# प्रकरण तीन

## लघुपाटबंधारे विभाग

**3.353 मौजे चाफे येथे कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधणे, तालुका मुरबाड**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर कामाकरीता रक्कम रुपये 13,54,965/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारनामा मध्ये नमुद केलेप्रमाणे काम सुरु करणेपूर्वी काम प्रगतीत असताना व काम पूर्ण झालेनंतरचे कामाचे छायाचित्र देयकासोबत जोडणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) त्या कामाचे देयकातून रुपये 66,445/- इतकी रक्कम स्वामित्वधनापोटी कपात केल्याचे दिसून आले आहे. या रकमेचा भरणा संबंधित लेखाशिर्षाखाली केल्याचे अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

3) या कामाच्या बाब क्रमांक 11, 12, 13 मध्ये एकूण रुपये 1,49,062.48 इतक्या रकमेची बचत करुन मूळ प्राकलनानुसार काम कार्यान्वीत केल्याचे दिसून येत नाही. तसेच या कामाच्या बाब क्रमांक 5,10 मध्ये मिळून मंजूर प्राकलना पेक्षा रुपये 2,45,021/- इतक्या रकमेचे जादा काम कार्यान्वीत केल्याचे दिसून येते. सबब या बाबीमध्ये सुध्दा मुळ मंजूर प्राकलनानुसार काम केल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम क्रमांक 118 नुसार मुळ अंदाजपत्रकात महत्त्वाचे घटनात्मक बदल आवश्यक असल्यास मूळ मंजूरी प्राधिका-याची परवानगी / आदेश घेणे आवश्यक आहे. वरील बाबीचे अवलोकन करता, या प्रकरणी अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. परिणामी मंजूर तांत्रिक प्राकलनापेक्षा बाबनिहाय कमी जादा खर्च केल्याचे दिसून आले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 87 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये खडी, मुरुम, सिमेंट, स्टील इत्यादी साहित्याचे शासकिय प्रयोगशाळा चाचणी अहवाल साहित्य वापरापूर्वी प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना दिनांक 31/03/2017 रोजी उशीराने चाचणी अहवाल घेण्यात आलेला आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/ प्र.क्र. 44/33, दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मापन पुस्तिकेंत नोंदी घेतल्यानंतर दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेत बाबनिहाय दिनांकित स्वाक्षरीच्या नोंदी नसल्याने तसेच मंजूर दैनंदिनी उपलब्ध न झाल्यामुळे मोजमाप पुस्तिकेतील नोंदी जागेवर घेऊन कामाची गुणवत्ता व दर्जा राखण्या संबंधी योग्य सनियंत्रण केले किंवा कसे, याची खात्री होत नाही. तसेच मोजमाप पुस्तिकेत काम केव्हा सुरु करणेत आले, याबाबतच्या नोंदी नाहीत.

6) 0 ते 100 हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या योजनांसाठी जोपर्यंत सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करण्यात येणार नाही, तोपर्यंत वित्तिय तरतूद करण्यात येवू नये, असे निर्देश ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक नागरी-2011/प्र.क्र.192/जल 1, दिनांक 02/02/2012 मध्ये दिले आहेत. तसेच योजनांसाठी सहकारी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याशिवाय कार्यारंभ आदेश देवू नये, असे निर्देशित केले आहे. याप्रकरणी अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

7) या कामाच्या प्रती हेक्टरी Benefit Ratio नुसार बंधा-याच्या लाभक्षेत्रातील लाभाधारकांना प्रती हेक्टरी रुपये 59,621/- इतके वार्षिक उत्पन्न मिळेल, असे गृहीत धरुन कामात प्रशासकिय, वित्तिय व तांत्रिक मान्यता देवून या कामावर रुपये 13,54,965/- इतका खर्च केला आहे. कामाचा Benefit Ratio ठरविताना प्रकल्पाची महत्तम उपयोगिता कृषी विभागाकडून निश्चित करुन घेणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. खुलासा करावा.

8) या प्रकल्पातून सिंचनासाठी पुरविलेल्या पाण्यापासून पाटबंधारे विभागाने ठरवून दिलेल्या पाणीपट्टीनुसार संबंधित लाभाधारकाकडून किती पाणीपट्टी वसूली करण्यात आली, याचा उल्लेख सदर कामाच्या प्रस्तावामध्ये कुठेही दिसून आला नाही. कारण मुख्यत: देखभाल दुरुस्तीचा खर्च हा पाणीपट्टी वसुलीतुन भागविणे आवश्यक आहे.

9) यापूर्वी सदरचा बंधारा केव्हा बांधला होता व त्यावर किती खर्च केल्याचा उल्लेख नस्तीमध्ये दिसून येत नाही.

**3.354 मौजे कानवे येथे सिमेंट कॉंक्रीट बंधारा बांधणे. तालुका शहापूर**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर कामाकरीता रक्कम रुपये 20,84,805/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारनामामध्ये नमुद केलेप्रमाणे काम सुरु करणेपूर्वी काम प्रगतीत असताना व काम पूर्ण झालेनंतर कामाचे छायाचित्र देयकासोबत जोडणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) या कामाचे देयकातून रुपये 1,32,894/- इतकी रक्कम स्वामित्वधनापोटी कपात केल्याचे दिसून आले आहे. या रकमेचा भरणा संबंधित लेखाशिर्षाखाली केल्याचे अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

3) कामाच्या Excess & Saving प्रमाणपत्रानुसार बाब क्रमांक 2, 3, 8 व 12 या बाबींवर अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा 10 टक्के जादा खर्च केला आहे. अंदाजपत्रकीय रकमेच्या 10 टक्के पेक्षा कमी / जादा खर्च झाल्यास त्याचे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118 प्रमाणे तात्रिक मंजुरी अधिकारी यांचेकडून Working Estimate करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 87 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 अन्वये खडी, मुरुम, सिमेंट, स्टील इत्यादी साहित्याचे शासकिय प्रयोगशाळा चाचणी अहवाल साहित्य वापरापूर्वी प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना सदर साहित्याचे चाचणी अहवाल काम पूर्ण झाल्यानंतर घेतल्याचे दिसून येते.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/ प्र.क्र. 44/33, दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मापन पुस्तिकेंत नोंदी घेतल्यानंतर दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेत बाबनिहाय दिनांकित स्वाक्षरीच्या नोंदी नसल्याने तसेच मंजूर दैनंदिनी उपलब्ध न झाल्यामुळे मोजमाप पुस्तिकेतील नोंदी जागेवर घेऊन कामाची गुणवत्ता व दर्जा राखण्यासंबंधी योग्य सनियंत्रण केले किंवा कसे, याची खात्री होत नाही. तसेच मोजमाप पुस्तिकेत काम केव्हा सुरु करणेत आले, याबाबतच्या नोंदी नाहीत.

6) 0 ते 100 हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या योजनांसाठी जोपर्यंत सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करण्यात येणार नाही, तोपर्यंत वित्तिय तरतूद करण्यात येवू नये, असे दिनांक 02/02/2012 मध्ये दिले आहेत. तसेच योजनांसाठी सहकारी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याशिवाय कार्यारंभ आदेश देवू नये, असे निर्देशित केले आहे. याप्रकरणी अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

7) या प्रकल्पातून सिंचनासाठी पुरविलेल्या पाण्यापासून पाटबंधारे विभागाने ठरवून दिलेल्या पाणीपट्टीनुसार संबंधित लाभाधारकाकडून किती पाणीपट्टी वसूली करण्यात आली, याचा उल्लेख दुरुस्ती प्रस्तावामध्ये कुठेही दिसून आला नाही. कारण मुख्यत: देखभाल दुरुस्तीचा खर्च हा पाणीपट्टी वसुलीतुन भागविणे आवश्यक आहे.

8) प्रशासकिय व तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे या प्रकल्पाच्या परिसरात भाजीपाला, दुध, फळे इत्यादी बाबींपासून प्रतिवर्ष मिळणा-या उत्पन्न प्राप्तीबद्दलची फलनिष्पती अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही.

**3.355 मौजे बांडेशेत मेर्दी क्रमांक 1 बंधारा पुर्नबांधणी करणे. तालुका मुरबाड.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर कामाकरीता रक्कम रुपये 9,85,339/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारनामामध्ये नमुद केलेप्रमाणे काम प्रगतीत असताना व काम पूर्ण झालेनंतरचे कामाचे छायाचित्र देयकासोबत जोडणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) या कामाचे देयकातून रुपये 51,475/- इतकी रक्कम स्वामित्वधनापोटी कपात केल्याचे दिसून आले आहे. या रकमेचा भरणा संबंधित लेखाशिर्षाखाली केल्याचे अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

3) या कामाच्या बाब क्रमांक 9 मध्ये एकूण रुपये 1,45,706/- इतक्या रकमेची बचत करुन मूळ प्राकलना नुसार काम कार्यान्वीत केल्याचे दिसून येत नाही. तसेच या कामाच्या बाब क्रमांक 8 मध्ये मंजूर प्राकलनापेक्षा रुपये 1,60,049/- इतक्या रकमेचे जादा काम कार्यान्वीत केल्याचे दिसून येते. सबब या बाबीमध्ये सुध्दा मुळ मंजूर प्राकलनानुसार काम केल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम क्रमांक 118 नुसार मुळ अंदाजपत्रकात महत्त्वाचे घटनात्मक बदल आवश्यक असल्यास मूळ मंजूरी प्राधिका-याची परवानगी / आदेश घेणे आवश्यक आहे. वरील बाबीचे अवलोकन करता, या प्रकरणी अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. परिणामी मंजूर तांत्रिक प्राकलनापेक्षा बाबनिहाय कमी जादा खर्च केल्याचे दिसून आले आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/ प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मापन पुस्तिकेंत नोंदी घेतल्यानंतर दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेत बाबनिहाय दिनांकित स्वाक्षरीच्या नोंदी नसल्याने तसेच मंजूर दैनंदिनी उपलब्ध न झाल्यामुळे मोजमाप पुस्तिकेतील नोंदी जागेवर घेऊन कामाची गुणवत्ता व दर्जा राखण्यासंबंधी योग्य सनियंत्रण केले किंवा कसे, याची खात्री होत नाही. तसेच मोजमाप पुस्तिकेत काम केव्हा सुरु करणेत आले, याबाबतच्या नोंदी नाहीत.

5) 0 ते 100 हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या योजनांसाठी जोपर्यंत सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करण्यात येणार नाही, तोपर्यंत वित्तिय तरतूद करण्यात येवू नये, असे निर्देश ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक नागरी-2011/प्र.क्र.192/जल 1, दिनांक 02/02/2012 मध्ये दिले आहेत. तसेच योजनांसाठी सहकारी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याशिवाय कार्यारंभ आदेश देवू नये, असे निर्देशित केले आहे. याप्रकरणी अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

6) या प्रकल्पातून सिंचनासाठी पुरविलेल्या पाण्यापासून पाटबंधारे विभागाने ठरवून दिलेल्या पाणीपट्टीनुसार संबंधित लाभाधारकाकडून किती पाणीपट्टी वसूली करण्यात आली, याचा उल्लेख दुरुस्ती प्रस्तावामध्ये कुठेही दिसून आला नाही. कारण मुख्यतः देखभाल दुरुस्तीचा खर्च हा पाणीपट्टी वसुलीतुन भागविणे आवश्यक आहे.

7) प्रशासकिय व तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे या प्रकल्पाच्या परिसरात भाजीपाला, दुध, फळे इत्यादी बाबींपासून प्रतिवर्ष मिळणा-या उत्पन्न प्राप्तीबद्दलची फलनिष्पती अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही. त्याप्रमाणे या बंधा-यामध्ये कुठल्याही गळतीशिवाय पाणी साठा होत आहे. अशा प्रकारे एका पावसाळयात चाचणी घेवून कामपूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले पाहिजे व त्याप्रमाणात ठेकेदाराची ठरावीक रक्कम राखून ठेवली गेली पाहीजे. अशा प्रकारची तरतूद निविदेच्या अटीशर्ती तयार करताना समाविष्ट केली गेली पाहीजे. तथापि, उपरोक्तप्रमाणे चाचणी घेतल्याचे प्रमाणपत्र नस्तीस दिसून येत नाही.

8) यापूर्वी सदरचा बंधारा केव्हा बांधला होता व त्यावर किती खर्च केल्याचा उल्लेख नस्तीमध्ये दिसून येत नाही.

9) कामाच्या करारनामा पत्रावर करारनामा केल्याचा दिनांक नमूद नाही.

**3.356 शेणसरी वाडूपाडा येथे सिमेंट काँक्रिट नाला बांध करणे. तालुका डहाणू.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद पालघर येथील सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षणात शेणसरी वाडूपाडा येथे सिमेंट काँक्रिट नाला बांध करणे, तालुका डहाणू या कामासाठी रक्कम रुपये 14,18,784/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) यांचे परिपत्रक दिनांक 03/08/2014 अन्वये Cleaning the site ही बाब निविदा कामात अंतर्भूत करू नये, असे आदेश असतांना बाब क्रमांक 1 मध्ये 220x 1.70 = 374 नुसार सफाई कामासाठी रुपये 374/- एवढी रक्कम प्रदान केलेली आहे. सदरची रक्कम लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. वसुली करून अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग व उर्जा विभागाचे शासन निर्णय क्रमांक बीसीए/2009/सीआर 108/लेबर-7अ, दिनांक 17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकराची 1टक्के रक्कम काम सुरु करण्यापूर्वी भरणा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, राजपत्र विक्रीकर आयुक्त, मुंबई यांची अधिसूचना दिनांक 30/03/2016 नुसार मूल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराकडून 2 टक्के प्रमाणे मूल्यवर्धित कर वसूल करण्यात यावा व मूल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून 5.5 टक्के प्रमाणे कर वसूल करण्यात यावा. कंत्राटदाराच्या देयकातून 5.5 टक्के प्रमाणे रक्कम रूपये 78,033/- वसूल करणे आवश्यक असताना रुपये 28,375/- कपात केलेली आहे. रक्कम रुपये 49,658/- कमी कपात केलेली आहे. सदर रक्कम वसूल करून अनुपालन दर्शवावे.

4) कार्यारंभ आदेश क्रमांक जा.क्र.पाजिप/लपावि/निविदा/34/2016-2017, दिनांक 01/03/2017 कार्यकारी अभियंता यांचे कार्यारंभ आदेशातील अटी व शर्ती नुसार मक्तेदाराने काम सुरु करण्यापूर्वी व काम झाल्यानंतर केलेल्या कामाचे छायाचित्रणे घेणे आवश्यक असतांना कामापूर्वीचे व काम झाल्यानंतरचे छायाचित्रणे घेतले नाहीत.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही नमुना नंबर 69 मध्ये व नियम 97 नुसार स्थावर मालमत्तेची नोंद नमुना नंबर 39 वर घेणे आवश्यक असताना नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 अन्वये प्रत्येक कामाचा करारनामा नमुना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंदवून मक्तेदाराला दिलेल्या रक्कमेच्या नोंदी नोंदवहीत करणे आवश्यक असताना नमुना नंबर 48 ठेवून कराराच्या नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक पीएम/1099/प्र.क्र.54/08, दिनांक 28/11/2009 नुसार रक्कम रुपये 20,000/- वरील कामाचे माहिती फलक लोखंडी फलकावर तयार करून बसविणे आवश्यक असतांना कामावर माहिती फलक बसविणेबाबत नाम फलकाचा फोटो नाही.

**3.357 कैनाड लोहारपाडा पुनर्बांधणी करणे, तालुका डहाणू.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद पालघर येथील सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षणात कैनाड लोहारपाडा पुनर्बांधणी करणे, तालुका डहाणू या कामासाठी रक्कम रुपये 19,44,160/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) यांचे परिपत्रक दिनांक 03/08/2017 अन्वये Cleaning the site ही बाब निविदा कामात अंतर्भूत करू नये, असे आदेश असतांना बाब क्रमांक 1 मध्ये 284 x 1.70 = 483/- नुसार सफाई कामासाठी रुपये 483/- एवढी रक्कम प्रदान केलेली आहे. सदरची रक्कम लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. वसुली करून अनुपालन दर्शवावे.

2) बाब क्रमांक 6 मध्ये Dewatering कामी रुपये 46,920/- खर्च दाखविलेली आहे. परंतु, Dewatering बाबत स्वतंत्र लॉगबुक ठेवलेले नाही व Dewatering विवरणपत्र देयकासोबत जोडलेले नाही. त्यामुळे सदर कामावर किती अश्वशक्तीचा पंप किती तासासाठी लावण्यात आला, याची तपासणी करता आली नाही. तरी Dewatering बाबत लॉगबुक किंवा विवरणपत्र उपलब्ध करावे अन्यथा रुपये 46,920/- वसूल करून अनुपालन दर्शवावे.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग व उर्जा विभागाचे शासन निर्णय क्रमांक बीसीए/2009/सीआर 108/लेबर-7अ दिनांक 17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकराची 1टक्के रक्कम काम सुरु करण्यापूर्वी भरणा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, राजपत्र विक्रीकर आयुक्त, मुंबई यांची अधिसूचना दिनांक 30/03/2016 नुसार मूल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराकडून 2 टक्के प्रमाणे मूल्यवर्धित कर वसूल करण्यात यावा व मूल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून 5.5 टक्के प्रमाणे कर वसूल करण्यात यावा. कंत्राटदाराच्या देयकातून 5.5 टक्के प्रमाणे रक्कम रूपये 1,06,029/- वसूल करणे आवश्यक असताना रुपये 39,098/- कपात केलेली आहे. रक्कम रुपये 67,831/- कमी कपात केलेली आहे. सदर रक्कम वसूल करून अनुपालन दर्शवावे.

5) कार्यारंभ आदेश क्रमांक जा.क्र.पाजिप/लपावि/निविदा/04/2016-2017, दिनांक 02/01/2017 कार्यकारी अभियंता यांचे कार्यारंभ आदेशातील अटी व शर्ती नुसार मक्तेदाराने काम सुरु करण्यापूर्वी व काम झाल्यानंतर केलेल्या कामाचे छायाचित्रणे घेणे आवश्यक असतांना कामा पूर्वीचे व काम झाल्यानंतरचे छायाचित्रणे घेतले नाहीत. याबाबत खुलासा करावा.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही नमुना नंबर 69 मध्ये व नियम 97 नुसार स्थावर मालमत्तेची नोंद नमुना नंबर 39 वर घेणे आवश्यक असताना नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. याबाबत खुलासा करावा.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 अन्वये प्रत्येक कामाचा करारनामा नमुना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंदवून मक्तेदाराला दिलेल्या रक्कमेच्या नोंदी नोंदवहीत करणे आवश्यक असताना नमुना नंबर 48 ठेवून कराराच्या नोंदी घेण्यात आल्या नाहीत. याबाबत खुलासा करावा.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीएम/1099/प्र.क्र.54/08 दिनांक 28/11/2009 नुसार रक्कम रुपये 20,000/- वरील कामाचे माहिती फलक लोखंडी फलकावर तयार करून बसविणे आवश्यक असतांना कामावर माहिती फलक बसविणेबाबत नाम फलकाचा फोटो नाही. याबाबत खुलासा करावा.

9) विमा संचलनालय यांचे पत्र क्रमांक प्रविवि 2903/ सहविमा/ जिप/ संकीर्ण/ अभियांत्रिकी/ एम-2 दिनांक 27/06/2003 प्रमाणे काम सुरु करताना काम करणाऱ्या मजुरांचा विमा उतरविणे आवश्यक असताना सदरची नस्ती तपासली असताना देयकातून रूपये 21,476/- कपात दर्शविलेली आहे. परंतू, विमा पावती रूपये 19,549/- अशी सादर केलेली आहे. त्यामुळे संबंधीतास रक्कम रुपये 1,927/- जादा अदा केलेली आहे. तरी संबंधीताकडून वसूल करुन लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

**3.358 विक्रमगड - मौजे मलवाडा बुरुजपाडा सिमेंट कॉक्रीट बंधारा बांधणे आदिवासी-उपयोजना जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत रक्कम रुपये 8,55,950/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका 1984 चे नियम 217 नुसार निविदा मंजूर झालेपासून 30 दिवसांचे आत कामाचा आदेश देणे असतानाही विलंबाने दिलेला आहे.

2) शासन निर्णय जलसंपदा विभाग जलसुधार प्रकल्प 1006/688/06, दिनांक 14/06/2017 अन्वये व दिनांक 31/07/2000 च्या शासन निर्णयानुसार सिंचन तलाव बांधकाम होणेपुर्वी शासनाने ठरवून दिलेल्या धोरणानुसार सहकारी पाणी वाटप संस्था स्थापन करून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे असतानाही तशी कार्यवाही केलेली नाही. फक्त करारनामामध्ये अट नोंद करून काम चालू केलेले आहे. परंतु, अद्यापपर्यंत पाणी वाटप संस्था स्थापन झालेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.1099/सी आर/ 54/ 08, दिनांक 20/05/1999 नुसार व शासन परिपत्रक क्रमांक 2009/प्र.क्र 81/प.रा-07, दिनांक 08/06/2009 अन्वये कामाच्या तपशिलासह दगडी किंवा लोखंडी माहिती फलक काम चालू करताना लावणे असतानाही तशी कार्यवाही केलेली नाही. बोर्ड लावणे संबधीचे कोणतेही लेखे नस्तीत जोडलेले नाहीत. त्यामुळे बाब क्रमांक 11 नुसार सदर कामास प्रदान रक्कम रुपये 21,924/- वसुली करावी.

4) महाराष्ट्र शासन, लघुपाटबंधारे विभाग, परिपत्रक क्रमांक आय डब्ल्यू-2264/18106/एलआय, दिनांक 06/10/1976 नुसार लॉग बुक व पाणी उपसा विवरणपत्र देयकासोबत जोडणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. त्यामुळे सदरच्या कामावर किती अश्वशक्तीचा पंप किती तासासाठी कोणत्या दिवशी वापरण्यात आला, याची खात्री करता आली नाही. त्यामुळे लॉग बुक व पाणी उपसा विवरणपत्र उपलब्ध करावे. बाब क्रमांक 11 नुसार सदरचा खर्च रक्कम (1,100 परिमाण x 23 दर)= रूपये 25,300/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

5) विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक 2303/सहविमा/जिप/संकीर्ण/अभियांत्रिकी/एम-2 दिनांक 27/06/2003 प्रमाणे काम सुरु करताना काम करणाऱ्या मजुरांचा विमा उतरवणे आवश्यक असतानाही अशी कार्यवाही न करता काम 22/04/2016 रोजी सुरु करूनही विमा त्यानंतर म्हणजे दिनांक 24/03/2017 रोजी उशिराने काढण्यात आलेला आहे.

6) विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक 2303/सहविमा/जिप/संकीर्ण/अभियांत्रिकी/एफ-2 दिनांक 27/06/2003 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील विविध योजनाबाबतचे कंत्राटी कामाचे विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे जमा करणे आवश्यक आहे. देयकातून 1 टक्के प्रमाणे रूपये 9,022/- विमा वसुली करणे आवश्यक असताना देयकातून केवळ रूपये 4,798/-विमा कपात करण्यात आल्याने शासनाचे रूपये 4,224/-इतक्या रक्कमेचे नुकसान झाले आहे. सदर कमी कपात रक्कम वसूल करून शासन खाती जमा करून अनुपालन दर्शवावे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक लपायो/1002/प्र.क्र.256/जल-3, दिनांक 07/05/2003 नुसार काम पूर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरुस्तीकरीता तलावाचे हस्तांतरण ग्रामपंचायतीकडे करून त्याचे सर्वेक्षण करून लाभधारकाकडून पाणीपट्टी ची रक्कम वसुली करून देखभाल दुरुस्ती करणे असतानाही तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे बंधारा फलश्रुती झाला असल्याची तपासणी करता येत नाही. ताबा पावतीवर ठराव क्रमांक व दिनांक नमूद नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासहिंता 1968 चे नियम 197 नुसार पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही नमुना नंबर 69 मध्ये व नियम 97 नुसार स्थावर मालमत्तेची नोंद नमुना नंबर 39 वर घेणे आवश्यक असताना नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

**3.359 सांगुळवाडी खालचीवाडी येथे संरक्षक भिंत बांधणे. तालुका वैभववाडी.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सांगुळवाडी खालचीवाडी येथे संरक्षक भिंत बांधणेकरीता रक्कम रूपये 4,97,000/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार साहित्य कामावर वापरण्यापूर्वी त्याची गुणवत्ता चाचणी घेणे आवश्यक आहे. सदर कामावर वापरलेली वाळू, खडी व स्टीलचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

2) सदर कामावर वाळू 10.80 ब्रास व खडी 21.52 ब्रास वापरण्यात आलेली आहे. वाळू व खडी 32.32 ब्रासची रॉयल्टी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक 67 महसूल व वनविभाग दिनांक 11/05/2015 नुसार खडी व वाळूसाठी प्रती ब्रास रक्कम रुपये 400/- प्रमाणे रुपये 12,928/- वसूल करणे आवश्यक आहे. सदर देयकातून रॉयल्टी रुपये 6,464/- वसूल केली आहे. उर्वरित रॉयल्टी रक्कम रुपये 6,464/- वसूल करून शासन सदरी भरणा करून पूर्तता सादर करावी.

3) अंदाजपत्रकात काही बाबींचे दर निश्चित करताना RATE ANALYSIS मध्ये 10 टक्के जादा दर आकारण्यात आलेला आहे. अतिप्रदान रक्कम रुपये 41,782/- वसूल करून शासन सदरी भरणा करून पूर्तता सादर करावी.

**3.360 कारीवडे पेडवे गावठाणवाडी येथे वळवणी बंधारा बांधणे, तालुका सावंतवाडी.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** कारीवडे पेडवे गावठाणवाडी येथे वळवणी बंधारा बांधणेकरिता रक्कम रूपये 19,61,016/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक 25 महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील सुधारणा दिनांक 24/04/2015 नुसार दहा लाख रुपयापर्यंत रूपये 500/- व दहा लाख रुपयांवरील रकमेच्या 0.1 टक्के दराने मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 19,61,016/- आहे. त्यामुळे रक्कम रुपये 1,500/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु, सदर कामाचा करारनामा रक्कम रुपये 1,200/- च्या मुद्रांक पेपरवर केला आहे. सबब रक्कम रुपये 300/- वसूल करून शासन सदरी भरणा करून पूर्तता सादर करावी.

2) सदर अनुदान खर्च करण्याची मुदत दिनांक 31/03/2016 असताना खर्च सन 2016-2017 या आर्थिक वर्षात केला आहे. सदर अनुदान खर्च करण्याबाबत सक्षम प्राधिकाराची मंजुरी घेतलेली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 मधील अंतर्भूत केलेल्या बाब क्रमांक 3 मध्ये नमूद केल्यानुसार पाणी वापर संस्था अध्यक्ष व कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे यांनी करारनामा करणे आवश्यक आहे. सदर करारनामा केलेला नाही.

4) सदर योजना पाणीवापर संस्थेकडे हस्तांतरित केलेली हस्तांतरण टिपणी नस्तीसोबत नाही.

5) सदर कामावर वाळू 39.48 ब्रास व खडी 78.97 ब्रास वापरण्यात आलेली आहे. RECOVERY STATEMENT वर सदर रॉयल्टीबाबत पास जोडल्याचे नमूद केले आहे. परंतु, नस्तीसोबत सदर पास जोडलेले नाहीत. त्यामुळे वाळू व खडी 118.45 ब्रासची रॉयल्टी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक 67 महसूल व वन विभाग, दिनांक 11/05/2015 नुसार खडी व वाळूसाठी प्रती ब्रास रक्कम रुपये 400/- प्रमाणे रुपये 47,380/- वसूल करून शासन सदरी भरणा करून पूर्तता सादर करावी.

**3.361 पळसंब खालचीवाडी येथे बंधारा बांधणे, तालुका मालवण.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** पळसंब खालचीवाडी येथे बंधारा बांधणेकरीता रक्कम रूपये 14,89,375/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार साहित्य कामावर वापरण्यापूर्वी त्याची गुणवत्ता चाचणी घेणे आवश्यक आहे. सदर कामावर वापरलेली वाळू, खडी व स्टीलचा चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

2) मापे मान्य असलेबाबत मक्तेदार स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 मधील अंतर्भूत केलेल्या बाब क्रमांक 3 मध्ये नमूद केल्यानुसार पाणी वापर संस्था अध्यक्ष व कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे यांनी करारनामा करणे आवश्यक आहे. सदर करारनामा केलेला नाही.

4) सदर योजना पाणीवापर संस्थेकडे हस्तांतरित केलेली हस्तांतरण टिपणी नस्तीसोबत नाही.

5) सदर कामावर वाळू 34.51 ब्रास व खडी 68.17 ब्रास वापरण्यात आलेली आहे. वाळू व खडी 102.68 ब्रासची रॉयल्टी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक 67 महसूल व वनविभाग दिनांक 11/05/2015 नुसार खडी व वाळूसाठी प्रती ब्रास रक्कम रुपये 400/- प्रमाणे रुपये 41,072/- वसूल करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या देयकातून रॉयल्टी रक्कम रुपये 20,535/- वसूल केली आहे. उर्वरित रॉयल्टी रक्कम रुपये 20,537/- वसूल करून शासन सदरी भरणा करून पूर्तता सादर करावी.

**3.362 सिमेंट कॉक्रीट बंधारा खारीनाला तालुकामालेगाव**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बाब क्रमांक 5 Providing erecting dismentaling RCC work (form work) चे एकूण काम 106.87 चौ.मी. करण्यात आलेले असून त्यासाठी रूपये 240.70 दर देण्यात आलेला आहे. CSR नुसार 1.5 मीटर उंचीपर्यंत रूपये 89.65 दर व 1.5 मीटर पेक्षा जास्त उंचीसाठी 240.70 दर देणे आवश्यक आहे. तथापि, संपूर्ण बाबीसाठी 240.70 दर दिल्यामुळे रक्कम रूपये 19,938/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदानाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

2) CSR मध्ये नमूद केल्यानुसार ठेकेदाराने प्रथम कामाच्या विम्याची रक्कम विमा संचालनालयाकडे भरणा करून जिल्हा परीषदेकडे विमा प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्यास प्रदान करावयाच्या देयकामध्ये विम्याची रक्कम समाविष्ट करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने स्वत: विमा रक्कम भरणा करून विमा प्रमाणपत्र जिल्हा परिषदेकडे सादर केलेले नाही. त्यामुळे देयकामध्ये विम्याची रक्कम समाविष्ट करणे आवश्यक नसतांनाही लघुपाटबंधारे विभागाने देयकामध्ये 1 टक्का विमा रक्कम रूपये 21,758/- समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे सदर जादा प्रदान रक्कमेची वसुली होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे.

4) सदर कामासाठी रुपये 1,300/- किंमतीच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक होते. तथापि, रुपये 1,200/- किंमतीच्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. त्यामुळे रुपये 100/- कमी मुद्रांकाची रक्कम संबंधिताकडून वसूल करावी.

5) बाब क्रमांक 8 construction of embankment साठी available material 865.12 घमी आणि borrow material 214.88 घमी वापरण्यात आलेले आहे.

खोदकामातून माती 116.44 घमी, कठीण मुरुम 616.25 घमी, मऊ दगड 228.56 घमी आणि कठिण दगड 120.20 घमी असे एकूण 1081.45 घमी एवढे material उपलब्ध झालेले होते. त्यामधून 20 टक्के प्लमसाठी 152.68 साहित्य वापरले म्हणजेच एकूण 928.77 घमी साहित्य उपलब्ध असताना 865.12 घमी साहित्य embankment साठी वापरण्यात आलेले आहे.

त्यामुळे 63.65 घमी साठी रूपये 173.70 प्रमाणे प्रदान केलेली रक्कम रूपये 11,056/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. सदरची रक्कम संबंधितांकडून वसुल करावी

**3.363 सिमेंट प्लग बंधारा नायगाव. तालुका सिन्नर.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** सिमेंट प्लग बंधारा कामाकरीता रक्कम रूपये 81,453/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बाब क्रमांक 6 Providing erecting dismentaling RCC work (form work) चे एकूण काम 370.72 चौमी. करण्यात आलेले असून त्यासाठी रूपये 252.70 दर देण्यात आलेला आहे. CSR नुसार 1.5 मीटर उंचीपर्यंत रूपये 89.65 दर व 1.5 मीटर पेक्षा जास्त उंचीसाठी 252.70 दर देणे आवश्यक आहे. तथापि, संपूर्ण बाबीसाठी 252.70 दर दिल्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रूपये 5,766/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदानाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

2) बाब क्रमांक 2, सिमेंट काँक्रिट 1:3:6 चे काम 280.19 घ.मी. एवढे केलेले असून रुपये 3089.50 प्रती घनमीटर अशी दर आकारणी केलेली आहे. अंदाजपत्रकातील दर पृथ:करण पाहिले असता वाळू चे लीड चार्जेस 62 कि.मी. एवढे घेतल्याचे आढळून आले. महाराष्ट्र शासन, आदेश क्रमांक संकीर्ण 2010/(570/2010)/ मोप्र -2, दिनांक 17/01/2015 नुसार कार्यकारी अभियंता यांना 25 किमी पर्यंत लीड चार्जेस मंजूर करता येतील तसेच त्यापेक्षा जादा लीड चार्जेस देण्याचे असल्यास अधीक्षक अभियंता यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. असे असतांना अधिक्षक अभियंता यांचे पुर्व मान्यतेशिवाय वरील प्रमाणे 25 कि.मी. पेक्षा जादा लीड चार्जेस (वाहतूक अंतर) घेऊन दर निश्चिती केल्यामुळे जादा प्रदान झाले आहे. सदर जादा प्रदान रक्कम रूपये 51,357/- वसुली होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे.

**3.364 साठवण बंधारा अजनाड नं. 1 ता.शिरपुर कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,40,283/- इतका खर्च झालेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 148(1) नुसार मक्तेदारास कार्यादेश देण्यापूर्वी करारनामा करुन घेण्यात येईल. विभागाने या नियमाप्रमाणे परिपूर्ण असा करारनामा न करता अत्यंत त्रोटक अशा प्रकारचा करार करुन घेतलेला आहे.

2) लघुसिंचन विभाग कार्यादेशावरील अट क्रमांक 2 नुसार सदरचे काम अदिवासी क्षेत्रात येत असल्याने व वन विभागाच्या क्षेत्रात येत नसल्योच संबंधित प्रकल्प अभियंता यांचे प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही. तसेच अटीनुसार नुसार उपअभियंता यांचे यापुर्वी कोणत्याही शिर्षातुन काम घेतल्याचे प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.199/सी.आर./54/03 दिनांक 20/05/2000 व कार्यारंभ आदेश दिनांक 24/03/2015 मधील अट क्रमांक 3 नुसार कामाच्या जागेवर दर्शनी फलक लावणे बंधनकारक राहील. तथापि, फलकाची फोटोप्रत नस्तीसोबत नाही. बाब क्रमांक 8 नुसार रूपये 1,000/- चे प्रदान केलेले आहे. तरी रक्कम रुपये 1,000/- वसुली करावी.

4) कार्यादेशातील अट क्रमांक 4 नुसार देयक सादर करतांना काम सुरु करण्यापुर्वीचे, काम सुरु असतांना व काम पुर्ण झालेनंतरचे छायाचित्र नाहीत.

5) शासकीय जागेचा 7/12 जागेचा ले आऊट / नकाशा नमुना 8 ड पत्रक प्राप्त नाही व बंधारा पुर्ण झालेनंतर मालमत्ता नोंदची छायांकित प्रत व हस्तांतरण व देखभाल दुरुस्तीचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध नाही. तसेच कार्यादेशातील अट क्रमांक 11 नुसार जागेचे कागदपत्र उपअभियंता यांचेकडुन प्राप्त करुन नस्तीसोबत लावलेले नाही.

6) कार्यादेश अट क्रमांक 12 प्रमाणे सदर कामाचे फोटो ऑनलाईन जलयुक्त् शिवार कक्षात अपलोड केल्याचे अभिलेखे नाहीत. तसेच त्रयस्त पक्षाकडुन तपासणी केल्याचा तपासणी अहवाल नाही. कामाचे प्रगतीत असतांनाचे पाच फोटोग्राफही नाहीत.

7) कार्यादेश अट क्रमांक 13 नुसार कामाचे देयक अदा करतांना आवश्यक असलेला ग्रामसभेचा ठराव घेणे बंधनकारक असतांना ठरावाची प्रत नस्तीसोबत लावलेल्या नाहीत.

8) कार्यादेश अट क्रमांक 14 नुसार कामाच्या दोष दायित्वाचा कालावधी पाच वर्षे असुन याबाबत ठेकेदाराकडुन अभिलेख तयार करुन नस्तीसोबत लावलेले नाहीत.

9) महाराष्ट् शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/प.रा.-7, दिनांक 19/10/2011 नुसार ग्रामपंचायतीने 1 लाखापेक्षा जास्त किंमतीचे साहित्य खरेदी करावयाचे असल्यास ई-टेंडरींगव्दारे खरेदी करणे बंधनकारक राहील. असे असतांना ग्रामपंचायतीने शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे.

10) उपरोक्त काम हे ग्रामपंचायतीने केलेले असून विक्रीकर सहआयुक्त यांचे पत्र क्रमांक विउओ (का.व.नि.)1/करदर/2009/14(2)/प्रशा-8/46, दिनांक 24/03/2015 नुसार ग्रामपंचायतीने जाहिर निविदा काढून व्यावसासिक कंत्राटदाराकडून काम पूर्ण केले असल्यास टीडीएस कपात करणे आवश्यक आहे. तसेच ग्रामपंचायतीने स्थानिक पुरवठादाराकडून साहित्य खरेदी करुन गावातील मंजूर लावून काम केल्यास टीडीएसची रक्कम कपात करणे आवश्यक नाही. ग्रामपंचायत कार्यकंत्राट कामाकरिता आवश्यक असलेले साहित्य स्थानिक पुरवठादारांकडून खरेदी करुन गावातील मजूराकरवी स्वत:च पूर्ण करुन घेत असेल, तर सदर व्यवहारामध्ये टीडीएसची तरतूद लागू होत नाही. मात्र ग्रामपंचायतीने केलेली कोणत्याही प्रकारची खरेदी ही कर बिजक, विक्रीचे देयक, रोखीचे नावं(कॅश मेमो)

इत्यादीच्या आधारे केलेली आहे, याची नस्तीसोबत योग्य अभिलेख (उपप्रमाणके) जोडलेले नसल्याने खात्री करता आली नाही. सबब टीडीएसची रक्कम रूपये 57,014/- वसूल करुन शासन सदरी भरणा करण्यात यावी.

11) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीएम-1099 /प्र.क्र. 44/33, दिनांक 22/12/2000 शासन निर्णयातील बाब क्रमांक 13 नुसार काम पूर्ण झालेवर काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तीकेत नोंदविणे आवश्यक असतानां तशी कार्यवाही झालेली नाही.

12) अंदाजपत्रकातील डिवॉटरींग या बाबीसाठी रक्क्म रुपये 6,437/- एवढा खर्च केलेला आहे. नस्तीसोबत मुळ लॉगबुक सहायक अभियंता यांचे स्वाक्षरीसह सादर केलेले आहे. परंतु, सदर लॉगबुक दिनांक 20/01/2016 ते 04/02/2016 पर्यंत आहे. काम सुरु असतांनाच्या छायाचित्रांची पडताळणी करता त्यात कोठेही पाणी असल्याचे दिसत नाही व काम सुरु असतांना टँकरव्दारे पाणीपुरवठा केल्याचे दिसत आहे. तरी सदरील रक्कम रूपये 6,437/- वसुलपात्र ठरते.

13) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.2010/प्र.क्र.पंरा-04, दिनांक 26/03/2010 व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचे दिनांक 30/04/2010 चे पत्रानुसार रुपये 01 लक्ष किमतीच्या कामास 5 झाडे याप्रमाणात झाडे लावुन त्यांना संरक्षण पिंजरा करुन झाडांचे संवर्धन करणेबाबत संबंधित काम करणाऱ्या यंत्रणेचे हमीपत्र आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.365 साठवण बंधारा भाटपुरा नं. 1 ता.शिरपुर कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 12,00,553/- इतका खर्च झालेला असून याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 148(1) नुसार मक्तेदारास कार्यादेश देण्यापूर्वी करारनामा करुन घेण्यात येईल. विभागाने या नियमाप्रमाणे परिपूर्ण असा करारनामा न करता,अत्यंत त्रोटक अशाप्रकारचा करार करुन घेतलेला आहे.

2) लघुसिंचन विभाग टिपणी दिनांक 23.11.2015 प्र.मं. आदेशावरील अट क्र.2 नुसार सदरचे काम अदिवासी क्षेत्रात येत असल्याने व वन विभागाच्या क्षेत्रात येत नसल्योच संबंधित प्रकल्प अभियंता यांचे प्रमाणपत्र नस्ती सोबत नाही. तसेच अट क्रमांक 4 नुसार उपअभियंता यांचे यापुर्वी कोणत्याही शिर्षातुन काम घेतल्याचे प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.199/सी.आर./54/03, दिनांक 20/05/2000 व कार्यारंभ आदेश दिनांक 24/03/2015 मधील अट क्रमांक 3 नुसार कामाच्या जागेवर दर्शनी फलक लावणे बंधनकारक राहील. तथापि, फलकाची फोटोप्रत नस्तीसोबत नाही. बाब क्रमांक 8 नुसार रूपये 1,000/- चे प्रदान केलेले आहे. तरी रक्कम रुपये 1,000/- वसुली करावी.

4) कार्यादेशातील अट क्रमांक 4 नुसार देयक सादर करतांना काम सुरु करण्यापुर्वीचे, काम सुरु असतांना व काम पुर्ण झालेनंतरचे छायाचित्र नाहीत.

5) शासकीय जागेचा 7/12 जागेचा ले आऊट / नकाशा नमुना 8 ड पत्रक प्राप्त नाही व बंधारा पुर्ण झालेनंतर मालमत्ता नोंदची छायांकित प्रत व हस्तांतरण व देखभाल दुरुस्तीचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध नाही. तसेच प्र.मा. अट क्रमांक 04 नुसार जागेचे कागदपत्र उपअभियंता यांचेकडुन प्राप्त करुन नस्तीसोबत लावलेले नाही.

6) तांत्रिक शाखेच्या तपासणी सुचीनुसार कामाचे देयक अदा करतांना आवश्यक असलेला ग्रामसभेचा ठराव घेणे बंधनकारक असतांना ठरावाची प्रत नस्तीसोबत लावलेल्या नाहीत.

7) सदर कामाबाबत ग्रामपंचायतीने देखाभाल व दुरस्ती करणेबाबतचा करारनामा अपुर्ण आहे. तसेच दोष दायित्व कालावधी नमुद नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/ प्र.क्र.172/ प.रा.-7, दिनांक 19/10/2011 नुसार ग्रामपंचायतीने 1 लाखापेक्षा जास्त किंमतीचे साहित्य खरेदी

करावयाचे असल्यास ई-टेंडरींगव्दारे खरेदी करणे बंधनकारक राहील. असे असतांना ग्रामपंचायतीने शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे.

9) उपरोक्त काम हे ग्रामपंचायतीने केलेले असून विक्रीकर सहआयुक्त यांचे पत्र क्रमांक विउओ (का.व.नि.)1/करदर/ 2009/14(2)/प्रशा-8/46, दिनांक 24/03/2015 नूसार ग्रामपंचायतीने जाहिर निविदा काढून व्यावसायिक कंत्राटदाराकडून काम पूर्ण केले असल्यास टीडीएस कपात करणे आवश्यक आहे. तसेच ग्रामपंचायतीने स्थानिक पुरवठादाराकडून साहित्य खरेदी करुन गावातील मजूर लावून काम केल्यास टीडीएसची रक्कम कपात करणे आवश्यक नाही. ग्रामपंचायत कार्यकंत्राट कामाकरिता आवश्यक असलेले साहित्य स्थानिक पुरवठादारांकडून खरेदी करुन गावातील मजूराकरवी स्वतःच पूर्ण करुन घेत असेल, तर सदर व्यवहारामध्ये टीडीएसची तरतूद लागू होत नाही. मात्र ग्रामपंचायतीने केलेली कोणत्याही प्रकारची खरेदी ही कर बिजक, विक्रीचे देयक, रोखीचे नावं(कॅश मेमो) इत्यादीच्या आधारे केलेली आहे, याची नस्तीसोबत योग्य अभिलेख (उपप्रमाणके) जोडलेले नसल्याने खात्री करता आली नाही. सबब टीडीएसची रक्कम रूपये 60,028/- वसूल करून शासन सदरी भरणा करण्यात यावी.

10) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, नाशिक यांचे पत्र क्रं.ल.सि./ (जलसंधारण) मं./ना/प्रंशा-3/4142/सन 2016, दिनांक 22/10/2016 अन्वंये 25 किमी पेक्षा जादा वाहतुक दर मंजुर केलेल्या यादीत उपरोक्तं नमुद कामाचे नाव नाही. प्राकलनाप्रमाणे मेटल-25 किमी, रेती-8 किमी याप्रमाणे वाहणावळ अंतर नमुद केलेले आहे. तथापि, तहसिल कार्यालयाकडुन मंजुर झालेला खदान नकाशा नस्तीसोबत नाही. त्यामुळे अंतराची पडताळणी करता आली नाही. महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन आदेश क्रमांक संकीर्ण 2010/(570/2010)/मोप्र.-2, दिनांक 17/01/2015 नुसार वहन अंतरास मान्यंता देण्या-या अधिका-याने खदानीपासुनची वहन अंतर तपासणी सक्षम स्तंरावर झाली असल्याचे तसेच खदाणी मधील बांधकाम साहित्याची चाचणी घेऊन सदरील साहित्यं बांधकामासाठी योग्यं असल्याचे गुणनियंत्रण विभागाचे प्रमाणपत्र नस्तीसोबत नसतांना वहन अंतरास मान्यंता दिलेली आहे.

11) लेखापरीक्षणासाठी मोजमाप पुस्तंक उपलब्ध करण्यात आले नाही. सबब प्राकलनातील मोजमापे व देयकातील मापे यांची पडताळणी करता आली नाही.

**3.366 साठवण बंधारा अजनाड नं. 2 ता.शिरपुर कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 10,19,603/- इतका खर्च झालेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 148(1) नुसार मक्तेदारास कार्यादेश देण्यापूर्वी करारनामा करुन घेण्यात येईल. विभागाने या नियमाप्रमाणे परिपूर्ण असा करारनामा न करता अत्यंत त्रोटक अशा प्रकारचा करार करुन घेतलेला आहे.

2) लघुसिंचन विभाग टिपणी दिनांक 23/11/2015 प्र.मं. आदेशावरील अट क्रमांक 2 नुसार सदरचे काम अदिवासी क्षेत्रात येत असल्याने व वन विभागाच्या क्षेत्रात येत नसल्योच संबंधित प्रकल्प अभियंता यांचे प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही. तसेच अट क्रमांक 4 नुसार उपअभियंता यांचे यापुर्वी कोणत्याही शिर्षातुन काम घेतल्याचे प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.199/सी.आर./54/03, दिनांक 20/05/2000 व कार्यारंभ आदेश दिनांक 24/03/2015 मधील अट क्रमांक 3 नुसार कामाच्या जागेवर दर्शनी फलक लावणे बंधनकारक राहील. तथापि, फलकाची फोटोप्रत नस्तीसोबत नाही. बाब क्रमांक 8 नुसार रूपये 1,000/- चे प्रदान केलेले आहे. तरी रक्कम रुपये 1,000/- वसुली करावी.

4) कार्यादेशातील अट क्रमांक 4 नुसार देयक सादर करतांना काम सुरु करण्यापुर्वीचे, काम सुरु असतांना व काम पुर्ण झालेनंतरचे छायाचित्र नाहीत.

5) शासकीय जागेचा 7/12 जागेचा ले आऊट / नकाशा नमुना 8 ड पत्रक प्राप्त नाही व बंधारा पुर्ण झालेनंतर मालमत्ता नोंदची छायांकित प्रत व हस्तांतरण व देखभाल दुरुस्तीचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध

नाही. तसेच कार्यादेशातील अट क्रमांक 11 नुसार जागेचे कागदपत्र उपअभियंता यांचेकडुन प्राप्त करुन नस्तीसोबत लावलेले नाही.

6) कार्यादेश अट क्रमांक 14 नुसार कामाच्या दोष दायित्वाचा कालावधी पाच वर्षे असुन याबाबत ठेकेदाराकडुन अभिलेख तयार करुन नस्तीसोबत लावलेले नाहीत. परंतु, रूपये 100/- चा करारनामा करुन हस्तांतर ग्रामपंचायतीस करुन देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ग्रामपंचायची राहील, असा असुन प्रत्यंक्षात मक्तेदाराने देखभाल करण्याची 5 वर्षापावेतो जबाबदारी घेतली पाहिजे. सदर बाब सर्वस्वी नियमबाहय आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/प.रा.-7, दिनांक 19/10/2011 नुसार ग्रामपंचायतीने 1 लाखापेक्षा जास्त किंमतीचे साहित्य खरेदी करावयाचे असल्यास ई-टेंडरींगव्दारे खरेदी करणे बंधनकारक राहील. असे असतांना ग्रामपंचायतीने शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे.

8) उपरोक्त काम हे ग्रामपंचायतीने केलेले असून विक्रीकर सहआयुक्त यांचे पत्र क्रमांक विउओ(का.व.नि.)1/करदर/2009/14(2)/प्रशा-8/46] दिनांक 24/03/2015 नुसार ग्रामपंचायतीने जाहिर निविदा काढून व्यावसायिक कंत्राटदाराकडून काम पूर्ण केले असल्यास टीडीएस कपात करणे आवश्यक आहे. तसेच ग्रामपंचायतीने स्थानिक पुरवठादाराकडून साहित्य खरेदी करुन गावातील मजूर लावून काम केल्यास टीडीएसची रक्कम कपात करणे आवश्यक नाही. ग्रामपंचायत कार्यकंत्राट कामाकरिता आवश्यक असलेले साहित्य स्थानिक पुरवठादारांकडून खरेदी करुन गावातील मजूराकरवी स्वतःच पूर्ण करुन घेत असेल, तर सदर व्यवहारामध्ये टीडीएसची तरतूद लागू होत नाही. मात्र ग्रामपंचायतीने केलेली कोणत्याही प्रकारची खरेदी ही कर बिजक, विक्रीचे देयक, रोखीचे नावं(कॅश मेमो) इत्यादीच्या आधारे केलेली आहे, याची नस्तीसोबत योग्य अभिलेख (उपप्रमाणके) जोडलेले नसल्याने खात्री करता आली नाही. सबब टीडीएसची रक्कम रूपये 50,980/- वसूल करुन शासन सदरी भरणा करण्यात यावी.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीएम-1099 /प्र.क्र. 44/33, दिनांक 22/12/2000 शासन निर्णयातील बाब क्रमांक 13 नुसार काम पूर्ण झालेवर काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक असतानां तशी कार्यवाही झालेली नाही.

10) अंदाजपत्रकातील डिवॉटरींग या बाबीसाठी रक्क्म रुपये 3,210.60/- एवढा खर्च केलेला आहे. नस्तीसोबत मुळ लॉगबुक सहायक अभियंता यांचे स्वाक्षरीसह सादर केलेले आहे. परंतु, सदर लॉगबुक दिनांक 24/01/2016 ते 04/02/2016 पर्यंत आहे. काम सुरु असतांनाच्या छायाचित्रांची पडताळणी करता त्यात कोठेही पाणी असल्याचे दिसत नाही. याउलट टॅंकरव्दारे पाणीपुरवठा केला आहे, हे छायाचित्रावरुन स्पष्टं होते. तरी सदरील रक्क्म रुपये 3,210.60/- वसुलपात्र ठरते.

**3.367 मौजे मंदाणे नंबर 1 साठवण बंधारा तालुका शहादा जिल्हा नंदुरबार**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 16, दिनांक 06/08/2016 अन्वये रक्कम रुपये 8,77,358/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) माहिती दर्शक फलक बसविणेत आलेला नाही. त्यामुळे बाब क्रमांक 10 मध्ये माहिती दर्शक फलक बसविणेसाठी केलेले एकूण प्रदान रूपये 2,930/- अनुज्ञेय ठरत नाही. सदरची रक्कम वसूल करणेत यावी.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 153(3) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अतिरिक्त सुरक्षा घेऊन निविदा पेक्षा 10 टक्के पेक्षा जास्त कमी रकमेची निविदा मंजुर करणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

3) कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी संबंधित कंत्राटी कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमापत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. आदेशाप्रमाणे कार्यवाही न करता, नियमबाह्य देयकामधून विमा रक्कम कपात केली आहे. त्यामुळे योजनेचा मुळ हेतू सफल झाला नाही

4) सार्वजनिक बांधकाम विभाग, परीपत्रक क्रमांक सीएटी/1087/सी.आर-94/बीएलडीजी/2, दिनांक 14/06/1989 अन्वये कंत्राटदार यांचे निविदा मंजूर झाल्यापासुनच्या तारखेपासुन 10 दिवसांचे आत टेंडरमध्ये नमुद

केलेले डिपॉझीटची रक्कम रोख स्वरुपात किंवा राष्टीयकृत बॅकेची ठेव पावती कार्यकारी अभियंता यांचे नावे तारण पुढील एक वर्ष मुदत असलेली घेणे आवश्यक असतांना कंत्राटदार यांचे देयकातुन कपात करणेत आलेली आहे सदर शासन आदेशानुसार कार्यवाही करणेत आलेली नाही

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 परिच्छेद क्रमांक 17 नुसार जिल्हा परिषद पातळीवर गुणवत्ता नियंत्रणासाठी विहित प्रक्रिया अंगीकारुन आऊटसोर्सिंग पध्दतीने त्रयस्थ पक्ष नियंत्रण कक्ष गठीत करुन होणारी कामे यांचा दर्जा व गुणवत्ता विहित केलेल्या निकषानुसार राहील याची खबरदारी घ्यावी, असे सूचित केलेले आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

6) अंदाजपत्रकातील Benefit cost analysis नुसार दरवर्षी बंधाऱ्यामुळे फायदा शेतकऱ्यांना होणार असल्याचे नमुद आहे. तथापि, बंधारा पुर्ण झाल्यानंतर सदर फायदा खरच शेतकऱ्यांना झाला काय? याचा फलनिष्पती अहवाल प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे.

7) कामाचा करारनामा करण्यात आलेला नाही. याबाबत खुलासा करावा व नियमानुसार काम झाले असल्याबाबतची खात्री पटवावी.

8) दिनांक 01/04/2012 पासून 5 टक्के दराने वॅट कर वसुल करणे आवश्यक आहे त्या अनुषंगाने कामाच्या नस्तीची तपासणी केली असता, त्यामध्ये कंत्राटदार यांनी विक्रीकर विभागाकडे नोंदणी केल्याची कागदपत्रे आढळली नाहीत. त्यामुळे ते नोंदणीकृत नसल्याने वरीलप्रमाणे 5 टक्के इतका मुल्यवर्धित कर कपात करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम रुपये 8,774/- संबधिताकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करावा.

9) बाब क्रमांक 5 - M-10 (1:3:6) चे एकूण काम 197.94 चौ.मी. करण्यात आलेले आहे. त्यामधून 20 टक्के प्लम वजा करणे आवश्यक होते. तथापि, 20 टक्के प्लम वजा न केल्यामुळे 69.54 चौ.मी. साठी रूपये 3,123.44 दराने एकूण रूपये 1,23,650/- चे जादा प्रदान झालेले आहे.

10) व्यवस्थ पार्टी SQM राज्य गुणवत्ता निरीक्षक अंतिम मुल्यांकन अहवालात मुद्दा क्रमांक 8 काम करण्याची पध्दत 1:2:4 अशी दाखविण्यात आलेली आहे. परंतु, सदर कामात कोठेही 1:2:4 वापर न करता 1:3:6 वापर करण्यात आलेला आहे. त्यामुळे कामाची गुणवत्ता खरी काय आहे, याबाबत स्पष्ट होत नाही.

11) सदर कामाचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग यांनी तांत्रिक मान्यता प्रदान करणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही

12) कामाची छायाचित्रे प्रमाणीत केलेली नाहीत. त्यावर कामाचे नांव छायाचित्र क्रमांक नमुद नाही.

13) कार्यकारी अभियंता यांनी मोजमाप पुस्तक क्रमांक 1772 पान क्रमांक 38, 39 वर तपासणी करता मान्यता आढळुन येत नाही. तरी मान्यता घेण्यात यावी.

### 3.368 मौजे मंदाणे नंबर 4 साठवण बंधारा तालुका शहादा जिल्हा नंदुरबार

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 7, दिनांक 31/09/2016 अन्वये रक्कम रुपये 7,89,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी संबंधित कंत्राटी कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमापत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. आदेशाप्रमाणे कार्यवाही न करता, नियमबाह्य देयकामधून विमा रक्कम कपात केली आहे. त्यामुळे योजनेचा मुळ हेतू सफल झाला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 150 नुसार तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाज तयार करुन त्यांचे तंत्र शाखेत परिनिरीक्षण करणे आवश्यक आहे. तदनुसार कार्यवाही करण्यात यावी.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 परिच्छेद क्रमांक 17 नुसार जिल्हा परिषद पातळीवर गुणवत्ता नियंत्रणासाठी विहित प्रक्रिया अंगीकारुन आऊटसोर्सिंग पध्दतीने त्रयस्थ पक्ष नियंत्रण कक्ष गठीत करुन होणारी कामे यांचा दर्जा व गुणवत्ता

विहित केलेल्या निकषानुसार राहील, याची खबरदारी घ्यावी, असे सूचित केलेले आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968, नियम 147 व 197 नुसार पुर्ण कामाच्या नोंदी नमुना नंबर 69 मधील पुर्ण कामांची नोंदवहीतील स्तंभ 1 ते 9 व नमुना नंबर 48 मधील करार नोंदवहीतील स्तंभ 1 ते 12 मध्ये आणि नमुनामध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु, सदरच्या नोंदवहया लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेत आलेल्या नाहीत. नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) अंदाजपत्रकातील Benefit cost analysis नुसार दरवर्षी बंधाऱ्यामुळे फायदा शेतकऱ्यांना होणार असल्याचे नमुद आहे. तथापि, बंधारा पुर्ण झाल्यानंतर सदर फायदा खरच शेतकऱ्यांना झाला काय? याचा फलनिष्पती अहवाल प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे.

6) कंत्राटदार यांनी विक्रीकर विभागाकडे नोंदणी केल्याची कागदपत्रे आढळली नाहीत. त्यामुळे ते नोंदणीकृत नसल्याने वरीलप्रमाणे 5 टक्के इतका मुल्यवर्धित कर कपात करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम रुपये 7,890/- संबधिताकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करावा.

7) बाब क्रमांक 5 - M-10 (1:3:6) चे एकूण काम 178.57 चौ.मी. करण्यात आलेले आहे. त्यामधून 20 टक्के प्लम वजा करणे आवश्यक होते. तथापि, 20 टक्के प्लम वजा न केल्यामुळे 35.71 चौ.मी. साठी रुपये 3,123.44 दराने एकूण रूपये 1,11,550 /- चे जादा प्रदान झालेले आहे.

8) अंदाजपत्रक, तात्रिक मंजुरी आदेश क्रमांक जिपंनं/लसीवी/सांब/तामा/77/15/-16, दिनांक 12/01/2016 नुसार content / capacity table मध्ये 9.37 gross capacity मध्ये पुन्हा 2 x 9.37 = 18.74 T.C.M डबल केलेले आहे. लेखापीरक्षणास याबाबत खात्री पटवावी.

9) कामाची छायाचित्रे प्रमाणीत केलेली नाहीत. त्यावर कामाचे नांव छायाचित्र क्रमांक नमुद नाही.

10) कामाची सिमेंट देयके प्रमाणित केलेले नाहीत.

### 3.369 मौजे कुंभारी ता जामनेर येथील पाझर तलाव दुरुस्ती

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1539, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 16,14,425/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 2004/प्र.क्र.18/वित्तं-9 (33) दिनांक 30/06/2004 आणि शासन निर्णय क्रमांक ग्रासभी 2007/प्र.क्र.1/मो.9, दिनांक 08/05/2007 मधील परीच्छेद 3.2.8 नुसार मजुर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व ग्रामपंचायत यांना व नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यामध्ये 33:33:34 या प्रमाणात कामाचे वाटप करावयांचे आहे. याबाबत प्रत्येक वेळी काम वाटप करतांना सदरचे प्रमाणाप्रमाणे विभागाने कार्यावाही केलेबाबत कामवाटप समितीचे कामे वाटपाबाबतची नोंदवही उपलब्ध झालेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 150 नुसार तांत्रिक मंजुरी देण्यापुर्वी तपशिलवार नकाशे व अंदाज तयार करुन त्यांचे तंत्र शाखेत सविस्तर परिनिश्चित करने आवश्यक आहे. तथा कार्यावाही करण्यात आलेली नाही.

3) मुख्य अभियंत (स्थानिक स्तर ) पुणे यांचेकडील परीपत्रक क्रमांक मुअ/उविअ-2/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये क्लरींग द साईट बाब अंदाजपत्रकात अतर्भत करणेत येऊ नये, असे असतांना मोजमाप पुस्तिका क्रमांक 1254 मध्ये बाब क्रंमाक 1 मध्ये रक्कम रुपये अंदाजपत्रकात तरतुद करुन रक्कम रुपये 23,718/- कंत्राटदार यांना प्रदान करण्यात आली आहे. तरी सदरची रक्कम संबधीताकडुन वसुल करुन शासन सदरी भरणा करण्यात यावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक व्हीपीए 1099/सीआर/54/03, दिनांक 20/05/1999 अन्वये प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहीती दर्शविणारा फलक दोष निवारण कालावधीसह कंत्राटदार यांनी बसविणे आला आहे. तथापि, नस्तीमध्ये जोडलेल्या कामाच्या छायाचित्रामध्ये

माहिती फलकातील मजकुर शासन निर्णयात दिलेल्या तपशीलाप्रमाणे असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे फलक बसविण्याचा उदेश सफल होत नाही.

5) पाझर तलाव दुरुस्तीसाठी मोजमाप पुस्तिका 1254 मध्येखालील परीमाणावर गौणखनिजाची आकारणी केलेली नाही. रॉयल्टीची रक्कम रूपये 1,37,648/- संबधीताकडुन वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

6) निविदा अटीनुसार जर एखादया कामाच्या बाबीवर 25 टक्के बदल व रुपये 5,000/- जे अधिक असेल, त्या विषयी सुधारीत तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. महराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते-1, दिनांक 11/06/2014 प्रमाणे कामाचे अंदाज पत्रक व वस्तुनिष्ठ परिस्थितीवर आधारीत असावे. काही बाबी अंदाज पत्रकातील परिमाणात बदल होणे अटल असल्यास त्याचा सविस्तर प्रस्ताव करणासह कार्यकारी अभियंता यांना उपअभियंता यांनी सादर केलेला नाही. त्यामूळे रक्क्म रूपये 73,354/- ज्यादा प्रदान झालेले आहे.

**3.370 मौजे वाणेगांव तालुका पाचोरा येथील साठवण बंधारा बांधकामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदर बाबत रक्कम रुपये 14,69,277/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता (स्थानिक स्तर) पुणे यांचेकडील परीपत्रक क्रमांक मु.अ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये क्लीअरींग द साईड ही बाब अंदाजपत्रकात अंतर्भुत करणेत येऊ नये, असे असतांना मोजमाप पुस्तिका क्रमांक 406 मध्ये बाब क्रमांक 1 मध्ये रक्कम रुपये 1,863/- अंदाजपत्रकात तरतुद करणेत येऊन रक्कम रुपये 1,863/- कंत्राटदार यांना प्रदान करण्यात आली आहे. तरी सदरची रक्कम रुपये 1,863/- संबधितांकडुन जबाबदारी निश्चती करुन वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

2) कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी संबंधित कंत्राटी कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमापत्राची प्रत जिल्हापरिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. आदेशाप्रमाणे कार्यवाही न करता, नियमबाहय देयकामधून विमा रक्कम कपात केली आहे. त्यामुळे योजनेचा मुळ हेतू सफल झाला नाही

3) बाब क्रमांक 11 मध्ये CONSTRUCTION OF EMBANICMENT FOR BOUND अन्वये एकुण स्टॅडर्ड स्पेशिफिकेशन आरडी 16.10 नुसार माती व मुरुम भरावासाठी वापरलेले असेल आणि सदर बांधकामाचे मोजमाप घेण्यात आलेले असेल, तर पावसाळयापुर्वी 15 टक्के व पावसाळयानंतर 10 टक्के सिकेंज वाजावट करणे आवश्यक असतांना सदरचे काम हे दिनांक 30/03/2017 रोजी पुर्ण झालेले असुन GUIDE BOUND दबाई मोजमाप पुस्त्किा ॲटम नंबर 7 मध्ये करणेत आलेली असुन सदरच्या कामामध्ये 5 टक्के कमी सिंकेज वजा केलेली असल्यामुळे कंत्राटदार यांना रक्कम रुपये 9,030/- एवढे जादा प्रदान झालेले असुन सदरची रक्कम संबधिताकडुन वसुल करावी.

4) अंदांजपत्रकीय तरतुदीअंतर्गत खर्च केला असला तरीही बाबनिहाय खर्चाचे कमी / अधिक प्रमाण पहाता प्राकलनापेक्षा फारच तफावत असल्याने संकल्पाचित्रात बदल होत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे नियमाप्रमाणे सुधारित तांत्रिक मान्यता घेऊनच अंतिम प्रदान करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. प्रस्तुत कामाच्या संचिकेत संलग्न कामाच्या वाढघट टिपणी अन्वये कमी-अधिक बाबींना मंजूरी दिलेली नाही. फक्त AS Per execution of work म्हणुन मान्यता दिलेली आहे. सदरची बाब नियमोचित नाही.

5) कामवाटप समितीचे काम वाटपाबाबतची नोंदवहीची मागणी केलेली असतानाही, ती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे काम वाटप समितीने शिफारस असल्याची व विहीत प्रमाणात वाटप करण्यात आल्याची खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जलशि- 2015/प्र.क्र. 115/जल, दिनांक 13/03/2015 अन्वये मुद्दा क्रमांक 01 नुसार काम सुरु असतांना कामाचे किमान 02 वेळा समवर्ती मुल्यमापन रोजगार हमी योजना विभागाच्या कामांचे ज्या पध्दतीने Quality Control Moniter यांचेमार्फत करण्यात येते,

त्याप्रमाणे समवर्ती मुल्यमापन करण्यात यावे, असे नमुद आहे. तथापि, अशी कार्यवाही केल्यांची नस्तीसोबत आढळून आले नाही.

7) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जलशि- 2015/प्र.क्र.115/जल-7, दिनांक 13/03/2015 अन्वेय कामे पुर्ण झाल्यानंतर कामांचे त्रयस्त यंत्रणेमार्फत / संस्थेमार्फत मुल्यमापन करण्यात यावे, असे नमुद आहे. तथापि, अशी कार्यवाही केल्यांची नस्तीसोबत आढळून आले नाही.

8) ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1088/सीआर/3041/ 26, दिनांक 14/09/1988 नुसार जेथे बांधकाम करावयाचे आहे, ती जागा संरक्षित केल्या शिवाय कार्यारंभ आदेश देऊ नये, असे असताना तशी कार्यवाही झालेली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 नियम 197 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

10) साहित्य वापरण्यापुर्वी प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करणे, असे निर्देश आहेत. तथापि, सदर कामासाठी चाचणी अहवाल दिनांक 23/03/2017 रोजी प्राप्त झालेला असुन काम पुर्णत्वाचा दाखला दिनांक 30/03/2017 रोजीचा आहे. यावरुन कामावर वापरण्यात आलेले साहित्य चाचणी न करता वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे कामावरील साहित्यांची व कामाच्या दर्जाबाबत खात्री पटवावी.

**3.371 मौजे वडजी-5 तालुका भडगांव येथील सिंमेट नाला बांधकामातील अनियमितता**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** सदरबाबत रक्कम रुपये 10,32,104/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता (स्थानिक स्तर) पुणे यांचेकडील परीपत्रक क्रमांक मु.अ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये क्लीअरींग द साईड ही बाब अंदाजपत्रकात अंतर्भुत करणेत येऊ नये, असे असतांना मोजमाप पुस्तिका क्रमांक 1982 मध्ये बाब क्रमांक 1 मध्ये रक्कम रुपये 5,400/- अंदाजपत्रकात तरतुद करणेत येऊन रक्कम रुपये 5,400/- कंत्राटदार यांना प्रदान करण्यात आली आहे. तरी सदरची रक्कम रुपये 5,400/- संबधितांकडुन जबाबदारी निश्चती करुन वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

2) कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी संबंधित कंत्राटी कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमा पत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. आदेशाप्रमाणे कार्यवाही न करता, नियमबाह्य देयकामधून विमा रक्कम कपात केली आहे. त्यामुळे योजनेचा मुळ हेतू सफल झाला नाही.

3) प्रादेशिक दरसुचीत गौण खनिजावरील स्वामित्व शुल्क हे महसुल व वन विभागाचे दिनांक 11/02/2010 च्या शासन निर्णयानुसार ज्या बाबींमध्ये साहित्याकरिता स्वामित्व शुल्क लागू आहेत त्या बांबीच्या दरामध्ये स्वामित्व शुल्क अंतर्भुत करण्यात आले आहेत, असे असतानाही बाब क्रमांक 11 उपलब्ध साहित्यांचा वापर केल्याने त्यावरील स्वामित्व धनाचे शुल्काची रक्कम रूपये 51,248/- शासन सदरी भरणा न केल्याने सदरची रक्कम वसुल करुन शासन सदरी भरणा करावी.

4) प्रस्तुत कामाच्या संचिकेत संलग्न कामाच्या वाढ-घट तक्त्यानुसार कमी - जास्त केलेला खर्च आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 120(2) प्रमाणे अंदाजपत्रकातील काही बाबींचे काम न केल्यामुळे होणारी बचत इतर बाबींवर खर्च करता येणार नाही. तसेच नियम 153(1) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी मक्तेदाराची आहे. अंदाजपत्रकाप्रमाणे काम करुन घेण्याची जबाबदारी अभियंत्याची आहे, असे नमुद असतांनाही उपरोक्त नमूद केलेप्रमाणे एका बाबीवरील बचत दुस्या बाबींवर वापरण्यात आली आहे. एखाद्या बाबींवर बचत करुन अन्य बाबीवर अधिक खर्च केलेला असल्याने नियम 153(2) नुसार सक्षम प्राधिका-यांची लेखी मान्यता घेतलेली नाही.

प्रस्तुत कामाच्या संचिकेत संलग्न कामाच्या वाढ्घट टिपणी अन्वये कमी-अधिक बाबींना मंजूरी दिलेली नाही. फक्त AS Per execution of work म्हणुन मान्यता दिलेली आहे. सदरची बाब नियमोचित नाही.

5) कामवाटप समितीचे काम वाटपाबाबतची नोंदवहीची मागणी केलेली असतानाही, ती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे काम वाटप समितीने शिफारस असल्याची व विहीत प्रमाणात वाटप करण्यात आल्याची खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जलशि- 2015/प्र.क्र. 115/जल, दिनांक 13/03/2015 अन्वये मुद्दा क्रमांक 01 नुसार काम सुरु असतांना कामाचे किमान 02 वेळा समवर्ती मुल्यमापन रोजगार हमी योजना विभागाच्या कामांचे ज्या पध्दतीने Quality Control Moniter यांचे मार्फत करण्यात येते, त्याप्रमाणे समवर्ती मुल्यमापन करण्यात यावे, असे नमुद आहे. तथापि, अशी कार्यवाही केल्यांची नस्तीसोबत आढळून आले नाही.

7) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जलशि- 2015/प्र.क्र.115/जल-7, दिनांक 13/03/2015 अन्वेय कामे पुर्ण झाल्यानंतर कामांचे त्रयस्त यंत्रणेमार्फत / संस्थेमार्फत मुल्यमापन करण्यात यावे, असे नमुद आहे. तथापि, अशी कार्यवाही केल्यांची नस्तीसोबत आढळून आले नाही.

8) सदर कामासाठी चाचणी अहवाल दिनांक 23/06/2016 रोजी प्राप्त झालेला असुन काम पुर्णत्वाचा दाखला 25/05/2016 रोजीचा आहे. यावरुन कामावर वापरण्यात आलेले साहित्य चाचणी न करता वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे कामावरील साहित्यांची व कामाच्या दर्जाबाबत खात्री पटवावी.

9) सदरचे काम हे दिनांक 20/06/2017 रोजी पुर्ण झालेले असुन GUIDE BOUND दबाई मोजमाप पुस्तिका ॲटम नंबर 9 मध्ये करणेत आलेली असुन सदरच्या कामामध्ये 5 टक्के कमी सिंकेज वजा केलेली असल्यामुळे कंत्राटदार यांना रक्कम रुपये 4,264/- एवढे जादा प्रदान झालेले असुन सदरची रक्कम संबधिताकडुन वसुल करावी.

**3.372 मौजे शिवणी-2 तालुका भडगांव येथील सिंमेट नाला बांधकामातील अनियमितता**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** सदरबाबत रक्कम रुपये 8,79,369/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता (स्थानिक स्तर) पुणे यांचेकडील परीपत्रक क्रमांक मुअ/प्रशा-5/2611 दिनांक 03/08/2004 अन्वये क्लीअरींग द साईड ही बाब अंदाजपत्रकात अंतर्भुत करणेत येऊ नये, असे असतांना मोजमाप पुस्तिका क्रमांक 1676 मध्ये बाब क्रमांक 1 मध्ये रक्कम रुपये 5,400/- अंदाजपत्रकात तरतुद करणेत येऊन रक्कम रुपये 5,400/- कंत्राटदार यांना प्रदान करण्यात आली आहे. तरी सदरची रक्कम रुपये 5,400/- संबधितांकडुन जबाबदारी निश्चती करुन वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

2) कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी संबंधित कंत्राटी कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमा पत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. आदेशाप्रमाणे कार्यवाही न करता, नियमबाह्य देयकामधून विमा रक्कम कपात केली आहे. त्यामुळे योजनेचा मुळ हेतू सफल झाला नाही

3) प्रादेशिक दरसुचीत गौण खनिजावरील स्वामित्व शुल्क हे महसुल व वन विभागाचे दिनांक 11/02/2010 च्या शासन निर्णयानुसार ज्या बाबींमध्ये साहित्याकरिता स्वामित्व शुल्क लागू आहेत त्या बांबीच्या दरामध्ये स्वामित्व शुल्क अंतर्भुत करण्यात आले आहेत, असे नमुद असतानाही बाब क्रमांक 11 उपलब्ध साहित्यांचा वापर केल्याने त्यावरील स्वामित्व धनाचे शुल्काची रक्कम रूपये 1,21,661/- शासन सदरी भरणा न केल्याने सदरची रक्कम वसुल करुन शासन सदरी भरणा करावी.

4) एखादया बाबींवर बचत करुन अन्य बाबीवर अधिक खर्च केलेला असल्याने नियम 153(2) नुसार सक्षम प्राधिका-यांची लेखी मान्यता घेतलेली नाही.

अंदांजपत्रकीय तरतुदीअंतर्गत खर्च केला असला, तरीही बाबनिहाय खर्चाचे कमी/अधिक प्रमाण पहाता प्राकलनापेक्षा फारच तफावत असल्याने ज्यावरुन संकल्पाचित्रात बदल होत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे नियमाप्रमाणे सुधारित तांत्रिक मान्यता घेऊनच अंतिम प्रदान करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) कामवाटप समितीचे काम वाटपाबाबतची नोंदवहीची मागणी केलेली असतानाही, ती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे काम वाटप समितीने शिफारस असल्याची व विहीत प्रमाणात वाटप करण्यात आल्याची खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जलशि- 2015/प्र.क्र.115/जल-7, दिनांक 13/03/2015 अन्वेय कामे पुर्ण झाल्यानंतर कामांचे त्रयस्त यंत्रणेमार्फत / संस्थेमार्फत मुल्यमापन करण्यात यावे, असे नमुद आहे. तथापि, अशी कार्यवाही केल्यांची नस्तीसोबत आढळून आले नाही.

7) सदरच्या कामामध्ये 5 टक्के कमी सिंकेज वजा केलेली असल्यामुळे कंत्राटदार यांना रक्कम रुपये 10,073/- एवढे जादा प्रदान झालेले असुन सदरची रक्कम संबधिताकडुन वसुल करुन अनुपालन दर्शवावे

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.44/33 दिनांक 22/12/2000 च्या शासन परिपत्रकातील अनुक्रमांक 1 नुसार एका कामासाठी एक मोजमाप पुस्तिका वापरणे तसेच अनुक्रमांक 2 नुसार एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामाच्या नोंदी घेण्यात येऊ नयेत, असे नमूद असतानाही एकाच मोजमाप पुस्तिकेत अनेक कामांच्या नोंदी घेतल्याचे आढळून आले आहे.

**3.373 मौजे शिवणी-1 तालुका भडगांव येथील सिंमेट नाला बांधकामातील अनियमितता**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 27) -** सदरबाबत रक्कम रुपये 9,45,085/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता (स्थानिक स्तर) पुणे यांचेकडील परीपत्रक क्रमांक मु.अ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये क्लीअरींग द साईड ही बाब अंदाजपत्रकात अंतर्भुत करणेत येऊ नये, असे असतांना मोजमाप पुस्तिका क्रमांक 1857 मध्ये बाब क्रमांक 1 मध्ये रक्कम रुपये 5,400/- अंदाजपत्रकात तरतुद करणेत येऊन रक्कम रुपये 5,400/- कंत्राटदार यांना प्रदान करण्यात आली आहे. तरी सदरची रक्कम रुपये 5,400//- संबधितांकडुन जबाबदारी निश्चती करुन वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

2) प्रादेशिक दरसुचीत गौण खनिजावरील स्वामित्व शुल्क हे महसुल व वन विभागाचे दिनांक 11/02/2010 च्या शासन निर्णयानुसार ज्या बाबींमध्ये साहित्याकरिता स्वामित्व शुल्क लागू आहेत, त्या बांबीच्या दरामध्ये स्वामित्व शुल्क अंतर्भुत करण्यात आले आहेत, असे असतानाही बाब क्रमांक 09 उपलब्ध साहित्यांचा वापर केल्याने त्यावरील स्वामित्व धनाचे शुल्काची रक्कम रूपये 1,06,868/- शासन सदरी भरणा न केल्याने सदरची रक्कम वसुल करुन शासन सदरी भरणा करावी.

3) बाब क्रमांक 07 मध्ये CONSTRUCTION OF EMBANICMENT FOR BOUND अन्वये एकुण स्टॅंडर्ड स्पेशिफिकेशन आरडी 16.10 नुसार माती व मुरुम भरावासाठी वापरलेले असेल आणि सदर बांधकामाचे मोजमाप घेण्यात आलेले असेल, तर पावसाळयापुर्वी 15 टक्के व पावसाळयानंतर 10 टक्के सिकेंज वाजावट करणे आवश्यक असतांना सदरचे काम हे दिनांक 17/06/2017 रोजी पुर्ण झालेले असुन GUIDE BOUND दबाई मोजमाप पुस्तिका ॲटम नंबर 9 मध्ये करणेत आलेली असुन सदरच्या कामामध्ये 5 टक्के कमी सिंकेज वजा केलेली असल्यामुळे कंत्राटदार यांना रक्कम रुपये 12,171/- एवढे जादा प्रदान झालेले असुन सदरची रक्कम संबधिताकडुन वसुल करुन अनुपालन दर्शवावे

**3.374 साठवण बंधारा दुरुस्ती,जगताप वस्ती. (कोळगाव) ता. श्रीगोंदा**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 614, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 5,60,679/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 132 नुसार कामाचे स्थळ निरीक्षण करुन तांत्रिक अधिकारी यांनी सादर केलेला प्रथम पाहणी अहवाल व प्रस्तावित कामाचा चिन्हांकीत नकाशे नस्तीसोबत जोडणेत आलेला नाही. त्यामुळे पाहणी अहवालात नमूद बाबींचा अंदाजपत्रकात समावेश केल्याची तसेच प्रस्तावित काम योग्य जागेत झाल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

2) कोणत्या वर्षी सदरचे मुळ काम झाले होते. याबाबत अहवाल दप्तरी नाही. दुरुस्ती पुर्वीची परिस्थितीबाबतचे फोटो नाही. सबब दुरुस्तीवरील खर्चाची सत्यता व योग्यता तपासुन पाहता आली नाहीत

3) सदर कामाचे मोजमाप पुस्तकेची तपासणी केली असता सदर कामाचे प्रत्यक्ष work done रूपये 5,60,678/- झालेले असून त्यावर गौण खनिज रक्कम रूपये 16,753/- व निविदा कमी दर 10.57 टक्के यांचे परिगणनेनुसार सदर देयक रूपये 5,03,185/- रकमेस पारित करणे आवश्यक असतांना रक्कम रूपये 5,60,678/- ने पारित केले आहे. त्यामुळे रक्कम रूपये 57,493/- जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदान रक्कम रूपये 57,493/- वसूल करून शासन सदरी भरणा करून पूर्तता दर्शवावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 197 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे.

5) बांधकाम विभागाने कामाचे देयकातुन 1 टक्का दराने विम्याची रक्कम कपात केली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास 1098/प्र.क्र.29/98 शासन हमी दिनांक 19/08/1998 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जिल्हा परिषद -2/2000/प्र.क्र.837/परा 8(35), दिनांक 15/09/2003 तसेच संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक पविनि/1/1801/सीआर/जिल्हा परिषद/संकीर्ण, दिनांक 30/07/2002 नूसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापुर्वी संबधित कंत्राटी कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमा पत्राची प्रत जिल्हा परिषद कडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

6) जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, अहमदनगर तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कार्यकारी समिती, अहमदनगर यांनी दिलेल्या प्रशासकीय आदेशात नमुद केल्याप्रमाणे दुरूस्ती करावयाचे काम संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांचेकडील मार्गदर्शन सुचना क्रमांक मृदस/ मफुजअ / राकृवियो/मासू12-13 /नक्र.104/2009/2012, दिनांक 21/08/2012 नुसार भौतिकदृष्टया संबंधित बांधाचे मुळ अंदाजपत्रकाच्या 30 टक्केपेक्षा अधिक असणार नाही. याची कार्यकारी अभियंता यांनी तुलनात्मक तक्ता तयार करुन खात्री केल्यानंतरच सदर बांधाचे दुरूस्तीचे काम करणेत यावे, असे असतांना तशी कार्यवाही केली नाही.

7) कामाचे नस्तीसोबत खोदकामाचे मोजमापाचे फिल्डबुक तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही. सबब प्रत्यक्ष मोजमाप पुस्तकात नोंदविलेली मापांची पडताळणी फिल्ड बुक अभावी करता आली नाही.

8) निविदातील विवरणपत्रामधील माहिती निविदाकारानी भरलेली नाही. त्यामुळे निविदाकाराकडील उपलब्ध हत्यारे व संयंत्रे कर्मचारी, तांत्रिक कर्मचारी, मजूर इत्यादी आवश्यक बाबी त्यांच्याकडे असल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. सदर उणिवा असताना निविदा स्वीकारलेली नाही.

9) अंदाजपत्रकीय मुल्यापेक्षा जादा रूपये 32,553/- रक्कमेचे जादा काम करण्यात आले आहे. जादा कामाबाबत सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी घेतलेली नाही. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम, शासन परीपत्रक क्रमांक संकिर्ण-2004/प्रक्र-85/रस्ते-1, दिनांक 11/06/2004 प्रमाणे तसेच निवीदा कलम 38 मधील तरतुदीप्रमाणे एखादया बाबीचे अंदाजपत्रकातील परीमाणापेक्षा 25 टक्के किंवा रूपये 5,000/- जे कमी असेल ते त्यापेक्षा जादा काम होत असल्यास वरील शासन परीपत्रकातील निर्देशाप्रमाणे व निवीदा करारातील अट क्रमांक 38 प्रमाणे काम करण्याचे अगोदर योग्य कार्यवाही करूनच जादा काम करणे आवश्यक असतांना, शासन निर्देशाचे व निवीदा कलम 38 चे पालन न करता जादा काम केलेने रूपये 32,553/- प्रदान नियमबाहय ठरते.

**3.375 पाझर तलाव दुरुस्ती पाठेगाव,1 तालुका कर्जत**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 407, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 5,39,807/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 132 नुसार कामाचे स्थळ निरीक्षण करुन तांत्रिक अधिकारी यांनी सादर केलेला प्रथम पाहणी अहवाल व प्रस्तावित कामाचा चिन्हांकीत नकाशे नस्तीसोबत जोडणेत आलेला नाही.

त्यामुळे पाहणी अहवालात नमूद बाबींचा अंदाजपत्रकात समावेश केल्याची तसेच प्रस्तावित काम योग्य जागेत झाल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

2) कोणत्या वर्षी सदरचे मुळ काम झाले होते, याबाबत अहवाल दप्तरी नाही. दुरुस्ती पुर्वीची परिस्थितीबाबतचे फोटो नाही. सबब दुरुस्तीवरील खर्चाची सत्यता व योग्यता तपासुन पाहता आली नाहीत

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे.

4) सदर कामाचे रूपये 5,39,807/- चे देयकातून आवश्यक असणाऱ्या कपाती कमी कपात केलेल्या आहेत. सदर कमी कपात रक्कम रूपये 21,184/- वसूल करून शासन सदरी व रक्कम रूपये 5,296/- अनामत सदरी भरणा करून पूर्तता दर्शवावी.

5) सदर कामाचे मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता Item no,5 Filling C.O.T. with selet herting material obtain from borrow area qty. 1873.24 cum घेतलेली असून त्यामधून 187.32 cum 10 टक्के वजावट करून रक्कम अदा करणे आवश्यक होते. तथापि, सदरची वजावट न केल्याने रक्कम रूपये 49,756/- (187.32 cum*rate 265.62) जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदान रक्कम रूपये 49,756/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

6) बांधकाम विभागाने कामाचे देयकातुन 1 टक्का दराने विम्याची रक्कम कपात केली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास 1098/प्र.क्र.29/98 शासन हमी, दिनांक 19/08/1998 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जिल्हा परिषद -2/2000/प्र.क्र.837/परा 8(35), दिनांक 15/09/2003 तसेच संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक पविनि/1/1801/सीआर/जिल्हा परिषद/संकीर्ण, दिनांक 30/07/2002 नूसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापुर्वी संबधित कंत्राटी कामाचा व त्या नुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमा पत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

7) जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, अहमदनगर तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कार्यकारी समिती, अहमदनगर यांनी दिलेल्या प्रशासकीय आदेशात नमुद केल्याप्रमाणे दुरूस्ती करावयाचे काम संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांचेकडील मार्गदर्शन सुचना क्रमांक मृदसं/ मफुजअ / राकृवियो/मासू12-13 /नक्र.104/2009/2012, दिनांक 21/08/2012 नुसार भैातिकदृष्टया संबंधीत बांधाचे मुळ अंदाजपत्रकाच्या 30 टक्केपेक्षा अधिक असणार नाही, याची कार्यकारी अभियंता यांनी तुलनात्मक तक्ता तयार करुन खात्री केल्यानंतरच सदर बांधाचे दुरूस्तीचे काम करणेत यावे, असे असतांना तशी कार्यवाही केली नाही.

8) कामाचे नस्तीसोबत खोदकामाचे मोजमापाचे फिल्डबुक तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही. सबब प्रत्यक्ष मोजमाप पुस्तकात नोंदविलेली मापांची पडताळणी फिल्ड बुक अभावी करता आली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22/वित्त-4, दिनांक 30/08/2010 परिच्छेद क्रमांक 17 नुसार जिल्हा परिषद पातळीवर गुणवत्ता नियंत्रणासाठी विहित प्रक्रिया अंगीकारुन आऊटसोर्सिंग पध्दतीने त्रयस्थ पक्ष नियंत्रण कक्ष गठीत करुन होणरी कामे यांचा दर्जा व गुणवत्ता विहित केलेल्या निकषानुसार राहील, याची खबरदारी घ्यावी, असे सूचित केलेले आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

**3.376 साठा बंधारा खंडाळा(मरकड वस्ती) तालुका श्रीरामपुर**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1054, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 11,77,607/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाचे स्थळ निरीक्षण करुन तांत्रिक अधिकारी यांनी सादर केलेला प्रथम पाहणी अहवाल व प्रस्तावित कामाचा चिन्हांकीत नकाशे नस्तीसोबत जोडणेत आलेला नाही. त्यामुळे पाहणी अहवालात नमूद बाबींचा

अंदाजपत्रकात समावेश केल्याची तसेच प्रस्तावित काम योग्य जागेत झाल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

2) कोणत्या वर्षी सदरचे मुळ काम झाले होते, याबाबत अहवाल दप्तरी नाही. दुरुस्ती पुर्वीची परिस्थितीबाबतचे फोटो नाही. सबब दुरुस्ती वरील खर्चाची सत्यता व योग्यता तपासुन पाहता आली नाहीत

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे.

4) निविदा शर्त क्रमांक 2 नुसार दंडात्मक कार्यवाही करून मुदतवाढ देणेची तरतुद आहे. त्यानुसार सदर ठेकेदाराने मुदत संपलेनंतर मुदतवाढ मागितली आहे. सदर ठेकेदारास जिल्हा परीषदेने प्रती दिन रूपये 10 x 180 दिवस प्रमाणे = रूपये 1,800/- दंड केला आहे. नियमानुसार 3 टक्केप्रमाणे निविदा रक्कम x 6 महिने(180 दिवस) = रूपये 19,998/- दंड आकारणे आवश्यक होता. तथापि, जिल्हा परिषदेने रूपये 1,800/- दंड आकारला आहे. तरी उर्वरीत रक्क्म रूपये 18,198/- वसुलात आणावी.

5) कामाचे देयकातून कामगार उपकर रूपये 13,332/- असे कपात करणे आवश्यक असतांना कामाचे देयकातून रक्कम रूपये 11,776/- ठेकेदाराकडून कपात करण्यात आली. तरी उर्वरित कमी कपात रक्कम रूपये 1,556/- रक्कम संबधितांकडुन वसुल करुन शासन निधीत भरणा करणेत यावी.

6) बांधकाम विभागाने कामाचे देयकातुन 1 टक्का दराने विम्याची रक्कम कपात केली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास 1098/प्र.क्र.29/98 शासन हमी, दिनांक 19/08/1998 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जिल्हा परिषद -2/2000/प्र.क्र.837/परा 8(35), दिनांक 15/09/2003 तसेच संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक पविनि/1/1801/सीआर/जिल्हा परिषद/संकीर्ण, दिनांक 30/07/2002 नूसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापुर्वी संबधित कंत्राटी कामाचा व त्या अनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमा पत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

7) सदर कामाचे बिल हे मुल्यांकन व रॉयल्टी व निवीदा दर 3.80 टक्के कमी धरून रक्कम रुपये 11,75,083/- इतके झाले. सदर देयक रक्कम रुपये 11,75,083/- इतक्या रकमेला पारीत करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 11,77,607/- ने प्रदान केले आहे. तरी जादा प्रदान (रूपये रूपये 11,77,607-11,75,083) रूपये 2,524/- वसुल करण्यात यावे.

8) काम पुर्ण असले बाबत नमुना नंबर 65 कोरे आहे. त्यामुळे काम पुर्णत्वाची पडताळणी करता आली नाही.

9) जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, अहमदनगर तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कार्यकारी समिती, अहमदनगर यांनी दिलेल्या प्रशासकीय आदेशात नमुद केल्याप्रमाणे दुरूस्ती करावयाचे काम संचालक मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन ,कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांचेकडील मार्गदर्शन सुचना क्रमांक मृदस/ मफुजअ / राकृवियो/मासू12-13 /नक्र.104/2009/2012, दिनांक 21/08/2012 नुसार भौतिकदृष्टया संबंधित बांधकामाचे मुळ अंदाजपत्रकाच्या 30 टक्केपेक्षा अधिक असणार नाही, याची कार्यकारी अभियंता यांनी तुलनात्मक तक्ता तयार करुन खात्री केल्यानंतरच सदर बांधाचे दुरूस्तीचे काम करणेत यावे, असे असतांना तशी कार्यवाही केली नाही.

**3.377 मेंढवन येथे साठा बंधारा बांधणे. तालुका संगमनेर**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 24) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 129, दिनांक 21/10/2016 अन्वये रक्कम रुपये 12,02,117/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाचे स्थळ निरीक्षण करुन तांत्रिक अधिकारी यांनी सादर केलेला प्रथम पाहणी अहवाल व प्रस्तावित कामाचा चिन्हांकीत नकाशे नस्तीसोबत जोडणेत आलेला नाही. त्यामुळे पाहणी अहवालात नमूद बाबींचा

अंदाजपत्रकात समावेश केल्याची तसेच प्रस्तावित काम योग्य जागेत झाल्याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

2) कोणत्या वर्षी सदरचे मुळ काम झाले होते. याबाबत अहवाल दप्तरी नाही. दुरुस्ती पुर्वीची परिस्थिती बाबतचे फोटो नाही. सबब दुरुस्ती वरील खर्चाची सत्यता व योग्यता तपासुन पाहता आली नाहीत

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 117 नुसार पुर्ण कामाच्या नोंदवहीत नमुना नंबर 69 मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे.

4) महसूल व वन विभाग यांचे शासन निर्णय दिनांक 15/05/2015 अन्वये स्वामित्वधन सुधारित दरानुसार उप अभियंता लघुपाटबंधारे यांनी तांत्रिक मान्यता घेतांना अंदाजपत्रकात स्वामित्वधन सुधारित दरानुसार तरतूद करणे आवश्यक होते. त्यानुसार कार्यवाही न करता ठेकेदाराचे हित जोपासून स्वतंत्र स्वामित्वधनाचे देयक (405.37x70.68) रक्कम रूपये 40,398.69 तयार करून ठेकेदाराकडून वसूल न करता शासन निधीतून खर्च करण्यात आला. तरी सुधारीत दर रूपये 141.34 फरक रक्कम रूपये 40,398/- ठेकेदाराकडून वसुल करून योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करून अनुपालन दर्शवावे.

6) बांधकाम विभागाने कामाचे देयकातुन 1 टक्का दराने विम्याची रक्कम कपात केली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास 1098/प्र.क्र.29/98 शासन हमी, दिनांक 19/08/1998 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जिल्हा परिषद -2/2000/प्र.क्र.837/परा 8(35), दिनांक 15/09/2003 तसेच संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक पविनि/1/1801/सीआर/जिल्हा परिषद/संकीर्ण, दिनांक 30/07/2002 नूसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापुर्वी संबधित कंत्राटी कामाचा व त्याअनुषंगाने कामगारांचा विमा उतरवून सदर विमा पत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

7) सदर कामाचे बिल हे मुल्यांकन व रॉयल्टी व निवीदा दर 11.66 टक्के कमी धरून रक्कम रुपये 12,02,117/- इतके झाले. तथापि, ई - टेंडर प्रमाणे मंजुर निवीदा रूपये 11,97,639/- ची आहे. सदर देयक रक्कम रुपये 11,97,639/- इतक्या रकमेला पारीत करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 12,02,117/- ने प्रदान केल्याने जादा प्रदान (रूपये 12,02,117–11,97,639 ) रूपये 4,478/- वसुल करण्यात यावे.

8) जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, अहमदनगर तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कार्यकारी समिती, अहमदनगर यांनी दिलेल्या प्रशासकीय आदेशात नमुद केल्याप्रमाणे दुरूस्ती करावयाचे काम संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांचेकडील मार्गदर्शन सुचना क्रमांक मृदस/मफुजअ / राकृवियो/मासू12-13 /नक्र.104/2009/2012, दिनांक 21/08/2012 नुसार भौतिकदृष्टया संबंधित बांधकामाचे मुळ अंदाजपत्रकाच्या 30 टक्केपेक्षा अधिक असणार नाही, याची कार्यकारी अभियंता यांनी तुलनात्मक तक्ता तयार करुन खात्री केल्यानंतरच सदर बांधाचे दुरूस्तीचे काम करणेत यावे, असे असतांना तशी कार्यवाही केली नाही.

**3.378 वढु बुद्रुक (चाफडवस्ती) ता. शिरुर येथे साठवण बंधारा बांधणे कामातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** वढु बुद्रुक (चाफडवस्ती) तालुका शिरुर येथे साठवण बंधारा बांधणे कामाकरिता रक्कम रूपये 14,93,429/- खर्च केला आहे. याबाबत खालीप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अ) निविदा शर्त क्रमांक 14 व 15 नुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 114, 118, 120, 152(2) अन्वये अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुसऱ्या बाबीवर वापरु नये. तसेच एखाद्या बाबीतील तरतुदीमध्ये 25 टक्के पेक्षा जादा वाढ होत असेल किंवा खर्चात रुपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास, त्यास कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची पुर्वमान्यता घेवुनच काम करणे आवश्यक होते परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही. 3 बाबीवर अंदाजपत्रकापेक्षा रक्कम रूपये 1,69,485/- जादा खर्च केला आहे. सदरबाबत सक्षम प्राधिका-याची पुर्व मंजूरी न घेतलेने सदरचा खर्च लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे

ब) तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 152(3) नुसार कामातील बचत ही अन्य बाबीच्या कामावरील खर्च करणेकरीता वापरणे अनियमिततेचे आहे. 3 बाबींच्या परिमाणात बचत ही 10 पेक्षा अधिक आहे. तसेच काही बाबी प्रकलनात घेण्यात आलेल्या आहेत. परंतू, त्या बाबीवर खर्च न झाल्याने रक्कम रूपये 3,34,147/- बचत झालेली आहे. सदर बचत कोणत्या प्राधिकारान्वये वापरण्यात आली? हे स्पष्ट करण्यात यावे.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र./108/ कामगार 7अ, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर या खाती 1 टक्के व रक्कम शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

सदर कामाच्या देयकामधून रूपये 18,793/- कपात करणे आवश्यक होते. तथापि, रूपये 14,934/- कपात करण्यात आले आहेत. उर्वरीत रक्कम रुपये 3,859/- वसुल करुन शासनास भरणा करावी.

3) दरसुचीमधील सुचनेनुसार निविदा रकमेमध्ये 1 टक्के कामगार विमा रक्कम अधिक करुन कागदोपत्री पुर्तता झाल्यानंतरच सदरची रक्कम ठेकदारास प्रतीपूर्ती करावयाची आहे तथापि, कामाची नस्ती, दर पृथःकरणाच्या व देयकाची तपासणी करताना आसे आढळून आले आहे की, ठेकेदाराला देय रकमेमधूनच 1 टक्के कामगार विमा रक्कम कपात करुन शासानास भरणा करण्यात येत आहे. तर मग Recapitulation sheet मध्ये 1 टक्के/ कामगार विमा रक्कम का अधिक करण्यात येते? याबाबत खुलासा करावा.

4) तलाव / बंधा-याचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर प्रस्तावीत क्षेत्र सिंचनाखाली आले आहे किंवा नाही, याबाबत लाभार्थी गावाचा/शेतकऱ्यांचा अहवाल देण्यात आलेला नाही.

5) सहाय्यक मुख्य अभियंता सिंचन मंडळ पुणे यांचे पत्र क्रमांक 542 दिनांक 11/01/2013 चे पत्रानुसार स्टीलचे वाढीव दर दिनांक 01/01/2013 ते दिनांक 31/03/2013 या कालावधीसाठी देण्यात आले आहेत. तथापि, त्यांनंतर सन 2013-2014 ची नवीन दर सुची अस्तीत्वात आलेली आहे. सन 2013-2014 च्या दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असल्याने व त्यामध्ये स्टीलचे सुधारीत दर देण्यात आलेले असल्यामुळे संदर्भाकींत पत्राप्रमाणे दर आकारता येणार नाहीत. परंतू, संदर्भाकीत पत्राप्रमाणे दर आकारल्यामूळे रक्कम रूपये 2,712/- जादा रकमेचे प्रदान झालेले आहेत.

6) लघुपाटबंधारे विभाग नियम पुस्तिकेतील भाग नंबर 7 नियम क्रमांक 8.6(4) हार्ड रॉक मध्ये 0.60 मी पेक्षा जास्त खोदकाम करणेचे नसताना देखाल उपरोक्त कामामध्ये 0.60 मी पेक्षा जास्त खोदाई केल्याचे मोजमामाप पुस्तिका क्रमांक 1025 पृष्ठ क्रमांक 52 वर घेतलेल्या नोंदीवरुन दिसून येते. सदर खोदाई आवश्यक असलेबाबत मोजमाप पुस्तिकेत कार्यकारी अभियंता यांनी शेरा मारलेला नाही.

दर 264.70 X 29.79 = 7,885/- वसुली करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी

7) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी 2016/ प्र.क्र. 2/इमा.2 दिनांक 12/02/2016 मधील मुद्दा क्रमांक 1 नुसार प्राप्त निविदेचा न्युनतम देकार 10 टक्के पेक्षा अधिक कमी दराचा असल्यास तर संबधीत ठेकेदाराकडून एवढया कमी दराने काम करण्याच्या नियोजनाबाबत तपशील प्राप्त करुन घेवून सदर काम निम्नतम देकाराच्या किमतीत पुर्ण करता येणे शक्य असल्याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे

उपरोक्त प्रमाणे खात्री न करताच 13.01 टक्के कमी दराची निविदा सिवक्रुत करण्यात आलेली आहे. त्यामुळे काम विहीत कालमर्यादेत व गुणवत्तेनुसार पुर्ण झाले किंवा कसे, याबाबत कार्यकारी अभियंता यांनी खात्री करावी व झालेल्या अनियमिततेबाबत खुलासा करावा.

**3.379 मौजे खरपुड (डाव-याचा ओढा), तालुका खेड येथे वळण बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** मौजे खरपुड (डाव-याचा ओढा), तालुका खेड येथे वळण बंधारा बांधणेकरिता रककम रूपये 46,96,017/- खर्च केला आहे. याबाबत खालीप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) अ) निविदा शर्त क्रमांक 14 व 15 नुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 114, 118, 120, 152(2) अन्वये अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे.

कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुसऱ्या बाबीवर वापरु नये. तसेच एखाद्या बाबीतील तरतुदीमध्ये 25 टक्के पेक्षा जादा वाढ होत असेल किंवा खर्चात रुपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्यास कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची पुर्वमान्यता घेवुनच काम करणे आवश्यक होते परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही. खालील बाबीवर अंदाजपत्रकापेक्षा रक्कम रूपये 9,79,379/- जादा खर्च केला आहे.

ब) तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 152(3) नुसार कामातील बचत ही अन्य बाबीच्या कामावरील खर्च करणेकरीता वापरणे अनियमिततेचे आहे. 8 बाबींच्या परिमाणात बचत ही 10 टक्के पेक्षा अधिक आहे. तसेच काही बाबी प्रकलनात घेण्यात आलेल्या आहेत. परंतू, त्या बाबीवर खर्च न झाल्याने रक्कम रूपये 11,03,106/- बचत झालेली आहे. सदर बचत कोणत्या प्राधिकारान्वये वापरण्यात आली? हे स्पष्ट करण्यात यावे. तोपर्यंत 8 बाबीवरील बचतीची रक्कम पुर्व परवानगी न घेता वापरल्याने तात्पुरते अमान्य ठेवण्यात येत आहे.

2) विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविनि 2307/जिप/सातारा/विमा संकीर्ण/ अभि-2, दिनांक 16/11/2007 जिल्हा परिषद, पुणे बांधकाम विभागाचे परीपत्रक क्रमांक जिप/बां/प्र.क्र 793, दिनांक 25/03/2011 नुसार देयकामधून 1 टक्के कामगार विमा रक्कम कपात करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

सदर कामाची एकुण रक्कम रूपये 46,96,017/- एवढी आहे. संबंधीत ठेकेदाराने दिनांक 11/05/2016 पर्यंत विधीग्राहय असणार रक्कम रूपये 40,15,128/- एवढया कामाच्या रकमेवर कामगार विमा पॉलीसी काढली आहे. तथापि, काम दिनांक 08/03/2017 रोजी पुर्ण झालेले आहे. त्यामूळे उर्वरीत रकमेवर रूपये 6,80,889/- या कामाच्या देयकामधून रूपये 6,809/- कपात करणे आवश्यक होते. सदर कपात न केल्याने उर्वरीत रक्कम रुपये 6,809/- वसुल करुन शासनास भरणा करावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148(1) व निविदा अटी व शर्ती क्रमांक 2 नुसार कामामध्ये योग्य ती प्रगती राहण्याकरीता 1 टक्के ते 10 टक्के दंडाची तरतूद अंतर्भूत आहे. तसेच मुदतवाढी करीता मुळ मुदत संपण्यापूर्वी ठेकेदाराने किमान 15 दिवस अगोदर पुर्व सुचना देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

कामाचे योग्य नियोजनाअभावी कामास विलंब झाला आहे. त्यामुळे विनादंडाने मुदतवाढ देणे संयुक्तिक नाही. सबब संबंधीतांकडून रककम रूपये 46,960/- दंड वसुल करुन शासनास भरणा करावा.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परीपत्रक क्रमांक परास/101/प्र.क्र.40/जल, दिनांक 19/10/2001 अन्वये तलाव/बंधारा बांधणे/दुरुस्तीच्या कामापोटी कपात करुन ठेवलेली 10 टक्के रक्कम काम पुर्ण झाल्यापासून पुढील दोन वर्षे पाणी गळती तपासणी करुन देणेची आहे.

बंधाऱ्यामध्ये पुरेसा पाणी साठा झाल्यानंतर सदर बंधाऱ्याची प्रस्तावीत पाणी साठवण क्षमता व पाणी गळतीबाबत स्थिती तपासुन राखुन ठेवलेली 10 टक्के रक्कम ठेकेदारास परत करणे आवश्यक असताना माहे 7/2017 मध्ये ठेकेदारास रक्कम परत करण्यात आली आहे.

5) ग्रामविकास विभागाचे दिनांक 07/05/2002 चे परीपत्रकानुसार पाणी वापर सहकारी संस्था तयार केलेचे प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

### 3.380 मोरगांव (खटकाळीचा ओढा) तालुका बारामती येथे कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा बांधणे कामातील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** मोरगांव (खटकाळीचा ओढा) तालुका बारामती येथे कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा बांधणे कामाकरिता रक्कम रूपये 49,13,767/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अ) निविदा शर्त क्रमांक 14 व 15 नुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 114, 118, 120, 152(2) अन्वये अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुसऱ्या बाबीवर वापरु नये. तसेच एखाद्या बाबीतील तरतुदीमध्ये 25 टक्के

पेक्षा जादा वाढ होत असेल किंवा खर्चात रुपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास, त्यास कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची पुर्वमान्यता घेवुनच काम करणे आवश्यक होते परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही. अंदाजपत्रकापेक्षा रक्कम रूपये 5,66,075/-जादा खर्च केला आहे. सदरबाबत सक्षम प्राधिका-याची पुर्व मंजूरी न घेतलेने सदरचा खर्च लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

ब) तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 152(3) नुसार कामातील बचत ही अन्य बाबीच्या कामावरील खर्च करणेकरीता वापरणे अनियमिततेचे आहे. 5 बाबींच्या परिमाणात बचत ही 10 टक्के पेक्षा अधिक आहे. तसेच काही बाबी प्रकलनात घेण्यात आलेल्या आहेत. परंतू, त्या बाबीवर खर्च न झाल्याने रक्कम रूपये 5,09,905/- बचत झालेली आहे. सदर बचत कोणत्या प्राधिकारान्वये वापरण्यात आली? हे स्पष्ट करण्यात यावे. तोपर्यंत बचतीची रक्कम पुर्व परवानगी न घेता वापरल्याने तात्पुरते अमान्य ठेवण्यात येत आहे.

2) विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविनि 2307/जिप/सातारा/विमा संकीर्ण/ अभि-2, दिनांक 16/11/2007 जिल्हा परिषद, पुणे बांधकाम विभागाचे परीपत्रक क्रमांक जिप/बां/प्र.क्र 793, दिनांक 25/03/2011 नुसार देयकामधून 1 टक्के कामगार विमा रक्कम कपात करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

सदर कामाच्या देयकामधून रूपये 49,138/- कपात करणे आवश्यक होते. तथापि, रूपये 46,726/- कपात करण्यात आले आहेत. उर्वरीत रक्कम रुपये 2,412/- वसुल करुन शासनास भरणा करावी.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र./108/ कामगार 7अ, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर या खाती 1 टक्के रक्कम शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

सदर कामाच्या देयकामधून रूपये 49,138/- कपात करणे आवश्यक होते. तथापि, रूपये 46,726/- कपात करण्यात आले आहेत. उर्वरीत रक्कम रुपये 2,412/- वसुल करुन शासनास भरणा करावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक परास/101/प्र.क्र.40/जल, दिनांक 19/10/2001 अन्वये तलाव/बंधारा बांधणे/दुरुस्तीच्या कामापोटी कपात करुन ठेवलेली 10 टक्के रक्कम काम पुर्ण झाल्यापासून पुढील दोन वर्षे पाणी गळती तपासणी करुन देणेची आहे.

बंधाऱ्यामध्ये पुरेसा पाणी साठा झाल्यानंतर सदर बंधाऱ्याची प्रस्तावीत पाणी साठवण क्षमता व पाणी गळतीबाबत स्थिती तपासुन राखुन ठेवलेली 10 टक्के रक्कम ठेकेदारास परत करणे आवश्यक होते. परंतु, तसा अहवाल नस्तीसोबत दिसुन आला नाही. देयकावर शेरा मारुन ठेकेदाराला रुपये 4,91,376/- माहे 10/2016 मध्ये परत करण्यात आले आहेत. सदर अनियमिततेबाबत खुलासा करण्यात यावा.

5) दरसुचीमधील सुचनेनुसार निविदा रकमेमध्ये 1 टक्के कामगार विमा रक्कम अधिक करुन कागदोपत्री पुर्तता झाल्यानंतरच सदरची रक्कम ठेकदारास प्रतीपूर्ती करावयाची आहे तथापि, कामाची नस्ती, दर पृथःकरणाच्या व देयकाची तपासणी करताना आसे आढळून आले आहे की, ठेकेदाराला देय रकमेमधूनच 1 टक्के कामगार विमा रक्कम कपात करुन शासानास भरणा करण्यात येत आहे. तर मग Recapitulation sheet मध्ये 1 टक्के कामगार विमा रक्कम का अधिक करण्यात येते? याबाबत खुलासा करावा.

6) तलाव/बंधा-याचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर प्रस्तावीत क्षेत्र सिंचनाखाली आले आहे किंवा नाही, याबाबत लाभार्थी गावाचा/शेतकऱ्यांचा अहवाल देण्यात आलेला नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148(1) व निविदा अटी व शर्ती क्रमांक 2 नुसार कामामध्ये योग्य ती प्रगती राहण्याकरीता 1 टक्के ते 10 टक्के दंडाची तरतूद अंतर्भूत आहे तसेच मुदतवाढीकरीता मुळ मुदत संपण्यापूर्वी ठेकेदाराने किमान 15 दिवस अगोदर पुर्व सुचना देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

कामाचा मुळ कालावधी दिनांक 04/06/2014 ते 03/06/2015 = 12 महिने असा आहे. मुळ मुदतीमध्ये साधारणत: 75 टक्के काम पुर्ण झाले आहे. उपअभियंता यांचे अभिप्राय पाहता फक्त बंधाऱ्याची चाचणी होणे बाकी आहे. तथापि, मुळ मुदत ही दिनांक 03/06/2015 पर्यंत 12 महिने असताना फक्त चाचणी घेण्यासाठी 19 महिने

(160 टक्के) अतिरिक्त मुदतवाढ विना दंड मंजूर करण्याबाबत शिफारस केली आहे. बंधा-याचे काम पुर्ण झाल्यानंतर चाचणी घेण्यात येत असल्याने चाचणी घेण्यासाठी मुदतवाढीची शिफारस का करण्यात आली आहे? याबाबत खुलासा करावा. तसेच बंधा-याच्या एकुण कामाची किंमत रुपये 49,13,766/- असुन मुळ मुदतीत रुपये 34,92,502/- व मुदतवाढीच्या कालावधीमध्ये रुपये 14,21,264/- एवढ्या रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. ठेकेदाराचा मुदतवाढीचा अर्ज दिनांक 19/10/2015 रोजी कार्यालयास प्राप्त झाला आहे. निविदा अटी व शर्ती क्रमांक 2 व 6 नुसार विहीत मुदतीत मुदतवाढीसाठी अर्ज प्राप्त न झाल्याने मुळ मुदतीनंतर शिल्लक कामासाठी 1 टक्के ते 10 टक्के पर्यंत दंड आकारणे आवश्यक असताना, नाममात्र रूपये 1,000/- दंड आकारुन मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. तथापि, रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. उपरोक्त अटी व शर्तीनुसार उर्वरीत कामाच्या किमान 2 टक्के रक्कम रुपये 28,425/- दंड वसुल करुन शासनास भरणा करण्यात यावा.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2006/प्र.क्र. 366/वित्त 9, दिनांक 31/12/2009 अन्वये 5 लाखापेक्षा कमी कामासाठी जिल्हा स्तरावरील एक गट “क” वर्ग दैनिक (मराठी/हिंदी) व एक “क” वर्ग मराठी साप्ताहीक तसेच 5 लाख ते 50 लाखावरील कामांसाठी विभाग स्तरावरील एक गट “ब” वर्ग दैनिक (मराठी/हिंदी) व एक “ब” वर्ग मराठी साप्ताहीक, जिल्हा स्तरावरील एक गट “ब” वर्ग दैनिक (मराठी/हिंदी) व एक “क” वर्ग साप्ताहीक (15 लाखा पर्यंत), एक “ब” वर्ग साप्ताहीक (15 ते 50 लाखांपर्यंत) तसेच वर्तमानपत्रात दिल्या जाणाऱ्या जाहीरातींचे रोस्टर/नोंदवह्या ठेवण्यात याव्यात व त्या जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडून तपासुन घेण्यात याव्यात.

उपरोक्त प्रमाणे कामाच्या जाहीराती देताना कार्यवाही झालेली नाही. तसेच रोस्टर/नोंदवह्या लेखापरीक्षणास उपलब्ध् झाल्या नाहीत. खुलासा करावा व पुर्तता लेखापरीक्षणात दाखवण्यात यावी.

### 3.381 हिंगणगांव तांबोळेवस्ती, तालुका इंदापूर येथे कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधणे कामातील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** हिंगणगांव तांबोळेवस्ती, तालुका इंदापूर येथे कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधणेकरिता रक्कम रूपये 53,77,649/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अ) निविदा शर्त क्रमांक 14 व 15 नुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 114, 118, 120, 152(2) अन्वये अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुसऱ्या बाबीवर वापरु नये. तसेच एखाद्या बाबीतील तरतुदीमध्ये 25 टक्के पेक्षा जादा वाढ होत असेल किंवा खर्चात रुपये 5,000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्यास कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची पुर्वमान्यता घेवुनच काम करणे आवश्यक होते परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही. खालील बाबीवर अंदाजपत्रकापेक्षा रक्कम रूपये 11,08,069/- जादा खर्च केला आहे. सदरबाबत सक्षम प्राधिका-याची पुर्व मंजूरी न घेतलेने सदरचा खर्च लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे

ब) तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 152(3) नुसार कामातील बचत ही अन्य बाबीच्या कामावरील खर्च करणेकरीता वापरणे अनियमिततेचे आहे. 8 बाबींच्या परिमाणात बचत ही 10 टक्के पेक्षा अधिक आहे. तसेच काही बाबी प्रकलनात घेण्यात आलेल्या आहेत. परंतू, त्या बाबीवर खर्च न झाल्याने रक्कम रूपये 3,56,394/- बचत झालेली आहे. सदर बचत कोणत्या प्राधिकारान्वये वापरण्यात आली? हे स्पष्ट करण्यात यावे. तोपर्यंत बचतीची रक्कम पुर्व परवानगी न घेता वापरल्याने तात्पुरते अमान्य ठेवण्यात येत आहे.

2) विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविनि 2307/जिप/सातारा/विमा संकीर्ण/ अभि-2, दिनांक 16/11/2007 जिल्हा परिषद, पुणे बांधकाम विभागाचे परीपत्रक क्रमांक जिप/बां/प्र.क्र 793, दिनांक 25/03/2011 नुसार देयकामधून 1 टक्के कामगार विमा रक्कम कपात करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

सदर कामाच्या देयकामधून रूपये 53,776/- कपात करणे आवश्यक होते. तथापि, रूपये 48,310/- कपात करण्यात आले आहेत. उर्वरीत रक्कम रुपये 5,466/- वसुल करुन शासनास भरणा करावी.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र./108/ कामगार 7अ, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर या खाती 1 टक्के रक्कम शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

सदर कामाच्या देयकामधून रूपये 53,776/- कपात करणे आवश्यक होते. तथापि, रूपये 48,310/- कपात करण्यात आले आहेत. उर्वरीत रक्कम रुपये 5,466/- वसुल करुन शासनास भरणा करावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 148(1) व निविदा अटी व शर्ती क्रमांक 2 नुसार कामामध्ये योग्य ती प्रगती राहण्याकरीता 1 टक्के ते 10 टक्के दंडाची तरतूद अंतर्भूत आहे तसेच मुदतवाढीकरीता मुळ मुदत संपण्यापूर्वी ठेकेदाराने किमान 15 दिवस अगोदर पुर्व सुचना देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

कामासाठी 18 महिन्याची पुरेशा कालावधी असताना काम विहीत कालावधीमध्ये पुर्ण न झाल्याने किमान 1 टक्के ने रुपये 46,528/- दंड आकारणे आवश्यक होते. तथापि, कामाच्या ठिकाणी पाणी असल्याचे कारण देवून नाममात्र रुपये 5,000/- दंड आकारुन दिनांक 31/10/2016 अखेर मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. सबब उर्वरीत दंडाची रक्कम रुपये 41,528/- संबंधीतांकडून वसुल करुन शासन निधीमध्ये भरणा करावा.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक परास/101/प्र.क्र.40/जल, दिनांक 19/10/2001 अन्वये तलाव/बंधारा बांधणे/दुरुस्तीच्या कामापोटी कपात करुन ठेवलेली 10 टक्के रक्कम काम पुर्ण झाल्यापासून पुढील दोन वर्षे पाणी गळती तपासणी करुन देणेची आहे तसा अहवाल नस्तीसोबत दिसुन आला नाही. देयकावर शेरा मारुन ठेकेदाराला रुपये 5,37,765/- माहे 2017 मध्ये परत करण्यात आले आहेत. सदर अनियमिततेबाबत खुलासा करण्यात यावा.

6) निविदा अटी शती (Detailed Tender Notice) क्रमांक 12 अन्वये 120 दिवसाचा निविदा ग्राहयता कालावधी दिनांक 28/11/2014 रोजी संपला असताना, विलंबाने दिनांक 30/12/2014 रोजी कार्यादेश का देण्यात आले? याबाबत खुलासा करावा.

7) दर सुचीमधील सुचनेनुसार निविदा रकमेमध्ये 1 टक्के कामगार विमा रक्कम अधिक करुन कागदोपत्री पुर्तता झाल्यानंतरच सदरची रक्कम ठेकदारास प्रतीपूर्ती करावयाची आहे तथापि, कामाची नस्ती, दर पृथःकरणाच्या व देयकाची तपासणी करताना आसे आढळून आले आहे की, ठेकेदाराला देय रकमेमधूनच 1 टक्के कामगार विमा रक्कम कपात करुन शासानास भरणा करण्यात येत आहे. तर मग Recapitulation sheet मध्ये 1 टक्के कामगार विमा रक्कम का अधिक करण्यात येते? याबाबत खुलासा करावा.

8) सदर बंधारा बांधल्यामुळे 32 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असल्याचे नमुद केले आहे. तथापि, बंधाऱ्याचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर किती क्षेत्र सिंचनाखाली आले? याबाबत लाभार्थी गावाचा/शेतकऱ्यांचा अहवाल देण्यात आलेला नाही.

9) सदर बंधारा साखर कारखान्यापासून 10 किमी च्या आत असल्याबाबत प्रमाणपत्र नस्तीसोबत दिसुन आले नाही. त्यामुळे दर पृथःकरणामध्ये प्रत्येक बाबीसाठी आकारण्यात आलेली 5 टक्के जादा रक्कम रूपये 2,53,543/- वसुल करणे आवश्यक आहे. खुलासा करा.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2006/प्र.क्र. 366/वित्त 9, दिनांक 31/12/2009 अन्वये 5 लाखापेक्षा कमी कामासाठी जिल्हा स्तरावरील एक गट “क” वर्ग दैनिक (मराठी/हिंदी) व एक “क” वर्ग मराठी साप्ताहीक तसेच 5 लाख ते 50 लाखावरील कामांसाठी विभाग स्तरावरील एक गट “ब” वर्ग दैनिक (मराठी/हिंदी) व एक “ब” वर्ग मराठी साप्ताहीक, जिल्हा स्तरावरील एक गट “ब” वर्ग दैनिक (मराठी/हिंदी) व एक “क” वर्ग साप्ताहीक (15 लाखापर्यंत), एक “ब” वर्ग साप्ताहीक (15 ते 50 लाखांपर्यंत) तसेच वर्तमानपत्रात दिल्या जाणाऱ्या जाहीरातींचे रोस्टर/नोंदवहया ठेवण्यात याव्यात व त्या जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडून तपासुन घेण्यात याव्यात.

उपरोक्तप्रमाणे कामाच्या जाहिराती देताना कार्यवाही झालेली नाही. तसेच रोस्टर/नोंदवह्या लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. खुलासा करावा.

**3.382 पाझर तलाव दुरुस्ती वर्णे तालुका सातारा कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर कामाबाबत प्रमाणक क्रमांक 146, दिनांक 30/06/2016 अन्वये रक्कम रुपये 44,66,903/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विमा संचालनालयाच्या दिनांक 19/03/2015 च्या पत्रानुसार 25 लाखापेक्षा जादा रकमेच्या कामावर 1 टक्केप्रमाणे विमा कपात करणे आवश्यक असताना 0.5 टक्के प्रमाणे रूपये 22,335/- कपात केलेले आहेत. कामावरील मजूरांचा विमा न काढलेने कमी कपात दंड विमा रूपये 22,335/- कपात करुन विमा संचालनालयास पाठविणे आवश्यक आहे.

2) लघुपाटबंधारे विभागाने इतर कामांना एक वर्षापेक्षा जास्तीची मुदत दिलेली असताना सदर कामास केवळ 1 महिन्याचा कालावधी का देण्यात आला? याबाबत साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.383 साठवण बंधारा दरे खुर्द, तालुका जावली कामाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदर कामाबाबत प्रमाणक क्रमांक 75, दिनांक 27/06/2016 अन्व्ये रक्कम रुपये 8,90,703/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1A) सदर कामाच्या बाब क्रमांक 1 मोजमाप पुस्तक पान क्रमांक 41 वरील नोंदीनुसार KEY TRENCH EXCAVATION करीता माती व कठीण खडकामध्ये अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा एक मीटरने तसेच M-15 कॉंक्रीटमध्ये 1.30 मीटरने काम केल्याने M-15 कॉंक्रीटमधील अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा जादा काम 0.30 मीटर केल्याने रक्कम रूपये 16,476/- वसूल होणे आवश्यक आहे. सदरची मोजमापे पहाता सदर EXCAVATION 1 मीटरने केले आहे.

1B) सदर कामासंबंधातील M-15 च्या केलेल्या कामाची मोजमापे (मोजमाप पान क्रमांक 43) पडताळणी केली असता सदर काम 1.30 मीटरने केले आहे. त्यामुळे M-15 चे जादा केलेले काम 0.30 लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. करीता जादा प्रदान रुपये 16,476/- वसुल करुन साधार पुर्तता दाखवावी.

2) तसेच सदर कामाच्या बाब क्रमांक 1 SR EXCAVATION चे चेनेज क्रमांक 3 मध्ये 1.30 मध्ये 0.10 व TRENCH करीता 0.40 असे एकूण 0.50 इतक्या उंचीचे जादा काम केलेले आहे.

मॅन्युअल ऑफ मायनर इरिगेशन वर्क्स 1943 मधील परिच्छेद क्रमांक 7.10 अन्वये खडकामध्ये 1.20 पर्यंतच खुदाई करणेबाबत पुरेशी तरतुद आहे. त्यामुळे जादा खुदाई 0.50 मीटरचे जादा प्रदान झालेले आहे. रक्कम रुपये 759/- वसुल करुन पुर्तता होणे आवश्यक आहे.

**3.384 मत्स्य व्यवसाय वाढीच्या तलाव ठेक्यातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 34) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेकडील एकूण मोठे तलाव त्यापैकी बारमाही पाणी असणारे तलाव यांच्या सर्व नोंदी विभागाकडे असून त्यानुसार सर्व तलावांसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन त्यानुसार इच्छुक निविदाधारकांमधून महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय दिनांक 15/10/2001 नुसार कार्यवाही होणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही न केलेने जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

2) ठेक्याने देण्याची कार्यवाही सन 2012-2013 पासून लघुपाटबंधारे विभागाकडे आलेली असून त्यापूर्वी सदर काम सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय सातारा यांचेकडे होते. तथापि, लघु पाटबंधारे विभागाने सहाय्यक

आयुक्त कार्यालयाकडून कोणकोणते तलाव किती कालावधीअखेर दिलेले आहेत? तसेच कोणत्या संस्थेकडे ठेक्याची येणेबाकी आहे? याबाबतची माहिती घेणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही झालेली नाही.

3) विभागाकडे 7.5 हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असणारे बारमाही बंधारे असून त्यांच्या ठेक्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने सदर तलाव अनधिकृतपणे वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) विभागाकडे संस्थेने मागणी केल्यावर 5 वर्षांसाठी तलाव ठेक्याने देण्याची कार्यपध्दती अवलंबिलेली आहे. तथापि, निविदा पध्दतीने प्रसिध्दीनंतर एकपेक्षा जास्त मच्छीमार संस्थांनी तलावासाठी ठेक्याची मागणी केल्यास त्याद्वारे स्पर्धात्मक दराचा लाभ मिळू शकला असता. परंतू, विभागाने विना जाहिरात 5 वर्षांसाठी करार केलेने अन्य संस्था इच्छुक असणारे केवळ विस्तृत प्रसिध्दी अभावी त्या ठेक्यापासून वंचित राहिल्या असून यापुढे 5 वर्षाच्या ठेका पध्दतीत बदल करणे आवश्यक आहे.

5) सन 2016-2017 मध्ये सदर बाबीतून रुपये 56,850/- इतके उत्पन्न जिल्हा परिषदेस मिळाले असून तपशिलवार नोंदवही ठेऊन जाहिर प्रसिध्दीद्वारे तलाव ठेक्याने दिल्यास याहून मोठे उत्पन्न मिळू शकते.

**3.385 कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा निमसोड तालुका कडेगाव**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 48,16,453/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शेतकऱ्याच्या विरोधामुळे कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा स्थान बदल झाल्यामुळे या कामासाठी सुधारित प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्याचे अधिक्षक अभियंता यांनी आदेश दिल्यामुळे मुळ कामाचे आदेश रद्द करुन सुधारित निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना कार्यालयाने तशी कार्यवाही केलेली नाही.

2) मुळ अंदाजपत्रक हे सन 2008-2009 च्या दरसुची प्रमाणे रक्कम रुपये 24,10,695/- चे केलेले होते. तर सुधारित अंदाजपत्रक हे नवीन स्थळाचे सन 2009-2010 दर सुचीप्रमाणे करुन रुपये 51,72,306/- चे करण्यात आले होते. त्यामुळे मक्तेदाराने काम करताना ज्या नवीन स्थळासाठी अंदाजपत्रक केले होते, त्याच जागेवर करणे अपेक्षित असताना मक्तेदाराने कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याचे काम नवीन जागेवर न करता शेतकऱ्याच्या मागणीवरुन कार्यालयाच्या परवानगीशिवाय जुन्याच जागेवर केल्याने अनियमितता झाली आहे.

3) मक्तेदाराला प्रथम धावत्या देयकाचे प्रदान हे जुन्याच दरसुची व शेडयुल्ड बी दराप्रमाणेच केले असून सुधारित प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची रक्कम अधिक असल्यामुळे विभागीय कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रशा/2/228, दिनांक 24/01/2013 अन्वये या योजनेच्या संधानक एम 10 (40 MSA) ऐवजी एम-15 (40 MSA) करण्याची अतिरिक्त बाब दरसुचीची परवानगी मागितली व त्यास सहाय्यक अधिक्षक अभियंता यांचे पत्र क्रमांक रेशा/अतिरिक्त बाब दरसूची/382/2014, दिनांक 24/01/2014 ने मंजूरी दिली

जर संधानकाचे काम एम-10 (40 MSA) मध्ये करण्यात आले असते तर रुपये 14,49,519/- एवढा खर्च झाला असता या नवीन अतिरिक्त बाबीस मंजूरी घेवून एम-15 (40 MSA) मध्ये संधानकाचे एकूण काम 742.19 घमी x 3,310.75 इतके केल्यामुळे रुपये 24,57,205/- इतका खर्च झाला आहे व त्यामुळे रुपये 10,07,686/- इतका जादा खर्च झाला आहे. वास्तविक महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक जलसं/2029/प्रक्र 1/जल-1/जल-7, दिनांक 01/01/2014 नुसार सिमेंट कॉक्रिट बंधाऱ्याची कामे एम-10 मध्ये करावीत, असे स्पष्ट आदेश असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) त्याचप्रमाणे मूळ अंदाजपत्रकात बाब नसताना केवळ अधिक रकमेची सुधारित प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी असताना तसेच बंधाऱ्याचे काम मूळ जागेवर केल्यामुळे सदर कामावर प्रत्यक्ष खर्च कमी होत असल्याने मान्यतेची मोठी रककम शिल्लक रहात असल्याने कार्यकारी अभियंता (जलसंधारण) विभाग, सांगली दिनांक 19/10/2016 ने सदर कामाच्या पाणी साठा होणाऱ्या बाजूस पाणी साठा वाढविण्याच्या दृष्टीने खोदकाम करुन घेणे आवश्यक असल्याचे पत्र दिनांक 30/12/2016 ने नमूद करुन याबाबत निविदा शर्त 38 च्या प्रस्तावास मान्यता देण्यासाठी अधिक्षक अभियंता यांना पत्र दिले. Excavation for Nala regradation साठी परवानगी मागितली. महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, जलसं/2012/प्रक्र 1/जल-7, दिनांक 01/01/2014 मध्ये सिमेंट नाला हा

पुर्नभरणाचा उपचार आहे राज्यातील भौगोलिक परिस्थिती /भुगर्भातील जमिनीचा प्रकार विचार करता जमिनीत पाणी किती मुरते? याचे प्रमाण निश्चित करता येत नाही. त्यामुळे नालाबांधाचे आर्थिक मापदंड पाणी साठयाशी निगडीत ठेवू नये, असे नमूद केले असतानाही सहाय्यक अधिक्षक अभियंता यांचे पत्र क्रमांक रेशा/निविदा/5522/2016, दिनांक 09/12/2016 ने 25,700.25/- घमी x 67.10 = 16,65,774/- ला परवानगी दिल्यामुळे अनियमितता झाली आहे. त्यामुळे अंदाजपत्रकातील मुळ खोदाई 383 घमी व प्रत्यक्ष खोदाई 24,706 घमी केल्यामुळे रुपये 16,38,141/- इतका जादा खर्च करावा लागला आहे.

5) मे. साई कन्स्ट्रक्शन हिंगणगाव यांना काम सुरु करण्याचे आदेश दिनांक 25/05/2010 रोजी व कामाची मुदत 9 महिने म्हणजे 24/07/2011 पर्यंत होती. या कालावधीत काम सुरु झाले नव्हते. या कालावधीत मे. साई कन्स्ट्रक्शन यांच्या नोंदणी प्रमाणपत्राची मुदत 06/06/2012 रोजी संपलेली होती. तसेच ठेकेदाराने पहिली मुदत वाढीसाठी दिनांक 01/01/2014 रोजी पत्र दिले. त्यापुर्वी ठेकेदाराने नोंदणी प्रमाणपत्राची नुतनीकरण केल्याची खात्री होणे आवश्यक होते.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियमाप्रमाणे ठेकेदाराने मुदत संपण्यापुर्वी एक महिना अगोदर मुदतवाढीची मागणी करणे आवश्यक असता दिनांक 01/01/2014 रोजी म्हणजे 3 वर्षानंतर परवानगी मागीतल्याने व ती मुदतवाढ मंजूर केल्याने नियमबाहयता झाली आहे.

### 3.386 तालुका जत बेवनुर (नपापु विहिरीजवळ) येथे सिमेंट बंधारा बांधणे.

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 83, दिनांक 20/10/2016 अन्वये रक्कम रुपये 23,87,931/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामासाठी 6 निविदा प्राप्त झाल्या होत्या. मात्र निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली. फेरनिविदा प्रक्रियेत 2 निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापैकी श्रीमती पुजा दत्तात्रय व्हनमाने, जत यांची 16.45% नी कमी दराची निविदा होती. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दिनांक 12/02/2016 नुसार 1 ते 10 टक्क्यापेक्षा कमी दराची निविदा प्राप्त झाल्यास ठेकदाराकडुन 1 टक्का रक्कमेचा 1,72,110/- परफॉर्मन्स अनामत भरणे आवश्यक आहे. यासाठी कार्यालयाचे पत्र दिनांक 02/06/2016 अन्वये कळविण्यात आले होते. परंतु, श्रीमती पुजा दत्तात्रय व्हनमाने यांनी दिनांक 02/06/2016 रोजी धनाकर्ष नंबर 008759 दिनांक 02/06/2016 रूपये 1,72,110/- बँकेत जमा केल्यामुळे निविदा समितीच्या दिनांक 17/03/2016 च्या बैठकीत श्रीमती पुजा दत्तात्रय व्हनमाने यांची निविदा अमान्य करण्यात आली. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय दिनांक 12/2/2016 चे परिच्छेद क्रमांक 4 (छ) नुसार कंत्राटदाराची अनामत रक्कम जप्त करून त्यांची नोंदणी एक वर्षासाठी स्थगित ठेवणेसाठी अधिक्षक अभियंता यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला दिसत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 अन्वये साहित्याचा चाचणी अहवाल घेणे गरजेचे आहे. परंतु, प्रस्तूत प्रकरणी माती, मुरूम, सिमेंट, वाळू, स्टीलचा चाचणी अहवाल घेतलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जल संधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जलसं -2012 /प्र.क्र.65/जल-7, दिनांक 22/01/2013 नुसार सिमेंट बंधारा कामाच्या ठिकाणी नामफलक लावणे आवश्यक आहे पण, तशी कार्यवाही केलेली नाही.

4) सिमेंट बंधारा काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक 07/05/2003 च्या शासन परिपत्रकानुसार सदर बंधारा ग्रामपंचायतीकडे हस्तांतर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) सदर कामाचे बाब क्रमांक 10 माहिती फलकासाठी PWD DSR 2013-2014 मधील मूळ दर घेवून रक्कम रूपये 4,950/- इतकी रक्कम प्रदान केली आहे. परंतु, RSR पुणे विभाग सन 2013-2014 मध्ये माहिती फलकासाठी I/P 11/30 मध्ये रूपये 2,091.50 हा दर असताना PWD DSR मधील दर घेतल्याने रक्कम रूपये 2,858/- चे अतीप्रदान झाले आहे.

6) बंधारा हा त्यात पाणी साठलेवर ते पाणी गळती होत नाही. याबाबतचा कार्यकारी अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग, सांगली यांचा सविस्तर स्वतंत्र टेस्टींग रिपोर्ट हा नस्तीसोबत उपलब्ध झाला नाही. याबाबत सदरची चाचणी कधी घेण्यात आली? त्याचा निरिक्षण तपासणी अहवाल घेणे आवश्यक आहे. केलेले काम योग्य झाले असलेबाबत व सदर योजनेचा लाभ शेतकरी व ग्रामस्थांना होत असलेबाबत लाभार्थी गावांचा जिल्हास्तरावर छोटेपाटबंधारे विभागाने केलेल्या कामांबाबतचा अहवाल घेणे आवश्यक आहे.

**3.387 बेवनूर (बोराटी मळा ) येथील सिमेंट बंधारा बांधणे.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 84, दिनांक 20/10/2016 अन्वये रक्कम रुपये 43,59,796/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामासाठी दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. या प्राप्त निविदापैकी मे. पाटील कन्स्ट्रक्शन संख तालुका जत यांची सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झाली होती. शासन निर्णयाप्रमाणे 1 ते 10 टक्केपर्यंत कमी दराची निविदा प्राप्त झाल्यास ठेकेदाराकडुन 1 टक्का इतक्या रकमेचा धनाकर्षाचा म्हणजे रुपये 45,000/- देणे आवश्यक आहे. यासाठी कार्यालयाचे क्रमांक जिपसां/छोपावि/एबी2/1064/2016, दिनांक 27/05/2016 अन्वये ठेकेदारास कळविण्यात आले होते. ठेकेदाराने धनाकर्षाऐवजी रोख रककम बँकेत भरली. त्यामुळे निविदा समितीच्या दिनांक 04/06/2016 च्या बैठकीत मे. पाटील कनस्ट्रकशन यांची निविदा अमान्य करुन दुसरी कमी दराची निविदा श्री. बापुसाहेब गुंजाटे सांगली 0.55 टक्के कमी दराची निविदा मान्य केली. मात्र मे. पाटील कन्स्ट्रक्शन यांची सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय दिनांक 12/2/2016 चे परिच्छेद क्रमांक 4 (छ) नुसार कंत्राटदाराची अनामत रक्कम प्राप्त करुन त्यांची नोंदणी एक वर्षासाठी स्थगित ठेवणेसाठी अधिक्षक अभियंता यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला दिसत नाही.

2) अंदाजपत्रकाप्रमाणे की वॉलची उंची 6.60 मीटर धरण्यात आली होती. याप्रमाणे त्याचे प्रमाणे 61.2 नमूद असून प्रत्यक्ष की वॉलची उंची 7.10 मीटर धरुन की वॉलचे बांधकाम करण्यात आले आहे.

अ) 7.10 x 0.60 x 2.58 x 3 = 10.02 x 3 = 33.84 एमबी पृष्ठ क्रमांक 71

ब) 7.10 x 0.60 x 2.58 x 3 = 10.02 x 3 = 33.84

त्यामुळे एकूण प्रमाणे = 67.68 झाल्यामुळे रुपये 24,687/- चे अतिप्रदान झाले आहे. त्याची वसुली करण्यात यावी.

3) कामाचे माहिती फलकाची पीडब्ल्युडी 2013-2014 मधील मूळ दर घेवून रुपये 4,950/- इतकी अदाई केली आहे. परंतु, विभागीय दरसुची पुणे सन 2013-2014 मध्ये माहिती फलकासाठी I/P मध्ये रुपये 2,091.50/- इतका असताना पीडब्ल्युडी डीएसआर मधील दर घेतल्याने रुपये 2,858/- चे अतिप्रदान झाले आहे.

**3.388 पाझर तलाव नागरदळे क्रमांक 2 तालुका चंदगड जिल्हा कोल्हापूरचे बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पाझर तलाव नागरदळे क्रमांक 2 तालुका चंदगड, जिल्हा कोल्हापूरचे बांधकाम करणेकरीता रककम रूपये 94,24,317/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 34 व शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2009/प्रक्र/514/ वित्त 9 दिनांक 20/11/2009 च्या तरतुदीनुसार रुपये 9,000/- चा मुद्रांक घेणे आवश्यक असताना रुपये 7,300/- चा मुद्रांक घेणेत आला आहे. उर्वरित रककम रुपये 1,700/- चा मुद्रांक घेणे आवश्यक आहे.

2) पाझर तलाव नागरदळे क्रमांक 2 तालुका चंदगड या योजनेच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील नोंदवही क्रमांक 40 सन 2012 नुसार व आदेश जा.क्रं. मुअ/प्रशा/6/5279 दिनांक 15/10/2011 अन्वये रककम रुपये 78,95,461/- इतक्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रधान केलेली आहे. त्यानंतर या योजनेस जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडील ठराव क्रमांक 45 दिनांक 03/05/2012 नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली. निविदा मागविताना प्रचलित नियमानुसार निविदा

मागविण्यात येवून श्री. अशोक महादेव चौगले रा. सोनाळी तालुका कागल या ठेकेदाराचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.45 टक्के इतक्या जादा दराचे निविदा प्राप्त निविदेतील कमीत कमी दराचे निश्चित करुन निविदा क्रमांक ब-1/अअ/19/सन 2012-2013 अन्वये स्विकृत करण्यात आले. या कामाची निविदा रककम रुपये 81,78,610/- इतकी आहे. त्यानंतर या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक 16/11/2012 रोजी देणेत आले.

परंतु, वरीलप्रमाणे प्राप्त निविदेतील कमीत कमी दराची 15.45 जादा दराचे निविदा स्विकृती पुर्वी 10 टक्के पेक्षा जादा दराची निविदा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 114 नुसार व 115, 116, 118, 119 प्रमाणे मुळ अंदाजपत्रकापेक्षा 10 टक्के पेक्षा जादा होणाऱ्या मूळ अंदाजपत्रकीय रकमेत वाढ होत असलेने सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेवून निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित निविदा स्विकृती नियमानुसार वरीलप्रमाणे फेर निविदा काढुन निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. सदर अनियमिततेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणारी भुसंपादनासाठी गट नंबर 706 व 668 मध्ये भुसंपादनासाठी मोजणीबाबत भुमी अभिलेख कार्यालयाकडुन मो.र.नं. 334/13/283 दिनांक 27/12/2013 नुसार भुमापन गट क्रमांक 668 मध्ये 97.15 आर व 706 गट नंबरमध्ये 1 हे 98.01 आर असे एकूण 2.95.16 हेक्टर जमीन मोजणी करुन घेणेत आले. सदर जमीनीचे कब्जेदार ग्रामपंचायतीच्या नांवे आहे. त्याप्रमाणे 7/12 उताऱ्यावर नोंद आहे. परंतु, भुसंपादनानंतर शासनाच्या/ जिल्हा परिषदेच्या नांवे अधिगृहीत करुन भुसंपादन झालेबाबतचे नोंद उताऱ्यावर नसल्याने कार्यवाही पुर्ण झालेली नाही. तरी याबाबत तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तसेच सदर पाझर तलावाचे सांडवा पुच्छ कालव्याचा कांही भाग खाजगी जमिनीत येत असल्याने सदरबाबत भुसंपादनाबाबत काय कार्यवाही केली, याबाबत स्पष्टता दिसून येत नाही. या खाजगी जमिनीचे भुसंपादन होणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रकल्पाचे कामास सुरुवात भुसंपादनापुर्वीच केल्याचे दिसुन येते सदर अनियमिततेबाबत गंभीरपणे दखल घेवून कार्यवाही होणे अपेक्षीत होते.

4) सदर पाझर तलाव बांधकामाचा नियम बांधकाम पुर्ण करणेचा कालावधी 24 महिनेचा असल्याने सदर कालावधीत बांधकाम पुर्ण होवू शकलेले नाही त्यामुळे मुदतवाढ देण्यासाठी कंत्राटदाराने विहित कालावधीत मुदतवाढीचा प्रस्ताव निविदा अट-2 प्रमाणे अर्ज सादर करणे आवश्यक असता तशी कार्यवाही झाली नसल्याने संबंधित कंत्राटदारावर 1 टक्का प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सदर कामाची सुधारित मुदतवाढ दिनांक 31/03/2017 होती. तथापि, काम पुर्ण दिनांक 01/02/2017 रोजी असलेने कंत्राटदाराची दिलेल्या मुदतवाढीमुळे भाव, दरवाढ अनुज्ञेय रहाणार नाही. कारण सदर प्रकल्प पहिल्या विहित मुदतीत पुर्ण झाला नाही.

5) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, परिपत्रक ग्रापकं/109/प्रक्र 10/पापु 7, दिनांक 11/12/1997 अन्वये वापरलेल्या साहित्याचा मान्यता प्राप्त संस्थेकडे चाचणी अहवाल घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केल्याचे लेखे पडताळणीस उपलब्ध झाले नाहीत. तरी संबंधित पाझर तलावामध्ये वापरणेत आलेली माती, मुरुम योग्य दर्जाचे असल्याचे दिसून येत नाही.

6) कामाचे ठिकाणी संबंधित प्रकल्पाचे सविस्तर माहिती व दोषदायित्व इत्यादी बाबतचे फलक महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम/1099/सीआर/54/03, दिनांक 20/05/2000 नुसार व सार्वजनिक बांधकाम खात्याच्या नियमावलीनुसार माहिती फलक लावणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण/2004/प्रक्रं 85/रस्ते 2, दिनांक 11/06/2004 नुसार ब-1 निविदेमधील खंड 38 खालील प्रस्तावास क्षेत्रिय अधिक्षक अभियंता यांची मंजुरी प्राप्त झाल्यावरच तसेच सक्षम तांत्रिक अधिकाऱ्याची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच वाढीव परिमाणाचे प्रदान करता येईल. असे असताना ब-1 निविदा अट क्रमांक 38 नुसार सक्षम मंजुरी न घेता वाढीव परिमाणावर केलेला खर्च रक्कम रुपये 7,59,897/- लेखापरिक्षणात तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

**3.389 मौ.मळेगांव, (गांवतलाव), तालुका बार्शी येथे खोलीकरण व रुंदीकरण करणे.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,44,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बाब क्रमांक 01 Excavation in soil,soft murum व इतर मधून एम.बी.पृष्ठ क्रमांक 48, 49 नुसार 3479.70 घ.मी.मटेरियल प्राप्त आहे. त्यापैकी 95 टक्के मटेरियल 3,305.715 घ.मी. वापरांत आणण्याजोगे आहे. परंतु, गाईडबंडसाठी सदरचे मटेरियल कां वापरण्यांत आलेले नाही? याबाबत खुलासा करावा.

2) बाब क्रमांक 04 नुसार Excavated material in all strata (बाब क्रमांक 1 नुसार) चे Conveying & Depositing वर 3,479.70 घ.मी. x 42.50 दर = 1,47,887.25 एवढा खर्च झाला असून सदर मटेरियल गाईडबंडसाठी वापरले असते, तर हा खर्च झाला नसता व सदर रकमेची बचत झाली असती, असे लेखापरीक्षणाचे मत आहे. याबाबत खुलासा करावा.

3) सदर कामाच्या बाब क्रमांक 05 अन्वये नामफलक या बाबीसाठी रुपये 4,769/- एवढा खर्च करण्यांत आलेला असून दरसूची सन 2013-2014 अन्वये I/P 11/30 नुसार रुपये 2,091.50 दर नमूद आहे. तरी सदर कामावर रुपये 2,678/- एवढा जादा खर्च काय आधारे करण्यांत आला? याचा लेखापरीक्षणांस खुलासा करावा.

4) सदर काम सुरु करण्यापूर्वी भूस्तराबाबत वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचा अहवाल घेतला किंवा कसे, याबाबतचे अभिलेखे नस्तीसोबत दिसून आलेले नाहीत.

5) जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक जलशि-2015/प्र.क्र.115/जल-7, दिनांक 13/03/2015 अन्वये त्रयस्थ संस्थेमार्फत कामाचे मुल्यामापन करुन मुल्यमापन अहवाल घेणे आवश्यक आहे परंतु, सदर नस्तीसोबत मुल्यामापन अहवाल लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेला नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 144 नुसार ठेकेदाराकडून सुरक्षा अनामत ठेव चलनाने अथवा देयकातून कपांत करणे आवश्यक आहे. परंतु, सदर कामामध्ये एकूण रक्कम रूपये 2,44,000/- या रकमेवर 5 टक्के प्रमाणे 12,200/- कपात करणे आवश्यक असतांना प्रत्यक्ष कपांत चलनाने दिनांक 09/09/2016 रुपये 2,500/- व देयकातून कपांत रुपये 7,320/- असे एकूण रुपये 9,820/- कपांत केलेले आहेत. कमी कपांत रुपये 2,380/- कां करण्यांत आली? याचा लेखापरीक्षणांस खुलासा करावा.

7) कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 4 नुसार रिचार्ज शाफट चे काम करतांना मंजूर अंदाजपत्रकानुसार व संकल्प चित्रानुसार काम करणे आवश्यक आहे. सदर काम केल्याचे छायाचित्र व उपअभियंता यांचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेले नाही. सदर बाबींवर खर्च रूपये 14,280/- x 2 = 28,560/- तात्पुरता अमान्य करण्यांत येत आहे.

8) कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 09 नुसार कामाच्या देयकांतून देय रकमेवर 5 टक्के रक्कम हायड्रोलिक टेस्टींगसाठी कपांत करणे आवश्यक असतांना देय रक्कम रूपये 2,44,000/- वर 5 टक्के प्रमाणे रूपये 12,200/- कपांत केलेली नाही. याबाबत लेखापरीक्षणांस खुलासा करावा.

**3.390 मौ.निंभोरे(वळेकर वस्ती), तालुका करमाळा येथे नाला खोलीकरणासह सिमेंट बंधारा बांधणे**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर बाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 11,83,059/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांची अधिसूचना दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्व धन यासाठी प्रती घ.मी. रूपये 141.34/- या दराने वसुली करणे आवश्यक आहे. सदर कामामध्ये 304.37 घ.मी.ची एकूण रूपये 43,020/- वसुल केली असून त्याचे शासनाकडे जमा केल्याचे चलन लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेले नाही.

2) मुख्य अभियंता (लघूपाटबंधारे), स्थानिक स्तर, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक मुअ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये Clearing the Site ही बाब अंदाजपत्रकांत अंतर्भूत करु नये, असे नमूद आहे. परंतु,

सदर कामामध्ये बाब क्रमांक 01 अन्वये झाडेझुडपे काढणे, तोडणे व स्वच्छ करणे या कामासाठी रुपये 2,340/- एवढा खर्च केला आहे. रक्कम वसूल करावी.

3) सदर कामाच्या नामफलक या बाबीसाठी रुपये 4,843/- एवढा खर्च करण्यांत आलेला असून दरसूची सन 2013-2014 अन्वये I/P 11/30 नुसार रुपये 2,091.50/- दर नमूद आहे. तरी सदर कामावर रुपये 2,751.50/- एवढा जादा खर्च काय आधारे करण्यांत आला? याचा लेखापरीक्षणांस खुलासा करावा.

4) सदर काम सुरु करण्यापूर्वी भूस्तराबाबत वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचा अहवाल घेतला किंवा कसे, याबाबतचे अभिलेखे नस्तीसोबत दिसून आलेले नाहीत.

5) जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक जलशि-2015/प्र.क्र.115/जल-7, दिनांक 13/03/2015 अन्वये त्रयस्थ संस्थेमार्फत कामाचे मुल्यामापन करुन मुल्यमापन अहवाल घेणे आवश्यक आहे. परंतु, सदर नस्तीसोबत मुल्यामापन अहवाल लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेला नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 144 नुसार ठेकेदाराकडून सुरक्षा अनामत ठेव चलनाने अथवा देयकातून कपांत करणे आवश्यक आहे. परंतु, सदर कामामध्ये एकूण रक्कम रूपये 11,83,059/- या रकमेवर 5 टक्के प्रमाणे 59,153/- कपात करणे आवश्यक असतांना प्रत्यक्ष कपांत चलनाने रुपये 14,400/- व देयकातून कपांत रुपये 35,492/- असे एकूण रुपये 49,892/- कपांत केलेले आहेत. कमी कपांत रुपये 9,261/- कां करण्यांत आली? याचा लेखापरीक्षणांस खुलासा करावा.

7) सदर कामाची Providing & fixing in position steel bar या बाबीसाठी एकूण 1.884 मे.टन स्टील 8 व 10 एमएम बार वापरण्यांत आले असून त्याची आकारणी देयकामध्ये मूळ दराप्रमाणे (Base Rate) हा 47,141.70 (RSR 2013-14 प्रमाणे) न घेता रुपये 48,810/- प्रमाणे आकारण्यांत आलेला आहे. त्यामुळे 1.884 X 1668.30 =3,143/- जादा अदा झालेले वसूल करावेत.

8) सदर कामाचा ठेका हा (-) 15.55 कमी दराने दिला असून ठेकेदाराकडून निविदेतील अट क्रमांक 13 अन्वये निविदा रकमेच्या 90 टक्के रक्कम व कंत्राटदाराच्या बोलीची रक्कम यामधील फरकाची रक्कम ही अतिरिक्त सुरक्षा अनामत म्हणून घेणे आवश्यक आहे. परंतु, दिनांक 12/02/2016 चे चलनान्वये फक्त रुपये 8,000/- अतिरिक्त सुरक्षा अनामत म्हणून भरणा केलेला आहे. परंतु, उपरोक्त् अटीप्रमाणे रूपये 79,663/- एवढी रक्कम घेणे आवश्यक होते. तरी कमी कपांतीबाबत खुलासा करावा.

9) सदर कामाचे देयकातून विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील नोटीफिकेशन दिनांक 04/04/2012 नुसार बिलाच्या एकूण रक्कम रूपये 11,83,059/- वर 5 टक्के वॅट वसुल करणे आवश्यक असतां 2 टक्के रक्कम रुपये 24,335/- एवढा वसुल केलेला आहे. तरी कमी वसुल केलेला वॅट रक्कम रुपये 34,817/- एवढी रक्कम शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 मधील नियम 153(3) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करुन घेणे आवश्यक आहे. सदरबाबत सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

11) सदर कामाचे बाब क्रमांक 2 अन्वये Embankment including dressing bank साठी 48 चौ.मी. एवढे काम झाले असून याच्या परिमाणातून 10 सिंक्रेज वजा केलेले नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.391 मौ.तांबवे (मानेशेत), तालुका माळशिरस येथे सिमेंट बंधारा बांधणे नालाखोलीकरणासह.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 8,31,307/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, यांची अधिसूचना दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्व धन यासाठी प्रति घ.मी. रूपये 141.34 या दराने वसुली करणे आवश्यक आहे. सदर कामामध्ये 282.49 घ.मी.ची एकूण वसुली 39,928/- वसुल केली असून शासनाकडे जमा केल्याचे चलन लेखापरीक्षणांस उपलब्ध करावे.

2) मुख्य अभियंता (लघुपाटबंधारे), स्थानिक स्तर, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक मुअ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये Clearing the Site ही बाब अंदाजपत्रकांत अंतर्भूत करु नये, असे नमूद आहे. परंतु,

सदर कामामध्ये बाब क्रमांक 01 अन्वये झाडेझुडपे काढणे, तोडणे व स्वच्छ करणे या कामासाठी रुपये 3,145/- एवढा खर्च केला आहे. रक्कम वसूल करावी.

3) सदर कामाच्या नामफलक या बाबीसाठी रुपये 4,612/- एवढा खर्च करण्यांत आलेला असून दरसूची सन 2013-2014 अन्वये I/P 11/30 नुसार रुपये 2,091.50 दर नमूद आहे. तरी सदर कामावर रुपये 2,520.50 एवढा जादा खर्च काय आधारे करण्यांत आला? याचा लेखापरीक्षणांस खुलासा करावा.

4) सदर काम सुरु करण्यापूर्वी भूस्तराबाबत वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचा अहवाल घेतला किंवा कसे याबाबतचे अभिलेखे नस्तीसोबत दिसून आलेले नाहीत.

5) जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक जलशि-2015/प्र.क्र.115/जल-7,दिनांक13.03.2015 अन्वये त्रयस्थ संस्थेमार्फत कामाचे मुल्यामापन करुन मुल्यमापन अहवाल घेणे आवश्यक आहे परंतु, सदर नस्तीसोबत मुल्यामापन अहवाल लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेला नाही.

6) सदर कामाची Providing & fixing in position steel bar या बाबीसाठी एकूण 1.72 मे.टन स्टील 8 व 10 एमएम बार वापरण्यांत आले असून त्याची आकारणी देयकामध्ये मूळ दराप्रमाणे (Base Rate) हा 47,141.70 (RSR 2013-14 प्रमाणे) न घेता रुपये 48,810/- प्रमाणे आकारण्यांत आलेला आहे. त्यामुळे 1.72 X 1,668.30 = 2,869/- जादा अदा झालेले वसूल करावेत.

7) सदर कामाचा ठेका हा (-) 22.25 कमी दराने दिला असून ठेकेदाराकडून निविदेतील अट क्रमांक 13 अन्वये निविदा रकमेच्या 90 टक्के रक्कम व कंत्राटदाराच्या बोलीची रक्कम यामधील फरकाची रक्कम ही अतिरिक्त सुरक्षा अनामत म्हणून घेणे आवश्यक आहे. परंतु, चलनान्वये फक्त रुपये 13,100/- अतिरिक्त सुरक्षा अनामत म्हणून भरणा केलेला आहे. परंतु, उपरोक्त् अटीप्रमाणे रूपये 1,30,978/- एवढी रक्कम घेणे आवश्यक होते. तरी कमी कपांतीबाबत खुलासा करावा.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 मधील नियम 153(3) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करुन घेणे आवश्यक आहे. सदर बाबत सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

9) नमुना नंबर 65 (नियम 90) अन्वये काम पूर्ण दाखल्यावर दिनांक 30/06/2016 नमूद असून कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सोलापूर व उपअभियंता, माळशिरस यांच्या स्वाक्षरीने सदरहू दाखला दिलेला आहे तरी चे.सहकारमहर्षी शं.मो.पाटील म.स.सं.लवंग यांनी दिनांक 10/02/2017 रोजी दिनांक 01/07/2016 ते 31/03/2017 पर्यतचा विनादंड मुदतवाढ मिळणेसाठीचा अर्ज दिलेला आहे व त्यांस उपअभियंता, माळशिरस यांनी दिनांक 06/03/2017 रोजी प्रस्तावांस मुदतवाढ मिळणेबाबत कार्यकारी अभियंता यांचेकडे शिफारस केलेली आहे तरी या विसंगतीबाबत खुलासा करावा.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम (फ) नुसार मोजमाप नोंदवही मध्ये खाडाखोड, उपरीलेखन, फेरफारच्या नोंदी सक्षम अधिका-यांनी अनुप्रमाणाणित करणे आवश्यक आहे. परंतु, सदर मोजमाप नोंदवही मध्ये पान नंबर 13 ते 35 वर खाडाखोड दिसून येते. परंतु, ती प्रमाणित केलेली नाही. याबाबत खुलासा करावा.

11) सदर देयकांमध्ये बाब क्रमांक 02 Excavation in all types of strata याबाबींवर खालीलप्रमाणे खर्च दिसून येतो.

220.99 घ.मी. यावर 40.15 या दराने रक्कम रूपये 8,873/- प्रदान होणे आवश्यक असतांना 525.20 घ.मी.वर 40.15 या दराने रक्कम रूपये 21,087/- चे प्रदान दुसरे व अंतीम देयकातून झाले असल्यामुळे रक्कम रूपये 12,214/- चे अतिप्रदान झालेले असून सदरची वसुली संबंधीतांकडून होणे आवश्यक आहे.

12) सदर देयकांमध्ये बाब क्रमांक 11 Conveying & desposing याबाबींवर खालीलप्रमाणे खर्च दिसून येतो.

प्रथम व धावत्या देयकातून अदा करुन दुसऱ्या व अंतीम देयकातून 30.73 घ.मी. वरील प्रदान रूपये 39/- प्रमाणे रूपये 1,198/- होणे आवश्यक होते. परंतु, सदर देयकातून 311.94 घ.मी. x 39 प्रमाणे रुपये 12,166/- अदा झाल्यामुळे रक्कम रूपये 10,968/- एवढे जादा अदा वसुलांत आणल्याचे लेखापरीक्षणांस दाखवावे.

**3.392 सिमेंट नाला बांधकाम क्रमांक 1 बेनोडा कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** सिमेंट नाला बांधकाम क्रमांक 1 बेनोडा कामाकरीता रक्कम रूपये 24,34,632/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) रुपये 300/- चे स्टँप पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा केला. कमी रुपये 200/- वसुल पात्र ठरते.

2) सिमेंट नाला बांधकाम क्रमांक 1 बेनोडा या कामावर प्रती ब्रास रुपये 400/- प्रमाणे रॉयल्टीची कपात करणे आवश्यक असतांना रुपये 200/- प्रमाणे रॉयल्टीची कपात केली आहे. तरी 104.82 ब्रासवर कमी कपात रुपये 200/- प्रमाणे रुपये 20,964/- संबधिताकडुन वसुल करुन भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

3) सिमेंट नाला बांधकाम क्रमांक 3 बेनोडा या कामावर मोजमाप पुस्त‍िका क्रमांक 4,525 पान क्रमांक 15 वर 1:2:4 ची क्वॉटीटी 219.25 असुन रेतीचे प्रमाण 0.92 प्रमाणे 201.45 घ.मी.चे ब्रास 71.44 चे दर रुपये 400/- प्रमाणे रॉयल्टी कपात रुपये 28,579/- कपात करणे आवश्यक असतांना रुपये 13,764/- कपात केली आहे. कमी कपात रुपये 14,814/- केली आहे. तसेच गोषवा-यात रेती 34.80 ब्रास दर रुपये 400/- प्रमाणे कपात करणे आवश्यक असतांना रुपये 200/- प्रमाणे कपात केली आहे. तरी 34.80 कमी कपात दर X रुपये 200/- = 6,960/- वसुलपात्र ठरते.

4) सिमेंट नाला बांधकाम क्रमांक 1 तिवसाघाट या कामावर प्रती ब्रास रुपये 400/- प्रमाणे रॉयल्टीची कपात करणे आवश्यक असतांनी रुपये 200/- प्रमाणे रॉयल्टीची कपात केली आहे. तरी कमी कपात रुपये 200/- प्रमाणे रुपये 19,614/- संबधिताकडुन वसुल करुन भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

5) कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या कार्यारंभ आदेशात तीन महिन्याची कामाची मुदत दिलेली आहे. परंतु, संबधित ठेकेदाराने विहित मुदतीत कामाला सुरुवातसुदधा केलेली नाही. मुदत संपल्यानंतर पाणी टंचाईमुळे काम सुरु करणे शक्य नाही, असे मुदत संपल्यानंतर मुदतवाढीचे पत्र दिले असुन या पत्राचे अनुषंगाने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी पत्र क्रमांक 3521 दिनांक 29/11/2016 अन्वये दिनांक 31/03/2017 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. परंतु, या मुदतीतसुदधा सदर बांधकाम पुर्ण झाले नसुन अपुर्ण असल्याचे दिसुन येते. तरी 31/03/2017 पर्यंत दिलेली मुदतवाढ विना दंडाबाबत खुलासा करावा.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासहिंता 1968 चे नियम 167 व 168 अन्वये उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांनी कामाची टक्केवारीनुसार तपासणी केली नसल्याचे मोजमाप पुस्त‍िकेवरुन दिसुन येते.

**3.393 महात्मा फुले जलभुमी अभियान अंतर्गत उपविभाग धारणी यांनी खरेदी केलेल्या निडल्स कामामधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** सदरबाबत रक्कम रूपये 27,88,102/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त निविदा हया 10 टक्के पेक्षा कमी दराने मंजुर झालेल्या आहेत= त्याबाबत सुधारीत अंदाजपत्रक का करण्यात आले नाही? तसेच इतक्या कमी दराने काम करण्यास कंत्राटदारास काम कसे परवडले, याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे. त्यामुळे कामाचा दर्जा बाबत लेखापरीक्षणास सांशकाता असल्याने महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 87 नुसार कामाची तात्रिक पडताळणी अहवाल देयकासोबत नसल्याने कामाची गुणवत्ता व दर्जाबाबत लेखापरीक्षणाची खात्री करता आली नाही.

2) निविदेतील अट क्रमांक 25 नुसार "कार्यारंभ आदेश दिल्यानंतर एक नमुना निडल सात दिवसाचे आत तयार करुन तपासणी करीता सादर करावी व मान्यतेनंतरच पुढील निडल्सं तयार कराव्यात" मात्र याप्रमाणे नमुना निडल घेण्यात आल्या नाहीत. त्यामुळे घेतलेल्या निडल हया तपासणी न करताच खरेदी केल्याचे दिसते. कारण अशा प्रकरची तपासणी केल्याचा चाचणी अहवाल लेखापरीक्षणाला उपलब्धं झाला नाही. त्यामुळे गुणवत्तापुर्ण निडल खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

3) कामामध्ये रूपये 1,300/- ऐवजी रूपये 900/- चे स्टँप पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. रूपये 400/- कमी ने करण्यात आला आहे. रुपये 400/- वसुली करुन दर्शवावी.

4) दिया बंधा-याच्या कामामध्ये सुरवातीला 140 निडल्सचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. मात्र खरेदी 173 निडल्सची केलेली आहे. कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-याला एकुण किती निडल्स आहेत? तसेच बंधा-याला एवढया निडल्सची आवश्यकता होती का? याबाबत खुलासा करावा.

5) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 01/12/2016 नुसार खरेदी करतांना बाजारभाव पाहून त्यानुसार खरेदी करणे आवश्यंक आहे. जर दियाच्या कामाचा एक कंत्राटदार 19.21 टक्के पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार आहे, तर सावलीखेडा मध्ये कंत्राट्दारासोबत तशा प्रकारे वाटाघाटी करण्यास वाव होता. त्यामुळे नुकसान झाल्याचे दिसते. तरी त्याबाबत खुलासा करावा.

6) कामाचे मोजमाप पुस्तिकेची पडताळणी केली असता महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 ब नुसार कामाची प्रत्यक्ष पाहणी करुन कार्यकारी अभियंत्यानी 5 टक्के तपासणी करणे आवश्यक असतांना पाहणी / तपासणी केल्याचे दिसुन आले नाही. याबाबत खुलासा करावा.

7) नवीन फळया टाकल्यानंतर जुन्या फळयांची विल्हेवाट कशी लावण्यात आली, याबाबत देयक अथवा नस्तीमध्ये कोणताही उल्लेख नसल्याने याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

8) कोल्हापुरी बंधारा गावनिहाय कोणत्या बंधाऱ्यामध्ये किती फळया आहेत, याबाबत विभागाकडे कोणतेही अभिलेखे नसल्याने केलेल्या कामाची सत्यता पडताळता येत नाही.

9) करारनाम्यावर कार्यकारी अभियंता यांची सही नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

10) सदर निविदेला वृत्तपत्रात प्रसिध्दी दिल्याचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

11) खरेदी केलेल्या नवीन फळयाची नोंद साठा नोंदवही तसेच जडसंग्रह नोंदवहीला घेतल्याचे स्पष्ट झाले नाही.

**3.394 महात्मा फुले जलभुमी अभियान अंतर्गत उपविभाग वरुड यांनी खरेदी केलेल्या निडल्स कामामधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** सदरबाबत रक्कम रूपये 21,81,340/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त निविदा हया 10 टक्के पेक्षा कमी दराने मंजुर झालेल्या आहेत. त्याबाबत सुधारीत अंदाजपत्रक का करण्यात आले नाही? तसेच इतक्या कमी दराने काम करण्यास कंत्राटदारास काम कसे परवडले, याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे. त्यामुळे कामाचा दर्जाबाबत लेखापरीक्षणास सांशकता असल्याने महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 87 नुसार कामाची तांत्रिक पडताळणी अहवाल देयकासोबत नसल्याने कामाची गुणवत्ता व दर्जाबाबत लेखापरीक्षणाची खात्री करता आली नाही.

2) निविदेतील अट क्रमांक 25 नुसार "कार्यारंभ आदेश दिल्यानंतर एक नमुना निडल सात दिवसाचे आत तयार करुन तपासणी करीता सादर करावी व मान्यतेनंतरच पुढील निडल्सं तयार कराव्यात" मात्र याप्रमाणे नमुना निडल घेण्यात आल्या नाहीत. त्यामुळे घेतलेल्या निडल हया तपासणी न करताच खरेदी केल्याचे दिसते. कारण अशा प्रकरची तपासणी केल्याचा चाचणी अहवाल लेखापरीक्षणाला उपलब्धं झाला नाही. त्यामुळे गुणवत्तापुर्ण निडल खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

3) उपरोक्त कामाची पडताळणी केली असता महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 ब नुसार कामाची कार्यकारी अभियंत्यानी 5 टक्के तपासणी करणे आवश्यक असतांना पाहणी / तपासणी केल्याचे दिसुन आले नाही. याबाबत खुलासा करावा.

4) नवीन फळया टाकल्यानंतर जुन्या फळयांची विल्हेवाट कशी लावण्यात आली, याबाबत देयक अथवा नस्तीमध्ये कोणताही उल्लेख नसल्याने याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) कोल्हापुरी बंधारा गावनिहाय कोणत्या बंधाऱ्यामध्ये किती फळया आहेत, याबाबत विभागाकडे कोणतेही अभिलेखे नसल्याने केलेल्या कामाची सत्यता पडताळता येत नाही.

6) करारनाम्यावर उपअभियंता /कार्यकारी अभियंता यांची सही नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

7) सदर निविदेला वृत्तपत्रात प्रसिध्दी दिल्याचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

8) खरेदी केलेल्या नवीन फळयाची नोंद साठा नोंदवही तसेच जडसंग्रह नोंदवहीला घेतल्याचे स्पष्ट झाले नाही.

9) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 चे नियम 217 नुसार निविदा ही उघडल्यापासुन 90 दिवसापर्यंत वैध राहते. त्यामुळे सदर कालावधीतच सदर कामाचे कार्यारंभं आदेश देणे आवश्यक आहे. निविदा उघडल्यापासून 90 दिवसाचे आंत त्याची प्रक्रिया पार न पडल्यास निविदेतील वैधता नष्ट होते व केलेले करार नियमाला धरुन ठरत नाही. असे असतांना उपरोक्त कामाच्या निविदा उघडण्यात आल्याच्या दिनांकापासुन 90 दिवसानंतर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. तरी त्याबाबत खुलासा करावा.

10) उपरोक्त कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे केलेल्या कामाच्या मुल्यांकनाची तपासणी करता आली नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

11) निविदेतील अट क्रमांक 24 नुसार कंत्राटदाराकडे वेल्डींग वर्कशॉप असणे आवश्यक आहे. परंतु, कंत्राटदार श्री. अजयकुमार हेडा यांचेकडे वेल्डींग वर्कशॉप असल्याबबातचे अभिलेख लेखापरीक्षणास सादर झाले नाही. तरी त्याबबात खुलासा करावा.

**3.395 महात्मा फुले जलभुमी अभियान अंतर्गत सुसर्दा व हरिसाल उपविभाग धारणी यांनी खरेदी केलेल्या लोखंडी फळया कामामधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 30) -** सदरबाबत रककम रूपये 37,44,214/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त निविदा हया 10 टक्के पेक्षा कमी दराने मंजुर झालेल्या असून इतक्या कमी दराने काम करण्यास कंत्राटदार तयार असतांना त्यास दर पृथ्थकरण मागविण्यात आले नाही. त्यामुळे कामाचा दर्जाबाबत खात्री पटत नाही.

2) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 01/12/2016 नुसार खरेदी करतांना बाजारभाव पाहून त्यानुसार खरेदी करणे आवश्यंक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. याबाबत खुलासा करावा.

3) उपरोक्त दोन्ही कामे सारखीच असतांना हरिसाल येथील कामाची निविदा 12.52 टक्के कमी दराने तर सुसर्दा येथील कामाची निविदा 11.24 टक्के कमी दराने मंजुर करण्यात आली. एकाच प्रकारचे कामे असतांना वेगवेगळया निविदा बोलावण्याचे प्रयोजन काय? याबाबत खुलासा करण्यात यावा.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 87 नुसार कामाची तांत्रिक पडताळणी अहवाल देयकासोबत नसल्याने कामाची गुणवत्ता व दर्जाबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटत नाही.

5) कामाचे मोजमाप पुस्तिकेची पडताळणी केली असता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 168 ब नुसार कामाची कार्यकारी अभियंत्यानी 5 टक्के तपासणी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) सुसर्दा व हरिसाल येथील बंधा-याच्या कामाच्या अंदापत्रकात 105 व 190 निडल्सचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मोजमाप पुस्तिकेमध्ये 118 व 217 निडल्स परिमाण दाखविण्यात आलेले आहे. त्यामुळे कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-याला एकुण किती निडल्सची आवश्यकता होती, याबाबत कुठलेही अभिलेखे उपलब्ध नसल्यामुळे निडल्सच्या आवश्यकतेबाबत लेखापरिक्षणास खात्री पटत नाही.

7) निविदेतील अट क्रमांक 25 नुसार “कार्यारंभ आदेश दिल्यानंतर एक नमुना निडल सात दिवसाचे आत तयार करुन तपासणी करीता सादर करावी व मान्यतेनंतरच पुढील निडल्सं तयार कराव्यात” मात्र याप्रमाणे नमुना निडल घेण्यात आल्या नाहीत. त्यामुळे घेतलेल्या निडल हया तपासणी न करताच खरेदी केल्याचे दिसते. कारण अशा प्रकरची तपासणी केल्याचा चाचणी अहवाल लेखापरीक्षणाला उपलब्धं झाला नाही. त्यामुळे गुणवत्तापुर्ण निडल खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

8) करारनाम्यावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही. याबाबत खुलासा करावा.

9) जुन्या फळयांची विल्हेवाट कशी लावण्यात आली, याबाबत खुलासा करावा.

10) सदर निविदेला वृत्तपत्रात प्रसिध्दी दिल्याचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत. याबाबत खुलासा करावा.

11) खरेदी केलेल्या नवीन फळयाची नोंद साठा नोंदवही तसेच जडसंग्रह नोंदवहीला घेण्यात आली नाही.

**3.396 उपविभाग बार्शिटाकळी अंतर्गत जमकेश्वर खोदतळे कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** उपविभाग बार्शिटाकळी अंतर्गत जमकेश्वर खोदतळे कामावर रक्कम रूपये 19,16,966/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर काम कंत्राटदाराने -17.77 टक्के कमी दराने घेतले. इतक्या कमी दराने काम करण्यास कंत्राटदारास कसे परवडते, याबाबत कंत्राटदाराकडून खुलासा / स्पष्टीकरण घेतले नाही. त्यामुळे कंत्राटदाराने केलेले काम हलक्या दर्जाने केलेले असावे, असे लेखापरीक्षणाचे मत आहे. संबधितावर जबाबदारी निश्‍चित करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समीती लेखासंहीता 1968 चे नियम 146 व 147, 148 नुसार करारनामा करुन नमूना 48 मधील करारनामा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. करारनामा नोंदवहीत कामाच्या नोंदी पूर्ण नाहीत. सदर करारनाम्यात बांधकाम आदेश क्रमांक, दिनांक, काम पुर्ण करण्याचा कालावधी, रक्कम, इतर अटी शर्ती नमुद करुन कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी केलेली नाही. कंत्राटदाराशी केलेल्या करारनाम्यावर काम विहित मुदतीत पूर्ण झाले नाही तर त्यासाठी दंडाची तरतुद नमुद करण्यात आलेली नाही यामध्ये दंडाचा कोठेही उल्लेख नाही. B1 करारनामा पुस्तिकेवर कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी केलेली नाही.

3) करारनाम्यात कामाचा दोषारोपण कालावधी नमुद केलेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीएस.1094/समीतीप्र.क्र. 34/ मिव्य-3, दिनांक 31/10/1994 नुसार जी कामे पंधरा लाख किंवा त्यापेक्षा जादा रक्कमेची असतील अशा सर्व कामांची तपासणी अधिक्षक अभियंता यांनी करावी, असे असतांना सदर कामाची अधिक्षक अभियंता यांनी तपासणी केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर शासन निर्णयाचे उल्लंघन करण्यात आलेले आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33 दिनांक 22/12/2000 नुसार शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तकात दररोज तारखेसह मापे नमूद केली नाहीत कार्यकारी अभियंता यांनी प्रत्येक कामाची रूपये 50,000/- चे प्रत्येक टप्यात तपासणी केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 नुसार योग्य ती कार्यवाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 124 अन्वये मक्तेदाराकडे सोपविण्यात आलेले प्रत्येक कामाचे कार्यादेश पुस्तक ठेवावे व त्यामधे कार्यकारी अभियंता यांचे आदेश कामातील बदल, सुचना, दुरुस्ती यांच्या नोंदी घेणेबाबत निर्देश आहेत. सदर बुक ठेवण्यात आलेले नाही तथा लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेले नाहीत.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समीती लेखासंहीता 1968 चे नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना नंबर 23 मध्ये घेणे आवश्यक त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

8) कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करीता व कामाची गुणवत्ता राखण्यासाठी कामाची अंमलबजावणी पारदर्शक होण्याच्या दृष्टीने शासन परीत्रक जलसंधारण विभाग क्रमांक जलशि-2015/प्र.क्र.115/जल-7, दिनांक

13/03/2015 नुसार quality control monitor यांचे मार्फत कामाचे दोन वेळा समवर्ती मुल्यमापण होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबत साशंकता वाटते.

9) मुळ मुदतीच्या कालावधी पेक्षा 25 टक्के च्या वरती उपरोक्त नियमानुसार मुदतवाढ देतांना अधिक्षक अभियंता यांच्या शिफारसीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुदतवाढ देणे आवश्यक असतांना अधिक्षक अभियंता यांचे मत न घेताच मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर 1 टक्के प्रती दिनप्रमाणे 120 दिवस दंडाची रक्कम रुपये 2,44,900/- संबधितांकडून वसुल करून शासन निधीत भरणा करावी. तोपर्यंत सदर खर्चाची रक्कम लेखापरीक्षणात मान्य करण्यात येत नाही.

10) कामपूर्णत्व प्रमाणपत्रानुसार दिनांक 26/10/2016 रोजी कामपूर्ण झाल्याचे दर्शविले असून मोजमाप पुस्तिकेत 26/10/2016 ला काम सुरू झाल्याची दिनांक दिसून येते. यावरून काम विहीत मुदतीत सुरू व पूर्ण न करता काम पूर्ण दर्शविले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

11) महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक गौखनी 10/1009/ख, दिनांक11/02/2010 अन्वये व महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, राजपत्र असाधारण भाग चार-अ दिनांक 11/05/2015 अन्वये बांधकामावर वापर खडी, मुरूम इत्यादी गौणखनिजावर प्रती ब्रास रुपये 400/- प्रमाणे स्वामित्व धनाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. कामपुर्ण दिनांक 26/10/2016 असून यानंतर गौणखनिज वापरण्यात आले. 14 ब्रासची प्रती ब्रास रूपये 400/- प्रमाणे रूपये 5,600/- वसुल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

12) सदर कामाच्या देयकातून विम्याची रक्कम कपात करण्यात आली नाही. जर कामादरम्यान काही अपघात घडला असता, तर त्याची जबाबदारी विभागावर आली असती. सदर बाब विभागाच्या कोणत्याही कर्मचा-याने वरीष्ठांच्या लक्षात आणून दिलेली नाही. भविष्यात अशी अनियमितता होऊ नये, म्हणून संबधितावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच विमा रक्कम रुपये19,170/- प्रथम देयकातून कपात केल्याबाबत दर्शवावे, अन्यथा संबधितांकडून वसुल करून शासन निधीत भरणा करून अनुपालन दर्शवावे.

13) बी1 करारनामातील अट क्रमांक 3 नुसार काम दर्जेदार झाल्याबाबत ग्रामपंचायतींचे ठराव घेणे आवश्यक आहे. परंतू, तसा ग्रामपंचायतचा ठराव घेण्यात आला नाही. त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत साशंकता वाटते.

**3.397 गावतलाव नेर, चिपी व भिली दुरूस्ती कामांतील अनियमिततताबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** गावतलाव नेर, चिपी व भिली दुरूस्ती कामांवर रक्कम रूपये 21,46,361/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीमधे करारनामासाठी कोरा मुद्रांक जोडलेला आहे.

2) नस्तीसोबत जोडलेल्या B-1 टेंडर बूकची पडताळणी करता कोरी असून फक्त कंत्राटदाराच्या सहया नमुद आहेत. सदर पुस्तिकेत कामाचे नाव व इतर संपूर्ण तपशिल, काम प्रत्यक्ष अंदापत्रकीय दराने आहे किंवा कसे, या सर्व बाबी नमुद करणे आवश्यक असतांना नमुद करण्यात आल्या नाहीत.

3) मुळ मुदतीच्या कालावधीपेक्षा 25 टक्के च्या वरती उपरोक्त नियमानुसार मुदतवाढ देतांना अधिक्षक अभियंता यांच्या शिफारसीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुदतवाढ देणे आवश्यक असतांना अधिक्षक अभियंता यांचे मत न घेताच मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर 1 टक्के प्रती दिनाप्रमाणे दिवस दंडाची रक्कम 272 दिवस x 1 टक्के परंतू, अंदाजपत्रकीय रकमेच्या 10 टक्के रूपये 2,07,077/- संबधितांकडून वसुल करून शासन निधीत भरणा करावी.

4) भिली क्रमांक 2 कंत्राटदाराचे बयाणा रक्कम सुटबाबत बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र तपासणीस उपलब्ध केले नाही. त्यामुळे सदर बयाणा रक्कम सुटबाबत पडताळणी करता आली नाही. बयाणा रक्कम सुट प्रमाणपत्र न घेणेबाबत संबधितांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

5) भिली क्रमांक 2 -23 टक्के, गा.त.चिपी -11टक्के, गा.त नेर क्रमांक 3 -12.99 टक्के ब 1 रक्कमेपेक्षा इतक्या कमी दराने काम करण्यास कंत्राटदारास कसे परवडते, याबाबत कंत्राटदाराकडून खुलासा / स्पष्टीकरण घेतले

नाही. त्यामुळे कंत्राटदाराने केलेले काम हलक्या दर्जाने केलेले असावे, असे लेखापरीक्षणाचे मत आहे. संबधितावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

6) करारनामा कोरा आहे. त्यामुळे दोषारोपण कालावधीची जबाबदारी कंत्राटदारावर राहणार नाही.

7) चिपी व भिली कामांची शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तकात दररोज तारखेसह मापे नमूद केली नाहीत. तसेच सदर मोजमापे 100 टक्के तपासतांना उपअभियंता यांनी दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के कामाची तपासणी केल्याचे नमुद केलेले आहे. परंतु, प्रत्येक कामाची रुपये 50,000/- चे प्रत्येक टप्पयात तपासणी केलेली नाही.

8) कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करीता व कामाची गुणवत्ता राखण्यासाठी कामाची अंमलबजावणी पारदर्शक होण्याच्या दृष्टीने शासनपरीत्रक जलसंधारणविभाग क्रमांक जलशी-2015/प्र.क्र.115/जल-7, दिनांक 13/03/2015 नुसार quality control monitor यांचे मार्फत कामाचे दोन वेळा समवर्ती मुल्यमापन होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबत साशंकता वाटते.

9) त्रयस्थ संस्थेचे निरीक्षणाकरीता 10 टक्के राखीव रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून कपात करून तशी तरतुद करण्यात आली. परंतू, कामाची तपासणी करण्यात आली नाही. त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत साशंकता वाटते. सदर 10 टक्के रक्कम शासनास परत केल्याची खात्री पटत नाही.

10) काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या देयकातून विम्याची रक्कम कपात करण्यात आली आहे त्यामुळे विम्याचा उददेश सफल होत नाही.

11) बी 1 करारनामातील अटीनुसार काम दर्जेदार झाल्याबाबत ग्रामपंचायतींचे ठराव घेणे आवश्यक आहे. परंतू, तसा ग्रामपंचायतचा ठराव घेण्यात आला नाही. त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत साशंकता वाटते.

12) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना नंबर 23 मध्ये घेणे आवश्यक त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

13) महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 कलम 6 अन्वये लेखापरीक्षणास अभिलेखे सादर करण्याची जबाबदारी संबधित स्थानिक प्राधिकरणाची आहे. तसेच अर्धसमास पत्रानुसार मागणी करुनही लेखापरीक्षणास गा.त.भिली क्रमांक 2 कामाचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका, काम पुर्णत्व प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 व महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 03/04/2011 अन्वये केलेल्या सुधारणा नुसार रूपये 25,000/- दंडाची कार्यवाही प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सदर खर्चाची संबधितावर जबाबदारी निश्चित करून चौकशीअंती खर्चाची रक्कम वसुल करून शासन निधीत भरणा करून अनुपालन दर्शवावे.

**3.398 नविन पाझर तलाव बांधकाम उमरदरी तालुका मालेगाव बांधकाम खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** प्रस्तुत कामावर रक्कम रूपये 11,42,275/- खर्च करणेत आलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचा आदेश दिनांक 27/03/2017 रोजी देण्यात आला असतांना प्रथम धावते देयक 31/03/2017 रुपये 11,42,275/- चे कसे काढण्यात आले. याबाबत खुलासा करण्यात यावा.

2) जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक 10/05/2016 अन्वये निविदा स्विकृती प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात आली असुन त्यावर निविदेची किंमत रूपये 50,36,976/- दर्शविण्यात आली आहे. मात्र निविदेची किंमत रूपये 51,22,016/- ची असतांना रूपये 50,36,976/- कशी दर्शविण्यात आली, याबाबत खुलासा करण्यात यावा.

3) रुपये 4,300/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आला असुन करारनामा कोरा आढळुन आला आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 167 व 168 अन्वये कार्यकारी अभियंता/ उपअभियंता यांनी कामाची तपासणी करून दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यंक आहे. कार्यकारी अभियंता यांनी तपासणी केल्याबाबतचा दिनांक नमूद केलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2009/प्र.क्र. 81/ परा-7, दिनांक 08/06/2009 अन्वये बांधकामाचे जागी नामफलक लावणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही केल्याबाबत लेखापरीक्षण कालावधीत आढळून आले नाही. तसेच नामफलकाचा फोटो नस्तीस आढळून आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपिए 2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 मधील मुद्दा क्रमांक 1 व 2 अन्वये मोजमाप नोंदवहीच्या संदर्भात जिल्हा परिषदेच्या तांत्रिक अधिकारी यांनी दक्षता घेण्यात आल्याचे दिसुन येत नाही.

**3.399 धडक सिंचन विहीरीवरील खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** लघुसिंचन विभागाला सन 2015-2016 ची अखर्चीत रक्कम रूपये 345 लाख असुन सन 2016-2017 मध्ये लघुसिचंन विभागाला तरतूद निरंक दर्शविण्यात आली आहे. त्यामूळे एकुण शिल्लक अनुदान रूपये 345 लाख असुन लघुसिचंन विभागाने सन 2016-2017 मध्ये रूपये 130.62 लाख खर्च केला आहे. दिनांक 31/03/2017 अखेर रक्कम रूपये 214.38 लाख अखर्चीत असल्याचे दिसुन येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लघुसिचंन विभागाने धडक सिचंन विहीर कार्यक्रम अंतर्गत विहिरीबाबतचा तपशिल पुरविण्यात आला असुन सदर विवरणपत्रानुसार जिल्हयातील (4 लघुसिचंन उपविभाग) एकुण 1,803 विहीर मंजुर असल्याचे दिसते. त्यापैकी 1,083 विहीरी पुर्ण करण्यात आल्या असुन 354 विहीरी रद्द करीता प्रस्तावित असल्याचे दिसते. त्यामुळे पुरविण्यात आलेल्या लक्षानुसार अदयाप मंजुर विहीरींपैकी 579 इतक्या विहीरी पुर्ण झाल्याबाबत आढळुन येत नाही.

2) पुरविण्यात आलेल्या माहितीनुसार 354 विहीरी रद्दकरीता प्रस्तावित असल्याचे दिसते. परंतु, सदर विहिरी रद्द का करण्यात येत आहेत, याबाबत कारणमिमांसा करण्यात आली नाही.

3) राज्य रोजगार हमी योजना अंतर्गत घेण्यात येणा-या जवाहर धडक सिंचन विहिर कार्यक्रम अंतर्गत अपुर्ण विहीरी पुर्ण करण्याबाबत मुदतवाढ देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक योजना 2015 /प्र.क्28/(3)रोहयो 5, दिनांक 25/10/2016 अन्वये दिनांक 30/06/2017 पर्यंत सदर विहीरी पुर्ण करण्यास मूदतवाढ देणयात आली असली, तरी दिनांक 31/03/2017 पर्यंत किती विहीर प्रलंबित होत्या, याबाबत माहिती उपलब्ध नाही.

4) प्राप्त अनुदान व खर्चाचे आकडेवारी वरुन सन 2015-2016 मध्ये लघुसिचंन विभागाला धडक सिंचन विहीरीकरीता रूपये 3 कोटी 45 लाख अनुदान प्राप्त झाले असतांना दिनांक 31/03/2017 अखेर रूपये 130.62 लाख अनुदान खर्ची घालण्यात आले आहे. त्यामुळे दिनांक 31/03/2017 अखेर रूपये 214.38 लाख रक्कम अखर्चीत आढळुन आली आहे. 1,803 विहीरी मंजुर असतांना व सन 2016-2017 मध्ये रूपये 3 कोटी 45 लाख अनुदान लघुसिंचन विभागाकडे असतांना फक्त 1,224 विहीरी पुर्ण करण्यात आल्याचे दिसुन येते. त्यामुळे रूपये 214.38 लाख रक्कम अखर्चीत राहिल्याचे दिसुन येते.

**3.400 मौजे केगांव क्रमांक 1 तालुका मारेगांव येथील सिमेंटनाला बांधकाम करणे खर्चावरील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** मौजे केगांव क्रमांक 1 तालुका मारेगांव येथील सिमेंट नाला बांधकाम करणेकरीता रक्कम रूपये 12,59,427/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त कामाच्या निविदेची रक्कम रूपये 15,56,829/- असून सदर निविदा 1 टक्के कमी दराने मंजुर झाल्यामुळे मंजुर निविदेची रक्कम रूपये 15,41,261/- म्हणजेच रूपये 15,568/- ने कमी येते. एखादया बांधकामासाठी स्विकारलेल्या निविदेची रक्कम ही मंजुर अंदाजापेक्षा 10 टक्के किंवा रूपये 10,000/- यापैकी जी रक्कम अधिक असेल अशा रकमेने कमी असल्याचे आढळून आल्यास अंदाज पुन्हा तयार करण्यात येईल. असे असतांना महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 152(3) अन्वये “संक्षिप्त अंदाज” तयार करून त्यास सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मंजुरी कामाचे आदेश देण्यापुर्वी तथा अंतिम देयकाचे प्रदान

करण्यापुर्वी घेणे आवश्यक असताना घेण्यात आलेली नाही. सदर बाब ही लेखासंहिता नियमाचे उल्लंघन करणारी आहे. नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

2) वरील बांधकामाकरीता 343.48 घमी. साहित्य वापरले असून मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 चे नियम 18, 22 व 22 अनुसूची 1 मधील दर व शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/0206/प्र.क्र.57 ख, दिनांक 11/05/2015 नुसार दर प्रती घनमीटर रूपये 158.30 (141.34 + 12 टक्के सरचार्ज) प्रमाणे गौण खनिजावरील स्वामित्वधनाची रक्कम रूपये 54,373/- कपात करणे आवश्यक असतांना रूपये 48,554/- कपात केलेली आहे. सदर रक्कमेचा भरणा शासनखाती वेळीच न केल्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान झालेले आहे. याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व कमी कपात करण्यात आलेली रक्कम रूपये 5,819/- वसुल करण्यात येउन उचित लेखाशिर्षाखाली जमा करून दर्शवावी. तसेच देयकातून शासकीय कपाती नियमाप्रमाणे करणे ही लेखा विभागाची जबाबदारी असतांना सदर देयक लेखा विभागाने कसे पारीत केले, याबाबत खुलासा करावा.

3) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलसं-2012/प्र.क्रं.1/जल-7, दिनांक 12/11/2013 च्या मार्गदर्शक सुचनेमधील बाब क्रमांक 6(1) नुसार सिमेंट नाला बांधात गाळ जमा होऊ नये म्हणून सिमेंट नाला बांधलेल्या नाल्याच्या पाणलोट क्षेत्रात दोन गॅबीयन बंधारे बांधावेत, असे नमुद आहे. तथापि, गॅबीयन बंधारे बांधण्यात आले नाही. शासनाच्या मार्गदर्शक सुचनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात कसुर केलेला आहे. त्यामुळे बंधा-याची साठवण क्षमता अबाधित राखून शेतकरी सिंचनापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नसून त्यामुळे खर्च करूनही शासनाचा उददेश सफल होत नाही.

4) सदर बांधकाम दिनांक 15/11/2016 ला पुर्ण झाल्याचे कामपुर्णत्वाचे प्रमाणपत्रावरुन दिसून येते. बांधकाम दिनांक 15/11/2016 ला पुर्ण झाले असतांना कार्यकारी अभियंता यांनी बाब क्रमांक 4 (1:2:4) च्या कामाची 5 टक्के तपासणी बांधकाम चालु असतांना करणे आवश्यंक होते. परंतु, 5 टक्के दिनांक 31/01/2017 ला म्हणजेच बांधकाम पुर्ण झाल्यानंतर कशी केली व करण्याचे प्रयोजन काय, खुलासा करावा.

5) प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यापुर्वी साहित्याची गुणवता चाचणी करण्यात यावी. तसेच बांधकाम सुरु असतांना संधानकाचे 30 घमी./प्रती संच याप्रमाणे क्युबची चाचणी करण्याची जबाबदारी यंत्रणेची राहील. असे असतांना चाचणी अहवाल प्राप्त केलेला नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2006/ प्र.क्र.366/ वित्त-9, दिनांक 31/12/2009 चे कोष्टक बाब 2 अन्वये उपरोक्त बांधकामाची जाहिर निवीदा प्रसिध्दी एक “ब” वर्ग दैनिक (मराठी / हिंदी / इंग्रजी) व एक “क” वर्ग साप्ताहिकात देणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 तथा महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 चे बाब क्रमांक 2, 3 अन्वये तांत्रिक अभियंत्याने कामाची मापे तपासून मोजमाप नोंदवहीत दिनांकित स्वाक्षरी करून ते प्रमाणित करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

8) बांधकाम सुरु असतांना कामाचे व्हिडीयो फोटोग्राफ घेण्याची तरतुद करण्यात आली असून त्यावर रूपये 5,000/- खर्च करण्यात आलेला आहे. परंतु, सदर कामाचे व्हिडीयो फोटोग्राफ उपलब्ध झाले नाहीत. उपरोक्त बाबीचे खुलास्यासह व पुर्ततेसह अनुपालन दर्शवावे.

**3.401 उपविभाग दारव्हा अतंर्गत मौजे मालखेड क्रमांक-2 सिमेंट नाला बांधकाम करणे खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** उपविभाग दारव्हा अतंर्गत मौजे मालखेड क्रमांक 2 सिमेंट नाला बांधकाम करणेकरीता रक्कम रूपये 9,37,261/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त बांधकामाकरीता 298.45 घमी. साहित्य वापरले असून मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 चे नियम 18, 22 व 22 अनुसूची 1 मधील दर व शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/0206/ प्र.क्र.57 ख., दिनांक 11/05/2015 नुसार दर प्रती घनमीटर रूपये 158.30 (141.34 +12 टक्के सरचार्ज) प्रमाणे गौण खनिजावरील स्वामित्वधनाची रक्कम रूपये 47,253/- कपात करणे आवश्यक असतांना रुपये 42,188/- कपात करण्यात आली आहे. कमी कपात रुपये 5,065/- वसुल करण्यात येऊन उचित लेखाशिर्षाखाली जमा करून दर्शवावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र472/ वित्त 9, दिनांक 09/02/2009 ला अनूसरून रूपये 20,000/- पेक्षा जास्त किमंतीचे कामावर बोर्ड लावणे बंधनकारक असतांना कामावर बोर्ड लावण्यात आल्याचे आढळले नाही.

3) काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र रूपये 8,98,623/- चे देण्यात आलेले आहे. परंतु, बांधकामावर प्रत्यक्ष खर्च रुपये 9,37,162/- करण्यात आलेले आहे. याबाबत लेखापरीक्षणास सप्रमाण खुलासा करण्यात यावा.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो -2001/ प्रक्र-104/ जाक्र01, दिनांक 01/01/2002 मधील बाब क्रमांक 5 नमूद केल्याप्रमाणे गुणवत्तेबाबत चाचणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे बांधकाम गुणात्मक दर्जाचे झाल्याची खात्री पटली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2006/ प्र.क्र.366/ वित्त-9, दिनांक 31/12/2009 चे कोष्टक बाब 3 अन्वये उपरोक्त बांधकामाची जाहीर निविदा प्रसिध्दी एक “अ” “ब” व “क” वर्ग दैनिक (मराठी / हिंदी / इंग्रजी) व एक “अ” वर्ग साप्ताहिकात देणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 तथा महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 चे बाब क्रमांक 2, 3 अन्वये तांत्रिक अभियंत्याने कामाची मापे तपासून मोजमाप नोंदवहीत दिनांकित स्वाक्षरी करून ते प्रमाणित करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 चे बाब क्रमांक 13 अन्वये काम पुर्ण झाल्यावर पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत विहीत नमुन्यात नोंदविणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.402 उपविभाग पुसद मौजे धुंदी येथील सिंचन तलाव विशेष दुरुस्ती बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** उपविभाग पुसद मौजे धुंदी येथील सिंचन तलाव विशेष दुरुस्ती बांधकामाकरीता रक्कम रूपये 7,51,066/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त बांधकामाकरीता 1440.09 घमी. साहित्य वापरले असून मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 चे नियम 18, 22 व 22 अनुसूची 1 मधील दर व शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/0206/ प्र.क्र.57 ख., दिनांक 11/05/2015 नुसार दर प्रती घनमीटर रूपये 158.30 (141.34 + 12 टक्के सरचार्ज) प्रमाणे गौण खनिजावरील स्वामित्वधनाची रक्कम रूपये 2,27,966/- कपात करणे आवश्यक असतांना रुपये 2,03,630/- कपात करण्यात आली आहे. कमी कपात रुपये 24,336/- वसुल करण्यात येऊन उचित लेखाशिर्षाखाली जमा करून दर्शवावी.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 120(1) अन्वये कामावर झालेली बचत वाढीव कामावर वापरण्यात येवु असे असतानां तुलनात्मक विवरणानुसार रूपये 3,67,910/- झालेली बचत वाढीव काम रुपये 12,920/- चे करण्याकरीता वापरण्यात आलेली आहे. नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र472/ वित्त 9, दिनांक 09/02/2009 ला अनूसरून रूपये 20,000/- पेक्षा जास्त किमंतीचे कामावर बोर्ड लावणे बंधनकारक असतांना कामावर बोर्ड लावण्यात आल्याचे आढळले नाही.

4) काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्रक रूपये 7,80,546/- चे देण्यात आलेले आहे. परंतु, बांधकामावर प्रत्यक्ष खर्च रुपये 7,51,066/- करण्यात आलेले आहे. याबाबत लेखापरिक्षणास सप्रमाण खुलासा करण्यात यावा.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 148 अन्वये कामास मुदत वाढवुन देणे आवश्यक असेल, तर अशी वाढ कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद सिंचन विभाग, यवतमाळ यांचेकडुन मंजुर करुन घेतली पाहिजे आणि ती सुरुवातीची कालमर्यादा किंवा वाढवुन दिलेली कालमर्यादा संपण्यापुर्वी मंजुर करुन घेणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही. कामाचे आदेश क्रमांक कार्यकारी अभियंता/सिंचन/यजिप/811/16, दिनांक 20/04/2016 अन्वये काम दिनांक 19/07/2016 पर्यंत 3 महिन्यांत पुर्ण करणे आवश्यक असतांना काम विहीत मुदतीनंतर पुर्ण करण्यात आले नाही. नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/ 275/ प्र.क्र.172/ पंरा-7, दिनांक 19/10/2011 चे बाब 2 प्रमाणे ई-निविदा प्रतीवर मंजुरीबाबत निवीदा समितीतील अध्यक्ष/सभासदांची स्वाक्षरी आढळली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो -2001/ प्रक्र-104/ जाक्र01, दिनांक 01/01/2002 मधील बाब क्रमांक 5 नमूद केल्याप्रमाणे गुणवत्तेबाबत चाचणी अहवाल शासकिय यंत्रणेमार्फत घेण्यात आल्याचे आढळले नाही. प्राचार्य डॉ. हीराणी इन्स्टीटयुट ऑफ पॉलीटेक्नीक पुसद यांचे पत्र क्रमांक dr NPH10P/CED/R&CC/TR/42-09/16/ DT 09/06/2016 अन्वये घेण्यात आलेला आहे.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2006/ प्र.क्र.366/वित्त-9, दिनांक 31/12/2009 चे कोष्टक बाब 3 अन्वये उपरोक्त बांधकामाची जाहीर निवीदा प्रसिध्दी एक "अ" "ब" व "क" वर्ग दैनिक (मराठी/हींदी/इंग्रजी) व एक "अ" वर्ग साप्ताहीकात देणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 तथा महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-झेडपीए2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 चे बाब क्रमांक 2, 3 अन्वये तांत्रिक अभियंत्याने कामाची मापे तपासून मोजमाप नोंदवहीत दिनांकित स्वाक्षरी करून ते प्रमाणित करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 चे बाब क्रमांक 13 अन्वये काम पुर्ण झाल्यावर पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तिकेत विहीत नमुन्यात नोंदविणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.403 उपविभाग यवतमाळ मौजे शरद येथील पाझर तलाव बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** उपविभाग यवतमाळ मौजे शरद येथील पाझर तलाव बांधकामाकरीता रक्कम रूपये 39,10,971/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त बांधकामाकरीता दुसरे चालु देयकात 17478.04 घमी. साहित्य वापरले असून मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 चे नियम 18, 22 व 22 अनुसूची 1 मधील दर व शासन निर्णय क्रमांक गौखनि 10/0206/ प्र.क्र.57 ख., दिनांक 11/05/2015 नुसार दर प्रती घनमिटर रूपये 158.30 (141.34 + 12 टक्के सरचार्ज) प्रमाणे गौण खनिजावरील स्वामित्वधनाची रक्कम रूपये 27,66,773/- कपात करणे आवश्यक असतांना रुपये 12,35,348/- कपात करण्यात आली आहे. कमी कपात रुपये 15,31,426/- वसुल करण्यात येउन उचित लेखाशिर्षाखाली जमा करून दर्शवावी.

2) जिल्हा परिषद, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ यांचे आदेश क्रमांक 696, दिनांक 31/03/2016 अन्वये कामास दिनांक 19/07/2015 ते 31/03/2017 पर्यत विनादंड मुदतवाढ मंजुर करण्यात आलेली होती. परंतु, लेखापरिक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत काम पुर्ण करण्यात आलेले नाही. तसेच कामास विहीत मुदतीत दुसरीवेळ मुदतवाढ घेणे आवश्यक असतांना नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो -2001/ प्रक्र-104/ जाक्र01, दिनांक 01/01/2002 मधील बाब क्रमांक 5 नमूद केल्याप्रमाणे गुणवत्तेबाबत चाचणी अहवाल शासकिय यंत्रणेमार्फत घेण्यात आल्याचे आढळले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2006/ प्र.क्र.366/ वित्त-9, दिनांक 31/12/2009 चे कोष्टक बाब 3 अन्वये उपरोक्त बांधकामाची जाहीर निविदा प्रसिध्दी एक “अ” “ब” व “क” वर्ग दैनिक (मराठी / हिंदी/ इंग्रजी) व एक “अ” वर्ग साप्ताहिकात देणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 तथा महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 चे बाब क्रमांक 2, 3 अन्वये तांत्रिक अभियंत्याने कामाची मापे तपासून मोजमाप नोंदवहीत दिनांकित स्वाक्षरी करून ते प्रमाणित करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

### 3.404 विदर्भ सधन सिंचन कार्यक्रम अंतर्गत मंजुर झालेले कामे पुर्ण करुन सदरचा खर्च हा नियमबाहयपणे जिल्हा नियोजन योजनेतुन करणे बाबत.

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** विदर्भ सधन सिंचन कार्यक्रम अंतर्गत मंजुर झालेले कामे या योजनेमध्ये निधी उपलब्ध नसतानां सुध्दा सदर कामाचे आदेश देवुन कामे पुर्ण करुन नियमबाहयपणे जिल्हा नियोजन योजनेतुन सुधारीत प्रशासकीय मान्यता घेवुन रक्कम रूपये 3,46,46,00,000/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे सुधारीत प्रशासकीय मान्यता आदेश क्र्मांक 924 दिनांक 24/06/2016 मधील अट क्रमांक 24 नुसार जिल्हा परिषद सिंचन विभाग यांचेकडुन प्राप्त झालेले अंदाजपत्रके हे विदर्भ सधन सिंचन कार्यक्रम अंतर्गत यापुर्वी मंजुर असल्याने ती कामे विदर्भ सधन सिंचन कार्यक्रम अंतर्गतमधुन वगळून आता जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत मंजुर करण्यात येत आहे म्हणजेच जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत वरील आदेशातील अट क्रमांक 1 नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कामाची निविदा प्रक्रीया पुर्व करण्यात येवुन निधी उपलब्ध झाल्याशिवाय कार्यारंभ आदेश देण्यात येवू नये, असे निर्देश असतांनाही वरील कामे पुर्ण झाल्यानंतर सुधारीत प्रशासकीय आदेश प्राप्त करुन रक्कमाचे प्रदान करण्यात आले आहे. जसे खालील कामे पुर्ण झाल्याचा दिनांक काम पुर्वत्वाचे प्रमाणपत्रानुसार कामे पुर्ण झाली आहे.

| कामाचे नाव | गावाचे नाव | तालुका | काम पुर्ण झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| सिंचन तलाव दुरुस्ती | टाकळी वाघजाळ | मोताळा | 18/11/2015 |
| पाझर तलाव दुरुस्ती | सातगाव भुसारी | चिखली | 23/04/2016 |
| सिंचन तलाव दुरुस्ती | अंत्री कोळी | चिखली | 03/05/2016 |
| साठवण बंधारा दुरुस्ती | वडगाव खु | मोताळा | 30/06/2016 |

वरील कामे ही प्रशासकीय मान्यता दिनांक 24/06/2016 रोजीचे आधीच पुर्ण झाल्याने जिल्हा नियोजन समीतीची दिशाभूल करुन केवळ पुर्ण झालेल्या कामाचे प्रदान करण्यासाठीच सुधारीत प्रशासकीय आदेश काढून नियमबाहय प्रदान केल्याने सदरचा खर्च लेखापरीक्षणास अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

2) विदर्भ सधन सिंचन कार्यक्रम अंतर्गत योजनमध्ये निधी उपलब्ध नसतांना कामाचे कार्यरांभ आदेश देण्यात आले.

3) जिल्हाधिकारी यांचे सुधारीत प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक 437 दिनांक 01/03/2017 मधील अट क्रमांक 1 नुसार कामावरील खर्च विदर्भ सधन सिंचन कार्यक्रम अंतर्गत प्राप्त होण्याऱ्या अनुदानातुनचभागवावा. असे निर्देश असतांनाही या कामावरील खर्च हा जलयुक्त शिवार अभियान विशेष निधीतुन भागविण्यात आला आहे. नियमबाहयरीत्या काम पुर्ण झाल्यावर अनुदान वळती करुन प्रदान करण्यात आले आहे सदर बाब कोणत्या नियमानुसार केले, याबाबत साधार खुलासा करावा.

4) विदर्भ सधन सिंचन कार्यक्रम अंतर्गत मंजुर कामावरील खर्च हा जलयुक्त शिवार अभियानातुन करण्यात आला. या बाबत विदर्भ सधन सिंचन कार्यक्रम योजनेची पुर्व मंजुरीसाठी कार्यवाही केली काय तसेच विदर्भ सधन सिंचन कार्यक्रम अंतर्गत मंजुर कामे आराखडयातुन सदर कामे वगळली काय याबाबत साधार खुलासा करावा.

### 3.405 मौजे सवडद व्ही आय डी पी तालुका सिंदखेड राजा

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** मौजे सवडद प्रसासकीय मंजुरी आदेश क्रमांक 924 दिनाक 24/06/2016 सदर कामात आढळून आलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे यावर खालील अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180 नुसार देयकाचे दुबार प्रदान होवु नये म्हणून देयकाचे प्रदान झाल्यानंतर मोजमाप पुस्तिकेतील मोजमापे लाई शाईने कर्णरेषा मारण्याचे निर्देशित असतांना कर्णरेषा मारलेली नाही.

2) प्रस्तावित कामे हे कोणत्याही बुडीत क्षेत्रात येत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र संचिकेत आढळुन आले नाही. खुलासा करावा.

3) नियोजित कामाच्या ठिकाणी सुरुवातीस व शेवटी कामाविषयी शासन परिपत्रक निर्णय क्रमांक जिल्हा परिषद2009/ प्र.क्र.80/ पंरास-8, दिनांक 31/12/2009 अन्वये फलक लावणे बंधनकारक आहे. अशी कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. खुलासा करावा.

4) सदर देयकान्वये विमा कपात करुन विमा संचालनालय यांना भरणा करणेबाबत कार्यवाही केलेली आहे. परंतु, विमा संचालनालयाचे कोणते विमा पत्राची मुळ प्रत कार्यालयाकडे नाही. त्यामुळे जर कामावर जर नासधुस अथवा अनाहुत घटना घडली, तर त्याचा कोणताही फायदा होणार नाही. त्यामुळे विमा पत्राची मुळ प्रत लेखापरीक्षणास सादर करावी . तसेच या पुढे काम सुरु करण्यापुर्वी विमा प्रत घेवुनच काम सुरु करावे

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 4 खालील परीशिष्ठ 2 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2012 / प्र.क्र. 680/ वित्त 9, दिनांक 31/01/2013 अन्वये या स्तरावर प्रशासकीय, तांत्रीक व निविदा मंजुर केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल अगामी सर्वसाधारण सभेत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

6) काम सुरु होण्यापुर्वी काम चालु असताना व काम संपल्यानंतर प्रत्येक पायरीवर कामाचे फोटो घेवुन नस्तीस संलग्न करणे आवश्यक असताना तसे केल्याचे आढळुन आले नाही. खुलासा करावा.

7) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक 2195 दिनांक 29/12/2015 नुसार 1 टक्के दंड आकारुन कामास मुदतवाढ मंजुर केली आहे. परंतु, सदर रक्कम रुपये 19,980/- दंड कपात न करता संबंधीतांस प्रदान केल्याचे निदर्शनास येते. सदर रक्कम वसुल करुन पुराव्यासह अनुपालन दर्शवावे

### 3.406 मौजे तांदुळवाडी येथील कोल्हापूरी बंधारा दुरुस्ती बांधकाम तालुका नांदुरा

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 75) -** मौजे तांदुळवाडी येथील कोल्हापूरी बंधारा दुरुस्ती बांधकामाकरीता रक्कम रूपये 33,06,225/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बांधकाम सुरु होण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या ठिकाणाची छायाचित्रे काढून दप्तरी ठेवणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि 10 /0206 / प्र.क्र. 57 / ब / दिनांक 15/12/2006 नुसार कंत्राटदाराच्या देयकातुन गौण खनिज शुल्काची रक्कम कपात करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे अंतीम देयकातुन कपात करण्यात आली आहे. परंतु, गौण खनिज शुल्क भरल्याबाबत चलान लेखापरीक्षणास दर्शविण्यात आल्या नाहीत. तसेच गौण खनिजाचे उत्खनन / वहन करण्यापुर्वी महसुल विभागाची मंजुरी घेणे त्यानुसार चलान भरणे इत्यादी प्क्रीया करणे आवश्यक आहे. सदर ग्रामपंचायतीने कोणत्या नियमानुसार सदर गौण खनिजाचे वहन व वापर केला, याबाबत संयुक्तीक खुलासा सादर करावा.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180 नुसार देयकाचे दुबार प्रदान होवु नये म्हणून देयकाचे प्रदान झाल्यानंतर मोजमाप पुस्तिकेतील मोजमापे लाई शाईने कर्णरेषा मारण्याचे निर्देशित असतांना कटरेषा मारलेली नाही.

4) नियोजित कामाच्या ठिकाणी सुरुवातीस व शेवटी कामाविषयी शासन परिपत्रक / निर्णय क्रमांक जिल्हा परिषद2009/प्र.क्र.80/पंरास-8, दिनांक 31/12/2009 अन्वये फलक लावणे बंधनकारक आहे. अशी कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. खुलासा करावा.

5) सदर देयकान्वये विमा कपात करुन विमा संचालनालय यांना भरणा करणेबाबत कार्यवाही केलेली आहे. परंतु, विमा संचालनालयाचे कोणतेही विमा पत्राची मुळ प्रत कार्यालयाकडे नाही. त्यामुळे जर कामावर जर नासधुर अथवा अनाहुत घटना घडली, तर त्याचा कोणताही फायदा होणार नाही. त्यामुळे विमापत्राची मुळ प्रत लेखापरीक्षणास सादर करावी. तसेच या पुढे काम सुरु करण्यापुर्वी विमा प्रत घेवुनच काम सुरु करावे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 4 खालिल परीशिष्ठ 2 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2012 / प्र.क्र.680 वित्त 9, दिनांक 31/01/2013 अन्वये या स्तरावर प्रशासकीय, तांत्रीक व निवीदा मंजुर केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल अगामी सवसाधारण सभेत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.407 मौजा ब्राम्हणवाडा, तालुका नागपुर येथील माजी मालगुजारी तलाव मजबुती करणे व बळकटीकरण करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** प्रमाणक क्रमांक 4521, दिनांक 31/01/2017 अन्वये रक्कम रूपये 3,31,390/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दरपृथ्थकरणात मऊ मुरुम खोदकाम करुन खोदलेला मुरुम लावुन ठेवणे व पसरविणे कामासाठी जादा दर दिल्यामुळे रुपये 28,109/- चे जाद प्रदान झालेले आहे.

2) प्रत्यक्ष बांधकामाच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक काम सुरु होणेपुर्वी योजनेच्या परिक्षेत्राच्या दर्शनी भागात व रस्त्यालगत लावणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेत बोर्डाचे मुल्यांकन करुन रक्कम प्रदान कण्यात आलेली आहे. परंतु प्रत्यक्षात नस्तीबध्द असलेल्या कामाचे छायाचित्रात माहिती फलक दिसुन येत नाही.

3) बांधकाम साहीत्याचे चाचणी केल्याबाबतच्या अहवालाची प्रत कामाच्या नस्तीसोबत आढळून आलेली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट-1099/प्र.क्र.56/05, दिनांक 30/06/2000 नुसार बांधकामासाठी वापरण्यात येणा-या सिमेंटचा चाचणी अहवाल काम सूरू करण्यापूर्वी शासन मान्यता प्राप्त प्रयोग शाळेकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

4) निविदा मंजुरी बाबत निविदेच्या प्रत्येक पृष्ठावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 प्रमाणे व निवीदेच्या अटी व शर्ती नुसार निविदा मंजुर करणा-या प्राधिका-याने निविदा मंजुरीबाबत निविदेच्या प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

5) मामा तलाव कामाबाबतची गुणवत्ता व दर्जा प्रमाणित केल्याबाबतच्या अहवालाची प्रत कामाच्या नस्तीसोबत आढळून आलेली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र.217/पंरा-08, दिनांक 15/11/2011 नुसार कामाच्या विविध टप्प्यावर गुणवत्ता तपासणी करणे अनिवार्य असून कामाच्या दर्जाबाबत राज्य गुणवत्ता नियंत्रक यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक मामात 2015/242/2015/सिंव्य(कामे), दिनांक 21/01/2016 नुसार केलेल्या दुरुस्तीमुळे कोणत्या शेतक-यांना फायदा याची माहीती शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करणे आवश्यक असतांना त्याबाबतचा अहवाल नस्तीबध्द नाही.

**3.408 मौजा मांगली तालुका कुही येथील कोल्हापुरी बंधारा दुरुस्ती कामाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर कामाकरिता रक्कम रूपये 6,59,163/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा करारनाम्यातील अट क्रमांक 2 अन्वये उशिरा केलेल्या कामाचे बाबतीत करारनामा मुल्यांचे कमीत कमी 1 टक्के व जास्तीत जास्त 10 टक्के पर्यंत रक्कम वसुल करुन दंडात्मक कार्यवाही करण्याची तरतुद आहे. उशिरा केलेल्या कालावधीसाठी कमीतकमी 1 टक्के रुपये 6,591/- वसुल करावयाचे असतांना रुपये 2,955/- वसुल केल्यामुळे शासन निधीचे रुपये 3,636/- चे नुकसान झालेले आहे.

2) महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 नुसार रुपये 500/- चा मुदांक शुल्क देय ठरत असतांना सदर कामासाठी रुपये 100/- चा मुद्रांक पेपरवर करारनामा केल्याने शासनाचे रुपये 400/- ची हानी झालेली आहे.

3) सदर कामासाठी कंत्राटदाराने अनामत रक्कमेचा दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपेटिव्ह बँक लि. बँकेचा धनादेश क्रमांक 007202, दिनांक 23/02/2016 रक्कम रुपये 54,000/- मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद नागपुर यांचे नावे दिलेला आहे. सदर धनादेश निविदा स्विकृती नंतर जिल्हा परिषद खात्यात जमा करणे क्रम प्राप्त असतांना तो जमा न करता नस्तीत संलग्न करुन ठेवला आहे. सदर धनादेश बँकेत जमा केला नसल्यामुळे त्याचे पासुन मिळणा-या व्याजाचे नुकसान झालेले आहे.

4) निविदाधीन कामाच्या 15.11 टक्के कमी दराने निविदा स्विकारतांना त्याबाबत कंत्राटदाराकडुन कमी दरात काम करण्याचे नियोजनाबाबत सविस्तार तपशिल घेण्यात आलेला नाही. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी 2016/प्र.क्र.2/इमा.2, दिनांक 12/02/2016 अन्वये निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 10 टक्के पेक्षा अधिक दराने कमी असेल तर संबधित कंत्रटदाराकडुन एवढ्या कमी दरात काम करण्याचे नियोजनाबाबत सविस्तार तपशिल निविदा बोलविणाऱ्या अधिकाऱ्याने प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

5) माहे फेब्रुवारी व मार्च मध्ये कार्यारंभ आदेश देण्यास प्रतिबंध असतांना दिनांक 16/03/2016 ला कार्यारंभ आदेश दिलेला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 मधील नियम 296(ब) नुसार जानेवारी महिन्यात कोणतेही काम मंजूर करण्यात येऊ नये तसेच माहे फेब्रुवारी व मार्च मध्ये कोणतेही काम सुरू करण्यात येऊ नये अशा सुचना असून त्याचे पालन होणे आवश्यक आहे.

**3.409 मौजा सालई गोधनी-2 तालुका नागपूर येथील नवीन साठवण बंधा-याचे बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर कामाकरिता रक्कम रूपये 12,69,893/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बंधाऱ्याच्या कामाची गुणवत्ता व दर्जा प्रमाणित केल्याबाबतच्या अहवालाची प्रत कामाच्या नस्तीसोबत आढळून आलेली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र.217/पंरा-08, दिनांक 15/11/2011 नुसार कामाच्या विविध टप्प्यावर गुणवत्ता तपासणी करणे अनिवार्य असून कामाच्या दर्जाबाबत राज्य गुणवत्ता नियंत्रक यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

2) ग्रामपंचायतीला कामाचे प्राक्कलन मराठीत उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2001/प्र.क्र.105/वित्त-9, दिनांक 16/01/2004 नुसार विकास कामे ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करतांना संबंधित ग्रामपंचायतीला कळविणे व त्या कामाची प्राक्कलने मराठीत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

3) बांधकामाच्या जागी माहिती दर्शविणारा फलक लावण्यात आलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/पंरा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष बांधकामाच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक लावणे आवश्यक आहे.

4) काम सुरू करण्यापूर्वी सिमेंटचा चाचणी अहवाल प्राप्त केलेला नसून दिनांक 30/03/2017 रोजी काम पूर्ण केल्यानंतर दिनांक 24/04/2017 ला चाचणी अहवाल प्राप्त केलेला आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट-1099/प्र.क्र.56/05, दिनांक 30/06/2000 नुसार बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या सिमेंटचा चाचणी अहवाल काम सूरू करण्यापूर्वी शासन मान्यता प्राप्त प्रयोग शाळेकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

5) माहे फेब्रुवारी व मार्च मध्ये कार्यारंभ आदेश देण्यास प्रतिबंध असतांना दिनांक 09/02/2016 ला कार्यारंभ आदेश दिलेला आहे. तसेच माहे जानेवारी मध्ये काम मंजूर केलेले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 मधील नियम 296(ब) नुसार जानेवारी महिन्यात कोणतेही काम मंजूर करण्यात येऊ नये तसेच माहे फेब्रुवारी व मार्च मध्ये कोणतेही काम सुरू करण्यात येऊ नये अशा सुचना असून त्याचे पालन होणे आवश्यक आहे.

6) करारनाम्यासाठी 400 रूपयाचेच मुद्रांक वापरलेले आहेत. निविदा किंमतीनुसार करारनाम्यासाठी प्रत्यक्षात 700/- रूपयाचे मुद्रांक वापरणे आवश्यक होते. परंतु रूपये 300/- चे कमी मुद्रांक वापरले आहेत.

### 3.410 मौजा कुजबा तालुका कुही येथील नविन साठवण बंधा-याचे कामाबाबत.

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदर कामाकरिता रक्कम रूपये 11,53,744/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राकलनातील बाब क्रमांक 04 नुसार दिनांक 22/02/2017 ते 10/03/2017 पर्यंत 16 दिवस डिवाटरींगसाठी पंप वापरण्यात आलेत. लॉग बुकची नोंद दिनांकाप्रमाणे मोजमाप पुस्तिकेत घेण्यात आलेली नाही. सदर बाब ही प्राकलनातील बाब असल्यामुळे सविस्तर, दिनांकाप्रमाणे मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे.

2) कामाच्या करारनाम्यासाठी 500/- रूपयाचेच मुद्रांक वापरलेले आहेत. निविदा किंमतीनुसार करारनाम्यासाठी प्रत्यक्षात 700/- रूपयाचे मुद्रांक वापरणे आवश्यक होते. त्यामुळे रूपये 200/- चे मुद्रांक कमी वापरलेले आहेत.

3) काम पूर्ण झाल्यावर काम पूर्णत्वाचा दाखला विहित नमुन्यात मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेला नाही. त्याबाबतचे वेगळे प्रमाणपत्र तयार करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार काम पूर्ण झाल्यावर काम पूर्णत्वाचा दाखला विहित नमुन्यात मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे.

4) टेंडर पेपर मधील ज्ञापन पृष्ठ क्रमांक 25 वर कंत्राटाचे रेट परसेंटटेज नमुद नाही. तसेच बऱ्याच ठिकाणी कार्यकारी अभियंता व कंत्राटदार यांच्या स्वाक्ष-या नाहीत. करारनामा बी-1 करण्यात आल्यानंतर त्यातील सर्व बाबी अद्ययावत असणे व त्या स्वाक्षरीत असणे आवश्यक आहे.

### 3.411 साखळी सिमेंट कॉंक्रीट नाला बांधकाम (रुंदीकरण व खोलीकरणासह) पळसगाव तालुका देवळी उपविभाग वर्धा चे बांधकाम

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद, वर्धा चे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतांना, वर्धा उपविभाग अंतर्गत मौजा पळसगाव साखळी सिमेंट

काँक्रीट नाला बांधकाम (रुंदीकरण व खोलीकरणासह) पळसगाव 1,2,3 कामांच्या नस्तींची तपासणी करण्यात आली. सदर बाबत रककम रुपये 38,54,910/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमासं-1098/प्र.क्र.29/98, दिनांक 20/06/1998 आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/पंरा.8(35), दिनांक 15/09/2003 नुसार काम सुरू होण्यापुर्वी कामाचा व कामवरील मजूरांचा विमा, शासकीय विमा निधी, मुंबई यांचेकडे उतरविणे आवश्यक असतांना सदर कामाचा व कामावरील मजुरांचा विम्याची रक्कम हि कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी भरणा केलेला नाही व विमा काढलेला नाही.

2) सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक एसटीआर/1097/प्र.क्र.106/सांबा, दिनांक 09/02/1998 तसेच शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/5, दिनांक 30/06/2000 अन्वये बांधकामासाठी वापरण्यात येणा-या सामुग्रीची चाचणी काम सुरू होण्यापुर्वी करणे आवश्यक असतांनाही चाचणी अहवाल बघता तशी कार्यवाही झालेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो-1099/प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 मधील परिच्छेद 3 मधील मुददा क्रमांक 3.4 नुसार लघु पाटबंधारे तलाव कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे व साठवण तलाव आदि योजनांचे अगोदरच्या वर्षी जमा झालेल्या पाणीपटटी पैकी 20 टक्के रक्कम स्थानिक शुल्क् म्हणुन पाणीपुरवठा संस्थेने दरवर्षी शासनास भरणा करावा, अशी स्पष्ट सुचना दिलेले असतांनाही याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर वसुलीची कार्यवाही तात्काळ करावी

4) संबंधीत प्रकल्पातील पाण्याचा योग्य वापर करुन पिक उत्पादनामध्ये भरीव वाढ करण्याचा शासनाचा मुख्य् उददेश पुर्ण झालेबाबत संबंधीत लाभार्थीचा पिक उत्पादनात वाढ झालेबाबत फलश्रृती अहवाल तसेच या प्रकल्पामुळे स्थानीक स्तरावर जमिनीच्या आतील पाण्याचा पातळीत वाढ झाली किंवा नाही, याबाबत नस्तीत दस्ताऐवज वा अहवाल नसल्यामुळे सदर बाब तपासता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो-1099/प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 मधील परिच्छेद 3 मधील मुददा क्रमांक 3.4 नुसार लघु पाटबंधारे तलाव कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे योजनांचे स्वामीत्वशुल्क् म्हणुन रूपये 1,000/- व साठवण तलावाकरिता रूपयें 10,000/- प्रति योजना प्रति वर्ष पाणीपुरवठा संस्थेने दरवर्षी शासनास भरणा करावा, अशी स्पष्ट सुचना दिलेले असतांनाही याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर वसुलीची कार्यवाही तात्काळ करावी.

6) महाराष्ट्र शासन, राजपत्र (असाधारण भाग चार-ब) दिनांक 21/08/2014 नुसार स्वामीत्व् धन रकमेवर(रॉयल्टीवर) 10 टक्के विक्रीकराची कपात करण्याची सुचना दिलेली आहे. यानुसार या कामासाठी कपात करण्यात आलेल्या रॉयल्टी रक्कम रूपये 41,298/- वर कंत्राटदाराकडून 10 टक्के प्रमाणे रूपये 4,130/- कपात करणे आवश्यक असतांना 2 टक्के प्रमाणे रूपये 826/- कपात केले आहे. त्यामुळे उर्वरीत रूपये 3,304/- वसुलपात्र आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो-1099/प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 मधील परिच्छेद 5 मुददा क्रमांक 5.4 नुसार जिल्हा परिषदेअंतर्गत 0-100 हेक्टर सिंचन क्षमतेच्या योजनेसाठी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याखेरीज योजनेचे वा प्रकल्पाचे बांधकाम सुरु करण्यासाठी कार्यारंभ आदेश देऊ नयेत, असे स्पष्ट सुचना दिलेले असतांनाही याप्रमाणे पाणी वापर संस्थेची नोंदणी न करताच कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश दिले आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 148 व करारनामा अट क्रमांक 4 नुसार मुदतवाढीचा अर्ज कामाची मुदत संपण्यापूर्वी 15 दिवस अगोदर मुदतवाढीचा अर्ज सादर करणे बंधनकारक राहिल. त्याशिवाय मुदत वाढीचा विचार केला जाणार नाही, असे नमुद असतांनाही कंत्राटदाराने पहिली मुदतवाढीचा अर्ज काम संपल्याचा दिवस दिनांक 30/06/2015 व दुसरी मुदतवाढीचा अर्ज 10/02/16 रोजी सादर केला व विभागाने रूपये 10/- प्रती दिवस प्रमाणे दंड आकारुन दिनांक 04/03/2016 व दुसरा मुदतवाढीला दिनांक 22/03/2017 रोजी मुदतवाढ दिले. याप्रमाणे करारनामा अटीचा व लेखा संहीतेचे पालन केले नाही.

9) पळसगाव-2 या कामाचे मोजमाप पुस्तिका क्रमांक 3968 तपासले असता गणनेत चुक झाल्यामुळे अतिप्रदान रूपये 18,863/- झालेले आहे.

10) मंजूर कामाच्या एखादे बाबीत 125 टक्के वा रूपये 5,000/- पेक्षा जास्त वाढ असल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 118 मंजूरी घेणे व तसे लेखी आदेश संबंधीत कंत्राटदाराला दिल्यानंतरच वाढीव काम करुन कंत्राटदाराला त्यावर खर्च करण्याची मान्यता मिळते.

11) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1010/प्र.क्र.68/कोषा प्र.-5, दिनांक 18/04/2011 नुसार सर्व प्रकारची प्रदाने ईसीएस / एनईएफटीद्वारे करावयाचे निर्देश असतांनाही कंत्राटदाराला धनादेशाने प्रदाने करण्यात येऊन शासन निर्णयाचे पालन करण्यात आले नाही.

12) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 मधील मार्गदर्शन तत्व क्रंमांक 2 नुसार कोणत्याही परिस्थीतीत एकाच मोजमाप वहीत वेगवेगळया कामांच्या नोंदी घेण्यात येऊ नयेत, असे आदेश असतांनाही याप्रामणे कार्यवाही न करता एकाच मोजमाप पुस्तिकेत एकापेक्षा जास्त कामांची नोंद घेऊन शासन निर्देशांचे पालन केले नाही.

**3.412 साठवण बंधारा क्रमांक 2 बांधकाम पांढरकवडा तालुका वर्धा उपविभाग वर्धा**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** लघुसिंचन विभाग, जिल्हापरिषद, वर्धा चे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतांना, वर्धा उपविभाग अंतर्गत मौजा पांढरकवडा येथील साठवण बंधारा क्रमांक 2 बांधकाम या कामाच्या नस्तीची तपासणी करण्यात आली. सदर बाबत रककम रुपये 12,58,152/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमासं-1098/प्र.क्र.29/98, दिनांक 20/06/1998 आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/पंरा.8(35), दिनांक 15/09/2003 नुसार काम सुरू होण्यापुर्वी कामाचा व काम्वरील मजूरांचा विमा, शासकीय विमा निधी मुंबई यांचेकडे उतरविणे आवश्यक असतांना सदर कामाचा व कामावरील मजुरांचा विम्याची रक्कम ही, कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी भरणा केलेला नाही व विमा काढलेला नाही.

2) सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक एसटीआर/1097/प्र.क्र.106/सांबा, दिनांक 09/02/1998 तसेच शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/5, दिनांक 30/06/2000 अन्वये बांधकामासाठी वापरण्यात येणा-या सामुग्रीची चाचणी काम सुरू होण्यापुर्वी करणे आवश्यक असतांनाही चाचणी अहवाल बघता तशी कार्यवाही झालेली नाही.

3) बी-1 निविदा फॉर्मच्या प्रत्येक पृष्ठावर कार्यकारी अभियंता लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा व संबंधीत कंत्राटदार यांची सही नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो-1099/प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 मधील परिच्छेद 3 मधील मुददा क्रमांक 3.4 नुसार लघु पाटबंधारे तलाव कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे व साठवण तलाव आदि योजनांचे अगोदरच्या वर्षी जमा झालेल्या पाणीपटटीपैकी 20 टक्के रक्कम स्थानिक शुल्क म्हणुन पाणीपुरवठा संस्थेने दरवर्षी शासनास भरणा करावा, अशी स्पष्ट सुचना दिलेले असतांनाही याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर वसुलीची कार्यवाही तात्काळ करावी.

5) संबंधीत प्रकल्पातील पाण्याचा योग्य वापर करुन पिक उत्पादनामध्ये भरीव वाढ करण्याचा शासनाचा मुख्य् उददेश पुर्ण झालेबाबत संबंधीत लाभार्थीचा पिक उत्पादनात वाढ झालेबाबत फलश्रृती अहवाल तसेच या प्रकल्पामुळे स्थानिक स्तरावर जमिनीच्या आतील पाण्याचा पातळीत वाढ झाली किंवा नाही? याबाबत नस्तीत दस्ताऐवज वा अहवाल नसल्यामुळे सदर बाब तपासता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो-1099/प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 मधील परिच्छेद 3 मधील मुददा क्रमांक 3.4 नुसार लघु पाटबंधारे तलाव कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे योजनांचे स्वामीत्व शुल्क म्हणुन रूपये 1,000/- व साठवण तलावाकरीता रूपये 10,000/- प्रति

योजना प्रति वर्ष पाणीपुरवठा संस्थेने दरवर्षी शासनास भरणा करावा, अशी स्पष्ट सुचना दिलेले असतांनाही याप्रमाणे साठवण बंधाराकरीता रूपये 1,000/- शासनास भरणा करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर वसुलीची कार्यवाही तात्काळ करावी.

7) महाराष्ट्र शासन, राजपत्र (असाधारण भाग चार-ब) दिनांक 21/08/2014 नुसार स्वामीत्व धन रकमेवर(रॉयल्टीवर) 10 टक्के विक्रीकराची कपात करण्याची सुचना दिलेली आहे. यानुसार या कामासाठी कपात करण्यात आलेल्या रॉयल्टी रक्क्म रुपये 30,214/- वर कंत्राटदाराकडून 10 टक्के प्रमाणे रूपये 3,021/- कपात करणे आवश्यक असतांना 5 टक्के प्रमाणे रूपये 1,511/- कपात केले आहे. त्यामुळे उर्वरीत रूपये 1,510/- वसुलपात्र आहे.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो-1099/प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 मधील परिच्छेद 5 मुददा क्रमांक 5.4 नुसार जिल्हा परिषदेअंतर्गत 0-100 हेक्टर सिंचन क्षमतेच्या योजनेसाठी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याखेरीज योजनेचे वा प्रकल्पाचे बांधकाम सुरु करण्यासाठी कार्यारंभ आदेश देऊ नयेत, असे स्पष्ट सुचना दिलेले असतांनाही याप्रमाणे पाणी वापर संस्थेची नोंदणी न करताच कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश दिले आहे.

9) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1010/प्र.क्र.68/कोषा प्र.-5, दिनांक 18/04/2011 नुसार सर्व प्रकारची प्रदाने ईसीएस/एनईएफटी दवारे करावयाचे निर्देश असतांनाही कंत्राटदाराला धनादेशाने प्रदाने करण्यात येऊन शासन निर्णयाचे पालन करण्यात आले नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 मधील मार्गदर्शन तत्व क्रमांक 2 नुसार कोणत्याही परिस्थीतीत एकाच मोजमाप वहीत वेगवेगळया कामांच्या नोंदी घेण्यात येऊ नयेत, असे आदेश असतांनाही याप्रमाणे कार्यवाही न करता एकाच मोजमाप पुस्तिकेत एकापेक्षा जास्त कामांची नोंद घेऊन शासन निर्देशांचे पालन केले नाही.

**3.413 लघुसिंचन तलाव दुरुस्ती मौजा लेंडेझरी येथिल कामातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** प्रमाणक क्रमांक 2109, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 19,82,763/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रक तयार करतांना मऊ मरुम खोदकामा मध्ये कठीण मुरुम खोदकामाचे दर घेण्यात आलेले आहे. सीएसआर 13-14 पान क्रं.8 नुसार कठीण मुरुम खोदकामाचे दर प्रती क्युबिक मिटर रुपये 40.35 तर मऊ मुरुम खोदकामाचे दर प्रती क्युबिक मिटर रुपये 29.50 आहे. म्हणजेच अंदाजपत्रक तयार करतांना exacavation in soft murum ह्या ॲटम मध्ये कठीण मुरुम खोदकामाचे दर घेऊन प्रती क्युबिक मिटर रुपये 10.85 अधिक प्रदान करण्यात आलेले आहे. संबंधित कामामध्ये exacavation in soft murum ह्या ॲटमवर एकुण 2504.86 परीमाणाचे काम झालेले आहे. पर्यायाने संबंधीत कंत्राटदाराला असे एकुण रुपये 27,553/- रक्कमेचे अधिक प्रदान करण्यात आलेले आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152 (3) अन्वये 10 टक्के पेक्षा कमी दराची निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदा प्रकरणी (Reduced Rate) चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाची निविदा 18.86 टक्के कमी दराची असल्याने सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन मंजुरी घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिईएन 1088/समिती/सिआर 37 (5) भाग 1 इमारत 2, दिनांक 13/03/1989 अन्वये कामाची निविदा अंदाजपत्रकीय किंमतीच्या 15 टक्के पेक्षा कमी आलेली असेल तर संबधीत कंत्राटदाराकडून काम करण्याबाबत सविस्तर स्पष्टीकरण मागवावे हे स्पष्टीकरण समाधानकारक वाटल्यास व निविदा मंजुर केल्यास कामाचा दर्जा / गुणवत्ता खालावणार नाही, याची खात्री पटल्यास निविदा मंजुर करावी सदर प्रकरणात वरील निर्देशाप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही. यामुळे कामाचा दर्जा योग्य होता असे म्हणता येत नाही.

4) सदर कामाची मुदत दिनांक 26/07/2016 पर्यंत होती. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 148 (1) अन्वये मुळ मुदत संपण्यापुर्वी 15 दिवस अगोदर संबधीत कंत्राटदाराने मुदतवाढीसाठी अर्ज सादर करणे आवश्यक असुन त्यानंतर अर्ज केल्यास ग्राह्य धरता येणार नाही, असे स्पष्ट निर्देश असतांना कंत्राटदाराने मूळ मुदत संपल्यानंतर दिनांक 20/09/2016 ला मुदत वाढीसाठी अर्ज सादर केला आहे.

5) सदर काम विहित मुदतीत पुर्ण झाले नाही. काम पुर्ण करण्यासाठी दिनांक 27/07/2016 ते 31/03/2017 पर्यंत 8 महिने 04 दिवसाची पत्र क्रमांक जिपन/लसिवि/ले.प/170/17, दिनांक 27/01/2017 अन्वये विनामुल्य मुदतवाढ मंजूर करण्यात आली निवीदा करारनाम्यातील अट क्रमांक 2 अन्वये उशिरा केलेल्या कामाचे बाबतीत करारनामा मुल्याचे कमीत कमी 1 टक्का जास्तीत जास्त 10 टक्के पर्यंत रक्कम वसूल करुन दंडात्मक कार्यवाही करण्याची तरतूद आहे. उशिरा केलेल्या कालावधीसाठी कमीतकमी 1 टक्के रुपये 24,879/- वसूल करावयाचे असतांना वसूल न केल्यामूळे शासन निधीचे नुकसान झालेले आहे तरी संबंधीताकडून वसूली करुन निधीत जमा करावे.

6) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.डी.जी.2016/प्र.क्रं.2/इमा.2, दिनांक 12/02/2016 नुसार ज्या निविदा 10 टक्के पेक्षा कमी दराने मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यामूळे या कामात निविदा मुल्याच्या 10 टक्के पर्यंत 1 टक्के व नंतर प्रत्येकी 1 टक्के परफॉरम्न्स सिक्युरिटी कपात करणे आवश्यक असे असतांना या कामात 18.86 टक्के कमी दराने काम देऊन सुध्दा परफॉरम्न्स सिक्युरीटी रुपये 2,01,868/- कपात करण्यात आलेली नाही.

7) अर्धसमास प्रत्र कमांक 5, दिनांक 25/11/2016 अन्वये जलयुक्तशिवार योजनेतील ज्या कंत्राटदारांना ई-निविदेव्दारे कामे मंजूर झालेले आहेत. त्या कंत्राटदाराने सादर केलेले कामाबाबतचे दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावे याबाबत मागणी करण्यात आली होती. परंतु, उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

8) सदर कामात PWD CSR 2014-2015 चे दर खालील नमूद बाबी करता लागु केल्याचे दिसून आले, परंतु महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक BCA-2009/CR-108/Labour7-A, दिनांक 17/06/2010 नुसार 1 टक्के Labour Welfare ची रक्कम ही Basic rate मध्ये समाविष्ठ असल्याने ती रक्कम Basic rate मध्ये अधिक करु नये असे असतांना सदर कामात PWD CSR 2014-2015 चे खालील नमूद बाबीच्या दरात 1 टक्के Labour Welfare ची रक्कम आकारुन कंत्राटदाराला 1 टक्के Labour Welfare च्या रक्कमेचे अती प्रदान झाल्याचे मोजमाप पुस्तीकेवरुन दिसून आले. तरी जादा प्रदानाची रक्कम रुपये 6,742/- वसुल करण्यात यावी.

### 3.414 जलयुक्त शिवार योजनेतंर्गत नाला बांध व नाला खोलीकरण मौजा गर्रा बघेडा क्रमांक 1,2,3 येथील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत दोन प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 49,16,540/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकामध्ये सुरवातीला खोदकाम केलेले साहित्य 30 मिटर पर्यंत लिड दाखविण्यात आले आहे. परंतु त्याच खोदकाम केलेल्या उपलब्ध साहित्यापासून गाईडबंड बांधकाम करतांना मात्र 150 मिटर लिड दाखविण्यात आलेली आहे. सिएसआर 13-14 दराप्रमाणे 30 मिटरचे दर 7.75 रुपये आहे. तर 150 मिटरचे दर 28.70 रुपये आहे. म्हणजेच प्रती क्युबिक मिटर 20.95 रुपये अधिक प्रदान करण्यात आलेले आहे. सदर कामामध्ये गाईड बंड बांधकामावर 526.08 परीमाण दाखविण्यात आलेले आहे. म्हणजेच रुपये 11,021/- अधिक प्रदान करण्यात आलेले आहेत.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग ई-निविदेमध्ये सेक्शन 1 मुद्दा 2 अन्वये The cost of clearance as specified above is deemed to be include in the itom of exacavation असे नमूद असतांना सुध्दा साईड क्लिअरंन्स करीता सीएनबी व नाला खोलीकरणावर रुपये 5,709/- खर्च करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर रक्कम वसूलीपात्र ठरते.

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.डी.जी.2016/प्र.क्र.2/इमा.2, दिनांक 12/02/2016 नुसार ज्या निविदा 10 टक्के पेक्षा कमी दराने मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यामूळे या कामात 10 टकके पर्यंत 1 टक्के निविदा मुल्याच्या व नंतर प्रत्येकी 1 टक्के परफॉरमन्स सिक्युरिटी कपात करणे आवश्यक असे असतांना या कामात 18.21 टक्के कमी दराने काम देऊन सुध्दा परफॉरमन्स सिक्युरीटी रुपये 4,39,875/- कपात करण्यात आलेली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, सा.प.क्रमांक संकीर्ण 209-प्र.क्र.81/परा-7, दिनांक 08/06/2009 नुसार कामाचे माहीती दर्शविणारे फलक कामाचे ठिकाणी लावणे आवश्यक आहे. सदर फलकाची तरतूद अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे. परंतु वरील कामामध्ये माहीती फलक तयार करून तसा फोटो देयकासोबत संलग्न केल्याचे दिसून येत नाही. म्हणजेच प्रत्यक्षकामावर माहीती फलक न लावता माहिती फलकाचे रक्कम रुपये 15,498/- उचल केल्याचे दिसून येते.

5) सदर कामाचा कार्यादेश दिनांक 18/04/2015 ला देण्यात आला काम पुर्ण करण्याचा विहित कालावधी 3 महिने दिनांक 17/07/2015 पर्यंत होता. परंतु सदर काम विहित मुदतीत पुर्ण झाले नाही त्यामुळे निविदा करारनाम्यातील अट क्रमांक 2 अन्वये उशिरा केलेल्या कामाचे बाबतीत करारनामा मुल्याचे कमीत कमी 1 टक्के जास्तीत जास्त 10 टक्के पर्यंत रक्कम वसूल करुन दंडात्मक कार्यवाही करण्याची तरतूद आहे उशिरा केलेल्या कालावधीसाठी कमीतकमी 1 टक्के रुपये 59,757/- वसूल करावयाचे असतांना विनामूल्य मूदतवाढ दिल्याने शासन निधीचे नुकसान झालेले आहे तरी संबंधीताकडून वसूली करुन निधीत जमा करावे

6) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी प्रमाणे 2 टक्के प्रमाणे आयकर रक्कम रूपये 98,331/- कपात करावयास हवे परंतु कंत्राटदाराकडून प्रत्यक्षात रूपये 49,165/- 1 टक्के कपात करण्यात आले. म्हणजे 98,331 - 49,165 = रुपये 49,166/- कमी कपात करण्यात आले.

7) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिईएन 1088/समिती/सिआर 37 (5) भाग 1 इमारत 2, दिनांक 13/03/1989 अन्वये कामाची निविदा अंदाजपत्रकीय किंमतीच्या 15 टक्के पेक्षा कमी आलेली असेल तर संबधीत कंत्राटदाराकडून काम करण्याबाबत सविस्तर स्पष्टीकरण मागवावे हे स्पष्टीकरण समाधानकारक वाटल्यास व निविदा मंजुर केल्यास कामाचा दर्जा गुणवत्ता खालावणार नाही, याची खात्री पटल्यास निविदा मंजुर करावी सदर काम 18.21 टक्के कमी दराचे असुन सुध्दा वरील निर्देशाप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही. यामुळे कामाचा दर्जा योग्य होता असे म्हणता येत नाही.

8) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलस-2012-प्र.क्र.1-जल 7, दिनांक 12/11/2013 अन्वये सिमेंट नाला बांधाच्या काटछेदाप्रमाणे नाला तळपातळीच्या खाली पाया खोदाई कठीण खडकापर्यंत व जास्तीत जास्त 1.20 मि. घेण्यात यावी असे नमूद आहे. म्हणजेच 1.2 मिटर खोदाई कठीण खडकापर्यंत करावयाची आहे. परंतु वरील कामामध्ये 5 एचपीचे 7 मोटार पंप एकुण 441 तास दिनांक 28/12/2015 ते 27/02/2016 पर्यंत वापरण्यात आले आहे. सर्वसाधारणपणे 1 एचपी मोटार 1 तासाला 1500 हजार लिटर पाणी काढण्याची क्षमता असतांना 5 एचपी च्या 7 मोटार 718 तास लावून कंत्राटदाराला डिवाटरींग करीता अधिकचे प्रदान केल्याचे दिसून येते.

9) अर्धसमास प्रत्र कमांक 5, दिनांक 25/11/2016 अन्वये जलयुक्तशिवार योजनेतील ज्या कंत्राटदारांना ई-निविदेव्दारे कामे मंजूर झालेले आहेत. त्या कंत्राटदाराने सादर केलेले कामाबाबतचे दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावे याबाबत मागणी करण्यात आली होती, परंतु उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

10) प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेशनुसार सन 2015-16 या वर्षात अंदाजपत्रकीय किंमती एवढी तरतुद ज्या कामावर देण्यात आली आहे ती मार्च 2016 अखेरपर्यंत पूर्ण खर्च होणे आवश्यक होते. तथापी सदर अटीचे उल्लंघन करुन बांधकामावरील खर्च सन 2016-17 मध्ये करण्यात आलेले आहे.

**3.415 मा.मा.तलाव दुरुस्ती कलेवाडा गट न.14,5 ता.पवनी येथील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** प्रमाणक क्रमांक 1680, दिनांक 24/03/2017 अन्वये रक्कम रूपये 336155/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामात PWD CSR 2015-2016 चे दर खालील नमूद बाबी करता लागु केल्याचे दिसून आले परंतु PWD CSR 2015-2016 मधील अनुच्छेद क्रमांक 7.2 तथा उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक BCA-2009/CR-108/Labour7-A, दिनांक 17/06/2010 नुसार 1 टक्के Labour Welfare ची रक्कम ही Basic rate मध्ये समाविष्ठ असल्याने ती रक्कम Basic rate मध्ये अधिक करु नये असे असतांना सदर कामात PWD CSR 2015-2016 चे खालील नमूद बाबीच्या दरात 1 टक्के Labour Welfare ची रक्कम आकारुन कंत्राटदाराला 1 टक्के Labour Welfare च्या रक्कमेचे अती प्रदान झाल्याचे मोजमाप पुस्तीकेवरुन दिसून आले. तरी जादा प्रदानाची रक्कम रुपये 3,559/- वसुल करण्यात यावी.

2) मुदतवाढीसाठी नियमानुसार दंड आकरणी न करणेबाबत :- सदर कामाचा कार्यादेश दिनांक 24/05/2016 ला देण्यात आला काम पुर्ण करण्याचा विहित कालावधी 3 महिने दिनांक 24/08/2016 पर्यंत होता. परंतु सदर काम विहित मुदतीत पुर्ण झाले नाही काम पुर्ण करण्यासाठी दिनांक 24/08/2016 ते 25/01/2017 पर्यंत मुदतवाढ आदेश क्रमांक 462, दिनांक 06/03/2017 अन्वये नाममात्र दंड रुपये 10/- प्रती दिवस प्रमाणे 1,550/- आकारुन मुदतवाढ मंजूर करण्यात आली. निविदा करारनाम्यातील अट क्रमांक 2 अन्वये उशिरा केलेल्या कामाचे बाबतीत करारनामामुल्याचे कमीत कमी 1 टक्के जास्तीत जास्त 10 टक्के पर्यंत रक्कम वसूल करुन दंडात्मक कार्यवाही करण्याची तरतूद आहे, परंतू तशी कार्यवाही केली नाही.

3) गर्व्हनमेंट पॉलिटेक्निक कॉलेज सेंदूरवाफाचे टेस्ट रिपोर्टनुसार बाब M 20 डेट ऑफ कास्टिंग दिनांक 01/12/2016 ला केल्याचे नमूद केले आहे. परंतु मोजमाप पुस्तिकानुसार M 20 चे काम दिनांक 10/01/2017 ला केल्याचे नमूद आहे. काम सुरु होण्यापूर्वीच टेस्ट कसा काय घेण्यात आला. सदर दिनांकातील तफावतीबाबत योग्य ते अनुपालन सादर करावे.

4) सदर कामाचा कार्यारंभ आदेशा मधील अटी व शर्ती प्रमाणे व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2000/प्र.क्र.837/परास8/35, दिनांक 08/05/2002 तसेच विमा संचालनालय, मुंबई यांचे दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा व कामावरील मजुरांचा विमा शासकिय विमा निधी, मुंबई यांचेकडेच काम सुरु करणेपुवी उतरविणे आवश्यक आहे असे शासनाचे आदेश आहे. असे असतांना सदर कामाचा व कामावरील मजुरांचा विम्याची रक्कम हि खर्च प्रमाणकामधुन कपात करण्यात आल्यामुळे ती उशिराने कपात करण्यात आलेली आहे. त्यामुळे शासनाचा उद्देश सफल झाला असे म्हणता येत नाही व वरिल शासन निर्णयाचे उल्लघंन झालेले आहे.

5) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदवहीवर लाल शाईने कर्णरेषा मारलेल्या नाहीत.

6) काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तीकेत नोंदविण्यात आलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/33, दिनांक 21/12/2000 नुसार दाखला मोजमापपुस्तीकेत नोंदविणे आवश्यक आहे.

**3.416 मामा तलाव दुरूस्ती मोरगाव / राजे गट क्रमांक 31 ता.लाखनीचे बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत दोन प्रमाणकांन्वये रक्कम रूपये 1,71,093/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मामा तलाव दुरूस्तीचे बांधकामाचे नस्तीची तपासणी केली असता जुने नादुरूस्त जलविमोचक दगडाचे असल्याचे छायाचित्रावरून आढळून आले. परंतु मोजमाप पुस्तिका 4335 पान क्रमांक 2 वर बाब क्रमांक 1 अन्वये Dismentling the lime or lean cement concrete including stacking the spoils as directed with all lead & lift कामाचे मोजमाप 25.24 घनमीटर केले असून त्याकरिता रुपये 444/- प्रती घमी प्रमाणे रूपये

11,207/- एवढा खर्च केलेला आहे. परंतु दगडाचे काम तोडण्याचा दर Dismentling stone masonary in lime or cement mortor including stacking the material as directed with all lead & lift प्रती घनमीटर रूपये 239/- एवढा आहे. म्हणजे रुपये 5,175/- एवढा जादा खर्च केल्याने शासन निधीचे नुकसान झालेले आहे. तरी सदर रक्कम रूपये 5,175/- वसूलपात्र ठरते.

2) सुधारीत अंदाजपत्रकावर तांत्रिक मंजुरीचा दिनांक व क्रमांक नाही म्हणजे सक्षम प्राधिका-याची मंजुरी न घेताच सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

3) मुद्रांक पेपर विक्रेत्याकडून दिनांक 01/06/2016 ला विकत घेतल्याचे मुद्रांकावर नमूद असतांना करारनामा दिनांक 30/05/2016 ला केल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले. मुद्रांक विकत घेण्यापूर्वीच करारनामा करण्यात आला.

4) अंदाजपत्रकाची तपासणी केली असता प्राधिकृत क्वारी चार्ट जोडलेला उपलब्ध झाला नाही. त्यामुळे लिड स्टेटमेंटमधील खाणींचे अंतर योग्य असल्याची खात्री लेखापरिक्षणास करता आली नाही.

5) कामावरील मजूरांचा विम्याची रक्कम करारनाम्याच्या रक्कमेच्या 1 टक्का (2,09,095/- चे 1 टक्के) रूपये 2,095/- कपात न करता फक्त रूपये 1,794/- कपात करण्यात आले.

6) शासन पत्र क्रमांक झेडपीए 2011-प्र.क्र.601-11/वित्त-9, दिनांक 22/02/2011 नुसार वित्त विभागाची मान्यता घेवूनच कार्यारंभ आदेश देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता सरसकट कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

**3.417 लघुपाटबंधारे तलाव दुरुस्ती मौजा बरडकिन्ही कामातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 30) -** सदरबाबत दोन प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 16,84,481/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यारंभ आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे प्रकल्पाचे बांधकामाचे काम सुरु करण्याआधी पाणी वापर सहकारी संस्था स्थापन करणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 152 (3) अन्वये 10 टक्के पेक्षा कमी दराची निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदा प्रकरणी (Reduced Rate) चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाची निविदा 11.42 टक्के कमी दराची असल्याने सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन मंजुरी घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

3) निवीदा करारनाम्यातील अट क्रमांक अन्वये उशिरा केलेल्या कामाचे बाबतीत करारनामा मुल्याचे कमीत कमी 1 टक्के जास्तीत जास्त 10 टक्के पर्यंत रक्कम वसूल करुन दंडात्मक कार्यवाही करण्याची तरतूद आहे उशिरा केलेल्या कालावधीसाठी कमीतकमी 1 टक्के रुपये 24,333/- वसूल करावयाचे असतांना रुपये 00/- वसूल केल्यामूळे रुपये 24,333/- शासन निधीचे नुकसान झालेले आहे. तरी संबंधीताकडून वसूली करुन निधीत जमा करावे.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, सा.प. क्रमांक संकीर्ण 209-प्र.क्र.81/परा-7, दिनांक 08/06/2009 नुसार कामाचे माहीती दर्शविणारे फलक कामाचे ठिकाणी लावणे आवश्यक आहे. सदर फलकाची तरतूद अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे. परंतु वरील कामामध्ये माहीती फलक तयार करून तसा फोटो देयकासोबत संलग्न केल्याचे दिसून येत नाही. म्हणजेच प्रत्यक्षकामावर माहीती फलक न लावता माहिती फलकाचे रक्कम रुपये 5,543/- उचल केल्याचे दिसून येते.

5) शासन पत्र क्रमांक झेडपीऐ 2011-प्र.क्र.601-11/वित्त-9, दिनांक 22/02/2011 नुसार वित्त विभागाची मान्यता घेवुनच कार्यारंभ आदेश देणे आवश्यक असतांना लघुपाटबंधारे विभागातर्फे संबंधित कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे.

6) अर्धसमास प्रत्र क्रमांक 5, दिनांक 25/11/2016 अन्वये जलयुक्तशिवार योजनेतील ज्या कंत्राटदारांना ई-निविदेव्दारे कामे मंजूर झालेले आहेत. त्या कंत्राटदाराने सादर केलेले कामाबाबतचे दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावे, याबाबत मागणी करण्यात आली होती, परंतु उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

7) सदर कामात PWD CSR 2014-2015 चे दर खालील नमूद बाबी करता लागु केल्याचे दिसून आले परंतू उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक BCA-2009/CR-108/Labour7-A, दिनांक 17/06/2010 नुसार 1 टक्के Labour Welfare ची रक्कम ही Basic rate मध्ये समाविष्ठ असल्याने ती रक्क्म Basic rate मध्ये अधिक करु नये असे असतांना सदर कामात PWD CSR 2014-2015 चे दरात 1 टक्के Labour Welfare ची रक्कम आकारुण कंत्राटदाराला 1 टक्के Labour Welfare च्या रक्कमेचे अती प्रदान झाल्याचे मोजमाप पुस्तीकेवरुन दिसून आले. प्रदानाची रक्कम रुपये 8,871/- वसुल करण्यात यावी.

8) प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश क्रमांक 1745, दिनांक 23/05/2016 मधील नुसार सन 2015-16 या वर्षात अंदाजपत्रकीय किंमतीएवढी तरतुद ज्या कामावर देण्यात आली आहे. ती मार्च 2016 अखेरपर्यंत पूर्ण खर्च होणे आवश्यक होते. तथापि, सदर अटीचे उल्लंघन करुन बांधकामावरील खर्च सन 2016-2017 मध्ये करण्यात आलेले आहे.

**3.418 महसुलाचे झालेले नुकसान.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

करारनामा नोंदवही तपासली असता सन 2016-2017 ह्या वर्षात जिल्हा परिषद गोंदिया लघुपाटबंधारे विभाग यांनी जिल्ह्यातील विकासात्मक बांधकामाबाबत एकुण 128 करारनामे करण्यात आलेली आहे. त्यामध्ये ई-निविदाद्वारे, ग्रामपंचायत, सुशिक्षीत बेरोजगार, मजुर सहकारी संस्था यांचा समावेश आहे. सोबत जोडलेल्या कररनाम्याच्या यादी प्रमाणे 128 करारनाम्यापैकी रुपये 10 लाखाच्या आतिल करारनामे 98 आहे.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुच्छेद 63 मध्ये महाराष्ट्र शासन, राजपत्र अधिसुचना दिनांक 04/04/2015 प्रमाणे दहा लाखाच्या आतिल कार्यकंत्राटाच्या रक्कमेवर रुपये पाचशेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे बंधनकारक आहे. सदर विभागाने दहा लाखाच्या आतिल करारनामे रुपये 100/- च्या स्टॅम्पपेपरवर केलेले आहे. त्यामुळे रुपये 400/- प्रमाणे 98 करारनाम्याचे रुपये 39,200/- रक्कम महसुलाचे नुकसान झालेले आहे महसुलाच्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करुन रक्क्म वसुल करण्यात यावी.

**3.419 के.टी. साठवन बंधारा धामनेवाडा उपविभाग - गोंदिया.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** के.टी. साठवन बंधारा कामाकरिता रक्कम रूपये 1,89,823/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बी-1 निविदा करारमान्यातील अट क्रमांक 38 प्रमाणे एखाद्या बाबीचे अंदाजपत्रकातील परिमानापेक्षा 25 टक्के किंवा रुपये 5,000/- या पैकी जे कमी असेल ह्या पेक्षा त्याबाबीचे जादा काम होत असल्यास बी-1 निविदा करारमान्यातील अट क्रमांक 38 प्रमाणे त्या बाबीचे काम करण्याच्या अगोदर अटीमधील तरतुदी प्रमाणे योग्य कार्यवाही करुन काम करणे आवश्यक होते. परंतु नियमाप्रमाणे कुठलिही कार्यवाही न करता व जादा कामाबाबत कुठलेही संयुक्तीक कारण नसल्यामुळे जादा केलेले काम नियमबाह्य ठरते, त्यामुळे जादा कामाचे मुल्य रुपये 1,15,546/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

2) सदर कामाचे निविदा अंदाजपत्रकीय मुल्य रुपये 9,45,300/- इतके आहे. ई-निविदा प्रक्रियेनुसार अनिलकुमार रहांगडाले यांची निविदा 10.02 टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने प्राप्त होवून ती निविदा स्विकारुन कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. महराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2016/प्रक्र.2, दिनांक 12/02/2016 प्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10 टक्के पेक्षा कमी दराने निविदा प्राप्त झाल्यास निर्णयातील सुचना क्रमांक 01 प्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही. शासन निर्णयातील सुचना क्रमांक 02 प्रमाणे सदर निविदा 10.02 टक्के कमी दराची असल्यामुळे परफार्मस सिक्युरिटी जमा करण्यात आलेली नाही. वरिल शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे निविदा स्विकृती प्रक्रिया योग्य वाटत नाही.

3) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक 11/05/2015 चे अधिसुचनेनुसार प्रती 141.20 क्यु.मी. प्रमाणे गौण खनिजावर रॉयल्टी वसुल करणे बंधनकारक आहे. देयकातुन 1053.13 क्यु.मी. गौण

खनिजावर प्रती क्यु.मी. 141.20 प्रमाणे रुपये 1,48,702/- रॉयल्टी रक्कम देयकातुन कपात करणे आवश्यक आहे. परंतु रुपये 74,425/- इतके कपात केल्यामुळे शासन महसुलाचे रुपये 74,277/- इतके नुकसान झालेले आहे. तरी रुपये 74,277/- जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करुन शाषन शिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

**3.420 कोल्हापुरी बंधारा दुरुस्ती मौजा कुंभीटोला उपविभामअर्जुनी / मोर.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** कोल्हापुरी बंधारा दुरुस्ती मौजा कुंभीटोला कामाकरिता रक्कम रूपये 2,34,599/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाच्या पहिल्या बिलात बाब क्रमांक 08 प्रोवाईडिंग एन्ड लेईंग सिमेंट कांक्रीट 1:3:6 चे मोजमाप मोजमाप पुस्तीका पान क्रमांक 12 वर 140.61 क्यु.मी. दर्शविण्यात आलेली आहे. त्या अन्वये सदर देयकात प्रदान झालेले आहे. अंतिम मोजमापात पान क्रमांक 19 वर 44.79 क्यु.मी. मोजमापे घेवून त्यामध्ये 197.57 मोजमापे अधिक करुन एकुण 242.36 क्यु.मी. अंतिम बिलात परिमान दर्शवून प्रती क्यु.मी. रुपये 3918.17 प्रमाणे रुपये 9,49,608/- प्रदान झालेले आहे. प्रत्येक्षात अंतिम मोजमापाप्रमाणे पान क्रमांक 19 वरिल 44.79 व पान क्रमांक 12 वरिल 140.61 क्यु.मी. असे एकुण 185.40 क्यु.मी. चे रुपये 7,26,429/- रक्कमेचे प्रदान होणे आवश्यक असतांना रुपये 9,49,608/- चे प्रदान केल्यामुळे कंत्राटदारास रुपये 2,23,179/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा झालेले प्रदान जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करण्यात यावी.

2) सदर कामाचे निविदा अंदाजपत्रकीय मुल्य रुपये 14,22,480/- इतके आहे. ई-निविदा प्रक्रियेनुसार विनोद यशवंत नाकाडे यांची निविदा 29.99 टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने प्राप्त होवून ती निविदा स्विकारुन कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. महराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2016/प्रक्र.2, दिनांक 12/02/2016 प्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10 टक्के पेक्षा कमी दराने निविदा प्राप्त झाल्यास निर्णयातील सुचना क्रमांक 01 प्रमाणे कार्यवाही केलयाचे दिसुन येत नाही. शासन निर्णयातील सुचना क्रमांक 02 प्रमाणे सदर निविदा 29.99 टक्के कमी दराची असल्यामुळे परफार्मस सिक्युरिटी जमा करण्यात आलेली नाही. वरिल शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे निविदा स्विकृती प्रक्रिया योग्य वाटत नाही.

3) सदर कामाचा कार्यादेश कंत्राटदाराला दिनांक 21/03/2016 ला देण्यात आला कामाचे मुळ मुदत 03 महिने असुन कंत्राटदाराने करारनाम्याप्रमाणे दिनांक 20/06/2016 ला काम पुर्ण करणे अपेक्षित होते. परंतु काम पुर्णत्वाच्या प्रमाणपत्रानुसार कंत्राटदाराने दिनांक 22/12/2016 ला काम पुर्ण केल्याचे अभिलेख्यात दर्शविण्यात आले. दिनांक 20/06/2016 ते 25/12/2016 या कालावधीत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रुपये 15/- प्रतीदिवस दंड आकारुन मुदतवाढ मंजुर केलेली आहे. देयकातून रुपये 2,805/- दंडाची रक्कम कपात केलेली आहे. बी-1 निविदा करारातील अट क्रमांक 02 प्रमाणे दंडात्मक कार्यवाही ही मुदतवाढ मंजुर करतांना अंदाजपत्रकीय मुल्याच्या कमीत कमी 1 टक्का व जास्तीत जास्त 10 टक्के दंड आकारुन मुदतवाढ मंजुर करणे नियमाप्रमाणे योग्य ठरते. प्रशासनाने नगण्य स्वरुपाचा दंड आकारुन 187 दिवासाची मुदतवाढ मंजुर केलेली आहे. निविदा करारातील निर्देशाप्रमाणे कमीत कमी 01 टक्का दंड रुपये 14,225/- आकारणे आवश्यक आहे. नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही न केल्यामुळे रुपये 11,420/- चे शासनाचे नुकसान झालेले आहे.

**3.421 मामा तलाव खमारी विशेष दुरुस्ती बाबत. उपविभाग- गोंदिया.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** मामा तलाव खमारी विशेष दुरुस्ती करिता रक्कम रूपये 2,34,599/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर बाबीचे अंदाजपत्रकात नमुद परिमानापेक्षा जादा काम करण्यात आलेले आहे. बी-1 निविदा करारमान्यातील अट क्रमांक 38 प्रमाणे एखाद्या बाबीचे अंदाजपत्रकातील परिमानापेक्षा 25 टक्के किंवा रुपये 5,000/- या पैकी जे कमी असेल ह्या पेक्षा त्याबाबीचे जादा काम होत असल्यास बी-1 निविदा करारमान्यातील अट क्रमांक 38 प्रमाणे त्या बाबीचे काम करण्याच्या अगोदर अटीमधील तरतुदी प्रमाणे योग्य कार्यवाही करुन काम करणे आवश्यक होते. परंतु नियमाप्रमाणे कुठलिही कार्यवाही न करता व जादा कामाबाबत कुठलेही संयुक्तीक कारण

नसल्यामुळे जादा केलेले काम नियमबाह्य ठरते. त्यामुळे जादा कामाचे मुल्य रुपये 72,498/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक 11/05/2015 चे अधिसुचनेनुसार प्रती 141.20 क्यु.मी. प्रमाणे गौण खनिजावर रॉयल्टी वसुल करणे बंधनकारक आहे. देयकातुन 4815.48 क्यु.मी. गौण खनिजावर प्रती क्यु.मी. 141.20 प्रमाणे रुपये 6,79,946/- रॉयल्टी रक्कम देयकातुन कपात करणे आवश्यक आहे. परंतु रुपये 3,40,310/- इतके कपात केल्यामुळे शासन महसुलाचे रुपये 3,39,636/- इतके नुकसान झालेले आहे. तरी रुपये 3,39,636/- जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करुन शाषन शिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

3) सदर कमाची श्री. कोमल एन. कटरे कंत्राटदार यांची 21.71 टक्के कमी दराची निविदा मंजुर करुन कार्यादेश आदेश देण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जीईएन 1088/समिती/सीआर 37(5) भाग-1 इमारत -2, मंत्रालय मुंबई दिनांक 13/03/1989 मधील निर्देशाप्रमाणे जिल्हा परिषद मधील रस्ते व इमारतीच्या बांधकाबाबत दक्षता व गुणनियंत्रन अधिक प्रभावी करण्यासाठी कोणत्याही कामाची निविदा अंदापत्रकीय रक्कमेच्या 15 टक्के रक्कमे पेक्षा कमी झाली तर संबधीत कंत्राटदाराकडून त्याबद्दलचे सविस्तर स्पष्टीकरण मागवावे स्पष्टीकरण समाधानकारक असेल तरच निविदा मान्य करावी असे शासन निर्देश असतांना शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही न करता सरसकटपणे निविदा मान्य करण्यात येवून कार्यादेश देण्यात आलेला आहे. शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही न करता कमी मुल्याची निविदा स्विकारणे अत्यंत गंभीर बाब आहे त्यामुळे कामाची गुणवत्ता योग्य असल्याबाबत खात्री होत नाही

**3.422 रॉयल्टीच्या रकमेची कमी कपात करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** विकासात्मक बांधकामासाठी 34 कामाच्या चालू व अंतिम देयकातुन 9551.2 क्यु.मी. गौण खनिजाचा वापर केल्याबाबत सदर देयकातुन रुपये 70.67 क्यु.मी. प्रमाणे रुपये 6,74,983/- रॉयल्टीच्या रक्कमेची कपात केल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक 11/05/2015 चे अधिसुचनेनुसार रॉयल्टीच्या दरात सुधारना झाल्याने सदर देयकातुन 9551.2 क्यु.मी. गौण खनिजावर प्रती क्यु.मी. 141.34 प्रमाणे रुपये 13,49,967/- रॉयल्टी रक्कम देयकातुन कपात करणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त प्रमाणे बांधकामाचे देयकातुन जुनेच दर 70.67 क्यु.मी. प्रमाणे रुपये 6,74,983/- इतकी कपात केल्यामुळे शासन महसुलाचे रुपये 6,74,984/- इतके नुकसान झालेले आहे. तरी रुपये 6,74,984/- ची जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करुन शासन शिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

**3.423 पानसारा रक्कम थकीत असल्याबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पानसारा वसुली नोंदवही तपासली असता सन 2016-17 अखेर जिल्हयातील 8 तालुके अंतर्गत असलेल्या लघुपाठबंधारे तलावाचे पानसा-याची रम रुपये 1,08,97,184/- थकीत असल्याचे आढळुन आले. सन 2016-17 या आर्थीक वर्षात फक्त रुपये 19,265/- वसुली झालेली आहे. विभागाने पानसारा रक्कम वसुलीबाबत कुठलीही ठोस कार्यवाही न केल्यामुळे पानसा-याची रक्कम वसुल झालेली नाही.

**3.424 अंदाजपत्रकातील विशिष्ठ बाबीचे नियमबाह्य जादा कामाबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** मोजमापपुस्तीकेत अंदाजपत्रकापेक्षा विशिष्ठ बाबीचे नियमबाह्य रुपये 1,84,638/- चे जादा काम केल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकातील विशिष्ठ बाबीचे नियमबाह्य जादा कामाबाबत.

बांधकामात विशिष्ठ बाबीचे अंदाजपत्रकात नमुद परिमानापेक्षा जादा काम करण्यात आलेले आहे. बी-1 निविदा करारमान्यातील अट क्रमांक 38 प्रमाणे एखाद्या बाबीचे अंदाजपत्रकातील परिमानापेक्षा 25 टक्के किंवा रुपये 5,000/- या पैकी जे कमी असेल ह्या पेक्षा त्याबाबीचे जादा काम होत असल्यास वरिल शासन निर्देशाप्रमाणे व बी-1 निविदा करारमान्यातील अट क्रमांक 38 प्रमाणे त्या बाबीचे काम करण्याच्या अगोदर वरिल नियमाप्रमाणे योग्य कार्यवाही करुन काम करणे आवश्यक होते. परंतु नियमाप्रमाणे कुठलिही कार्यवाही न करता व जादा कामाबाबत कुठलेही संयुक्तीक कारण नसल्यामुळे जादा केलेले काम नियमबाह्य ठरते त्यामुळे जादा कामाचे मुल्य रुपये 1,84,638/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

**3.425 सिमेंट प्लग बंधारा बांधकाम मुड्झा क्रमांक 4,5,6 मधील नियमबाहयता.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर बाबत रक्कम रूपये 21,80,620/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक झेडपीए/2006/प्र.क्र.366/वित्त- 9, दिनांक 31/12/2009 नुसार सदर कामाची ई - निविदा प्रकाशीत झाल्याबाबत जाहीरात रोष्टरप्रमाणे विभाग स्तरीय ब वर्ग दैनिक, विभागस्तरीय ब वर्ग मराठी साप्ताहीक, जिल्हास्तरीय ब वर्ग दैनिक, जिल्हास्तरीय ब वर्ग साप्ताहीक अशा एकूण 4 ठिकाणी जाहीरात दिल्याचे वृत्तपत्र कात्रण, जाहीरात देयक व प्रमाणित रोष्टर नोंदवही उपलब्ध नाही. त्यामुळे अशा प्रकारे कार्यवाही न केल्यामुळे जिल्हा परिषदेला स्पर्धात्मक किमान दराचा फायदा झाला नाही.

2) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे परिपत्रक क्रमांक मुमअ/उविअ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये अंदाजपत्रकात साईट क्लिअरंस ही बाब अंतर्गत करण्यात येऊ नये, असे निर्देश असतांनाही अंदाजपत्रकात आईटम क्रमांक 1 मध्ये याबाबतच्या खर्चाची तरतुद करुन रूपये 2,067/- खर्च नोंदविण्यात आलेले आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्र.क्र.192/जल-1, दिनांक 02/02/2012 मधील नियम क्रमांक ब-5 नुसार सदर कामाला तांत्रिक मंजुरी अधिक्षक अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ यांचेकडून घेतलेली नाही. तसेच एकाच कामाचे क्रमांक 1, 2, 3 मध्ये अंदाजपत्रकाचे तुकडे पाडून कार्यकारी अभियंता यांनी तांत्रिक मंजुरी दिलेली आहे. वास्तवीकता, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 1093/प्र.क्र. 1516/भाग-2/33, दिनांक 27/04/2000 अन्वये कामाचे विभाजन न करता एकच अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. तथापि, काम तुकडे पाडून करण्यात येऊन शासकीय नियमाचे व दिशा निर्देशाचे पालन केलेले नाही.

4) काम विहीत मुदतीत पुर्ण केले नाही. मुदतवाढ मंजुर करताना नाममात्र दंडाची रक्कम आकारली. तथापि, टेंडर फॉर्म 'बी-1' मध्ये नमुद क्लॉज 2 नुसार अंदाजपत्रकीय / निविदा मुल्याच्या 1 टक्का रक्कम रूपये 24,257/- कंत्राटदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 चे कलम 42-3-क नुसार बांधकाम कंत्राटाच्या बाबतीत कार्यकंत्राटाच्या एकूण कंत्राट मुल्याच्या 5 टक्के रक्कम रूपये 1,09,031/- कपात न करता 3 टक्केप्रमाणे रक्कम रूपये 65,418/- कपात केली आहे. त्यामुळे फरकाची 2 टक्के रक्कम 63,413/- संबधीताकडून वसूल करून शासन लेखाशीर्षात जमा होणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 118 नुसार अंदाजात दिलेल्या मंजुरीचे अधिकार हे मर्यादित असुन कोणतेही अतिरिक्त किंवा वाढीव (जादा) बांधकामे करण्यासाठी विशेष प्राधिकाराशिवाय वापर करता येणार नाही. तसेच B-1 निविदा अट क्रमांक 38 (1) नुसार मजुंर कामाचे बाबनिहाय परीमाणापेक्षा 25 टक्केपर्यंत किंवा त्यांचे मुल्य रुपये 5,000/- पर्यंत खर्च करण्याची तरतुद असतांना त्यापेक्षा जादा रक्कम रुपये 18,398/- खर्च केली आहे.

7) बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या सामुग्रीची चाचणी प्रत्यक्ष संबधीत बाबीचे काम सुरु होण्यापुर्वी करणे आवश्यक असतांना काम चालु होण्यापुर्वी सहित्याची चाचणी झालेली नसल्याचे नस्तीमध्ये उपलब्ध तपासणी अहवालावरुन दिसुन येते.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 148 प्रमाणे सदर कामाच्या अटी शर्तीची नोंद ही, करारनाम्यात केलेली नाही.

9) पुर्ण झालेल्या बंधारा बांधकामाबाबत कोणतीही तक्रार नसल्याचा ग्रामसभेचा ठराव उपलब्ध नाही.

**3.426 सिमेंट प्लग बंधारा बांधकाम चकबापूर क्रमांक 3, चिवंडा क्रमांक 2, चिवंडा क्रमांक 3 मधील नियमबाहयता.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** सदर बाबत रक्कम रूपये 24,49,897/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपी,/2006/प्र.क्र.366/वित्त- 9, दिनांक 31/12/2009 नुसार सदर कामाची ई निविदा प्रकाशीत झाल्याबाबत जाहीरात रोष्टरप्रमाणे राज्यस्तरीय अ वर्ग दैनिक, विभागस्तरीय ब वर्ग दैनिक, जिल्हास्तरीय क वर्ग दैनिक, अ वर्ग मराठी साप्ताहिक अशा एकूण 4 ठिकाणी जाहीरात दिल्याचे वृत्तपत्र कात्रण, जाहीरात देयक व प्रमाणित रोष्टर नोंदवही उपलब्ध नाही. त्यामुळे अशा प्रकारे कार्यवाही न केल्यामुळे जिल्हा परिषदेला स्पर्धात्मक किमान दराचा फायदा झाला नाही.

2) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक क्रमांक/उविअ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2011 अन्वये साईट क्लिअरंस ही, बाब अंदाजपत्रकात अंर्तभुत करावयाची नसताना बाब क्रमांक 1 साईट क्लिअरंस वर केलेला रूपये 2,160/- खर्च संबधीताकडून वसूल होणे आवश्यक आहे.

3) काम विहीत मुदतीत पुर्ण केले नाही. मुदतवाढ मंजुर करताना नाममात्र दंडाची रक्कम आकारली. तथापि, टेंडर फॉर्म 'बी-1' मध्ये नमुद क्लॉज 2 नुसार अंदाजपत्रकीय / निविदा मुल्याच्या 1 टक्के रक्कम चकबापूर क्रमांक 3 वर रूपये 9,748/- चिवंडा क्रमांक 2 वर रूपये 9,057/- चिवंडा क्रमांक 3 वर रूपये 8,850/- एकूण 27,655/- कंत्राटदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 चे कलम 42-3-क नुसार बांधकाम कंत्राटाच्या बाबतीत कार्यकंत्राटाच्या एकूण कंत्राट मुल्याच्या 5 टक्के रक्कम कपात न करता 3 टक्केप्रमाणे रक्कम कपात केली आहे. त्यामुळे फरकाची 2 टक्के रक्कम संबधीताकडून वसूल करून शासन लेखाशीर्षात जमा होणे आवश्यक आहे.

5) बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या सामुग्रीची चाचणी प्रत्यक्ष संबधीत बाबीचे काम सुरु होण्यापुर्वी करणे आवश्यक असतांना काम चालु होण्यापुर्वी साहित्याची चाचणी झालेली नसल्याचे नस्तीमध्ये उपलब्ध तपासणी अहवालावरुन दिसुन येते.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 तधील नियम क्रमांक 148 प्रमाणे सदर कामाच्या अटी शर्तीची नोंद ही, करारनाम्यात केलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय दिनांक 20/05/1999 मधील कलम ब -2 नुसार कामावरील माहिती दर्शक फलकाचा खर्च ग्रामपंचायत स्वनिधीतून करणे आवश्यक असल्याने शासन निधीतून माहीती फलकावर केलेला खर्च चकबापूर क्रमांक 2 वर रूपये 4,650/- चिवंडा क्रमांक 2 वर रूपये 4,650/- एकूण रूपये 9,300/- संबधीतांकडून वसूल होणे आवश्यक आहे.

8) चिवंडा क्रमांक 2 मध्ये मोजमाप पुस्तीकेमध्ये गौण खनिज 265.54 क्युबीक मीटर करीता 70.68 प्रती क्युबीक मिटर प्रमाणे रूपये 18,768/- कपात केले आहेत. तथापि, कमी कपात केलेले रूपये 18,768/- संबधीतांकडून वसूल करून शासन लेखाशीर्षात जमा होणे आवश्यक आहे.

**3.427 सिमेंट नाला बांधकाम डोनाळा क्रमांक 1, 2 व 3 च्या कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 30) -** प्रमाणक क्रमांक 183 दिनांक 30/06/2016 अन्वये रक्कम रूपये 25,31,740/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधिल नियम क्रमांक 148 प्रमाणे सदर कामाच्या अटी व शर्तीची नोंद करारनाम्यात करणे आवश्यक आहे, अशी नियमात तरतुद असतांना त्याप्रमाणे करारनामा करण्यात आलेला नाही. करारनामा कोरा ठेवण्यात आला.

2) सदर कामाचा कार्यारंभ आदेशामधील अटी व शर्तीप्रमाणे व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परीपत्रक क्रमांक जि.प.2000/प्र.क.837/परास 8/35, दिनांक 08/05/2012 तसेच विमा संचालनालय, मुंबई यांचे दिनांक 27/06/2003 चे पत्रान्वये कामाचा व कामावरील मजुरांचा विमा शासकीय विमा निधी, मुंबई यांचेकडे काम सुरु करणेपूर्वी उतरविणे आवश्यक आहे. असे असतांना सदर कामाचा व कामावरील मजुरांच्या विम्याची रक्कम ही, खर्च प्रमाणकामधुन कपात करण्यात आलेली आहे.

3) सदर बाबीवर मुल्यवर्धित कर अधिनियम 2005 चे अनुसुची क नुसार 5 टक्के मुल्यवर्धित कराची रक्क्म रुपये 1,26,587/- कपात करणे आवश्यक आहे. परंतु, प्रथम देयकामधुन 3 टक्के प्रमाणे रुपये 75,952/- रुपये कपात करण्यात आलेले आहे. तेव्हा कमी कपात करण्यात आलेले रक्क्म रुपये 50,635/- संबंधितांकडुन वसूल करावी.

4) सार्वजनिक बांधकाम विभागाचे परीपत्रक क्रमांक एसटीआर/१०९७/प्रकं १०६/सांबा, दिनांक 09/02/1998 तसेच शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट/1099/प्र.क्र.56/5, दिनांक 30/06/2000 अन्वये बांधकामासाठी वापरण्यात येणा-या सामुग्रीची चाचणी काम सुरु होण्यापूर्वी करणे आवश्यक असतांना काम चालु होण्यापूर्वी साहित्याची चाचणी झालेली नसल्याचे नस्तीमध्ये उपलब्ध तपासणी अहवालावरुंन दिसुन येते. तेव्हा गुणवत्ता पुर्ण काम झाले किवा नाही, याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

5) कार्यारंभ आदेशामधील अट क्रमांक ६ नुसार सबंधित कामाकरीता लागणारे गौणखनिजाचे शुल्क मोकळे केल्याचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र देयकासोबत जोडावे लागेल. अन्यथा अंतिम देयक पारीत करण्यात येणार नाही, अशी अट आहे. परंतु, सबंधित प्रमाणपत्र देयक अथवा नस्तीमध्ये आढळुन आलेले नाही. तरी अंतिम देयक कसे काय अदा केले? याबाबत खुलासा व्हावा.

6) कंत्राटदाराने विहीत मुदतीमध्ये मुदतवाढीचा अर्ज सादर केला नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधिल नियम क्रमांक 197 नुसार पुर्ण कामाच्या नोंदी नमुना क्रमांक 69 मध्ये नियम 97 नुसार नमुना क्रमांक 39 मधील अचल मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक असतांना सदर नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त् करुन देण्यात आलेल्या नाहीत. तेव्हा सदर कामाची नोंद घेण्यात आली किवा नाही, याबाबतची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

8) प्रस्तुत कामामुळे जलस्त्रोत बळकटीकरणाच्या दुष्टीने फायदा होणे अपेक्षित आहे. तथापि, असा सामान्य अहवाल नस्तीमध्ये आढळुन आला नाही.

**3.428 सिमेंट प्लग बंधारा बांधकाम आष्टा, भद्रावती.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 35) -** सदर बाबत रक्कम रूपये 6,11,620/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक झेडपीए/2006/प्र.क्र.366/वित्त- 9, दिनांक 31/12/2009 नुसार सदर कामाची ई निविदा प्रकाशीत झाल्याबाबत जाहीरात रोष्टरप्रमाणे विभागस्तरीय ब वर्ग दैनिक, विभाग स्तरीय ब वर्ग मराठी साप्ताहीक, जिल्हा स्तरीय ब वर्ग दैनिक, जिल्हा स्तरीय ब वर्ग साप्ताहीक अशा एकूण 4 ठिकाणी जाहीरात दिल्याचे वृत्तपत्र कात्रण, जाहीरात देयक व प्रमाणीत रोष्टर नोंदवही उपलब्ध नाही. त्यामुळे अशा प्रकारे कार्यवाही न केल्यामुळे जिल्हा परिषदेला स्पर्धात्मक किमान दराचा फायदा झाला नाही.

2) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे परिपत्रक क्रमांक-मुमअ/उविअ/प्रशा-5/2611, दिनांक 03/08/2004 अन्वये अंदाजपत्रकात साईट क्लिअरर्स ही बाब अंतर्गत करण्यात येऊ नये, असे निर्देश असतांनाही अंदाजपत्रकात आईटम क्रमांक 1 मध्ये याबाबतच्या खर्चाची तरतुद करुन 2800 घ.मी * रुपये 1.30 चे रूपये 3,640/- खर्च नोंदविण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर खर्च लेखपरिक्षणात मान्य करता येत नाही.

3) रूपये 100/- चे मुद्रांकावर महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 148 प्रमाणे सदर कामाच्या अटी शर्तीची नोंद हि करारनाम्यात करणे आवश्यक आहे. अशी नियमात तरतुद असतांना त्याप्रमाणे करारनामा करण्यात आलेला नाही.

4) बांधकामासाठी वापरण्यात येणा-या सामुग्रीची चाचणी प्रत्यक्ष संबधीत बाबीचे काम सुरु होण्यापुर्वी करणे आवश्यक असतांना काम चालु होण्यापुर्वी साहीत्याची चाचणी झालेली नसल्याचे नस्तीमध्ये उपलब्ध तपासणी अहवालावरुंन दिसुन येते.

5) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 चे कलम 42-3-क नुसार बांधकाम कंत्राटाच्या बाबतीत कार्यकंत्राटाच्या एकूण कंत्राट मुल्याच्या 5 टक्के रक्कम रूपये 34,026/- कपात न करता 2 टक्केप्रमाणे रक्कम रूपये 13,689/- कपात केली आहे.त्यामुळे फरकाची 3 टक्के रक्कम 20,337/- संबधीताकडून वसूल करून शासन लेखाशीर्षात जमा होणे आवश्यक आहे.

6) काम विहीत मुदतीत पुर्ण केले नाही. मुदतवाढ मंजुर करताना नाममात्र दंडाची रक्कम आकारली. तथापि, टेंडर फॉर्म 'बी-1' मध्ये नमुद क्लॉज 2 नुसार अंदाजपत्रकीय/निविदा मुल्याच्या 1 टक्के रक्कम रूपये 6,805/- कंत्राटदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

7) बंधारा हस्तांतरण अट क्रमांक 2 नुसार प्रती लाभार्थी रूपये 100/- स्वामित्व शुल्क तसेच त्या वर्षीच्या सिंचन क्षेत्राच्या पाणीपटटीवर 20 टक्के पाणी पटटी जिल्हापरिषद चंद्रपूरला जमा करणे आवयक असतांना याप्रकारे रक्कम जमा झाले नाही.

8) कामाचा व कामावरील मजुरांचा विमा शासकिय विमा निधी, मुबंई यांचे कडेच काम सुरु करणेपुर्वी उतरविणे आवश्यक आहे. सदर कामाचा व कामावरील मजुरांचा विम्याची रक्कम ही खर्च प्रमाणकामधुन कपात करण्यात आल्यामुळे ती उशीराने कपात करण्यात आलेली आहे. त्यामुळे शासनाचा उददेश सफल झाला, असे म्हणता येत नाही.

9) काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र नमुना- 65 मध्ये नाही.

**3.429 साठवणूक बंधारा जोगीसाखरा, ता-आरमोरी, जिल्हा गडचिरोलीचे बांधकामातील अनिमिततेबाबत**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** उपविभाग वडसा अंतर्गत मौजा जोगीसाखरा, तालूका- आरमोरी, जिल्हा गडचिरोली येथे साठवणूक बंधारा बांधकाम करणेकरीता काम वाटप समिती सभा दिनांक 21/12/2015 नूसार ग्रामपंचायत जोगीसाखरा यांना शेडयुल दराने कामाचे वाटप केले असून 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 10,65,848/- प्रदान केले आहे.

सदर कामाचे मूल्यांकन रूपये 10,65,848/- केले असून शासकिय व इतर कपातीच्या रकमा वजा जाता निव्वळ रूपये 8,13,288/- कंत्राटदार ग्रामपंचायत जोगीसाखरा यांना प्रदान करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/ प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/2000 मधील परीच्छेद क्रमांक 5.4 नूसार पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याखेरीज योजनेचे बांधकाम करण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्यात येवू नयेस, असे असतांनाही नियमबाहय कार्यारंभ आदेश क्रमांक 1557 दिनांक 01/03/2016 दिल्याचे दिसून आले. तसेच काम वाटप दिनांक 21/12/2015 रोजी केले असून महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 मधील परीच्छेद क्रमांक 217 नूसार निविदा उघडले पासून 30 दिवसाचे आत दिनांक 20/01/2015 किंवा त्यापूर्वी कार्यारंभ आदेश देणे आवश्यक असतांना दिनांक 01/03/2016 रोजी 69 दिवसाचे विलंबाने कार्यारंभ आदेश दिले असून विलंबाबाबतची कारणे नमूद केलेली नाहीत

2) सदर कामाची मूदत दिनांक 30/11/2016 पर्यंत असून 79 दिवसाचे विलंबाने दिनांक 17/02/2017 रोजी काम पूर्ण झाले आहे. ग्रामपंचायत जोगीसाखराचे पत्र क्रमांक 61/17, दिनांक 21/01/2017 नूसार मूदतवाढीसाठी अर्ज केले असून सक्षम अधिकाऱ्याचे विनादंड मूदतवाढीचे पत्र संचिकेत दिसून आले नाही याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 07, दिनांक 26/09/2017 नूसार व वारंवार मौखिक मागणी करूनसूध्दा लेखापरीक्षणास सादर झाले नाही. तरी कार्यरंभ आदेश क्रमांक 1557, दिनांक 01/03/2016 व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक 1815, दिनांक 28/04/2014 नूसार दंड आकारणे आवश्यक असतांना विनादंड काम पूर्ण केलेले आहे.

3) ग्रामपंचायतीने रूपये 3,34,530/- चे 1,060 सिमेंट बॅग खरेदी केले असून कार्यारंभ आदेशातील अटी व शर्ती आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 19/10/2010 नूसार रूपये 1 लक्ष वरील बांधकाम साहित्य (सिमेंट बॅग)ची खरेदी ई-टेंडरींग प्रक्रिया राबवून केल्याचे अभिलेखे नस्तीत दिसून आले नाही.

4) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2015/(510/2015)/सिंव्य(कामे), दिनांक 14/08/2015 आणि महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्याकडून अधिनियम, 2005 (MMISFACT 2005) तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/ प्र.क्र.347/जल-1 दिनांक 31/07/2000 नूसार योजनेच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांनी एकत्र येवून योजनेच्या सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्तीसाठी लाभधारकांची पाणी वापरसंस्था स्थापण केलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 118 व 120 नुसार कंत्राटदारास अंदाजपत्रकानुसार कामे करणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकात दिलेल्या मंजुरीचे अधिकार हे मर्यादित असून कोणतेही अतिरिक्त किंवा वाढीव (जादा) बांधकाम विशेष प्राधिकाराशिवाय करता येणार नाही. असे असताना तसेच बी-1 निविदेतील अट क्रमांक 38(1) नुसार मंजुर कामाचे बाबनिहाय परिमाणापेक्षा 25 टक्के पेक्षा किंवा मुल्य रुपये 5,000/- पेक्षा जास्त खर्च करण्याची तरतुद नसतांना जादा खर्च करण्यात आलेला आहे.

6) जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नूसार मोजमाप पुस्तकातील तपशिलवार मोजणी असलेल्या पृष्ठावरील मोकळी जागा लाल शाईने कर्णरेषा काढून खोडलेले नाही.

7) साठवण बंधारा बांधकामाची स्थावर मालमत्ता रजिस्टरला नोंद घेतलेली नाही.

**3.430 साठवणूक बंधारा पिसेवडधा, ता-आरमोरी, जिल्हा गडचिरोलीचे बांधकामातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** उपविभाग वडसा अंतर्गत मौजा पिसेवडधा, तालूका- आरमोरी, जिल्हा गडचिरोली येथे साठवणूक बंधारा बांधकाम करणेकरीता काम वाटप समिती सभा दिनांक 11/02/2014 नूसार ग्रामपंचायत पिसेवडधा यांना शेडयुल दराने कामाचे वाटप केले असून 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 14,29,527/- प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/ प्र.क्र.347/जल-1, दिनांक 31/07/ मधील परीच्छेद क्रमांक 5.4 नुसार पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याखेरीज योजनेचे बांधकाम करण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्यात येवू नयेत, असे असतांनाही कार्यारंभ आदेश क्रमांक 958, दिनांक 09/06/2014 दिल्याचे दिसून आले.

2) सदर साठवण बंधा-याची सिंचन क्षमता 18.19 हेक्टर असून महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक संकिर्ण-1002/प्र.क्र.310/जल-1, दिनांक 27/11/2003 नूसार 30 हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षमता असलेले साठवणूक बंधारे कार्यान्वीत करण्यात येवूनयेत आणि 20 हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षमता नसलेले योजनांना शासनाची परवानगी घेणे आवश्यक असतांना सदर योजना नियमबाहय राबविल्याचे दिसून येते.

3) सदरकामाचे Benefit cast ratio 2.18 आणि वार्षिक उत्पन्न रूपये 2,47,044/- दर्शविले असून त्यानूसार प्रशासकिय मान्यता प्रदान केली आहे. करीता योजनेच्या उददीष्टानूसार फलनिष्पती झाल्याचे अहवाल संचिकेत दिसून आला नाही.

4) जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नूसार मोजमाप पुस्तकातील तपशिलवार मोजणी असलेल्या पृष्ठावरील मोकळी जागालाल शाईने कर्णरेषा काढून खोडलेले नाही

5) साठवण बंधारा बांधकामाची स्थावर मालमत्ता रजिस्टरला नोंद घेतलेली नाही.

6) सदर साठवणूक बंधाराचे काम दिनांक 30/06/2015 ला पूर्ण झाल्याचे दिसून येत असून कामाचे व्दितीय व अंतिम देयक प्र.क्र. 2593, दिनांक 31/03/2017 नूसार रूपये 3,75,376/- 1 वर्ष 09 महिने उशिरा प्रदान केले आहे. तरी सदर विलंबाबाबतचे कोणतेही कारणे नस्तीत दिसून आले नाही.

7) काम पूर्ण करण्याची मूदत दिनांक 08/03/2015 असून जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 148 अन्वये सुरवातीची कालमर्यादा संपण्यापूर्वी मूदतवाढ मंजूर करूण घेणे आवश्यक असतांना अप्पर मूख्य कार्यकारी अधिकारी यांनी विहीत मूदतीनंतर पत्र क्रमांक 325, दिनांक 31/03/2017 नूसार 124 दिवसांची मूदतवाढ विनादंड मंजूर केलेली आहे. त्यामूळे शासकिय निधीचे नूकसान झालेले आहे.

8) ग्रामपंचायतीने पुढीलप्रमाणे रूपये 5,61,550/- चे 1850 सिमेंट बॅग खरेदी केले असून कार्यारंभ आदेशातील अटी व शर्ती आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 19/10/2010 नूसार रूपये 1 लक्ष वरील बांधकाम साहित्य (सिमेंट बॅग) ची खरेदी ई-टेंडरींग प्रक्रिया राबवून केल्याचे अभिलेखे नस्तीत दिसून आले नाही.

### 3.431 साठवणुक बंधारा राजापुर पेंच, तालुका अहेरी बांधकामातील अनियमितताबाबत

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर बाबत रक्कम रुपये 10,51,974/- खर्च करण्यात आला आहे. उपरोक्त प्रमाणकान्वये सदर बांधकामाच्या देयकाचे प्रदान केलेले आहे. सदर बंधाऱ्याची सिंचन क्षमता 12.01 हेक्टर आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 118 व 120 नुसार कंत्राटदारास अंदाजपत्रकानुसार कामे करणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकात दिलेल्या मंजुरीचे अधिकार हे मर्यादित असून कोणतेही अतिरिक्त किंवा वाढीव (जादा) बांधकाम विशेष प्राधिकाराशिवाय करता येणार नाही. असे असताना तसेच बी-1 निविदेतील अट क्रमांक 38(1) नुसार मंजुर कामाचे बाबनिहाय परिमाणापेक्षा 25 टक्के पेक्षा किंवा मुल्य रुपये 5,000/- पेक्षा जास्त खर्च करण्याची तरतुद नसतांना जादा खर्च करण्यात आलेला आहे. प्राधिकाराशिवाय केलेला जास्तीचा खर्च रूपये 1,04,216/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2010/275/प्र.क्र.172/ पं.रा 7, दिनांक 19/10/2011 नुसार साहित्य खरेदीची किंमत रूपये 1.00 लक्ष पेक्षा जास्त असल्यास प्रत्येक बाब e-tendering च्या माध्यमातून निविदा मागवून खरेदी करण्यात यावी, अशी सूचना आहे. परंतू, ग्रामपंचायतींनी बंधाऱ्याच्या कामासाठी केलेल्या सिमेंट खरेदीच्या संदर्भात तशी कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता अधिनियम 1968 चे कलम 97 व 197 नुसार पुर्ण झालेल्या कामाची नमुना 39 व 69 मध्ये आवश्यक आहे. नोंदवहीत नोंदी घेतल्याबाबत नोंदवही पाहावयास उपलब्ध झाले नाही.

4) अंदाजपत्रकात LEAD STAMENT मध्ये प्रत्यक्ष साहित्याचे वहन अंतर कमाच्या ठिकाणापासुन 2 किमी.पेक्षा जादा आहे. महाराष्ट्र पाठबंधारे विभाग, शासन परिपत्रक क्रंमाक संकीर्ण 1098/(96/98)मो.प्रं.(व), दिनांक 04/09/2000 प्रमाणे साहित्य सामुग्रीचे वहन अंतर अंदाजपत्रकात 2 कि.मी.पेक्षा जास्त असल्यास मुख्य अभियंता यांची मंजुरी घेण्याबाबत स्प्ष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत. परंतु, नस्तीला तशी मंजुरी घेतल्याचे आढळले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/जल1, दिनांक 31/07/2000 अन्वये मुददा क्रमांक 5.4 नुसार जिल्हा परिषद अंतर्गत 0-100 हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन योजनेसाठी पाणी वापर संस्थेची नोंदणी झाल्याखेरीज योजनेचे बांधकाम सुरु करण्यासाठी

कार्यारंभ आदेश देण्यात येऊ नयेत. असे असतांना पाणी वापर संस्थेची नोंदणी त्या क्षेत्राच्या सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे नोंदणी करण्यात आलेली नाही. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास 2011/प्र.क्र. 217/प.रा. 8, दिनांक 15/11/2015 नुसार राज्य गुणवत्ता नियंत्रण (SQM) यंत्रणेकडून कामाची पाहणी करणे आवश्यक आहे.

**3.432 मौजा सुंदरनगर क्रमांक 2 येथिल साठवन बंधारा बांधकामाबाबत. उपविभाग चामोर्शी**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** प्रमाणक क्रमांक 2435, दिनांक 30/03/2017 अन्वये रक्कम रुपये 7,31,669/- सदर बांधकामाच्या देयकाचे प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर बांधकामाच्या साहित्य चाचणी TEST REPORT क्रमांक 976 दिनांक 16/03/2017 अन्वये साहित्य चाचणी दिनांक 07/03/2017 ला केल्याची नोंद आहे व काम पुर्णत्वाच्या प्रमाणपत्रावरती काम दिनांक 06/03/2017 ला झाल्याची नोंद आहे. म्हणजेच काम पुर्ण झाल्यानंतर साहित्य तपासणी केलेली आहे. त्यामुळे साहित्याची तपासणी योग्य प्रकारे झालेली आहे, असे म्हणता येणार नाही.

2) करारनामा पेपरवर संबंधीत ग्रामपंचायतीचे सरपंच / सचिव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. परंतू, कार्यकारी अभियंता (सिंचाई) यांची स्वाक्षरी नाही. तसेच साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या नाहीत. करारनामा व स्टँप पेपर टेंडर कोरे आहेत. दस्तऐवज परिपूर्ण भरलेले नाहीत.

3) वरील कामाचे खोदकाम पुर्ण झाल्यानंतर काँक्रीट करावयाच्या अगोदर पाया तपासणी कार्यकारी अभियंता सिंचाई यांचेकडुन करुन घेणे आवश्यक असतांना तशी तपासणी केल्याचे आढळत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2010/275/प्र.क्र.172/पं.रा 7, दिनांक 19/10/2011 नुसार साहित्य खरेदीची किंमत रूपये 1.00 लक्ष पेक्षा जास्त असल्यास प्रत्येक बाब e-tendering च्या माध्यमातून निविदा मागवून खरेदी करण्यात यावी, अशी सूचना आहे. परंतू, ग्रामपंचायतींनी बंधाऱ्याच्या कामासाठी केलेल्या सिमेंट खरेदीच्या संदर्भात तशी कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

5) अंदाजपत्रकात LEAD STAMENT मध्ये प्रत्यक्ष साहित्याचे वहन अंतर कमाच्या ठिकाणापासुन 2 कि.मी.पेक्षा जादा आहे. महाराष्ट्र पाठबंधारे विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 1098/(96/98)मो.प्रं.(व), दिनांक 04/09/2000 प्रमाणे साहित्य सामुग्रीचे वहन अंतर अंदाजपत्रकात 2 कि.मी.पेक्षा जास्त असल्यास मुख्य अभियंता यांची मंजुरी घेण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहे. परंतु, नस्तीला तशी मंजुरी घेतल्याचे आढळले नाही.

6) कार्यकारी अभियंत्यांनी अंतिम मोजमापाच्या 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, तशी तपासणी केलेली नाही.

**3.433 7 टक्के वन महसुल अंतर्गत अंकीसा तालुका सिरोंचा येथील धोबीघाट बांधकामाबाबत**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** प्रमाणक क्रमांक 1287, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 1,57,151/- सदर बांधकामाच्या देयकाचे प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामासाठी गिट्टी व रेतीचा वापर करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास परिपत्रक क्रमांक साहित्य/1099/प्र.क्र.-65/35, दिनांक 30/06/2006 नुसार बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून तपासणी करणे आवश्यक असतांना कार्यवाही केलेली नाही.

2) दिनांक 04/04/2016 ला रुपये 200/- च्या स्टँप पेपरवरती करारनामा केलेला आहे. पेपरवर संबंधीत ग्रामपंचायतीचे सरपंच / सचिव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. परंतू, कार्यकारी अभियंता सिंचाई यांची स्वाक्षरी नाही. तसेच साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या नाहीत. करारनामा व स्टँप पेपर टेंडर कोरे आहे. दस्तऐवज परिपूर्ण भरलेले नाही.

3) बाब क्रंमाक 4 providing and dewatatering during exczvation साठी 250 bhp वापरले आहे. परंतु, त्या करीता लॉगबुक लेखापरिक्षणास सादर केले नाही. त्यामुळे सदर खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4) सदर देयकातुन आयकर 2 टक्के रुपये 3,776/-, विक्रीकर 5 टक्के रूपये 9,440/-, विमा 1 टक्के रूपये 1,939/-, कामगार उपकर 1 टक्के रूपये 1,888/- कपात केलेली आहे. परंतु, सदर रक्कम शासन खाती जमा केलेची पोहचपावती लेखापरिक्षणास सादर केले नाही. त्यामुळे सदर रक्कम जमा केले किंवा नाही, याची खात्री करता आलेली नाही.

5) अंदाजपत्रकात LEAD STAMENT मध्ये प्रत्यक्ष साहित्याचे वहन अंतर कामाच्या ठिकाणापासुन 2 कि.मी.पेक्षा जादा आहे. महाराष्ट्र पाठबंधारे विभाग, शासन परिपत्रक क्रंमाक संकीर्ण 1098/(96/98)मो.प्रं.(व), दिनांक 04/09/2000 प्रमाणे साहित्य सामुग्रीचे वहन अंतर अंदाजपत्रकात 2 कि.मी.पेक्षा जास्त असल्यास मुख्य अभियंता यांची मंजुरी घेण्याबाबत स्प्ष्ट निर्देश देण्यात आलेले आहे. परंतु, नस्तीला तशी मंजुरी घेतल्याचे आढळले नाही.

**3.434 साठवणुक बंधारा अंलिगा बांधकामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 371, दिनांक 02/07/2016 अन्वये रक्कम रुपये 1,55,828/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अधिक्षक अंभियता यांचे पत्र दिनांक 17/04/2015 अन्वये ज्या निविदा 10 टक्के पेक्षा कमी दराने मंजुर करण्यात आलेल्या आहेत. त्यांचेकडुन प्रति लाखा मागे 1 टक्का याप्रमाणे परॅफामंस सिक्युरिटी कपात करण्यात यावी. परंतु, संबधित कंत्राटदाराचे दर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 8.67 टक्के नी कमी असुन सुध्दा परफॉर्मन्स सिक्युरिटी कपात करण्यात आलेली नाही व निविदा स्विकृत करण्यात आली.

2) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा), नियम 2015 आणि महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, अधिसुचना दिनांक 11/05/2015 प्रमाणे गौण खनिजाचे दर प्रति ब्रास रूपये 400/- प्रमाणे रूपये घमी @ रूपये 141.36/- कपात करणे आवश्यक असतांना 583.55 घनमीटर करीता रुपये 70.68/- प्रमाणे एकुण रुपये 41,245/- कपात केले आहे. तरी 583.55 घनमीटर करीता रूपये 141.36/- प्रमाणे रूपये 82,490.62/- कपात करणे आवश्यक होते. रुपये 41,245.62/- कमी कपात केलेले आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 118 व 120 नुसार कंत्राटदारास अंदाजपत्रकानुसार कामे करणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकात दिलेल्या मंजुरीचे अधिकार हे मर्यादित असून कोणतेही अतिरिक्त किंवा वाढीव (जादा) बांधकाम विशेष प्राधिकाराशिवाय करता येणार नाही. असे असताना तसेच बी-1 निविदेतील अट क्रमांक 38(1) नुसार मंजुर कामाचे बाबनिहाय परिमाणापेक्षा 25 टक्के पेक्षा किंवा मुल्य रुपये 5,000/- पेक्षा जास्त खर्च करण्याची तरतुद नसतांना जादा खर्च करण्यात आलेला आहे. प्राधिकाराशिवाय केलेला जास्तीचा खर्च रुपये 1,23,072/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4) पूर्ण झालेल्या कामाची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 अन्वये नमुना क्रमांक 69 नोंदवहीत घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2010/275/प्र.क्र.172/ पं.रा 7, दिनांक 19/10/2011 नुसार साहित्य खरेदीची किंमत रूपये 1.00 लक्ष पेक्षा जास्त असल्यास प्रत्येक बाब e-tendering च्या माध्यमातून निविदा मागवून खरेदी करण्यात यावी, अशी सूचना आहे. परंतू, ग्रामपंचायतीने बंधाऱ्याच्या कामासाठी केलेल्या सिमेंट खरेदीच्या संदर्भात तशी कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

6) शासन परिपत्रक दिनांक 19/10/2001 मधील मार्गदर्शक सूचना क्रमांक 12 व 13 नुसार लाभ क्षेत्रातील लाभधारकांनी सहकारी संस्था बंधारा बांधण्यापुर्वीच स्थापन करण्यात यावी. परंतू, लाभधारक शेतकऱ्यांनी सहकारी संस्था नोंदणी झाल्याचे आढळून आले नाही. तसेच लाभधारक शेतकऱ्याची यादी नस्तीसोबत जोडलेली नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास 2011/प्र.क्र. 217/प.रा.8, दिनांक 15/11/2011 5 नुसार राज्य गुणवत्ता नियंत्रण (SQM) यंत्रणेकडून कामाची पाहणी करणे आवश्यक आहे.

**3.435 को.प.बं.भोकनगांव क्रमांक 2 कामाबाबत (तालुका कन्नड).**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** को.प.बं.भोकनगांव क्रमांक 2 कामावर रक्कम रूपये 91,04,272/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 4 मधील परिशिष्ट दोन मध्ये निर्दिष्ट केल्या प्रमाणे तसेच महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012 / प्र.क्र.680 / वित्त-9, दिनांक 31/01/2013 नुसार स्विकारलेल्या निविदेची माहीती पुढील स्थायी समिती, विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहीजे. परंतु विभागाने अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

2) कामाच्या अंदाजपत्रकात वाळुची लिड 20 किलो मीटरसाठी रुपये 313.41/- असतांना 40 किलो मीटरचा दर रुपये 580.83/- दिला आहे. त्यामुळे रक्कम रुपये 3,01,644/- जादाची अदाई झाली आहे. सदर रक्कम वसूल करावी.

3) अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 15 भराव कामाचे परिणाम नोंदवितांना एकुण खोदकाम 3285.11 cum वजा काँक्रीट काम 1895.69 = 1389.42 ची अदाई केली आहे परंतु प्रत्यक्ष काँक्रीट काम 1997.45 cum आहे. या नुसार रूपये 4,467/- जादा अदाई झाली आहे ते वसुल व्हावे.

4) अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 18 undesposed material याचे मोजमाप नोंदविताना रुंदी 25.0m नोंदविली आहे परंतु प्रत्यक्षात रुंदी 2.5m आहे.

याप्रमाणे रुपये 46,860/- अदा करणे एवजी 4,68,600/- अदा झालेले आहे. यात रक्कम रुपये 4,21,740/- जादाचे अदा झाले आहे.

5) अंदाजपत्रकातील खोदकामाच्या बाबतीत खोदकामात निघालेले मटेरियल 30 मिटर पर्यंत नेवुन टाकणेसहीत आहे. तरी सुद्दा बाब क्रमांक 18 मध्ये खोदकामात निघालेले मटेरियल नेवुन टाकणेबाबत तरतुद केली आहे.

6) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकल्पना 0411/9262/2011/मोप्र, दिनांक 15/09/2011 अन्वये प्राकलनाचे संकल्पन तयार करतेवेळी प्रकल्पाची पाया पातळी निश्चीत करतेवेळी ट्रायल पीट बोअर इत्यादी प्रकारे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कामाचे संचिकेत ट्रायल पीट घेतले नाहीत.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 152(1) व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118, 120 व 152 प्रमाणे तसेच बी-1 निविदेतील अट क्रमांक 38(1) नुसार 25% पर्यंत परिमाणात वाढ झाल्यास त्याबाबत कार्यकारी अभियंता यांचे सुधारीत मंजुरीचे आदेश असणे आवश्यक आहे. मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे तसेच कोणताही करारनामा निष्फळ किंवा शुन्य होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष देण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता व त्यांचे दुय्यम अभियंता यांची असताना विभागाने मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे काम केलेले नाही. सदरील कामाचे कमी अधिक परिमाण पहाता कामाचे अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ केल्याचे दिसुन येत नाही. अंदाजपत्रकाच्या काही बाबी मध्ये एकुण रक्कम रुपये 9,10,630/- ने वाढ झाली आहे. याबाबत वरील प्रमाणे कार्यवाही न करता केवळ काम झाल्यानंतर Working Estimate केलेले आहे.

8) दुसरे देयकात Dewatering 30 दिवस दर्शविले आहे मोजमाप पुस्तीका पान क्रमांक 14 वर दुसरे देयकाची record entry दिनांक 20/032017 रोजी नोंद आहे व अंतिम नोंद दिनांक 30/03/2017 रोजी आहे व यात Dewatering 30 दिवस दर्शविले आहे. म्हणजे दिनांक 20/03/2017 ते 30/03/2017 कालावधीत 30 दिवस होत नाहीत, 20 दिवस म्हणजे 6400 तास 20.90 चा दर प्रमाने रक्कम रुपये 1,33,760/- जादाची अदाई आहे.

9) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्थर), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक मुअ/लपा/स्थास्थ/उविअ/2/1042, दिनांक 13/04/2006 नुसार वहन नकाशा व वहन अंतर 10 किलो मीटर पुढील अधिक्षक अभियंता यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. उपलब्ध साहित्याबाबतचा Quarry Chart प्रमाणे नकाशा नुसार वाळु वहन अंतर 20 किलो मीटर आहे. विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे दर पृथःक्करणात दर्शविलेले वहनाचे दर योग्य असलेबाबतची खात्री करता येत नाही.

10) कामावर वापरलेल्या फक्त सिमेंटचा चाचणी अहवाल संचिकेत संलग्न केलेला आहे. इतर साहित्याचा (खडी, वाळु,दगड) चाचणी अहवाल नाही. म्हणजेच चाचणी अहवाल (क्रमांक 72512, दिनांक 30/03/2017) प्राप्त होण्यापूर्वीच कॉंक्रीटचे काम केलेले आहे. यावरुन सदर कामाचे गुणवत्तेबाबत तांत्रीक अधिकाऱ्याकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

11) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/1001/प्र.क्र.40/जल-3, दिनांक 19/10/2001 नुसार संबंधीत संस्थेने (मक्तेदाराने) 2 वर्ष देखभाल हमी घेणे आवश्यक असून देयकाच्या 10 टक्के रक्कम रुपये 9,10,000/- राखून ठेवणे आवश्यक असताना विभागाने फ़क्त रुपये 5,00,000/- राखून ठेवली आहे. परिपत्रक प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

12) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 अन्वये प्रत्यक्ष कामाचे जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात अशा पध्दतीने माहिती दर्शविणारे फलक बसविलेले नाहीत.

13) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/38, दिनांक 22/12/2000 मधील तरतुदीनुसार संबंधीत कनिष्ठ अभियंता शाखा अभियंता व उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तकात दिनांकीत स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे कामाची तपासणी केव्हा करण्यात आली याबाबत पडताळणी करता आली नाही.

14) सर्व कामांचे बाबतीत वापरलेल्या सिमेंटच्या खरेदीच्या मुळ पावत्या देयकासोबत संलग्न केलेल्या नाहीत. त्यामुळे देयकासोबत / मोजमाप पुस्तीकेत नोंदविलेल्या सिमेंट कंझम्प्शन स्टेटमेंट मधील सिमेंट बॅगची दर्शविलेली संख्या योग्य असलेबाबत खात्री करता आली नाही.

15) मोजमाप पुस्तकातील खाडाखोड केलेल्या नोंदी साक्षांकित केलेल्या नाहीत.

16) प्रत्येक कामाच्या अंदाजपत्रकानुसार खोदकामातुन उपलब्ध होणा-या साहित्याचा जास्तीत जास्त किफायतशीर पुनर्वापर करणे बाबत निर्देशित केलेले आहे. परंतु याबाबत कामात उपलब्ध सर्व साहित्याचा वापर झालेला दिसून येत नाही.

**3.436 सिमेंट बंधारा योजनेतील कामाबाबत. (उपविभाग औरंगाबाद)**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सिमेंट बंधारा योजनेतील कामावर रक्कम रूपये 2,05,06,798/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामावर वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करुन अंतिम देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. म्हणून काम गुणवत्तापूर्ण झाले किंवा कसे याबाबतची खात्री करता येत नाही.

2) सिमेंट बंधारा महालपिंप्री या कामात दगडाचे बांधकाम करतांना फ़ुगवठा 1.40 rate analysis मध्ये ग्राहय धरण्यात येउ नये असे जिल्हा दर सुची मध्ये नमुद असतांना फ़ुगवठा 1.40 ग्राहय धरल्याने 201.41 चा दरात फ़रक पडतो यामुळे रक्कम रूपये 10,635/- जादा अदा झाले आहे. ते वसुल होणे आवशक आहे. कामात जितके खोदकाम केलेले आहे तितकेच भराव काम केलेले आहे भराव करतांना सिमेंट कॉंक्रीटचे काम वजा केले नाही.

3) कामे पुर्ण झाल्यावर कामाच्या वाढीव बाबीस सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी न घेता working estimate तयार केले आहे, सिमेंट बंधारा शाहु टाकळी या कामाचे working estimate नाही व महालपिंप्री याकामाच्या working estimate वर मंजुरी क्रमांक. व दिनांक नाही.

4) सिमेंट बंधारा शाहु टाकळी क्रमांक 1 कामाच्या rate analysis मध्ये 10 किलो मीटर अंतरासाठी रेती करीता रुपये 165.60 घेतेले आहे परंतु 10 किलो मीटरचा दर रुपये 163.60/- आहे. यामुळे रक्कम रुपये 382/- ची जादाची अदाई झाली आहे.

5) सिमेंट बंधारा शाहु टाकळी क्रमांक 1 कामाचे आदेश दिनांक 16/03/2017 रोजी दिले व प्रथम धावते देयेक दिनांक 18/03/2017 ला नोंदविले व Dewatering 5 दिवस दर्शविले आहे. यात रक्कम रुपये 1,672/- जादाची अदाई झाली आहे. तसेच या कामाच्या मोजमाप पुस्तीकेवर जिथे हे देयक नोंदविले आहे. तीथे मुख्य लेखा व वित्त आधिकारी, यांची Paid & cancelled वर स्वाक्षरी नाही.

6) मुख्य अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) यांचे परिपत्रक दिनांक 03/08/2004 अन्वये क्लिनिंग द साईट ही बाब निविदा कामात अंतर्भूत करु नये असे आदेश आहेत. सिमेंट बंधारा महालपिंप्री या कामात सदरील बाबीचा अंदाजपत्रकात समावेश केला असल्याने रक्कम रुपये 9,370/- चे नियमबाह्य अदाई झालेली आहे.

7) सिमेंट बंधारा महालपिंप्री या कामात Back filling ही कामाची बाब कामाच्या अंदाजपत्रकात अंतर्भुत नस्तांना कार्यान्वीत करुन या extra item वर रुपये 8,692/- खर्च केला आहे. सदर बाबीस सक्षम अधिकाऱ्याची मंजुरी नसल्यामुळे हा खर्च मान्य करता येत नाही. मंजुरीविना केलेला खर्च वसुलीसपात्र आहे. तो वसुल व्हावा. अशाच प्रकारे सिमेंट बंधारा वावना मध्ये सुध्दा रुपये 11,226/- खर्च झाला आहे.

8) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्थर), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक मुअ/लपा/स्थास्थ/उविअ/2/1042, दिनांक 13/04/2006 नुसार वहन नकाशा व वहन अंतर 10 किलो मीटरपुढील अधिक्षक अभियंता यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. उपलब्ध साहित्याबाबतचा Quarry Chart प्रमाणे नकाशा संचिकेत संलग्न करणे आवश्यक आहे. विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे दर पृथक्करणात दर्शविलेले वहनाचे दर योग्य असलेबाबतची अधिक्षक अभियंता यांचेकडून प्रमाणित करुन घेतलेले नाही.

9) सि.ना.बं. तुपेवाडी निविदा कमी दराची (-12.25%) प्राप्त झाल्याने फ़रकाची रक्कम प्रथम जमा करुन नंतरच कामाचे आदेश देण्याच्या अटीवर निविदा मंजुर केली आहे. परंतु ठेकेदाराने फ़रकाची रक्कम प्रथम जमा न करताच कामाचे आदेश दिले आहे. सदर कामाच्या ठेकेदारांच्या कागदपत्रांच्या तुलनात्मक तकत्यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

10) कामाची मुदत तीन महिने होती, कामाचे आदेश दिनांक 16/03/16 जावक क्रमांक 352 व कामपुर्ण झाले दिनांक 31/03/2017 रोजी, सदरील कामास मुदतवाढ नाही किंवा दंडही कपात केलेला नाही. विहित मुदत पुर्ण होऊन 375 दिवस झाले तरी दंड आकारला नाही. तरी अंदाजपत्रकिय दराच्या 1089814 X 0.05% = 545 X 375 दिवस = 2,04,340/- दंड आकारणे आवशय्क होते. ते वसुलीस पात्र ठरते. तसेच सि.ना.बं.बोधेगांव बु विहित मुदत पुर्ण होऊन 726 दिवस झाले तरी दंड आकारला नाही. तरी अंदाजपत्रकिय दराच्या 989955 X 0.05% = 494 X 726 दिवस =3,59,353/- दंड आकारणे आवश्यक होते. ते वसुलीस पात्र ठरते.

11) सि.ना.बं. धनगांव कामात मोजमाप नोंदवितांना नाला रुंदीकरण कामात मऊ मुरमात खोद्काम 1325 cum चे केले आहे व याबाबीस रुपये 84.75/- चा दर दिला आहे. परंतु या बाबीचा दर रुपये 29.50/- आहे, यात रुपये 55.25/- चा जादाचा दरामुळे रक्कम रुपये 73,206/- जादाची अदाई झाली आहे.

12) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118, 120 व 152 प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच बी-1 निविदेतील अट क्रमांक 38(1) नुसार 25% परिमाणात पर्यंत किंवा रक्कम रुपये 5,000/- वाढ झाल्यास त्याबाबत कार्यकारी अभियंता यांचे सुधारीत मंजुरीचे आदेश असणे आवश्यक आहे. परंतु विभागाने अशा प्रकारचे आदेश निर्गमीत केलेले नाहीत कामाच्या परिमाणात झालेली कमी अधिक वाढ पहाता अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ केले नसल्याचे दिसुन येते प्रत्येक कामाबाबत केवळ तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. तसेच प्रकरध क्रमांक 1014 च्या कामाच्या तुलनात्मक तक्ता वर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही.

13) प्रत्येक कामाच्या अंदाजपत्रकानुसार खोदकामातुन उपलब्ध होणाऱ्या साहित्याचा जास्तीत जास्त किफायतशीर पुनर्वापर करणे बाबत निर्देशित केलेले आहे. परंतु याबाबत प्रत्येक कामात उपलब्ध सर्व साहित्याचा वापर झालेला दिसून येत नाही.

14) महाराष्ट्र शासन जलसिंचन विभागाच्या नियमपुस्तीका पान क्रमांक 109 परिच्छेद क्रमांक 8.7.3 चे उपपरिच्छेद (ड) नुसार माती कामासंदर्भात 20 टक्के संकोच (Shrinkage) वजा करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 02/01/2004 नुसार हार्टींग व केसींग झोन भरावयाचे संकुचन व आकुंचन 20 टक्के असल्याने विहित प्रमाणात घट दर्शविणे आवश्यक आहे. परंतु विभागाने खालीलप्रमाणे तपशिलात दर्शविलेप्रमाणे 20 टक्के घट दर्शविली नसल्याने अतिप्रदान झालेले आहे. तरी आता अतिप्रदानाची रक्कम रुपये 96,534/- संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करावी.

**3.437 सन 1994 पासुन लघूपाटबंधारे विभागाची कामे अपूर्ण असणेबाबत**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा परिषद, जालनाच्या लघुपाटबंधारे विभागाच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात विभागाने अपुर्ण कामाची जी यादी लेखापरीक्षणास सादर केली आहे, त्यावरुन सन 1994-1995 ते सन 2016-2017 पर्यंत रक्कम रूपये 8,99,03,000/- ची कामे पुर्ण झालेली नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परीपत्रक क्रमांक बी.जी.टी.-2090/अर्थसंकल्प/डी, दिनांक 18/06/1999 व क्रमांक बी.जी.टी.-1097/प्र.क्र.-16/अर्थसंकल्प/19, दिनांक 19/04/1997 नुसार जी कामे पुर्ण करण्याच्या बाबतीत विलंब झाल्याने त्यांच्या किंमतीत वाढ होवुन शासनावर आर्थीक भार पडतो. तरी सदर कामे प्रथम प्राधान्याने पुर्ण करण्यांत यावी व त्यानंतरच नवीन कामांना मंजुरी देण्यांत यावी. परंतु, लघुपाटबंधारे विभाग जालनाने मागील कांमे अपुर्ण ठेवून नवीन कामांना प्रशासकीय मान्यता दिल्याचे दिसुन येते

2) सिंचन विभागाने कामांवर रक्कम रुपये 899.03 लक्ष चा खर्च करण्यांत आलेला आहे. इतक्या मोठया प्रमाणात कामांना मान्यता दिल्यामुळे एकूण 461 कामे अपुर्ण राहीले. सन 1994-1995 ते आजपर्यंत म्हणजे जवळपास 23 वर्षे कामे पुर्ण न झाल्यामुळे शासनाचा झालेला खर्च हा पुर्णपणे निरर्थक ठरलेला आहे.

3) महाराष्ट्र शासनाने सिंचनाखालील जास्तीत जास्त जमीन आणण्याच्या हेतूने अशा प्रकारची कामे घेण्याबाबत योजना राबविलेली होती. ज्यामुळे या योजनेचा सरळ सरळ फायदा जिल्हयातील शेतकऱ्यांना होणे अपेक्षीत होते. परंतु, 23 वर्षात कामे पुर्ण न झाल्यामुळे अप्रत्यक्षपणे कोटयावधी रुपायाच्या उत्पन्नास शेतकरी मुकला असल्याचे दिसुन येते.

4) मंजुर कामे विहीत मुदतीत पुर्ण न झाल्यामुळे मुळ कामाच्या अंदाजपत्रकापेक्षा कामाच्या किंमतीत कितीतरी पटीने वाढ होते. ज्याचा बोझा शासनावर पडतो. त्यामुळे वाढीव कामांवर होणाऱ्या खर्चाची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

5) अपुर्ण कामांवर झालेला खर्च रक्कम रुपये 899.03 लक्ष संबंधीत जबाबदारांकडून वसुल का करण्यांत येवू नये, याबाबत समर्थनिय खुलासा करून अनुपालन सादर करावे

**3.438 कठीण खडक खोदकामामुळे झालेल्या जादा अदाई बाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** जिल्हा परिषद, जालनाच्या लघुपाटबंधारे विभागाच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात सिमेंट नाला बंधारे व कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे व पाझर तलाव या कामांवर रक्कम रूपये 8,10,423/- खर्च झाला आहे. सदरची तपासणी केली असता कामासंदर्भात जादा अदाई / नुकसान झाल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, अधिक्षक अभियंता दगडी धरण मंडळ मध्यवर्ती संघटना यांचे परीपत्रक जा.क्र.म.सं.सं./दक्ष-1/साठवण बंधारे/244/2013, दिनांक 19/08/2013 नुसार सिमेंट बंधारा बांधकामाची जमीन पातळी पासुनचा पाया पातळी जितकी खोल घेतली, तितकी बंधाऱ्याच्या उंचीत वाढ होईल व अनुषंगाने

खर्चात लक्षणीय वाढ होईल. म्हणुन 1.20 मीटरपेक्षा जास्त खोलीवर पाया खडक असेल, तर अशी साईट सिमेंट बंधा-यासाठी अव्यवहार्य समजावी. उपरोक्त शासन निर्णयातील उपपरिच्छेद 4 नुसार सिमेंट नाला बांधाच्या काठछेदाप्रमाणे नाला तळपातळीच्या खाली पाया खोदाई कठीण खडकापर्यंत घेण्यांत यावे. असे असतांनाही सिंचन विभागाने कठीण खडकात खोदकाम केल्यामुळे रक्कम रुपये 1,74,925/- शासनाचे नुकसान झालेले आहे. याबाबतची जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुलीची कार्यवाही करावी.

**3.439 नाला खोलीकरण दगडवाडी गट क्रमांक 32 तालुका भोकरदन कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जालना सन 2016-2017 या वित्तीय वर्षात नाला खोलीकरणावर रक्कम रूपये 2,82,486/- खर्च करण्यांत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 04 खालील परिशिष्ट-2 नुसार कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद, जालना यांनी कामास प्रशासकीय तसेच निविदेस मंजूरी दिलेली आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेड.पी.ए./ 202/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टिप क्रमांक 01 नुसार दिलेल्या प्रशासकीय मान्यतेची माहिती पुढील स्थायी समिती / विषय समितीच्या बैठकीत अवलोकनासाठी सादर करणे अनिवार्य आहे. परंतु, सदरील नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

2) शाखा अभियंता यांनी मापन पुस्तिकेत नोंदी घेतल्यानंतर दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु, संबधीतांनी नोंदीबाबत दिनांकीत स्वाक्षरी केलेली दिसून आली नाही. तसेच त्याची मंजूर दैनंदिनी लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे मोजमाप पुस्तिकेत नोंदी जागेवर घेतल्याची खात्री करता आली नाही. तरी पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 153 (1) अन्वये मंजुर विवरण व अंदाजपत्रकाप्रमाणेच काम करण्यांची जबाबदारी कार्यकारी अभियंता व त्याच्या सहका-याची आहे. परंतु. तपशिलाप्रमाणे निवीदा कराराप्रमाणे व अंदाजपत्रकाप्रमाणे काम न करता जादा काम केलेले आहे. बाब क्रमांक 03 चे मोजमाप पुस्तिकेप्रमाणे परीमाण 1918.35 व तांत्रीक मान्यता प्रमाणे परीमाण 1458.81 प्रमाणे घेण्यांत आलेले आहे. म्हणजेच जादा परीमाण 459.54 X दर 100.59 = 46,225 रुपयाचे जादा काम करण्यांत आलेले आहे. यावरुन कामाचे अंदाजपत्रक हे ट्रायलपिट न घेताच मोघम स्वरुपाचे करण्यांत आलेले आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1001/प्र.क्र.16/38, दिनांक 31/01/2001 नुसार अंदाजपत्रकात दोष आढळुन आल्यास तांत्रीक मान्यता देणा-या अधिका-याला जबाबदार धरणेबाबतच्या सुचना आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन क्रमांक झेडपी–2007/प्र.क्र.974/इमा-2, दिनांक 26/08/2002 तसेच शासन निर्णय / परिपत्रक क्रमांक झेडपीए-2003/प्र.क्र.115/वित्त-2009, दिनांक 12/02/2003 नुसार ग्रामपंचायतीकडे स्वतःची हत्यारे सयंत्रे आहेत किंवा नाही, याची खात्री न करता ढोबळ मानाने कामे देण्यांत आलेली आहे.

5) आयकर विभागाचे 1961 चे अधिनियमातील कलम 194 (सी) नुसार ज्या संस्थेकडे किंवा ठेकेदाराकडे पॅनकार्ड उपलब्ध नसेल, तर त्यांच्या देयकातुन 20 टक्के आयकर वसुल करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीच्या देयकातुन 2 टक्के रक्कम कपात केलेली आहे. ग्रामपंचायतीचे पॅन नंबर संचीकेत नसल्याने उर्वरित 18 टक्के रक्कम रुपये 50,847/- ची वसुली करण्यांत यावी.

**3.440 ग्रामपंचायत सोनगिरी क्रमांक 1, तालुका जाफ्राबाद मध्ये सिमेंट नाला बांधकाम कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 28) -** सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जालना सन 2016-2017 या वित्तीय वर्षात वर्षात सिमेंट नाला बांधकाम कामावर प्रमाणक क्रमांक 57 दिनाक 14/06/2016 अन्वये रक्कम रुपये 4,83,424/- खर्च करण्यांत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) यांचे परिपत्रक दिनांक 03/08/2004 अन्वये क्लिनिंग द साईट ही बाब निविदा कामात अंतर्भूत करू नये, असे आदेश आहेत. सदरील बाबीचा अंदाजपत्रकात समावेश केला असल्याने 1,000 चौरस मीटर कामाचे प्रती चौरस मीटर रुपये 4.40 प्रमाणे रक्कम रुपये 4,400/- ची नियमबाहय अदाई करण्यांत आलेली आहे. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी ही सदरील कामाचे अंदाजपत्रक तयार करणा-या तांत्रीक अधिका-याची आहे. उपरोक्त रक्कमेची संपुर्ण वसुली करुन शासन खाती भरणा करण्यांत यावा.

2) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, अधिक्षक अभियंता, दगडी धरण मंडळ मध्यवर्ती संघटना यांचे परीपत्रक जा.क्र.म.सं.सं./दक्ष-1/साठवण बंधारे/244/2013, दिनांक 19/08/2013 नुसार सिमेंट बंधारा बांधकामाची जमीन पातळी पासुनचा पाया पातळी जितकी खोल घेतली तितकी बंधा-याच्या उंचीत वाढ होईल व अनुषंगाने खर्चात लक्षणीय वाढ होईल म्हणुन 1.20 मीटरपेक्षा जास्त खोलीवर पाया खडक असेलतर अशी साईट सिमेंट बंधा-यासाठी अव्यवहार्य समजावी. उपरोक्त शासन निर्णयातील उपपरिच्छेद 4 नुसार सिमेंट नाला बांधाच्या काठछेदाप्रमाणे नाला तळपातळीच्या खाली पाया खोदाई कठीण खडकापर्यंत घेण्यांत यावे. असे असतांना कठीण खडक खोदकाम 51.54 घनमीटर करुन रक्कम रुपये 264.70 या दराने रक्कम रुपये 13,643/- ची अदाई करण्यांत आलेली आहे. सदरील रक्कमेची वसुली करण्यांत यावी.

3) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, अधिक्षक अभियंता, दगडी धरण मंडळ मध्यवर्ती संघटना यांचे परीपत्रक जा.क्र.म.सं.सं./दक्ष-1/साठवण बंधारे/244/2013, दिनांक 19/08/2013 नुसार बंधा-याच्या काठछेदाचे संकल्पन हे स्थैर्य पृथ:करणात (Gravity Structure) म्हणुन करण्यांत आलेले असुन स्थैर्य पृथ:करणात (Gravity Structure) संधानकाची घनता विचारात घेतली जाते. त्यामुळे संधानक एम-10 ऐवजी एम-15 मध्ये केल्यास बंधाऱ्याचा काठछेदात कोणत्याही प्रकारचा बदल होत नसल्याने सदर बाब ही खर्चीक होईल. म्हणुन सिमेंट बंधारे पुर्वी संकल्पीत केल्याप्रमाणेच एम-10 मध्येच ठेवावेत. सिंचन विभागाच्या लेखापरीक्षणात कांही कामांत एम-15 चा वापर संधानकासाठी केल्यामुळे 154.11 घनमीटर कामासाठी रुपये 214.70 या दराने रक्कम रुपये 33,087/- ची जादा अदाई झालेली आहे. याबाबत वसुलीची कार्यवाही करण्यांत यावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 04 खालील परिशिष्ट-2 नुसार कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद, जालना यांनी कामास प्रशासकीय तसेच निविदेस मंजूरी दिलेली आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेड.पी.ए./ 202/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टिप क्रमांक 01 नुसार दिलेल्या प्रशासकीय मान्यतेची माहिती पुढील स्थायी समिती / विषय समितीच्या बैठकीत अवलोकनासाठी सादर करणे अनिवार्य आहे. परंतु, सदरील नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

5) शाखा अभियंता यांनी मापन पुस्तिकेत नोंदी घेतल्यानंतर दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु, संबधीतांनी नोंदीबाबत दिनांकीत स्वाक्षरी केलेली दिसून आली नाही. तसेच त्याची मंजूर दैनंदिनी लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे मोजमाप पुस्तिकेत नोंदी जागेवर घेतल्याची खात्री करता आली नाही. तरी पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2009/ प्र.क्र.80/ पंरास/8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारे माहीती फलक लावणे आवश्यक आहे. संचिकेत नामफलकाचे फोटो नसल्याने माहिती फलक लावले किंवा नाही? शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यांत आली नाही. खुलासा करावा.

**3.441 सिमेंट नाला बंधारा ढाळेवाडी क्रमांक 2 कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सिमेंट नाला बंधारा ढाळेवाडी क्रमांक 2 कामाकरिता रक्कम रूपये 19,42,774/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/ प्र.क्र.514 वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार 10 लक्ष पर्यंत 100/- रुपये व त्यापुढील प्रत्येक लखासाठी 100/- रुपयाप्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाची निविदा रूपये 21.59 लाख चे असल्यामुळे रूपये 1,300/- चे मुद्रांक लावणे

आवश्यक होते. प्रत्यक्षात रूपये 300/- चे मुद्रांक संचिकेस लावले आहे रूपये 1000/- चे मुद्रांक रक्कम संबंधिताकडून वसूल करून शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 मधील तरतुदी नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक आहे तथापि जिल्हा परिषदेने एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामांची नोंदी केलेल्या आहेत

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 166 (ब)(6) नुसार दिनांकीत स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत. प्रत्यक्ष दिनांक नमुद करून व तो दौरा दैनंदीनीशी योग्य अचूक असल्याची खात्री पटवावी.

4) सदर काम मुदतीत पुर्ण न झाल्याने संबंधितावर रूपये 29,142/- दंड आकारला आहे. परंतु सदरचे काम अद्यापही पुर्ण झालेले नाही. त्यामुळे काम विहित मुदतीत पुर्ण न झाल्याने सदर योजनेचा लाभ शेतकऱ्यांना झालेला नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम 1961 चे कलम 116 नुसार निविदेच्या प्रत्येक पानावर ठेकेदार व करार करून घेणाऱ्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक असते. टेंडरवर करार करून घेणाऱ्यांच्या प्रत्येक पेजवर स्वाक्षऱ्या नाहीत. असे असतांना पुढील प्रक्रिया केलेली आहे.

6) शासन परिपत्रक पंरास 01/प्र.क्र.160/38, दिनांक 18/08/2001 नुसार मोजमापे मान्य असले बाबत मोजमाप पुस्तीकेत ठेकेदाराची स्वाक्षरी घेतलेली नाही.

7) लेखा संहिता नियम 180 अन्वये घेण्यात आलेल्या नोंदी लाल शाईने क्रॉस चिन्ह करून खोडलेल्या नाहीत.

8) जिल्हाधिकारी, बीड यांचे प्रशासकीय मंजुरी आदेश मधील अट क्रमांक 01 अन्वये या कामांसाठी खाजगी जागा असल्यास लागणाऱ्या जागेचे दानपत्र नियमानुसार रजिस्टर करुन जागा शासनाच्या नावे करुन घेऊनच कामास सुरुवात करावी. खाजगी मालमत्तेवर कामे घेण्यात येवु नयेत. तसेच जिल्हाधिकारी यांचे कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद यांना दिलेले पत्र क्रमांक 1185, दिनांक 02/11/2015 मधील अट क्रमांक 03 अन्वये सदर काम हे फक्त ग्रामपंचायत / नगरपरिषद यांचे स्वत:च्या मालकीच्या व केवळ शासनाच्या मालकी हक्काच्या जागेवरच घेण्यात यावे. याबाबत सर्वस्वी जबाबदारी यंत्रणांची राहील. याबाबत मालकी हक्काचा सातबाराचा उतारा सत्यप्रतीत जोडण्यात यावा, असे आदेशीत असताना जागेचे सातबाराखाजगी व्यक्तींचे असुन शासन मालकीचे नाहीत व दानपत्रही करुन घेण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अटी व शर्तीनुसार जागेची निवड केली नसल्याचे दिसते

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार कामाची/योजनेची प्रगती नोंदवही नमुना नंबर 23 तसेच नियम 97 अन्वये नमुना नंबर 39 मध्ये स्थावर मालमत्ता नोंदवही, नमुना ठेवलेली नाही.

**3.442 सिंचन तलाव विशेष दुरूस्ती जाधववाडी कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सिंचन तलाव विशेष दुरूस्ती जाधववाडी कामाकरिता रक्कम रूपये 1,59,996/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर देयकातून स्वामित्वधानाची रक्कम रूपये 31,727/- कपात करणे आवश्यक होते. प्रत्यक्षात रूपये 6,964/- कपात करण्यात आलेले आहेत. उर्वरीत रूपये 24,763/- चलनाद्वारे शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2000/ प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 मधील तरतुदी नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक आहे तथापि जिल्हा परिषदेने एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामांची नोंदी केलेल्या आहेत

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 166 (ब) (6) नुसार दिनांकीत स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत. प्रत्यक्ष दिनांक नमुद करून व तो दौरा दैनंदीनीशी योग्य अचूक असल्याची खात्री पटवावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम 1961 चे कलम 116 नुसार निविदेच्या प्रत्येक पानावर ठेकेदार व करार करून घेणाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक असते. टेंडरवर करार करून घेणाऱ्यांच्या प्रत्येक पेजवर स्वाक्षऱ्या नाहीत. असे असतांना पुढील प्रक्रिया केलेली आहे.

5) शासन परिपत्रक पंरास 01/प्र.क्र.160/38, दिनांक 18/08/2001 नुसार मोजमापे मान्य असलेबाबत मोजमाप पुस्तीकेत ठेकेदाराची स्वाक्षरी घेतलेली नाही.

**3.443 जलयुक्त शिवार योजने अंतर्गत 8 CNB कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5, 9, 10, 14, 27, 35, 39, 48 व 49) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, जलसिंचन विभागाच्या नियमपुस्तिका पान क्रमांक 109 परिच्छेद क्रमांक 8.7.3 चे उपपरिच्छेद (ड) नुसार माती कामासंदर्भात 10 टक्के संकोच (Shrinkage) वजा करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन, परिपत्रक दिनांक 02/01/2004 नुसार हार्टींग व केसींग झोन भरावयाचे संकुचन व आकुंचन 10 टक्के असल्याने विहित प्रमाणात घट दर्शविणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने खालीलप्रमाणे तपशिलात दर्शविलेप्रमाणे 10 टक्के घट दर्शविली नसल्याने अतिप्रदान झालेले आहे. तरी आता अतिप्रदानाची रक्कम रूपये 36,054/- वसूल करावी.

2) कामांची सचिकेतील General report नुसार Removing the dismentled revetment and reconstructing the same या बाबीत निघालेले किमान 50 टक्के साहित्याचा पुनर्वापर Providing and const. stone revetment etc. या बाबीत करणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. उपरोक्त कामाची रक्कम रूपये 93,774/- अमान्य करण्यात येत आहे.

3) उपरोक्त कामाच्या संचिका तपासल्या असता सदरील कामाच्या अंदाजपत्रकासाठी सन 2013-2014 ची प्रादेशिक दरसुची कंत्राटदाराची निविदा मान्य करुन करारनामा केलेला आहे. सन 2013-2014 च्या प्रादेशिक दर सुचित अधीच खोदलेल्या उपलब्ध माल ढिगा-यामधुन निवडलेल्या माल सामग्रीने सरळ भरावाच्या आवरण क्षेत्राची रचना करणे, थरामध्ये मांडणी करणे, ढेकळे फोडणे भरावाचे सपाटीकरण करणे, जल शिंपन व संघनन करणे या बाबीचा दर रूपये 14.45 आहे. तथापि, सदरील कामाच्या अंदाजपत्रकातील दर पृथकरण करणे विवरणे तपासली असता अंदाजपत्रकामधील सदर बाबीसाठी दर रूपये 28.60 दर्शवुन दर पृथकरण केलेले आहे त्यामुळे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदान रक्कम रूपये 28,782/- संबंधीताकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 नुसार मंजुर करण्यात आलेला प्रत्येक करार हा नमुना 48 मधील नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे. परंतु, अर्धसमास पत्र क्रमांक 1 दिनांक 05/10/2017 अन्वये लेखी मागणी करुनही सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही अनुसरल्याची खात्री करता आलेली नाही

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जलशि-2015/प्र.क्र.30/जल-7, दिनांक 05/02/2015 नुसार संबंधीत संस्थेने (मक्तेदाराने) 5 वर्ष देखभाल हमी घेणे आवश्यक असून देयकाच्या 5 टक्के रक्कम राखून ठेवणे आवश्यक असताना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) सदर कामाचे अंदाजपत्रक तपासले असता सिमेंटसाठी प्रत्येक बॅगसाठी दर फरक 325 - 248 = 77 दिलेला आहे. सदर कामांचे बाबतीत वापरलेल्या सिमेंटच्या खरेदीच्या मुळ पावत्या देयकासोबत संलग्न केलेल्या नाहीत. त्यामुळे देयकासोबत / मोजमाप पुस्तीकेत नोंदविलेल्या सिमेंट कंझम्प्शन स्टेटमेंट मधील सिमेंट बॅगची दर्शविलेली संख्या योग्य असलेबाबत खात्री करता आली नाही. तरी सिमेंट बॅग दर फरक रूपये 21.50 लाख लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

7) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक जलसं-2012/प्र.क्र.1/जल-7, दिनांक 01/01/2014 नुसार सिमेंट कॉंक्रीट नाला बांधाची काम M-15 संधानकात करण्याऐवजी M-10 संधानकात करावी, अशा सुचना आहेत. परंतु, विभागाने उपरोक्त काम M-15 संधानकात केलेले आहे. परंतु, उपरोक्त शासन

निर्णयाप्रमाणे M-10 संधानकात उपरोक्त काम केले नसलेमुळे रूपये 22.18 लाख जादा प्रदान झाला आहे. तरी सदर वसूल करावी.

8) सदर कामे दिलेल्या मुदतीत पुर्ण झाले नाही नियमाप्रमाणे निविदा रक्कमेच्या 10 टक्के दंड आकारणे आवश्यक आहे. त्यामुळे रक्कम रूपये 21 लाख विलंबाने काम पुर्ण केल्यामुळे नुकसान भरपाई म्हणुन वसुल करावे

**3.444 सिमेंट बंधारा क्र. 04 कोर्टा ता. वसमत येथील बांधकामातील अनियिमततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सिमेंट बंधारा क्रमांक 04 कोर्टा तालुका वसमत येथील बांधकामाकरिता रक्कम रूपये 3,36,509/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 4 मधील परिच्छेद क्रमांक 02 मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-ए/2012/प्र.क्र. - 680/ वित्त-9, दिनांक 31/03/2013 नुसार प्रशासकीय व तांत्रीक मान्यता व स्विकारलेल्या निविदेची माहिती पुढील स्थायी समितीच्या व विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे परंतु विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही.

2) सदर कामाच्या सामान्य अहवालामध्ये तसेच अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेत काम कोठे करण्यात येणार आहे ( गट नंबर ) व प्रत्यक्षात कोठे केले आहे याबाबत उल्लेख नसल्याने काम योग्य ठिकाणी झाल्याचे तसेच कामाची द्विरुक्ती झाली नसल्याची खात्री करता येत नाही.

3) सदर कामावर वापरलेल्या खडी, सिमेंट, वाळु यावर विभागाने रूपये 70.68/- प्रति घन मीटर या दराने रॉयल्टीची रक्कम आकारली आहे. परंतु महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 4 (अ) क्र. 67 दिनांक 11/05/2015 अन्वये बांधकाम साहित्याच्या रॉयल्टीच्या दरात वाढ केली असून रॉयल्टी प्रति घन मीटर रूपये 141.36/- या दराने वसुल करणे आवश्यक आहे. तरी कमी वसुल केलेली रॉयल्टीची रक्कम रूपये 32,245/- वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

4) उपसचिव उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्रमांक डीएमएफ 0916/ प्र.क्र. 68/ उ 9, दिनांक 20/09/2016 आणि जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे आदेश क्रमांक जा.क्र. 2016/ जमील-3/गौ.ख./कावि, दिनांक 30/09/2016 नुसार रॉयल्टीवर 10% उपकर आकारण्यात यावा अशा सुचना आहेत. परंतु त्याप्रमाणे आकारणी न केल्याने उपकराची रक्कम रूपये 6,450/- वसुल करण्यात यावी.

5) सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक 251 नुसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक - पंरास-1091/ सी.आर.427/26, दिनांक 11/02/1995 अन्वये बांधकामास प्रशासकीय व तांत्रीक मान्यता देण्यापूर्वी कामाच्या ठिकाणचे शेतकऱ्याचे संमतीपत्र जोडणे आवश्यक आहे. परंतु असे अभिलेखे नस्तीसोबत दिसून आले नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/ 1009/ प्र.क्र. 40 / जल-3 दिनांक 19/10/2001 नुसार संबंधित संस्थेने ( मक्तेदाराने ) 2 वर्ष देखभाल हमी घेणे आवश्यक असून देयकाच्या 10% रक्कम राखुन ठेवणे आवश्यक असताना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलसं-2012/ प्र.क्र.1/जल-7, दिनांक 12/11/2013 व शुद्धीपत्रक क्रमांक जलसं-2012/ प्र.क्र.1/ जल-7, दिनांक 01/01/2014 नुसार सिमेंट कॉंक्रीट नाला बांधकामाची कामे एम-15 ऐवजी एम-10 संधानकात करावीत असे आदेश आहेत. परंतु विभागाने सदरील काम एम-15 या संधानकात केल्यामुळे खालीलप्रमाणे रूपये 55,440/- चे शासनाचे नुकसान झाले आहे. सदरील रक्कम संबंधिताकडून वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 प्रमाणे ब-1 निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9) शासन परिपत्रक पंरास 01/प्र.क्र.160/38, दिनांक 18/8/2001 प्रमाणे मोजमापे मान्य असलेबाबत ठेकेदाराने स्वाक्षरी करणे आवश्यक असताना याप्रमाणे मोजमाप पुस्तीकेत नोंदी घेतल्याचे दिसून येत नाही.

**3.445 सिमेंट नाला मालेगाव क्र. 1,2,3, शिवनी क्र. 1,2 व रामवाडी क्र. 2 ता. कळमनुरी येथील बांधकामातील अनियिमततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर बाबत रक्कम रूपये 11,92,233/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 4 मधील परिच्छेद क्रमांक 02 मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए-ए/2012/प्र.क्र.-680/ वित्त-9, दिनांक 31/03/2013 नुसार प्रशासकीय व तांत्रीक मान्यता व निविदा ( दर ) स्विकृतिची माहिती पुढील समितीच्या / जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे परंतु विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही.

2) सदर कामाच्या सामान्य अहवालामध्ये तसेच अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेत काम कोठे करण्यात येणार आहे (गट नंबर) व प्रत्यक्षात कोठे केले आहे याबाबत उल्लेख नसल्याने काम योग्य ठिकाणी झाल्याचे तसेच कामाची द्विरुक्ती झाली नसल्याची खात्री करता येत नाही.

3) सदर कामावर वापरलेल्या खडी, सिमेंट, वाळु यावर विभागाने रूपये 70.68/- प्रति घन मीटर या दराने रॉयल्टीची रक्कम आकारली आहे. परंतु महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 4 (अ) क्रमांक 67, दिनांक 11/05/2015 अन्वये बांधकाम साहित्याच्या रॉयल्टीच्या दरात वाढ केली असून रॉयल्टी प्रति घन मीटर रूपये 141.36/- या दराने वसुल करणे आवश्यक आहे. तरी कमी वसुल केलेली रॉयल्टीची रक्कम रूपये 1,24,358/- वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

4) उपसचिव उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्रमांक डीएमएफ 0916/ प्र.क्र.68/ उ 9, दिनांक 20/09/2016 आणि जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे आदेश क्रमांक जा.क्र. 2016/जमील-3/गौ.ख./कावि, दिनांक 30/09/2016 नुसार रॉयल्टीवर 10% उपकर आकारण्यात यावा अशा सुचना आहेत. परंतु त्याप्रमाणे आकारणी न केल्याने उपकराची रक्कम रूपये  24,873/- वसुल करण्यात यावी.

5) सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक 251 नुसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक - पंरास-1091/सी.आर.427/26 दिनांक 11/02/1995 अन्वये बांधकामास प्रशासकीय व तांत्रीक मान्यता देण्यापूर्वी कामाच्या ठिकाणची जमीन जिल्हा परिषदेच्या नावावर असली पाहिजे परंतु असे अभिलेखे नस्तीसोबत दिसून आले नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/ 1009/ प्र.क्र. 40 / जल-3 दिनांक 19/10/2001 नुसार संबंधित संस्थेने ( मक्तेदाराने ) 2 वर्ष देखभाल हमी घेणे आवश्यक असून देयकाच्या 10% रक्कम राखुन ठेवणे आवश्यक असताना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलसं-2012/प्र.क्र.1/जल-7 दिनांक 12/11/2013 व शुद्धीपत्रक क्रमांक जलसं-2012/ प्र.क्र.1/ जल-7, दिनांक 01/01/2014 नुसार सिमेंट कॉंक्रीट नाला बांधकामांची कामे एम-15 ऐवजी एम-10 संधानकात करावीत असे आदेश आहेत. परंतु विभागाने सदरील काम एम-15 या संधानकात केल्यामुळे खालीलप्रमाणे रूपये 2,34,070/- चे शासनाचे नुकसान झाले आहे. सदरील रक्कम संबंधिताकडून वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे

8) शासन परिपत्रक पंरास 01/प्र.क्र.160/38, दिनांक 18/8/2001 प्रमाणे मोजमापे मान्य असलेबाबत ठेकेदाराने स्वाक्षरी करणे आवश्यक असताना याप्रमाणे मोजमाप पुस्तीकेत नोंदी घेतल्याचे दिसून येत नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जलसं-2012/ प्र.क्र. 65/ जल-7 दिनांक 22/01/2013 नुसार नाला बांधाच्या फलॅक वॉलवर ऑईलपेंटने फलक लिहीणे आवश्यक आहे. परंतु कामाच्या ठिकाणी असा फलक लिहीण्यात आलेला नाही.

**3.446 साखरा तांडा ता. सेनगाव येथील सिमेंट नाला बंधारा क्रमांक 01 व 02 आणि सिनगी खांबा, देवुळगाव ज. ता. सेनगाव येथील सिमेंट नाला बंधारा बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर बाबत रक्कम रूपये 28,58,013/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 4 मधील परिच्छेद क्रमांक 02 मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-ए/2012/प्र.क्र.-680/वित्त-9, दिनांक 31/03/2013 नुसार प्रशासकीय व तांत्रीक मान्यता व निविदा ( दर ) स्विकृतिची माहिती पुढील समितीच्या / जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे परंतु विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही.

2) सदर कामाच्या सामान्य अहवालामध्ये तसेच अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेत काम कोठे करण्यात येणार आहे (गट नंबर) व प्रत्यक्षात कोठे केले आहे याबाबत उल्लेख नसल्याने काम योग्य ठिकाणी झाल्याचे तसेच कामाची द्विरुक्ती झाली नसल्याची खात्री करता येत नाही.

3) सदर कामावर वापरलेल्या खडी, सिमेंट, वाळु यावर विभागाने रूपये 70.68/- प्रति घन मीटर या दराने रॉयल्टीची रक्कम आकारली आहे. परंतु महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 4 (अ) क्रमांक 67, दिनांक 11/05/2015 अन्वये बांधकाम साहित्याच्या रॉयल्टीच्या दरात वाढ केली असून रॉयल्टी प्रति घन मीटर रूपये 141.36/- या दराने वसुल करणे आवश्यक आहे. तरी कमी वसुल केलेली रॉयल्टीची रक्कम रूपये 1,35,665/- वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

4) उपसचिव उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्रमांक डीएमएफ 0916/ प्र.क्र. 68/ उ 9, दिनांक 20/09/2016 आणि जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे आदेश क्रमांक जा.क्र.2016/जमील-3/गौ.ख./कावि, दिनांक 30/09/2016 नुसार रॉयल्टीवर 10% उपकर आकारण्यात यावा अशा सुचना आहेत. परंतु त्याप्रमाणे आकारणी न केल्याने उपकराची रक्कम रूपये 13,567/- वसुल करण्यात यावी.

5) सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक 251 नुसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1091/सी.आर.427/26, दिनांक 11/02/1995 अन्वये बांधकामास प्रशासकीय व तांत्रीक मान्यता देण्यापूर्वी कामाच्या ठिकाणचे शेकऱ्याचे संमतीपत्र घेणे आवश्यक आहे. परंतु असे अभिलेखे नस्तीसोबत दिसून आले नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/ 1009/प्र.क्र.40/जल-3 दिनांक 19/10/2001 नुसार संबंधित संस्थेने (मक्तेदाराने) 2 वर्ष देखभाल हमी घेणे आवश्यक असून देयकाच्या 10% रक्कम राखुन ठेवणे आवश्यक असताना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.447 सरोध सिमेंट बंधारा कांडली ता. कळमनुरी येथील कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर बाबत रक्कम रूपये 1,51,431/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 4 मधील परिच्छेद क्रमांक 02 मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-ए/2012/प्र.क्र.-680/वित्त-9, दिनांक 31/03/2013 नुसार प्रशासकीय व तांत्रीक मान्यता व स्विकारलेल्या निविदेची माहिती पुढील स्थायी सर्वसाधारण समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे परंतु विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही.

2) सदर कामाच्या सामान्य अहवालामध्ये तसेच अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेत काम कोठे करण्यात येणार आहे (गट नंबर) व प्रत्यक्षात कोठे केले आहे याबाबत उल्लेख नसल्याने काम योग्य ठिकाणी झाल्याचे तसेच कामाची द्विरुक्ती झाली नसल्याची खात्री करता येत नाही.

3) मुख्य अभियंता लघुपाटबंधारे स्थानिक स्तर यांचे परिपत्रक क्रमांक मुअ / उविअ-2/ प्र.शा. 5/ 2611 दिनांक 07/08/2004 नुसार अंदाजपत्रकात साफसफाई (साईट क्लिनिंग) या बाबीचा समावेश करु नयेत असे आदेश असनूही वरील कामास क्लियरिंग साईट या बाबीवर रूपये 3,144/- नियमबाहयरित्या अदा करण्यात करण्यात आला आहे. त्याची वसूली करण्यात यावी.

4) सदर कामावर वापरलेल्या खडी, सिमेंट, वाळु यावर विभागाने रूपये 70.68/- प्रति घन मीटर या दराने रॉयल्टीची रक्कम आकारली आहे. परंतु महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 4 (अ) क्रमांक 67, दिनांक 11/05/2015 अन्वये बांधकाम साहित्याच्या रॉयल्टीच्या दरात वाढ केली असून रॉयल्टी प्रति घन मीटर रूपये 141.36/- या दराने वसुल करणे आवश्यक आहे. तरी कमी वसुल केलेली रॉयल्टीची रक्कम रूपये 29,217/- वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

5) उपसचिव उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्रमांक डीएमएफ 0916/ प्र.क्र.68/ उ 9, दिनांक 20/09/2016 आणि जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे आदेश क्रमांक जा.क्र. 2016/ जमील-3/गौ.ख./कावि, दिनांक 30/09/2016 नुसार रॉयल्टीवर 10% उपकर आकारण्यात यावा अशा सुचना आहेत. परंतु त्याप्रमाणे आकारणी न केल्याने उपकराची रक्कम रूपये 5,843/- वसुल करण्यात यावी.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/ 1009/ प्र.क्र.40 / जल-3 दिनांक 19/10/2001 नुसार संबंधित संस्थेने (मक्तेदाराने) 2 वर्ष देखभाल हमी घेणे आवश्यक असून देयकाच्या 10% रक्कम राखुन ठेवणे आवश्यक असताना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलसं-2012/ प्र.क्र.1/ जल-7, दिनांक 12/11/2013 व शुद्धीपत्रक क्रमांक जलसं-2012/ प्र.क्र.1/ जल-7, दिनांक 01/01/2014 नुसार सिमेंट काँक्रीट नाला बांधकामाची कामे एम-15 (1:2:4) ऐवजी एम-10 (1:3:6) संधानकात करावीत असे आदेश आहेत. परंतु विभागाने सदरील काम एम-15 या संधानकात केल्यामुळे खालीलप्रमाणे रूपये 3,283/- चे शासनाचे नुकसान झाले आहे. सदरील रक्कम संबंधिताकडून वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे

8) सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक 251 नुसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1091/सी.आर. 427/26, दिनांक 11/02/1995 अन्वये बांधकामास प्रशासकीय व तांत्रीक मान्यता देण्यापूर्वी कामाच्या ठिकाणचे शेतकऱ्याचे संमतीपत्र घेणे आवश्यक आहे. परंतु असे अभिलेखे नस्तीसोबत दिसून आले नाहीत.

9) सरोध सिमेंट बंधारा कामाचे आदेश दिनांक 04/03/2013 रोजी दिले असून कामाची मुदत 12 महिने आहे. परंतु काम प्रत्यक्षात दिनांक 29/01/2016 म्हणजेच 696 दिवस उशिराने पूर्ण झाले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 अन्वये ठेकेदाराने मुदतवाढीसाठी काम पूर्ण होण्याच्या विहीत मुदतीच्या किमान 15 दिवस अगोदर अर्ज देणे आवश्यक आहे. परंतु या कामात कंत्राटदाराने काम पूर्ण झाल्यानंतर एक वर्षाने मुदतवाढीसाठी अर्ज केला आहे. मुदतवाढ मंजूर नसताना काम कसे केले याचा बोध होत नाही. कामाच्या आदेशातील त्याचप्रमाणे निविदेतील अटी आणि शर्ती प्रमाणे प्रतिदिन 1% जास्तीत जास्त 10% एवढा दंड करणे आवश्यक आहे. परंतु कंत्राटदाराला फक्त 5% दंड आकारुन मुदतवाढ दिली आहे. सबब उर्वरित 5% दंडाची रक्कम रूपये 7]572/- वसुल करण्यात यावी. प्रथम धावते देयक रूपये 5,08,544/- ची अदाई दिनांक 31/03/2013 रोजी झालेली आहे. परंतु त्यानंतरही काम दोन वर्षानंतर पूर्ण झालेले आहे एवढया कालावधीसाठी शासनाचा निधी निष्कारण गुंतुन पडला आहे. याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी.

**3.448 पांगरा शिंदे तालुका वसमत येथील सिंचन तलाव दुरुस्ती कामातील अनियिमततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** पांगरा शिंदे तालुका वसमत येथील सिंचन तलाव दुरुस्ती कामाकरिता रक्कम रूपये 4,50,119/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पांगरा येथील पाझर तलावाच्या दुरुस्तीच्या अहवालाचे अवलोकन केले असता बाब क्रमांक 02 मध्ये खोदलेला खड्डा माती ने भरणे याबाबीसाठी माती राजेवाडी येथून आणणे प्रस्तावित केले आहे. पांगरा येथील तलावात वापरायोग्य माती होती किंवा नव्हती याबाबत उल्लेख दिसून येत नाही. तरी योग्य तो खुलासा करण्यात यावा.

2) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील परिशिष्ठ 24 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी एकूण कामाच्या 5% प्रत्यक्ष बाबनिहाय तारखेसह तपासणी करणे आवश्यक असताना योग्य त्या प्रमाणात तपासणी केल्याचे दिसून आले नाही.

3) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 प्रमाणे कामाची मुदत संपण्यापूर्वी 15 दिवस आधी मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. परंतु कंत्राटदाराने दिनांक 06/01/2017 रोजी विलंबाने अर्ज सादर केला आहे.

4) महाराष्ट्र जिलहा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 67 व 197 नुसार कामाची प्रगती नोंदवही नमुना नंबर 23 व कामपूर्ण नोंदवही नमुना नंबर 69 मध्ये नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 प्रमाणे पदान रक्कमेची पोच पावती घेणे आवश्यक आहे. तसेच प्रदानाच्या धनादेश वितरण करतेवेळी संबंधित कंत्राटदार / संस्थेच्या सचिवाची मुद्रांक तिकीट लावून स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. कंत्राटदाराची मोजमापाची नोंदी व मुल्यांकण मान्य असल्याची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. पूर्तता करावी.

6) उपसचिव उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्रमांक डीएमएफ 0916/ प्र.क्र.68/ उ 9, दिनांक 20/09/2016 आणि जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे आदेश क्रमांक जा.क्र.2016/जमील-3/गौ.ख./कावि, दिनांक 30/09/2016 नुसार रॉयल्टीवर 10% उपकर आकारण्यात यावा अशा सुचना आहेत. परंतु त्याप्रमाणे आकारणी न केल्याने उपकराची रक्कम रूपये 23,267/- वसुल करण्यात यावी.

**3.449 सिमेंट बंधारा दुरुस्ती बारसगाव नंबर 1 व नंबर 2 तालुका अर्धापूर उपविभाग भोकर अंतर्गत केलेल्या कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सिमेंट बंधारा दुरुस्ती बारसगाव नंबर 1 व नंबर 2 तालुका अर्धापूर उपविभाग भोकर अंतर्गत केलेल्या कामावर रक्कम रूपये 14,49,053/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ज्या एका कामाचे मुल्य रूपये 5 लाखाच्यावर ते 50 लाखापर्यंत आहे, अशी खर्चाची कामे विभागीय स्तरावरील एक ब वर्ग दैनिक मराठी / हिंदी व एक ब वर्ग मराठी साप्ताहीक व जिल्हा स्तरावरील एक ब वर्ग दैनिक मराठी / हिंदी व एक ब वर्ग मराठी साप्ताहीक मध्ये ई-निविदा प्रसिध्द करणे आवश्यक आहे. कोणत्या वर्तमान पत्रामध्ये निविदा प्रसिध्दी दिलेली आहे, याबाबत जाहिरात दिल्याचे वर्तमान पत्राची प्रत संचिकेत नसल्यामुळे तपासणी करता आले नाही. त्यामुळे निविदा स्पर्धात्मक झाल्याचे स्पष्ट होत नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) जलसिंचन विभाग नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 8.7.3 चे उप परी.(ड) नुसार माती कामासंदर्भात 10 टक्के shrinkage वजा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही. जादा प्रदान रक्कम रूपये 50,296/- वसूल करून शासन खाती भरणा करावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 4 खालील परिशिष्ट-2 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रंमांक झेडपीए-2012/प्र.क्रं.-680/वित-9, दिनांक 31/01/2013 अन्वये या स्तरावर प्रशासकीय, तांत्रीक व निविदा मंजुरीचे केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवॉल्व आगामी सर्वसाधारण सभेत सादर करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक हप्त्यामध्ये 5 टक्के कामाची तपासणी करणे अनिवार्य असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट साहित्य 1099/ प्र.क्र.-56/ 35, दिनांक 30/06/2000 नुसार बांधकाम साहीत्य् कामावर वापरण्यापुर्वी साहीत्याचे वारंवारीतेने शासकीय प्रयोगशाळेकडून चाचणी करून घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे योग्य गुणवतेची खात्री होत नाही.

6) सदर काम मंजूर अंदाजपत्रकानुसार झालेबाबत third party audit report घेतलेला नाही. त्यामुळे योग्य गुणवतेची खात्री होत नाही.

7) मोजमाप पुस्तिका क्रमांक 516 चे Page no.39 वर Item no. 2 असे नमूद असताना मोजमाप पुस्तिका पेज नंबर 41 वर पहिले व अंतिम देयाकाचे मोजमापात Gorth between 30 to 60 cm.- 35 nos दर्शविले आणि qty.as per MB no.516 page no. 39 वरून घेतल्याचे नमूद केले आहे.तसेच देयकातही संख्या 35 दर्शविल्याने रक्कम रुपये 2,780/- चे अतिप्रदान झालेले आहे. जादा प्रदान रक्कम रूपये 2,780/- वसूल करून शासन खाती भरणा करावी. तसेच सदरील तोडलेल्या झाडांची व लाकूड विक्री करून आलेली रक्कम शासन खाती भरणा केल्याचे दर्शवावे.

8) सदर कामाचे कार्यारंभ आदेश क्रमांक 408 दिनांक 24/03/2017 चे असून काम दिनांक 31/03/2017 पर्यंत (म्हणजे 08 दिवस) पूर्ण करण्याचे आदेश आहेत. सदरील कामाची प्रक्रिया ही 8 दिवसांत कशी पूर्ण होईल, तेंव्हा कामाची मुदत ही संयुक्तिक नसून वित्तीय औचीत्यास अनुसरून नाही. काम पूर्ण करण्याच्या अत्यल्प कालावधीमुळे काम तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण दर्जेदार झाल्याचे प्रमाणित करता येत नाही.

9) उपरोक्त CNB-1 व CNB-2 चे ग्रामपंचायत कडे हस्तांतरण केले किंवा नाही, हे अभिलेख्याअभावी समजू शकले नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 97 व 197 नुसार पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नंबर 39 व 69 मध्ये घेणे आवश्यक आहे. सदर नोंदी घेतल्याचे दर्शवुन अनुपालन सादर करावे.

**3.450 सिंचन तलाव दुरुस्ती मौजे नंदनवन तालुका कंधार जिल्हा नांदेड कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सिंचन तलाव दुरुस्ती मौजे नंदनवन तालुका कंधार जिल्हा नांदेड कामावर रक्कम रूपये 5,03,254/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, अधिसूचना क्रमांक शासन राजपत्र असाधारण-67, दिनांक 11/05/2015 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खानिजामधून स्वामित्व धनाची रक्कम (141.36/cum दराने) रक्कम 2,81,640/- वसूल करणे आवशक आहे. तथापि, सदरील कामाच्या देयकातून स्वामित्वधनाची रुक्कम रूपये 1,40,820/- कपात केलेली आहे. सबब कमी कपात केलेली रक्कम 1,40,820/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

2) जलसिंचन विभाग नियमपुस्तिका परिच्छेद क्रमांक 8.7.3 चे उप परी.(ड) नुसार माती कामासंदर्भात 10 टक्के shrinkage वजा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही. जादा प्रदान रक्कम रूपये 35,699/- वसूल करून शासन खाती भरणा करावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 4 खालील परिशिष्ट-2 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रंमांक झेडपीए-2012/प्र.क्रं.-680/वित-9, दिनांक 31/01/2013 अन्वये या स्तरावर प्रशासकीय, तांत्रीक व निविदा मंजुरीचे केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवॉल्व आगामी सर्वसाधारण सभेत सादर करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक हप्त्यामध्ये 5 टक्के कामाची तपासणी करणे अनिवार्य असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट साहित्य 1099/ प्र.क्र.-56/35, दिनांक 30/06/2000 नुसार बांधकाम साहित्य कामावर वापरण्यापुर्वी साहीत्याचे वारंवारीतेने शासकीय प्रयोगशाळेकडून चाचणी करून घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे योग्य गुणवतेची खात्री होत नाही.

6) काम सुरु होण्यापूर्वी, काम चालू असताना व काम पूर्ण झाल्यानंतरचे कामाचे फोटो संचिकेत दिसून आले नाहीत.

7) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर पुणे यांचे परिपत्रक क्रमांक -मुअ/उविअ-2/प्रशा-05/2611, दिनांक 26/11/2004 अन्वये साईट क्लिअरन्ससाठी अंदाजपत्रकात वेगळी तरतूद करण्यात येऊ नये, अशा सूचना असतानाही सदर बाबीची अंदाजपत्रकात वेगळी तरतूद करून रक्कम रूपये 9,483/- खर्च नोंदविण्यात आला आहे. सबब सदरील खर्च लेखारीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येतो.

**3.451 लेखाशिर्ष-2702-6202 अंतर्गत केलेल्या सी.एन.बी. व नाला खोलीकरण व सरळीकरण कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर कामावर रक्कम रूपये 13,82,407/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाची संचिका उपलब्ध केली. परंतु, मोजमाप पुस्तिका अर्धसमास पत्र क्रमांक 04 दिनांक 10/11/2017 अन्वये लेखी व मौखिक मागणी करूनही उपलब्ध केली नाही. त्यामुळे मंजूर अंदाजपत्रकानुसार काम झाल्याचे खातरजमा करता आली नाही.

2) पाझर तलाव दुरुस्ती मौजे राऊतखेडा तालुका कंधार या कामावर वापरण्यात आलेल्या गौण खानिजामधून स्वामित्व धनाची रक्कम रूपये 2,29,183/- (141.36 दराने) वसूल करणे आवशक आहे. तथापि, सदरील कामाच्या देयकातून स्वामित्वधनाची रक्कम रूपये 1,14,649/- कपात केलेली आहे. सबब कमी कपात केलेली रक्कम 1,14,534/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

3) पाझर तलाव दुरुस्ती मौजे राऊतखेडा तालुका कंधार कामाचे काम सुरु होण्यापूर्वी, काम चालू असताना व काम पूर्ण झाल्यानंतरचे कामाचे फोटो संचिकेत दिसून आले नाहीत

4) जलसिंचन विभाग नियमपुस्तिका परिच्छेद क्रमांक 8.7.3 चे उप परी.(ड) नुसार माती कामासंदर्भात 10 टक्के shrinkage वजा करणे आवश्यक आहे. तथापि, पाझर तलाव दुरुस्ती मौजे राऊतखेडा तालुका कंधारच्या कामातून 10 टक्के shrinkage वजा करण्याची कार्यवाही केली नाही. जादा प्रदान रक्कम रूपये 23,625/- वसूल करून शासन खाती भरणा करावी.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक हप्त्यामध्ये 5 टक्के कामाची तपासणी करणे अनिवार्य असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.452 उपविभाग नायगाव अंतर्गत नाला खोलीकरण व सरळीकरण कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** नाला खोलीकरण व सरळीकरण कामावर रक्कम रूपये 9,53,700/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 4 खालील परिशिष्ट-2 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्रं.-680/ वित-9, दिनांक 31/01/2013 अन्वये या स्तरावर प्रशासकीय, तांत्रीक व निविदा मंजुरीचे केलेल्या कार्यवाहीबाबतचा

अहवॉल्व आगामी सर्वसाधारण सभेत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही.

2) नाला खोलीकरण व सरळीकरण नरसी तालुका नायगाव या कामाच्या कार्यारंभ आदेशामध्ये कामाची मुदत 3 महिने आहे. परंतु, काम पूर्णत्व प्रमाणपत्रावर काम सुरु दिनांक 25/03/2017 व काम पूर्ण दिनांक 29/03/2017 आहे. म्हणजे काम केवळ पाच दिवसांत पूर्ण केलेले दिसून येते कामाची मुदत 3 महिने असताना काम केवळ पाच दिवसांत पूर्ण केल्यामुळे कामाच्या दर्जाबाबत खात्री पटत नाही खुलासा करावा.

3) नाला खोलीकरण व सरळीकरण नरसी तालुका नायगाव या कामाच्या मोजमाप पुस्तिका क्रमांक 59 पान क्रमांक 11, 14, 16 वर कामांच्या measurements मध्ये खाडाखोड केली आहे. तसेच मोजमाप पुस्तिकेवरील पान क्रमांक 59 वरील दिनांक 15/04/2017 खोडून 28/03/2017 केलेली आहे. मोजमाप पुस्तिकेत खाडाखोड करू नये, असे असताना खाडाखोड केली आहे. सदर दिनांकात खाडाखोड करण्याबाबत खुलासा करावा.

4) नाला खोलीकरण व सरळीकरण आदमपूर तालुका बिलोली या कामाच्या मोजमाप पुस्तिका क्रमांक 1624 ची तपासणी केली असता मोजमाप पुस्तिका पान क्रमांक 2 वर change to site slight length अशी नोट लिहिली आहे. नाला खोलीकरण व सरळीकरण काम ज्या जागेवर करणे आपेक्षित व आवश्यक होते, तेथे न करता कामाच्या जागेमध्ये बदल झाला आहे. कामामध्ये बदल झाला असल्यास कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे यांची सदर कामात बदल झालेबाबतची निरीक्षण टिप्पणी व नवीन जागेच्या कामातील बदलास मंजुरी घेणे आवश्यक असताना अशी मंजुरी न घेता काम केले आहे. त्यामुळे कामाचे सुधारित अंदाजपत्रक करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही. तसेच कामाच्या अंदाजपत्रकामध्ये सदर काम 0 ते 570 या साखळीमध्ये मंजूर असताना प्रत्यक्षात 0 ते 300 या साखळीमध्ये काम केल्याचे मोजमाप पुस्तिकेत नोंदी आहेत. कामाचा मंजूर निधी 0 ते 570 या साखळीसाठी वापरणे आवश्यक असताना एकूण 270 या साखळीचे काम कमी करून पूर्ण मंजूर निधी वापरण्यात आला आहे. त्यामुळे काम कमी झाले व पूर्ण रक्कम खर्च करण्यात आली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम 153 प्रमाणे मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणेच काम करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही.

**3.453 पाझर तलाव दुरुस्ती दुधड ताहिमायतनगर कामातील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** पाझर तलाव दुरुस्ती दुधड तालुका हिमायतनगर कामावर रक्कम रूपये 75,635/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 4 खालील परिशिष्ट-2 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्रं.-680/वित-9, दिनांक 31/01/2013 अन्वये या स्तरावर प्रशासकीय, तांत्रीक व निविदा मंजुरीचे केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवॉल्व आगामी सर्वसाधारण सभेत सादर करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही.

2) सदर कामाच्या मोजमाप पुस्तिका क्रमांक 396 ची तपासणी केली असता पान क्रमांक 60 ते 63 वर फक्त कामांच्या बाबींचे परिमाणे ही मोजमाप पुस्तिका क्रमांक 1603 वरून घेण्यात आली आहेत, असे नमूद आहे. परंतु, सदर कामाची संदर्भ मोजमाप पुस्तिका क्रमांक 1603 अर्धसमास पत्र क्रमांक 11 दिनांक 13/12/2017 अन्वये लेखी व मौखिक मागणी करूनही उपलब्ध केली नाही.

3) मोजमाप पुस्तिका क्रमांक 396 वर खालील बाबींचे कामे ही अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा कमी झालेले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम 153 प्रमाणे मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणेच काम करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही. तसेच उपरोक्त प्रमाणे कमी कामे करण्यात आलेली असल्यामुळे कामाचा दर्जा योग्य असल्याबाबत खात्री होत नाही.

4) सदर कामाचे प्रशासकिय मान्यता आदेश हे दिनांक 15/05/2015 चे असताना रूपये 141.36 ने royalty ची परिगणना करणे आवश्यक असताना रूपये 70.68 ने केली आहे. सबब कमी कपात केलेली रक्कम रूपये 1,55,660/- संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा दर्शवावा.

5) पाझर तलाव दुरूस्तीच्या अंदाजपत्रकात सर्वसाधारण अहवालामध्ये (General report) प्रस्तावित कामाचा पुर्व इतिहास नमुद करावा. त्यामध्ये मुळ कैंव्हा झाले आणि कोणत्या लेखाशीर्षाखाली मुळ बांधकामावर किती खर्च करण्यात आला आहे, तसेच दुरूस्तीसाठी प्रस्तावित कामाचे यापुर्वी कोणत्यावर्षी व कोणत्या बाबीची दुरूस्ती करण्यात आली व त्यावर किती खर्च करण्यात आला, याबाबत फॉर्म नंबर 23 मधील माहिती देणे आवश्यक आहे. परंतु, अशी माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर कामाची दुरूस्तीची आवश्यकताबाबत खात्री पटत नाही

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट साहित्य 1099/ प्र.क्र.-56/35, दिनांक 30/06/2000 नुसार बांधकाम साहित्य कामावर वापरण्यापुर्वी साहीत्याचे वारंवारीतेने शासकीय प्रयोगशाळेकडून चाचणी करून घेणे आवश्यक असताना चाचणी अहवॉल्व संचिकेत दिसून आला नाही. त्यामुळे कामाच्या योग्य गुणवतेची खात्री होत नाही.

### 3.454 सिंचन तलाव दुरुस्ती पोटातांडा तालुका हिमायतनगर कामातील अनियमिततााबाबत.

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** सिंचन तलाव दुरुस्ती कामावर रक्कम रूपये 38,811/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संदर्भ मोजमाप पुस्तिका क्रमांक 394 अर्धसमास पत्र क्रमांक 11 दिनांक 13/12/2017 अन्वये लेखी व मौखिक मागणी करूनही उपलब्ध केली नाही. त्यामुळे सदर कामाची संदर्भ मोजमाप पुस्तिका दर्शवून अनुपालन सादर करून पूर्तता दर्शवावी.

2) कामाचे प्रशासकिय मान्यता आदेश हे दिनांक 15/05/2015 चे असताना रूपये 141.36 ने royalty ची परिगणना करणे आवश्यक असताना रूपये 70.68 ने केली आहे.

त्यामुळे कमी कपातीची रक्कम रूपये 56,991/- संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करून शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) सिंचन तलाव दुरूस्तीच्या अंदाजपत्रकात सर्वसाधारण अहवालामध्ये (General report) प्रस्तावित कामाचा पुर्व इतिहास नमुद करावा. त्यामध्ये मुळ कैंव्हा झाले आणि कोणत्या लेखाशीर्षाखाली, मुळ बांधकामावर किती खर्च करण्यात आला आहे, तसेच दुरूस्तीसाठी प्रस्तावित कामाचे यापुर्वी कोणत्या वर्षी व कोणत्या बाबीची दुरूस्ती करण्यात आली व त्यावर किती खर्च करण्यात आला, याबाबत फॉर्म नंबर 23 मधील माहिती देणे आवश्यक आहे. परंतु, अशी माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर कामाची दुरूस्तीची आवश्यकताबाबत खात्री पटत नाही

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट साहित्य 1099/ प्र.क्र.-56/35, दिनांक 30/06/2000 नुसार बांधकाम साहित्य कामावर वापरण्यापुर्वी साहित्याचे वारंवारीतेने शासकीय प्रयोगशाळेकडून चाचणी करून घेणे आवश्यक असताना काम पूर्ण झाल्यानंतर साहित्याची तपासणी करण्यात आली. त्यामुळे कामाच्या योग्य गुणवत्तेची खात्री होत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 180 प्रमाणे मोजमाप-पुस्तिकेतील मोजमापाचे प्रदान केल्यानंतर त्यावर लाल शाईने कर्णरेषा काढून न चुकता खोडून टाकण्यात आले पाहिजे. तथापि, अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

### 3.455 मौजे मंगरुळ, तालुका तुळजापूर येथील गट क्रमांक 712 व 715 मध्ये करण्यात आलेल्या सिमेंट नाला बंधारा बांधकामातील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबादचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात उप विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे उप विभाग तुळजापूर अंतर्गत कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे बांधकाम योजनेतून सदर कामावर रक्कम रुपये 901972/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तूत कामाची निविदा 12.90% कमी दराची स्विकारणेत आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 152 (3) अन्वये स्विकारलेल्या निविदेची रक्कम ही मंजूर अंदाजापेक्षा

10% किंवा रुपये 10000/- या पैकी जी रक्कम अधिक असेल अशा रक्कमेने कमी असल्याचे आढळून आल्यास निम्न दरानुसार नविन संक्षिप्त अंदाज तयार करणे आवश्यक आहे. तसेच मुळ अंदाज रद्द करुन त्या ऐवजी कमी दराने अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक - बीडीजी-2016/प्र.क्र.2/इमा.2 दिनांक 12/02/2016 व महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुध्दिपत्रक क्रमांक - बीडीजी-2016/प्र.क्र.2/इमा-2, दिनांक 17/03/2016 अन्वये अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सुचनांचे पालन करण्यात आलेले नाही. यानुसार निम्नतम निविदाकाराकडून एवढ्या कमी दरात काम करण्याच्या नियोजनाबाबत सविस्तर तपशिल घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नसल्याने सदर काम गुणवत्तापुर्ण झाल्याची खात्री करता येत नाही. तसेच प्राप्त तीनही निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने प्राप्त असून सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 2 व 3 अन्वये घेण्यात आलेल्या परफॉर्मन्स सिक्युरिटी चा धानाकर्ष सदर संचिकेत जोडलेला नाही. तसेच ई-निविदा संबंधित सर्व निविदाकारांचे तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रे सदर संचिकेत जोडलेली नाहीत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 192 अन्वये बांधकामाशी संबंधित सर्व कागदपत्रे एकाच संचिकेत ठेवणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नसल्यामुळे उक्त शासन निर्णयांचे पालन केल्याबाबत व निविदा प्रक्रीया स्पर्धात्मक झाल्याची खात्री करता आली नाही.

3) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक - मुअ/उविअ-2/प्र.शा-05/2611, दिनांक 07/08/2004 नुसार अंदाजपत्रकातील साफ-सफाई ( साईट-क्लिअरन्स) चा समावेश करण्यात येऊ नये असे असतानाही सदर बाबीसाठी रक्कम रुपये 1097/- चे ठेकेदारास नियमबाहय प्रदान केल्यामुळे वसूलपात्र ठरतात.

4) महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 12/11/2013 व महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 01/01/2014 सिमेंट कॉंक्रीट नाला बांधची कामे M-10 मधील संधानकात करावी अशा सुचना आहेत. परंतु लघु पाटबंधारे विभागाने सदरील नियमाप्रमाणे कार्यवाही न करता सिमेंट कॉंक्रीट नाला बांधची कामे ही M-15 मधील संधानकात केलेली आहेत. त्यामुळे कामावर अनावश्यक रक्कम रुपये 86949/- चा जास्तीचा खर्च झाला आहे. जास्तीच्या झालेल्या खर्चाचे रक्कम रुपये 86949/- संबंधिताकडून वसूल करावेत.

5) महाराष्ट्र शासन जल संधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.1/जल-7, दिनांक 12/11/2013 मधील तांत्रिक मान्यता देताना विचारात घ्यावयाच्या बाबीमधील परिच्छेद क्रमांक 7.4 अन्वये मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, दगडी धरणे नाशिक यांनी निश्चित केलेल्या सिमेंट नाला बांधच्या काटछेदाप्रमाणे नाला पातळीच्या खाली पाया खोदाई कठीण खडकापर्यंत व जास्तीत जास्त 1.20 मीटर घेण्यात यावी असे निर्देश आहेत. कठीण खडकात केलेले खोदकामाच्या बाबीवर केलेला जादा खर्च रक्कम रुपये 19450/- संबंधिताकडून वसूल करावेत.

6) लघु पाटबंधारे विभागाने सुधारीत वाढीव दराने रॉयल्टीचे दर कामाध्ये समाविष्ठ करुन कपात न केल्यामुळे रक्कम रुपये 22920/- ची शासन हानी झालेली आहे. त्यामुळे रक्कम रुपये 22920/- संबंधिताकडून वसूल करुन शासन खाती भरणा करावेत.

7) बांधकामातील कांही बाबीवर मंजूर अंदाजातील परिमाणापेक्षा प्रत्यक्षात जास्त काम केल्याने एकुण रक्कम रुपये 30929/- चा जास्त खर्च केला आहे. प्रत्यक्ष जास्त केलेल्या कामास पुर्व मंजुरी घेण्यात आलेली नाही. केवळ अंतिम देयकासोबत संलग्न केलेल्या तुलनात्मक विवरणावर कार्यकारी अभियंता यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 154 (3) नुसार नमुद बाबीपेक्षा जादा खर्चाचे काम तोंडी आदेश देवून पार पाडता येणार नाहीत. बांधकामाच्या बाबतीत वाढ / घट / बदल होत असल्यास त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या सुधारीत तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीशिवाय अशी कामे करु नयेत; अशा सुचना असुनही सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्येतेशिवाय केलेला जास्तीचा खर्च रक्कम रुपये 30929/- वसूलपात्र ठरतो.

8) महाराष्ट्र शासन जल संधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.1/जल-7, दिनांक 12/11/2013 मधील परिच्छेद क्रमांक 7 (4) नुसार नाला तळपातळीच्या खाली पाया खोदाई जास्तीत जास्त 1.20 मिटर घेणे आवश्यक आहे. तसेच मुख्य अभियंता संकल्पन, प्रशिक्षण, संशोधन व सुरक्षितता, महाराष्ट्र अभियांत्रीकी प्रशिक्षण प्रबोधनी नाशिक यांचे पत्र क्रमांक -जाक्र.-म.सं.सं./दध/द.ध.-1/साठवण बंधारा/288/2013, दिनांक 19/08/2013 मधील परिच्छेद क्रमांक 3 अन्वये 1.2 मिटरपेक्षा जास्त खोलीवर पाया खडक असेल तर अशी साईट सिमेंट बंधाऱ्यासाठी अव्यवहार्य समजावी व अशा जागा निवडू नयेत असे निर्देश आहेत. सदर कामाच्या मोजमपा पुस्तिकेची तपासणी केली असता सीएच. नंबर 0.00 ते 26 पर्यंत बॉडी वॉलची खोली 1.20 मिटरपेक्षा जास्त खोदाई केल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर काम उपरोक्त सुचनांचे उल्लंघन करुन अव्यवहार्य ठिकाणी केले आहे.

9) सिमेंट काँक्रीट घनाची तपासणी प्रयोगशाळेकडून करण्यापुर्वीच कामावर साहित्याचा वापर केला आहे. त्यामुळे सदरील काम गुणवत्तापुर्ण झाले आहे याची खात्री होत नाही.

10) पुर्ण झालेल्या कामांची नोंदवही नमुना नंबर 69 ठेवून त्यामध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु सदरील नोंदवही लेखा परीक्षणास दर्शवली नाही.

11) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जल संधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक - पंरास-1009 /प्र.क्र.-40/जल-03, दिनांक 19/10/2001 अन्वये संबंधित मक्तेदारास कामाच्या देखभालीपोटी 10% निधी 2 वर्षे देण्यात येवू नये असे आदेश असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.त्यामुळे दोष दायीत्व निवारण कालावधी मध्ये सदर कामामध्ये कांही दुरुस्ती उद्भवल्यास सदर कंत्राटदार दुरुस्ती करेल यासाठीची कोणतीही सुरक्षा राहिलेली नाही.

12) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जल संधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.65/जल-7, दिनांक 22/01/2013 नुसार नाला बांधाच्या फ्लॅक वॉलवर ऑईल पैंन्टने फलक लिहीने आवश्यक आहे. परंतु कामाचे ठिकाणी असा फलक लिहीण्यात आला नाही.

**3.456 मौजे कुंभारी, तालुका तुळजापूर येथील गट क्रमांक 302 मध्ये करण्यात आलेल्या सिमेंट नाला बंधारा बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबादचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात उप विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे उप विभाग तुळजापूर अंतर्गत पाझर तलाव बांधकाम योजना या योजनेतून काम केले आहे. सदर बाबत रक्कम रुपये 810742/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तूत कामाची निविदा 11.01% कमी दराची स्विकारलेली आहे.महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 152 (3) अन्वये स्विकारलेल्या निविदेची रक्कम ही मंजूर अंदाजापेक्षा 10% किंवा रुपये 10000/- या पैकी जी रक्कम अधिक असेल अशा रक्कमेने कमी असल्याचे आढळून आल्यास निम्न दरानुसार नविन संक्षिप्त अंदाज तयार करणे आवश्यक आहे. तसेच मुळ अंदाज रद्द करुन त्या ऐवजी कमी दरांचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

2) निम्नतम निविदाकाराकडून एवढ्या कमी दरात काम करण्याच्या नियोजनाबाबत सविस्तर तपशिल घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नसल्याने सदर काम गुणवत्तापुर्ण झाल्याची खात्री करता येत नाही. तसेच प्राप्त निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने प्राप्त असून सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 2 व 3 अन्वये घेण्यात आलेल्या परफॉर्मन्स सिक्युरिटी चा धानाकर्ष सदर संचिकेत जोडलेला नाही. तसेच ई-निविदा संबंधित सर्व निविदाकारांचे तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रे सदर संचिकेत जोडलेली नाहीत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 192 अन्वये बांधकामाशी संबंधित सर्व कागदपत्रे एकाच संचिकेत ठेवणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नसल्यामुळे उक्त शासन निर्णयांचे पालन केल्याबाबत व निविदा प्रक्रीया स्पर्धात्मक झाल्याची खात्री करता आली नाही.

3) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक - मुअ/उविअ-2/प्र.शा-05/2611, दिनांक 07/08/2004 नुसार अंदाजपत्रकातील साफ-सफाई ( साईट-क्लिअरन्स) चा समावेश करण्यात येऊ

नये असे असतानाही सदर बाबीसाठी रक्कम रुपये 790/- चे ठेकेदारास नियमबाह्य प्रदान केले आहे. त्यामुळे सदरील रक्कम रुपये 790/- ची वसूली करावी.

4) महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 12/11/2013 व महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 01/01/2014 सिमेंट कॉंक्रीट नाला बांधची कामे M-10 मधील संधानकात करावी अशा सुचना आहेत. परंतु उप विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे उप विभाग परांडा यांनी सदरील नियमाप्रमाणे कार्यवाही न करता सिमेंट कॉंक्रीट नाला बांधची कामे ही M-15 मधील संधानकात केलेली आहेत. त्यामुळे त्यामुळे कामावर अनावश्यक रक्कम रुपये 76984/- चा जास्तीचा खर्च झालेला आहे. जास्तीचा खर्च रक्कम रुपये 76984/- संबंधिताकडून वसूल करावा.

5) महाराष्ट्र शासन जल संधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.1/जल-7,दिनांक 12/11/2013 मधील तांत्रिक मान्यता देताना विचारात घ्यावयाच्या बाबीमधील परिच्छेद क्रमांक 7.4 अन्वये मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, दगडी धरणे नाशिक यांनी निश्चित केलेल्या सिमेंट नाला बांधच्या काटछेदाप्रमाणे नाला पातळीच्या खाली पाया खोदाई कठीण खडकापर्यंत व जास्तीत जास्त 1.20 मीटर घेण्यात यावी असे निर्देश आहेत. तथापि कठीण खडकात केलेले खोदकाम लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. त्यामुळे कठीण खडकात केलेले खोदकामाच्या बाबीवर केलेला खर्च रक्कम रुपये 15261/- संबंधिताकडून वसूल करावेत.

6) लघु पाटबंधारे विभागाने सुधारीत वाढीव दराने रॉयल्टीचे दर कामाध्ये समाविष्ठ करुन कपात न केल्यामुळे रक्कम रुपये 22336/- ची शासन हानी झालेली आहे. त्यामुळे रक्कम रुपये 22336/- संबंधिताकडून वसूल करावेत व शासन खाती भरणा करुन लेखापरीक्षणास पुर्तता दर्शवावी.

7) बांधकामाच्या बाबतीत वाढ / घट / बदल होत असल्यास त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या सुधारीत तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीशिवाय अशी कामे करु नयेत; अशा सुचना असुनही सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्येतेशिवाय केलेला जास्तीचा खर्च रक्कम रुपये 23663/- वसूलपात्र ठरतो. तरी याबाबत योग्य कार्यवाही करुन लेखापरीक्षणातस पुर्तता दर्शवावी.

8) सिमेंट कॉंक्रीट घनाची तपासणी प्रयोगशाळेकडून करण्यापुर्वीच कामावर साहित्याचा वापर केला आहे. त्यामुळे सदरील काम गुणवत्तापुर्ण झाले आहे याची खात्री होत नाही.

### 3.457 मौजे डोकेवाडी, तालुका भूम येथील गट क्रमांक 56 मध्ये सिमेंट नाला बंधाराचे बांधकामातील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबादचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात उप विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे उप विभाग परांडा अंतर्गत कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे बांधकाम योजना या योजनेतून सिमेंट नाला बंधाराचे काम केले आहे. सदर बाबत रक्कम रुपये 863524/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तूत कामाची निविदा 12.10% कमी दराची स्विकारलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 152 (3) अन्वये स्विकारलेल्या निविदेची रक्कम ही मंजूर अंदाजापेक्षा 10% किंवा रुपये 10000/- या पैकी जी रक्कम अधिक असेल अशा रक्कमेने कमी असल्याचे आढळून आल्यास निम्न दरानुसार नविन संक्षिप्त अंदाज तयार करणे आवश्यक आहे. तसेच मुळ अंदाज रद्द करुन त्या ऐवजी कमी केलेले अंदाज कार्यकारी अभियंता यांनी दाखल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

2) निम्नतम निविदाकाराकडून एवढ्या कमी दरात काम करण्याच्या नियोजनाबाबत सविस्तर तपशिल घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नसल्याने सदर काम गुणवत्तापुर्ण झाल्याची खात्री करता येत नाही. तसेच प्राप्त तीनही निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने प्राप्त असून सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 2 व 3 अन्वये घेण्यात आलेल्या परफॉर्मन्स सिक्युरिटी चा धनाकर्ष सदर संचिकेत जोडलेला नाही. तसेच ई-निविदा संबंधित सर्व निविदाकारांचे तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रे सदर संचिकेत जोडलेली नाहीत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 192 अन्वये बांधकामाशी संबंधित सर्व कागदपत्रे एकाच संचिकेत

ठेवणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नसल्यामुळे उक्त शासन निर्णयांचे पालन केल्याबाबत व निविदा प्रक्रीया स्पर्धात्मक झाल्याची खात्री करता आली नाही.

3) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक - मुअ/उविअ-2/प्र.शा-05/2611, दिनांक 07/08/2004 नुसार अंदाजपत्रकातील साफ-सफाई (साईट-क्लिअरन्स) चा समावेश करण्यात येऊ नये असे असतानाही सदर बाबीसाठी रक्कम रुपये 1427/- चे ठेकेदारास नियमबाह्य प्रदान केले आहे. त्यामुळे सदरील रक्कम रुपये 1427/- वसूल करावी.

4) महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 12/11/2013 व महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 01/01/2014 सिमेंट काँक्रीट नाला बांधची कामे M-10 मधील संधानकात करावी अशा सुचना आहेत. परंतु लघु पाटबंधारे विभाग परांडा यांनी सदरील नियमाप्रमाणे कार्यवाही न करता सिमेंट काँक्रीट नाला बांधची कामे ही M-15 मधील संधानकात केलेली आहेत. त्यामुळे कामावर रक्कम रुपये 85415/- चा अनावश्यक जास्तीचा खर्च झाला आहे. जादा खर्चाचे रक्कम रुपये 85415/- संबंधिताकडून वसूल करावा.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक 251 नुसार व महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जल संधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - पं.रा.स.-1091/सी.आर-427/26, दिनांक 11/02/1995 अन्वये बांधकामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी सदरील जमिन जिल्हा परिषदेच्या / पंचायत समितीच्या नावावर झाली पाहिजे. परंतु सदरी अभिलेखे नस्ती सोबत जोडलेले नाहीत.

6) लघु पाटबंधारे विभागाने सुधारीत वाढीव दराने रॉयल्टीचे दर कामाध्ये समाविष्ठ करुन कपात न केल्यामुळे रक्कम रुपये 22602/- ची शासन हानी झालेली आहे. त्यामुळे रक्कम रुपये 22602/- संबंधिताकडून वसूल करावेत.

7) बांधकामाच्या बाबतीत वाढ / घट / बदल होत असल्यास त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या सुधारीत तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीशिवाय अशी कामे करु नयेत; अशा सुचना असुनही सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्येतेशिवाय केलेला जास्तीचा खर्च रक्कम रुपये 23945/- वसूलपात्र ठरतो. तरी याबाबत योग्य कार्यवाही करुन लेखापरीक्षणातस पुर्तता दर्शवावी.

8) कामाच्या बाबतीत सिमेंट काँक्रीट घनाची तपासणी प्रयोगशाळेकडून करण्यापुर्वीच कामावर साहित्याचा वापर केला आहे. त्यामुळे सदरील काम गुणवत्तापुर्ण झाले आहे याची खात्री लेखापरीक्षणात होत नाही.

9) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जल संधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक - पंरास-1009/प्र.क्र.-40/जल-03, दिनांक 19/10/2001 अन्वये संबंधित मक्तेदारास कामाच्या देखभालीपोटी 10% निधी 2 वर्षे देण्यात येवू नये असे आदेश असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.त्यामुळे दोष दायीत्व निवारण कालावधी मध्ये सदर कामामध्ये कांही दुरुस्ती उद्भवल्यास सदर कंत्राटदार दुरुस्ती करेल यासाठीची कोणतीही सुरक्षा राहिलेली नाही.

**3.458 मौजे भातंब्री व मौजे जळकोट, तालुका तुळजापूर येथे करण्यात अलेल्या सिमेंट नाला बंधाराचे बांधकामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबादचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात उप विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे उप विभाग तुळजापूर अंतर्गत् कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे बांधकाम योजनेतून कामे केलेली आहेत. सदर बाबत रक्कम रुपये 1473502/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तूत कामाची निविदा 14.15% कमी दराची स्विकारलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 152 (3) अन्वये स्विकारलेल्या निविदेची रक्कम ही मंजूर अंदाजापेक्षा 10% किंवा रुपये 10000/- या पैकी जी रक्कम अधिक असेल अशा रक्कमेने कमी असल्याचे आढळून आल्यास निम्न दरानुसार नविन संक्षिप्त अंदाज तयार करणे आवश्यक आहे. तसेच मुळ अंदाज रद्द करुन त्या ऐवजी कमी दराने

केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी केलेली नाही.

2) अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सुचनांचे पालन करण्यात आलेले नाही. यानुसार निम्नतम निविदाकाराकडून एवढ्या कमी दरात काम करण्याच्या नियोजनाबाबत सविस्तर तपशिल घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नसल्याने सदर काम गुणवत्तापुर्ण झाल्याची खात्री करता येत नाही. तसेच प्राप्त सर्व निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने प्राप्त असून सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 2 व 3 अन्वये घेण्यात आलेल्या परफॉर्मन्स सिक्युरिटी चा धानाकर्ष सदर संचिकेत जोडलेला नाही. तसेच ई-निविदा संबंधित सर्व निविदाकारांचे तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रे सदर संचिकेत जोडलेली नाहीत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 192 अन्वये बांधकामाशी संबंधित सर्व कागदपत्रे एकाच संचिकेत ठेवणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नसल्यामुळे उक्त शासन निर्णयांचे पालन केल्याबाबत व निविदा प्रक्रीया स्पर्धात्मक झाल्याची खात्री करता आली नाही.

3) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक - मुअ/उविअ-2/प्र.शा-05/2611, दिनांक 07/08/2004 नुसार अंदाजपत्रकातील साफ-सफाई ( साईट-क्लिअरन्स) चा समावेश करण्यात येऊ नये असे असतानाही सदर बाबीसाठी रक्कम रुपये 2063/- चे ठेकेदारास नियमबाह्य प्रदान केल्यामुळे वसूलपात्र ठरतात.

4) महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 12/11/2013 व महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 01/01/2014 सिमेंट कॉंक्रीट नाला बांधची कामे M-10 मधील संधानकात करावी अशा सुचना आहेत. परंतु लघु पाटबंधारे विभागाने सदरील नियमाप्रमाणे कार्यवाही न करता सिमेंट कॉंक्रीट नाला बांधची कामे ही M-15 मधील संधानकात केलेली आहेत. त्यामुळे कामावर अनावश्यक खर्च झाला आहे. उक्त कोष्टकात नमुद केलेल्या कामांच्या संदर्भात जादा झालेला खर्च रक्कम रुपये 143186/- संबंधिताकडून वसूल करावा व शासन खाती भरणा करुन लेखापरीक्षणास पुर्तता दर्शवावी.

5) महाराष्ट्र शासन जल संधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.1/जल-7,दिनांक 12/11/2013 मधील तांत्रिक मान्यता देताना विचारात घ्यावयाच्या बाबीमधील परिच्छेद क्रमांक 7.4 अन्वये मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, दगडी धरणे नाशिक यांनी निश्चित केलेल्या सिमेंट नाला बांधच्या काटछेदाप्रमाणे नाला पातळीच्या खाली पाया खोदाई कठीण खडकापर्यंत व जास्तीत जास्त 1.20 मीटर घेण्यात यावी असे निर्देश आहेत. तथापि कठीण खडकात केलेले खोदकाम लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. त्यामुळे कठीण खडकात केलेले खोदकामाच्या बाबीवर केलेला खर्च रक्कम रुपये 38971/- संबंधिताकडून वसूल करावेत व शासन खाती भरणा करुन लेखापरीक्षणास पुर्तता दर्शवावी.

6) लघु पाटबंधारे विभागाने सुधारीत वाढीव दराने रॉयल्टीचे दर कामाध्ये समाविष्ठ करुन कपात न केल्यामुळे रक्कम रुपये 41618/- ची शासन हानी झालेली आहे. त्यामुळे रक्कम रुपये 41618/- संबंधिताकडून वसूल करावेत.

7) बांधकामाच्या बाबतीत वाढ / घट / बदल होत असल्यास त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या सुधारीत तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीशिवाय अशी कामे करु नयेत. अशा सुचना असुनही सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्येतेशिवाय केलेला जास्तीचा खर्च रक्कम रुपये 54756/- वसूलपात्र ठरतो. तरी याबाबत योग्य कार्यवाही करुन लेखापरीक्षणातस पुर्तता दर्शवावी.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 अन्वये कामाची मुदत संपन्याच्या 15 दिवस आगोदर कामाच्या मुदतवाढीबाबत ठेकेदाराने पत्र कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे यांना सादर करणे आवश्यक आहे. परंतु मौजे जळकोट येथील सिमेंट नाली बांधचे कामा संदर्भात ठेकेदाराने दिनांक 15/03/2017 रोजी कामाच्या मुदतवाढीबाबत पत्र दिले आहे. त्यामुळे सदरील नियमाचे पालन झालेले नाही. तसेच कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग यांनी ठेकेदारचे पत्राचे अनुषंगाने कमाचे ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करुन,

मुदतवाढीबाबच्या कारणांची खातरजमा करुन घेतली पाहिजे. सदर काम पुर्ण होण्यास विलंब होत असेल तर निविदेतील कलम 02 नुसार 1% प्रति दिवस या दराने ठेकेदाराकडून नुकसान भरपाई घेतली पाहिजे. परंतु अशी कार्यवाही लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी केलेली नाही. सबब निविदा अटीप्रमाणे एकुण 10% भरपाईची रक्कम रुपये 96383/- ची वसूली करण्यात यावी.

9) सिमेंट कॉंक्रीट घनाची तपासणी प्रयोगशाळेकडून करण्यापुर्वीच कामावर साहित्याचा वापर केला आहे. त्यामुळे सदरील काम गुणवत्तापुर्ण झाले आहे याची खात्री लेखापरीक्षणात होत नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 अन्वये व निविदा अटीनुसार निविदेच्या प्रत्येक पानावर निविदा स्विकारतांना कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखांहिता 1968 मधील नियम क्रमांक 147 नुसार मंजूर करण्यात आलेला प्रत्येक करारनामा नमुना नंबर 48 मधील नोंदहवीत नोंदविणे आवश्यक आहे. परंतु सदरील नोंदवहीची तपासणी केली असता नोंदवहीतील कांही रकाने भरलेले नाहीत. सदरील नोंदवही अपुर्ण आहे.

**3.459 जलयुक्त शिवार अभियान योजना या योजनेतून करण्यात आलेल्या कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा दुरुस्तीचे कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबादचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात उप विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे उप विभाग तुळजापूर अंतर्गत जलयुक्त शिवार अभियान योजनेतून बांधकामे केलेली आहेत. सदर बाबत रक्कम रुपये 5102483/- 18 कामांवर खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक - मुअ/उविअ-2/प्र.शा-05/2611, दिनांक 07/08/2004 नुसार अंदाजपत्रकातील साफ-सफाई (साईट-क्लिअरन्स) चा समावेश करण्यात येऊ नये असे असतानाही सदर बाबीसाठी रक्कम रुपये 168609/- चे ठेकेदारास नियमबाह्य प्रदान केल्यामुळे वसूलपात्र ठरतात.

2) लघु पाटबंधारे विभागाने सुधारीत वाढीव दराने रॉयल्टीचे दर कामाध्ये समाविष्ठ करुन कपात न केल्यामुळे रक्कम रुपये 773318/- ची शासन हानी झालेली आहे. त्यामुळे रक्कम रुपये 773318/- संबंधिताकडून वसूल करावेत.

3) बांधकामाच्या बाबतीत वाढ / घट / बदल होत असल्यास त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या सुधारीत तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीशिवाय अशी कामे करु नयेत; अशा सुचना असुनही सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्येतेशिवाय केलेला जास्तीचा खर्च रक्कम रुपये 636856/- वसूल करण्यात यावा.

4) सदर काम पुर्ण होण्यास ठेकेदारामुळे विलंब होत असेल तर निविदेतील कलम 02 नुसार 1% प्रति दिवस या दराने ठेकेदाराकडून नुकसान भरपाई घेतली पाहिजे. परंतु अशी कार्यवाही लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी उक्त तक्त्यानुसार व या अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्रमांक 02 मधील काम क्रमांक 1, 2, 4, 5, 6, 7, 8, 9 व 10 च्याबाबतीत केलेली नाही. सबब निविदेतील अटीनुसार एकुण 10% प्रमाणे भरपाईचे रक्कम रुपये 489559/- संबंधित ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावेत.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 152 (3) अन्वये स्विकारलेल्या निविदेची रक्कम ही मंजूर अंदाजापेक्षा 10% किंवा रुपये 10000/- या पैकी जी रक्कम अधिक असेल अशा रक्कमेने कमी असल्याचे आढळून आल्यास निम्न दरानुसार नविन संक्षिप्त अंदाज तयार करणे आवश्यक आहे. परंतु उक्त तक्त्यानुसार व या अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्ठ क्रमांक 02 मधील अनुक्रमांक 1, 2, 4, 5, 7, 8, 9, 10 वरील कामांच्या बाबतीत मुळ अंदाज रद्द करुन त्या ऐवजी कमी दराने अंदाजपत्रक तयार करुन त्यास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असताना विभागाने अशी कार्यवाही केली नाही.

06) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक - बीडीजी-2016/प्र.क्र.2/इमा.-2, दिनांक 12/02/2016 व महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुध्दिपत्रक क्रमांक - बीडीजी-2016/प्र.क्र.2/इमा-2, दिनांक 17/03/2016 अन्वये अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सुचनांचे पालन करण्यात आलेले नाही. निम्नतम निविदाकाराकडून एवढ्या कमी दरात काम करण्याच्या नियोजनाबाबत सविस्तर तपशिल घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नसल्याने सदर काम गुणवत्तापुर्ण झाल्याची खात्री करता येत नाही.

07) मौजे आपसिंगा, तालुका तुळजापूर येथील कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा दुरुस्ती कामाच्या बाबतीत सिमेंट कॉंक्रीट घनाची तपासणी प्रयोगशाळेकडून करण्यापुर्वीच कामावर साहित्याचा वापर केला आहे. तसेच इतर कामांचे बाबतीत सिमेंट कॉंक्रीट घनाचे तपासणी अहवाल संचिकेत दिसून आला नाही. त्यामुळे सदरील काम गुणवत्तापुर्ण झाले आहे याची खात्री होत नाही.

**3.460 मौजे वालवड, तालुका भूम व मौजे शेलगाव, तालुका परांडा येथे करण्यात आलेल्या सिमेंट नाला बंधाराचे बांधकामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबादचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात उप विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे उप विभाग परांडा अंतर्गत कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे बांधकाम योजना या योजनेतून सिमेंट नाला बंधाराची बांधकामे केलेली आहेत. सदर बाबत रक्कम रुपये 1871612/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक - मुअ/उविअ-2/प्र.शा-05/2611, दिनांक 07/08/2004 नुसार अंदाजपत्रकातील साफ-सफाई ( साईट-क्लिअरन्स) चा समावेश करण्यात येऊ नये असे असतानाही सदर बाबीसाठी रक्कम रुपये 3696/- चे ठेकेदारास नियमबाह्य प्रदान केले आहे. त्यामुळे सदरील रक्कम रुपये 3696/- वसूल करावेत.

2) महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 12/11/2013 व महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 01/01/2014 सिमेंट कॉंक्रीट नाला बांधची कामे M-10 मधील संधानकात करावी अशा सुचना आहेत. परंतु लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी सदरील नियमाप्रमाणे कार्यवाही न करता सिमेंट कॉंक्रीट नाला बांधची कामे ही M-15 मधील संधानकात केलेली आहेत. त्यामुळे कामावर अनावश्यक रक्कम रुपये 180336/- चा जास्तीचा खर्च झाला आहे. जादा झालेल्या खर्चाचे रक्कम रुपये 180336/- संबंधिताकडून वसूल करावेत.

3) महाराष्ट्र शासन जल संधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.1/जल-7,दिनांक 12/11/2013 मधील तांत्रिक मान्यता देताना विचारात घ्यावयाच्या बाबीमधील परिच्छेद क्रमांक 7.4 अन्वये मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, दगडी धरणे नाशिक यांनी निश्चित केलेल्या सिमेंट नाला बांधच्या काटछेदाप्रमाणे नाला पातळीच्या खाली पाया खोदाई कठीण खडकापर्यंत व जास्तीत जास्त 1.20 मीटर घेण्यात यावी असे निर्देश आहेत. तथापि कठीण खडकात केलेले खोदकाम लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. त्यामुळे कठीण खडकात केलेले खोदकामाच्या बाबीवर केलेला खर्च रक्कम रुपये 41444/- संबंधिताकडून वसूल करावेत.

4) लघु पाटबंधारे विभागाने सुधारीत वाढीव दराने रॉयल्टीचे दर कामाध्ये समाविष्ठ करुन कपात न केल्यामुळे रक्कम रुपये 47622/- ची शासन हानी झालेली आहे. त्यामुळे रक्कम रुपये 47622/- संबंधिताकडून वसूल करावेत व शासन खाती भरणा करुन लेखापरीक्षणास पुर्तता दर्शवावी.

**3.461 जलयुक्त शिवार अभियान योजना या योजनेतून करण्यात अलेले कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे, पाझर तलाव दुरुस्तीची कामे व सिमेंट नाला बंधारा बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबादचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात उप विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे उप विभाग परांडा अंतर्गत जलयुक्त शिवार अभियान योजना या योजनेतून कामे केले आहेत. सदर बाबत रक्कम रुपये 9542936/- 13 कामांवर खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक - मुअ/उविअ-2/प्र.शा-05/2611, दिनांक 07/08/2004 नुसार अंदाजपत्रकातील साफ-सफाई ( साईट-क्लिअरन्स) चा समावेश करण्यात येऊ नये असे असतानाही सदर बाबीसाठी रक्कम रुपये 178136/- चे ठेकेदारास नियमबाह्य प्रदान केल्यामुळे वसूलपात्र ठरतात.

2) महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 12/11/2013 व महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- जलसं-2012/प्र.क्र.-1/जल-07, दिनांक 01/01/2014 सिमेंट काँक्रीट नाला बांधची कामे M-10 मधील संधानकात करावी अशा सुचना आहेत. परंतु लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी सदरील नियमाप्रमाणे कार्यवाही न करता सिमेंट काँक्रीट नाला बांधची कामे ही M-15 मधील संधानकात केलेली आहेत. त्यामुळे कामावर अनावश्यक रक्कम रुपये 85557/-चा जास्तीचा खर्च झाला आहे. उक्त कोष्टकात नमुद केलेल्या कामांच्या संदर्भात जास्तीच्या झालेल्या खर्चाचे रक्कम रुपये 85557/- संबंधिताकडून वसूल करावेत व शासन खाती भरणा करुन लेखापरीक्षणास पुर्तता दर्शवावी.

3) मौजे गोजवाडा येथील सिमेंट नाला बंधारा बांधकामावरील डिवॉटरिंग ऑफ फाउंडेशन ड्युरिंग इनटाअर एक्सकॅव्हेशन इटीसी. ह्या बाबीवर रक्कम रुपाये 1464/- चा खर्च नोंदविला आहे. परंतु सदर यंत्राचे लॉगबूक संचिकेत व प्रमाणकास संलग्न केलेले नाही, त्यामुळे याबाबीवर नोंदविलेला खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

4) महाराष्ट्र शासन जल संधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - जलसं-2012/प्र.क्र.1/जल-7,दिनांक 12/11/2013 मधील तांत्रिक मान्यता देताना विचारात घ्यावयाच्या बाबीमधील परिच्छेद क्रमांक 7.4 अन्वये मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, दगडी धरणे नाशिक यांनी निश्चित केलेल्या सिमेंट नाला बांधच्या काटछेदाप्रमाणे नाला पातळीच्या खाली पाया खोदाई कठीण खडकापर्यंत व जास्तीत जास्त 1.20 मीटर घेण्यात यावी असे निर्देश आहेत. तथापि कठीण खडकात केलेले खोदकाम लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. त्यामुळे कठीण खडकात केलेले खोदकामाच्या बाबीवर केलेला खर्च रक्कम रुपये 26366/- संबंधिताकडून वसूल करावेत व शासन खाती भरणा करुन लेखापरीक्षणास पुर्तता दर्शवावी.

5) लघु पाटबंधारे विभागाने सुधारीत वाढीव दराने रॉयल्टीचे दर कामाध्ये समाविष्ठ करुन कपात न केल्यामुळे रक्कम रुपये 766532/- ची शासन हानी झालेली आहे. त्यामुळे रक्कम रुपये 766532/- संबंधिताकडून वसूल करावेत व शासन खाती भरणा करुन लेखा परीक्षणास पुर्तता दर्शवावी.

6) बांधकामाच्या बाबतीत वाढ / घट / बदल होत असल्यास त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या सुधारीत तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीशिवाय अशी कामे करु नयेत; अशा सुचना असुनही सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्येतेशिवाय केलेला जास्तीचा खर्च रक्कम रुपये 652674/- वसूल करण्यात यावा. तरी याबाबत योग्य कार्यवाही करुन लेखापरीक्षणातस पुर्तता दर्शवावी.

7) काम पुर्ण होण्यास ठेकेदारामुळे विलंब होत असेल तर निविदेतील कलम 02 नुसार 1% प्रति दिवस या दराने ठेकेदाराकडून नुकसान भरपाई घेतली पाहिजे. परंतु अशी कार्यवाही लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी काम क्रमांक 5, 8 व 10 च्याबाबतीत केलेली नाही. सबब निविदेतील अटीनुसार एकुण 10% प्रमाणे भरपाईचे रक्कम रुपये 329024/- संबंधित ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावेत.

**3.462 उस्तुरी ता निलंगा येथिल कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा क्रमांक 02 या कामावरील केलेल्या खर्चातील अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर च्या सन 2016-2017 या वित्तिय वर्षाचे लेखापरीक्षणात निवड महिन्यांतील कामांच्या संचिकेची तपासणी केली असता 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 41,28,214/- खर्च नोंदविला आहे. उपरोक्त प्रमाणकान्वये नोंदविलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 4(अ) क्रमांक 67, दिनांक 11 मे 2015 नुसार गौणखनिज स्वामित्वधनाची रक्कम रुपये 141.34/- प्रती घनमीटर याप्रमाणे कपात करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिकेतील पान क्रमांक 31 वरील बाब क्रमांक 09- Providing puddle filling with impervious soil या बाबीची Qty- 404.42 cum X दर रुपये 141.36/- प्रमाणे गौणखनिज स्वामित्धनाची रक्कम रुपये 57,168/- कपात केलेली नाही. सदर रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) पाणी उपसणेसाठी 50 बीएचपी मोटार X रुपये 20.90 दराने वापरण्यात आली आहे. तथापि सदर मोटारीचे लॉगशीट नस्तीसोबत जोडले नसल्यामुळे झालेला खर्च रक्कम रुपये 1,045/- वसूल होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जिपर - 2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31 डिसेंबर 2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहीती दर्शविणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि, जिल्हा परिषदेने नामफलक बसविल्याबाबत मोजमाप पुस्तिकेवर खर्च नोंदविलेला आहे. परंतु कामाच्या छायाचित्रात नामफलक बसविल्याचे दिसत नाही. त्यामुळे सदर नामफलकावरील खर्च रक्कम रुपये 4,800/- वसूल करुन शासन खाती भरणा केलेचे चलन दर्शवावे.

4) संबंधित कंत्राटदाराच्या देयकांतून गौण खनिजावर रॉयल्टी ( रक्कम रुपये 1,76,105/-) व्यतिरिक्त रॉयल्टीच्या 10% दराने जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंशदान रक्कम रुपये 17]610/- वसूल करुन भरणा केलेचे चलनासह अनुपालन दर्शवावे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 185 अन्वये जिल्हा परिषदेस जमीन संपादन करण्यासाठी जिल्हा परिषदेने भुसंपादनाची / जमीन ताबा घेतल्या बाबतची कार्यवाही संचिकेसोबत कागदपत्रे नसल्याने भूसंपादन केल्याची खात्री करता आली नाही तरी याबाबत लेख्याधारे पूर्तता दर्शवावी.

6) देयक तपासणीसाठी जिल्हा दूरसूची उपलब्ध करुन देणेत आलेली नसलेने अंदाजपत्रकांतील दराची खात्री करता आली नाही त्यामुळे बाबनिहाय दर योग्य असल्याची खात्री पटवावी.

7) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र. क्र.680 / वित्त-9, दिनांक 19 मार्च 2012 मधील टीपांनुसार विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्वीकारलेची माहिती स्थायी समिती व विषय समिती बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे. आणि प्रत्येक विभागांनी कामाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करावयास पाहिजे, परंतु अशी कार्यवाही झालेचे दिसून आले नाही

8) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/जल 1, दिनांक 31/07/2000 नुसार पूर्ण झालेल्या योजना सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीसाठी लाभधारकांच्या सहकारी पाणी वापर संस्था यांना हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. तथापि योजना हस्तांतरील केलेचे अभिलेख संचिकेत नाहीत.

9) सदर कामासंबंधातील कामाचे आदेश दिनांक 22/09/2016 आहेत. काम पूर्णत्वाचा दिनांक 31/03/2017 रोजीचा आहे आणि कामांतील वापर केलेल्या साहित्यांचा चाचणी अहवाल दिनांक 23/03/2017 रोजीचा आहे. यावरुन काम सुरु होण्यांपूर्वी साहित्यांचा चाचणी करणे आवश्यक असता अशी कार्यवाही केलेली नाही असे दिसून येते.

**3.463 गंगापूर, ता लातूर येथिल कोल्हापूर पध्दतीचा बंधारा क्रमांक 02 बांधकामाच्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी सन 2016-2017 या वित्तीय वर्षात कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे लेखाशिर्षांतर्गत रक्कम रुपये 16,72,844/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संबंधित कंत्राटदाराच्या देयकांतून गौण खनिजावर रॉयल्टी व्यतिरिक्त रॉयल्टीच्या 10% दराने जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंशदान रक्कम रुपये 10,963/- उपरोक्त तक्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे वसूल करुन भरणा केलेचे पूर्तता अनुपालन दर्शवावे.

2) उपरोक्त काम Abutment wing wall आणि WEIR (Body wall) या दोन भागांत विभागलेले आहे. सदर कामासाठी जलसंपदा विभाग, प्रादेशिक दरसूचि 2011-12 ई संधनक काम अनुक्रमांक 18 नुसार मंजूर दरसूचीतील दरापेक्षा ज्यादा दर घेऊन ठेकेदारास रक्कम प्रदान केलेने शासनाचे रक्कम रुपये 28,638/- चे नुकसान झालेले आहे. ते वसूल करुन शासनखाती भरणा केलेचे साधार अनुपालन दर्शवावे.

3) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक 11/02/2010 नुसार संलग्नित केलेली अधिसूचना क्रमांक गौखनि/10/1009/प्र.क्र.309/ख (1)(2) व दिनांक 11/02/2010 अन्वये, गौणखनिज स्वामित्वधनाची रक्कम रुपये 70.68/- प्रती घनमीटर याप्रमाणे देयकांत कपात केलेली आहे. उपरोक्त काम Abutment wing wall आणि WEIR (Body wall) या दोन भागांत विभागलेले आहे. सदर कामाच्या दर पृथ्थकरण अहवालाप्रमाणे वाळू व खडी चे प्रमाण मोजमाप पुस्तिकेमध्ये रॉयल्टी कपात करतांना घेतलेले नाही म्हणजेच रॉयल्टीसाठी वाळू व खडी चे प्रमाण कमी दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे शासनाचे रुपये 5,443/- चे नुकसान झालेले आहे. त्याचा शासनखाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

4) तसेच supply of FRP Needls, supply of FRP Channel व pro & fixing MS sill beam यांचे दराबाबत अधिक्षक अभियंता यांचे आदेश दर्शविले नसलेने देयकांत अदा केलेले दर वाजवी असलेची खात्री लेखापरीक्षणात करता आली नाही. तरी उक्त आदेश दर्शवून दिलेले दर योग्य व मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे काम केलेबाबत खात्री पटवावी.

5) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक ग्रासयो 2008/प्र.क्र.75/यो.9, दिनांक 29 मे 2008 व क्रमांक परास/1089/प्र.क्र.14525/35, दिनांक 15/02/1990 नुसार जिल्हा परिषद योजनेच्या कामावर वापरलेल्या सर्व साहित्याचे चाचणी/तपासणी अहवाल पंतप्रधान ग्रामीण रोजगार योजना यांचे प्रयोगशाळेत करावयाचे असताना Building Research Institute, Latur या खाजगी संस्थेकडे केली आहे. तथा शासकीय प्रयोगशाळेकडून घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे कामांवर वापरलेल्या साहित्याचा दर्जा व गुणवत्ता योग्य असलेविषयी खातरजमा करता आली नाही.

6) सचिव जलसंधारण यांचेकडील पत्र क्रमांक पंरास/100/प्र.क्र./64/जल-3/ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग दिनांक 31/01/2002 नुसार कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे नवीन कामे हाती घेताना ते संपूर्ण काम एकाच कंत्राटदारास दयावे व उक्त कंत्राटदाराने बंधाऱ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याची 2 ते 3 वर्ष देखभाल केली पाहिजे अशी अट टाकावी असे स्पष्ट नमूद असताना अशा प्रकारे अट न घालताच कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. त्यामूळे दोष दायित्व अवधी मध्येच कामाची दुरुस्ती जिल्हा परिषदेने स्वतःच्या / शासनाच्या निधीतून केलेची शक्यता नाकारता येत नाही.

7) सदर कामासाठी संजय बाबर यांना दिनांक 13/10/2015 रोजी 12 महिन्यांच्या मुदतीत काम पूर्ण करणेचे अटिवर कार्यारंभ आदेश दिलेला होता. याचाच अर्थ दिनांक 12/10/2016 रोजी काम पूर्ण होणे आवश्यक होते. मात्र त्यांनी 31/03/2017 अखेर काम पूर्ण केलेले नाही. म्हणजेच 05 महिना 19 दिवस कामास विलंब झालेला आहे आणि त्यापुढे काम केव्हा पूर्ण झाले हे संचिकेत नमूद नाही तसेच विलंब कालावधी 170 दिवसांसाठी रुपये 10/- प्रमाणे रक्कम रुपये 1,700/- वसूल होणे आवश्यक असतांना रुपये 1,490/- देयकांतून वसूल केलेले आहेत. रुपये 210/- ची वसूली केलेली नाही. रुपये 210/- वसूल करुन शासनखाती भरणा केलेचे अनुपालन दर्शवावे.

**3.464 जलयुक्त शिवार अभियान लेखाशिर्षांतर्गत केलेल्या कामांतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात निवड महिन्यांत जलयुक्त शिवार अभियान लेखाशिर्षांतर्गत रक्कम रुपये 89,05,680/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी, लातूर यांचे पत्र क्रमांक 2016/गौखवि/जिखप्र/सीआर, दिनांक 22/11/2016 अन्वये, जिल्हा खनिज प्रतिष्ठान करीता अंशदान दिनांक 12/01/2015 पासून संकलीत करणेबाबत आदेश आहेत. त्यानुषंगाने, शासकिय कामासाठी वापरण्यात येणाऱ्या गौण खनिजावर रॉयल्टी व्यतिरिक्त रॉयल्टीच्या 10% दराने जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंशदान (अतिरिक्त निधी) संबंधित कंत्राटदाराच्या/ खदानधारकाच्या देयकांमधून पुर्वलक्षी प्रभावाने कपात करुन जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या खात्यांवर जमा करुन त्यासंबंधितचा अहवाल जिल्हाधिकारी लातूर यांना सादर करण्याचे आदेश आहेत. सदर प्रतिष्ठानसाठी कपात करुन जमा करण्यात आलेल्या रकमांची स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येऊन त्याचा मासिक अहवाल दर महिन्याच्या 01 तारखेस स्वतंत्रपणे जिल्हाधिकारी लातूर यांना सादर करणेचे आदेश आहेत. तथापि लघु पाटबंधारे जिल्हा परिषद लातूर यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तरी संबंधित कंत्राटदाराच्या देयकांतून गौण खनिजावर रॉयल्टी व्यतिरिक्त रॉयल्टीच्या 10% दराने जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंशदान रक्कम रुपये 3,06,806/- उपरोक्त तक्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे वसूल करुन भरणा केलेचे पूर्तता अनुपालन दर्शवावे.

2) कामासाठी कमी किंमतीच्या मुद्रांकावर करारनामा केलेने शासनाचे रक्कम रुपये 800/- चे नुकसान झालेले आहे. तरी उक्त रक्कम संबंधितांकडून वसूल करुन शासन खाती भरणा केलेचे पूर्तता अहवाल दर्शवावा.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक ग्रासयो 2008/प्र.क्र.75/यो.9, दिनांक 29 मे 2008 व क्रमांक परास/1089/प्र.क्र.14525/35, दिनांक 15/02/1990 नुसार जिल्हा परिषद योजनेच्या कामावर वापरलेल्या सर्व साहित्याचे चाचणी/तपासणी अहवाल पंतप्रधान ग्रामीण रोजगार योजना यांचे प्रयोगशाळेत करावयाचे असताना Building Research Institute, Latur या खाजगी संस्थेकडे केली आहे. तथा शासकीय प्रयोगशाळेकडून घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यांमुळे कामांवर वापरलेल्या साहित्याचा दर्जा व गुणवत्ता योग्य असलेविषयी खातरजमा करता आली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 चे नियम 152(3) नुसार स्विकारलेल्या निविदेची रक्कम ही मंजूर अंदाजापेक्षा 10% किंवा रुपये 10,000/- यापैकी जी रक्कम अधिक असेल अशा रकमेने कमी असल्याचे आढळून येईल तेंव्हा निविदेतील निम्न दरानूसार नवीन संक्षिप्त अंदाज तयार करण्यात येतील व मूळ अंदाज रद्द करण्यात येतील व सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेण्यात येईल. कमी दराने निविदा मंजुर केलेल्या आहेत. तथापि, सुक्ष्म दराने सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेण्यात आलेली नाही.

5) सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक सीएटी-1086/सीआर-196/इमारती-2 दिनांक 05 जून 1986 नुसार, अंदाजित दरापेक्षा जेवढे जास्त दर स्विकारण्याचा प्रस्ताव असतो तेव्हा त्या जादा दरामुळे येणारे आधिक्य कोणत्या कारणास्तव किती रकमेपर्यत (तपशीलवार आकडेमोडी आधारे) समर्थनीय आहे, याचे कारणनिहाय विश्लेषण नमूद करुन जादा दराचे समर्थन कार्यकारी अभियंत्यानी देणे आवश्यक आहे. तथापि अशी तपशिलवार कार्यवाही झालेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषदा पंचायत समित्या लेखासंहिता, 1968 चे नियम 87 नुसार प्राप्त साहीत्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही न करता उपरोक्त कामाच्या देयकांचे अंतीम प्रदान केलेले आहेत.

7) उपरोक्त अनेक कामांच्या संचिकेमध्ये कामाचे मंजुर अंदाजपत्रक जोडलेले नाही. तसेच जिल्हा दरसूची ही तपासणीसाठी उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे उक्त कामे मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे, आराखाडयाप्रमाणे झाले आहे याची लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही तरी मंजुर अंदाजपत्रक व जिल्हा दरसूची दर्शवुन अनुपालन सादर करावे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 चे नियम 197 नुसार नमुना 69 मध्ये पूर्ण केलेल्या बांधकामाची नोंदवही ठेवणे व त्यातील संपूर्ण रकाने भरणे आवश्यक आहे. तथापि, अशी नोंदवही ठेवून पूर्ण केलेल्या कामाच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यांमुळे एकाच कामांवर वारंवार खर्च केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 चे नियम 147 अन्वये प्रत्येक करार नमुना 48 मधील नोंदवहीत नोंदवून कंत्राटदाराला दिलेल्या रकमेची नोंद ही नोंदवहीत करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही.

10) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र. क्र.680 / वित्त-9, दिनांक 19 मार्च 2012 मधील टीपांनुसार विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्वीकारलेची माहिती स्थायी समिती व विषय समिती बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे आणि प्रत्येक विभागांनी कामाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करावयास पाहिजे. परंतु अशी कार्यवाही झालेचे दिसून आले नाही.

11) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/ जल 1, दिनांक 31/07/2000 नुसार पूर्ण झालेल्या योजना सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीसाठी लाभधारकांच्या सहकारी पाणी वापर संस्था यांना हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. तथापि योजना हस्तांतरील केलेचे अभिलेख संचिकेत नाहीत. त्यामुळे उक्त शासन निर्णयाचे पालन झालेले नसलेने यासंबंधाने पूर्तता अनुपालन दर्शवावे.

12) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 चे नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना नंबर 23 मध्ये नोंदी घेणे आवश्यक असताना नमुना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

13) सचिव जलसंधारण यांचेकडील पत्र क्रमांक पंरास/100/प्र.क्र./64/जल-3/ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग दिनांक 31/01/2002 नुसार कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे नवीन कामे हाती घेताना ते संपूर्ण काम एकाच कंत्राटदारास दयावे व उक्त कंत्राटदाराने बंधाऱ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याची 2 ते 3 वर्ष देखभाले केली पाहिजे अशी अट टाकावी असे स्पष्ट नमूद असताना अशा प्रकारे अट न घालताच कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. त्यामुळे दोष दायित्व अवधी मध्येच कामाची दुरुस्ती जिल्हा परिषदने स्वत:च्या / शासनाच्या निधीतून केलेची शक्यता नाकारता येत नाही.

**3.465 येळवट, ता औसा येथिल कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधकामाच्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूरच्या सन 2016-2017 या वित्तिय वर्षाचे लेखापरीक्षणात निवड महिन्यांतील कामांच्या संचिकेची तपासणी केली असता रक्कम रुपये 18,91,942/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संबंधित कंत्राटदाराच्या देयकांतून गौण खनिजावर रॉयल्टी (रक्कम रुपये 64,897/-) व्यतिरिक्त रॉयल्टीच्या 10% दराने जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंशदान रक्कम रुपये 6,490/- वसूल करुन भरणा केलेचे अनुपालन दर्शवावे.

2) सदरील कामाचा रुपये 1,100/- च्या महसुली मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना करारनामा केलेला नाही. त्यामुळे शासनाचे रुपये 1,100/- चे नुकसान झालेले आहे. तरी उक्त रक्कम संबंधितांकडून वसूल करावी.

3) उपरोक्त काम Abutment wing wall आणि WEIR (Body wall) या दोन भागांत विभागलेले आहे. सदर कामासाठी जलसंपदा विभाग, प्रादेशिक दरसूचि 2011-12 ई संधनक काम अनुक्रमांक 18 नुसार मंजूर दरसूचितील दरापेक्षा ज्यादा दर घेऊन ठेकेदारास रक्कम प्रदान केलेने शासनाचे रक्कम रुपये 27,171/- चे नुकसान झालेले आहे. ते वसूल करावे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषदा पंचायत समित्या लेखासंहिता, 1968 चे नियम 67 नुसार कामाच्या प्रगतीची नोंदवही नमुना नंबर 23 मध्ये नोंदी घेणे आवश्यक असताना नमुना नंबर 23 मध्ये कामाच्या प्रगतीची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

5) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक लपायो 1099/प्र.क्र.347/जल 1, दिनांक 31/07/2000 नुसार पूर्ण झालेल्या योजना सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीसाठी लाभधारकांच्या सहकारी पाणी वापर संस्था यांना हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. तथापि योजना हस्तांतरील केलेचे अभिलेख संचिकेत नाहीत. त्यामुळे उक्त शासन निर्णयाचे पालन झालेले नसलेने यासंबंधाने पूर्तता अनुपालन दर्शवावे

6) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जिपर - 2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31 डिसेंबर 2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहीती दर्शविणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि, जिल्हा परिषदेने अंदाजपत्रकात नामफलकाची तरतुद केलेली नाही व नामफलक बसविलेला नाही. त्यामुळे  उक्त कामाची तपशिलवार माहिती जनतेस होऊ शकली नाही.

7) तसेच supply of FRP Needls, supply of FRP Channel व pro & fixing MS sill beam यांचे दराबाबत अधिक्षक अभियंता यांचे आदेश दर्शविले नसलेने देयकांत अदा केलेले दर वाजवी असलेची खात्री लेखापरीक्षणात करता आली नाही. तरी उक्त आदेश दर्शवून दिलेले दर योग्य असलेची खात्री पटवावी.

8) सदर कामासाठी रोकडेश्वर कन्स्ट्रक्शन यांना दिनांक 03/02/2014 रोजी 09 महिन्यांच्या मुदतीत काम पूर्ण करणेचे अटी वर कार्यारंभ आदेश दिलेला होता. याचाच अर्थ दिनांक 02/11/2014 रोजी काम पूर्ण होणे आवश्यक होते. मात्र त्यांनी दिनांक 28/12/2016 रोजी काम पूर्णत्वाच्या दाखल्यांनुसार काम पूर्ण केलेले आहे म्हणजेच 02 वर्षे 01 महिना 26 दिवस विलंबाने काम पूर्ण केलेले आहे. यावर पुढिल अभिप्राय नोंदविण्यात येतात.

अ) महाराष्ट्र जिल्हा परिषदा पंचायत समित्या लेखासंहिता, 1968 मधील नियम 148 नुसार कामाची मुदत संपण्यापूर्वी 15 दिवस अगोदर मुदतवाढ अर्ज करणे आवश्यक असतांना त्यांनी दिनांक 09/02/2016 रोजी मुदतवाढीकरीता अर्ज दिलेला आहे. म्हणजेच त्यांनी 01 वर्ष 03 महिने 21 दिवस विलंबाने मुदतवाढीसाठी अर्ज दिलेला आहे.

ब) कामांवर पहिल्या धावत्या देयकांपोटी जवळ जवळ रुपये 16.62 लक्ष इतका निधी अकारण पडून राहिला, त्याचा कोणताही उपयोग जनतेसाठी झाला नाही, लाभार्थि त्यांचे हक्काच्या लाभापासून वंचित राहिले. या गंभिर अनियमिततेसाठी जबाबदारी निश्चित न करता केवळ नाममात्र रुपये 20/- प्रतिदिन प्रमाणे दंडाची आकारणी केलेचे दिसून येते. तथापि, विहित कालावधीत काम पूर्ण न झालेमूळे बी-1 निविदेतिल कराराच्या अटी व शर्ती मधील (पान क्रमांक 40) अट क्रमांक 02 नुसार, नुकसान भरपाईची रक्कम संबंधित कसूरदार कंत्राटदारांकडून वसूल करुन अनुपालन दर्शवावे.

क) काम पूर्णत्वाच्या विलंबास कंत्राटदार जबाबदार असेल तर त्यांचेवर सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 05/ 06/ प्र.क्र.53/ इमा.02, दिनांक 28/09/2006 नुसार कार्यवाही प्रस्तावित करणे अपेक्षित होते. पण विलंबाची कोणतीही सखोलवार प्रशासकिय व तांत्रिक चौकशी न करता केवळ पाणीटंचाई या कारणास्तव मुदतवाढ दिलेली आहे. प्रस्तुत संचिकेची पाहणी करता वेळोवेळी कामाच्या प्रगतिचा आढावा कोणीही घेतलेला नाही हे दिसून येते. त्यामुळेच उक्त काम करण्यास विलंब झालेला आहे.

**3.466 मौ.घोनसीतांडा ता जळकोट पाझर तलाव क्र.1 दुरुस्तीच्या कामाच्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** लघुपाटबंधारे विभाग जिल्हा परिषद लातूर सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात निवड महिन्यातील उपरोक्त कामाच्या नस्तीची तपासणी केली असता सदरील कामावर एकूण रक्कम रुपये 2,07,000/- इतका खर्च नोंदवलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेड 2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 19 मार्च 2012 मधील टीप 1 नुसार विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची

व निविदा स्वीकारलेची माहिती स्थायी समिती व विषय समितीस सादर करावयास पाहिजे. परंतु अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

2) मुंबई गौण खनिज नियम 1955 चे नियम 18,22,29 अनुसूची 1 मधील दर महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/206/प्र.क्र.57/ख, दिनांक 15/05/2006 नुसार गौण खनिज स्वामित्व धनाचे दरानुसार स्वामित्व धन एकूण रूपये 80,929/- इतकी कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेली नाही. संबंधितांकडून वसूल करुन शासन खाती भरणा करावी व लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे

3) सदरील कामावरील स्वामित्वधनाची रक्कम रुपये 80,929/- च्या 10% रुपये 8,093/- संबंधितांकडून वसूल करावी.

4) बांधकामाचे स्टँडर्ड स्पेसिफिकेशनच्या परि क्रमांक 6.1 नुसार क्लिअरन्स ऑफ द साईट ही बाब खोदकामात अंतर्भूत असल्याने मोजमाप पुस्तिकेतील बाब क्रमांक 01-परिमाण 2070 sqm x दर रुपये 4.35 एकूण रक्कम रुपये 9,005/- इतका झालेला खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. अशाच प्रकारची अनियमितता इतर कामांतही झाली असणेची शक्यता असलेने अशा कामांचा शोध घेऊन ज्यादा प्रदानाची रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करावी व अनुपालन दर्शवावे.

5) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/44/33, दिनांक 22 डिसेंबर 2000 नुसार मोजमाप पुस्तिकेत नोंद घेणाऱ्या अभियंता यांनी मोजमापाच्या नोंदी घेतल्यानंतर मोजमाप पुस्तिकेत दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषदा पंचायत समित्या लेखासंहिता, 1968 चे नियम 180 नुसार अंतिम मोजमाप घेवून रक्कम प्रदान केल्यानंतर मोजमापावर लाल शाईने कर्ण रेषा मारणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

7) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट क्रमांक 12 नियम 10 नुसार निविदेतील प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झाली नाही खुलासा करुन आनुपालन दर्शवावे.

**3.467 तळीखेड, ता निलंगा येथिल नाला खोलीकरण या कामावरील केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, लातूर च्या सन 2016-2017 या वित्तिय वर्षाचे लेखापरीक्षणात निवड महिन्यांतील कामांच्या संचिकेची तपासणी केली असता रक्कम रुपये 1,42,962/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. उपरोक्त काम दोन बाबीमध्येच केले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 चा नियम 153(1)(2), 156 प्रमाणे मंजूर आराखडयाप्रमाणे काम करणे आवश्यक असतांना तसे काम केलेले नाही. उपरोक्त बाबींवरुन सदरचे काम 50% ही झालेले नसलेने उक्त काम मंजूर अंदाजपत्रकांप्रमाणे व आराखाडयांप्रमाणे झालेले नाही हे दिसून येते. कामांमध्ये प्राथमिक सर्वसाधारण अहवाल गांभिर्याने व वस्तुनिष्ठ स्वरुपात केला नसलेने काम पुर्ण न करताच आहे त्या स्थितीमध्ये अंतिम केले आहे. त्यामुळे ज्या उद्देशाने काम मंजूर केले होते तो उद्देश सफल झाला नाही, जनतेस त्याचा फायदा झाला नाही. तसेच काम आहे त्या स्थितीत अंतिम करणेबाबतची कोणतेही कारणे, अभिलेख संचिकेत नाहीत. त्यामुळे उक्त कामांवरील खर्च रक्कम रुपये 1,42,962/- निष्फळ ठरला आहे. याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. सदरची रक्कम वसूल करावी.

2) सदर कामासाठी मंजूर दरसूचितील दरापेक्षा ज्यादा दर आकारुन ठेकेदारास ज्यादा प्रदान केलेने शासनाचे रक्कम रुपये 5,434/- चे नुकसान झालेले आहे. ते वसूल करावे.

3) आयकर अधिनियम 1961 चे कलम 206 aa नुसार TAN/PAN क्रमांक नसल्यास 20% दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. तथापी काम क्रमांक 01 संबंधीत ग्रामपंचायत नरवटवाडीचा TAN/PAN क्रमांक

नसताना केलेल्या कामातून 2.30% आयकर कपात केलेला आहे. तरी 17.70% कमी कपात आयकर रक्कम रुपये 25,304/- संबंधितांकडून वसुल करुन आयकर खाती भरणा करावी.

4) बांधकामाचे स्टँडर्ड स्पेसिफिकेशनच्या परि क्रमांक 6.1 नुसार क्लिअरन्स ऑफ द साईट ही बाब खोदकामात अंतर्भूत असल्याने मोजमाप पुस्तिकेतील बाब क्रमांक 01-परिमाण 1662.5 sqm x दर रुपये 1.55 एकूण रक्कम रुपये 2,577/- इतका झालेला खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. अशाच प्रकारची अनियमितता इतर कामांतही झाली असणेची शक्यता असलेने अशा कामांचा शोध घेऊन ज्यादा प्रदानाची रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करावी व अनुपालन दर्शवावे.

5) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र. क्र.680 / वित्त-9, दिनांक 19 मार्च 2012 मधील टीपांनुसार विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची व निविदा स्वीकारलेची माहिती स्थायी समिती व विषय समिती बैठकीत अवलोकनार्थ सादर करावयास पाहिजे. आणि प्रत्येक विभागांनी कामाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करावयास पाहिजे परंतु अशी कार्यवाही झालेचे दिसून आले नाही.